# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level*

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN:2230-9578 January - 2026 Volume-18 Issue-1(IV)*





**Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole**

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org




JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

ISSN: 2230-9578

*ISSN: 2230-9578*
*January - 2026*
*Volume-18 Issue-1(IV)*

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

## Volume No-18, Issue-1(IV), January - 2026

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

***Disclaimer***

*The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.*
***© All rights reserved with the Editors.***

**Journal of Research and Development**

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org


# JOURNAL PARTICULARS

| **Name of Journal** | **JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT** |
|---|---|
| **Frequency** | Monthly : Jan to Dec (12 issues per year) |
| **ISSN** | 2230-9578 |
| **Publisher** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Chief Editor** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Copy right** | Journal of Research and Development |
| **Starting Year** | January 2010 |
| **Subject** | Multi-Disciplinary |
| **Review Process** | Double Blind Peer |
| **Language** | English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages. |
| **Publication Format** | Print |
| **Access** | OPEN ACCESS |
| **License** | Creative Commons (CC BY-NC-SA 4.0) |
| **Phone No.** | +91 93256 65856, +91-8888454089 |
| **Email** | jrdrvb.org@gmail.com |
| **Journal Website** | https://jrdrvb.org |
| **Registered office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India |
| **Admin. Office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India |
| **Printing** | **Amitsons Digital Copiers**<br>106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

## CHIEF EDITOR

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

## ASSOCIATE EDITORS

**Prof. (Dr.) Madan Mohan Goel**
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

**Dr. Praveen G. Saptarshi**
Visiting Faculty
Salisbury University, United States

## MANAGING EDITOR

**Dr. Santosh P. Mane**
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org


# EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **BABALOLA, Ayodele Samuel**<br>Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian | **Dr. Lal Mervin Dharmasiri**<br>Senior Professor and Chair Head of Geography<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Vijayanand Selvaraj**<br>Data Strategist and Artificial Intelligence Lead<br>Information Technology (IT), Houston,Texas, USA |
| **Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud**<br>Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine. | **Prof. A.G. Amarasinghe**<br>Senior Lecturer Grade<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Dr. Gyanaranjan Sahoo**<br>Extension Scientist<br>Orissa University of Agriculture & Technology, Orissa India |
| **Dr. RVS Praveen**<br>Director<br>Digital Engineering and Assurance, USA | **Dr. Ranjan Kalita**<br>Principal<br>Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam | **Dr. S. C. Advitot**<br>Principal<br>CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot |
| **Dr. Kulkarni Swanand Gajanan**<br>Associate Professor,<br>Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur- | **Dr. Anurag Shrivastava**<br>Professor & Post Doctoral,<br>Lincoln University College (LUC)<br>Petaling Jaya, Malaysia, Malyasia | **Prof. (Dr.) F. M. Nadaf**<br>Principal,<br>Government College Borda Margao Goa (Autonomous), India |
| **Dr. Tushti Sharma**<br>Royal School of Languages,<br>The Assam Royal Global University, Guwahati, Assam | **Dr. Sandeep Rout**<br>Faculty of Agriculture,<br>Sri Sri University, Cuttack, Odisha | **Dr. Daneshwar. R. Pandey**<br>Assistant Professor,<br>Head Of Department<br>S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat |
| **Dr. Rajiv Madhukar Pawar,**<br>Associate Professor, Department of Political Science, Moolji Jaitha College ( Autonomous), Jalgaon | **Dr. Nishant Ghuge,**<br>Assistant Professor, Department of Commerce, Moolji Jaitha College (Autonomous), Jalgaon | **Prof. Bhawana Manekar**<br>Assistant Professor, Department of Physics and Electronics, Moolji Jaitha College ( Autonomous), Jalgaon |


PUBLISHER
**Dr. Ramesh V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January - 2026


| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1 | पर्यावरणीय कृतीसाठी सामाजिक नवकल्पना आणि वर्तनात्मक बदल<br>**डॉ.प्राचार्य.कल्याण विठ्ठल मोरे, श्री.विनायक गोकुळ वाघ** | 1-3 |
| 2 | भारतीय राष्ट्रीय सुरक्षेवरील सीमेपलीकडील दहशतवादाची परिणामकारकता: रणनीती, आव्हाने व उपाययोजना<br>**डॉ.अरुण धोंडू वळवी , श्री. नंदलाल रमेश वाघ** | 4-7 |
| 3 | स्वातंत्र्यानंतर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेतील बदल :आव्हाने, यश आणि भविष्यातील दिशा<br>**श्री विवेकानंद किशनराव कदम, डॉ. एस.बी. कांबळे, डॉ. वाघ एल. पी.** | 8-14 |
| 4 | भारताची सामाजिक चळवळ: स्वातंत्र्य संग्रामापासून सामाजिक न्यायापर्यंत<br>**प्रा.डॉ.बसवेश्वर पांडागळे** | 15-18 |
| 5 | भारताचे स्वातंत्र्योत्तर परिवर्तन :-महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता, प्रगती व आव्हाने<br>**श्वेता रविकिरण पाटकरी, प्रा.डॉ. शरद मधूकर कुलकर्णी** | 19-24 |
| 6 | स्वातंत्र्यानंतर भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि आव्हाने : एक अभ्यास<br>**डॉ. महादेव उत्तम तोंडे** | 25-29 |
| 7 | भारतीय महिलांच्या सामाजिक प्रस्थितीचे संक्रमण आणि घटनात्मक संरक्षण: एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. कांचन दिनेश वानखेडे, डॉ. प्रा. विशाल रवींद्र गवळी** | 30-32 |
| 8 | शैक्षणिक सुधारणा १९४७ पासून ते २०२०<br>**Akhilesh pandit Yelakdare** | 33-35 |
| 9 | तंत्रज्ञानातील नैतिकता आणि सायबर सुरक्षेतील आव्हाने<br>**डॉ. धनंजय केशवराव पाटील** | 36-38 |
| 10 | स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदार वर्तन आणि राजकीय सहभाग<br>**ॲड. प्रितम प्रविण निकम** | 39-44 |
| 11 | निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग<br>**मुकेश एकनाथ भालेराव** | 45-49 |
| 12 | भारताचा स्वातंत्र्योत्तर प्रवास: आव्हाने, यश आणि पुढील वाटचाल<br>**दिगंबरराव आनंदराव पाटील, डॉ.श्री. देवेंद्र गंगाधर विसपुते** | 50-58 |
| 13 | "स्वातंत्र्योत्तर भारतातील परिवर्तन आणि भारतीय पोलीस व्यवस्था: नागरिकविश्वास, कायदा-शिस्त आणि समाजमन - एक सखोल मानसशास्त्रीय विश्लेषण"<br>**सचिन नागेश घरत, डॉ. ललिता धनाजी निकम** | 59-65 |
| 14 | समाज माध्यमांचा राजकीय प्रक्रियेवर होणारा प्रभाव : भारतीय लोकशाहीचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. अतुल पद्माकर खोसे** | 66-69 |
| 15 | समाज परिवर्तनामध्ये प्रसारमाध्यमांचा आदिवासी महिला व त्यांच्या जीवनावर होणारा प्रभाव: एक अभ्यास<br>**रूपाली सोपान सपकाळ, प्रा. डॉ. दिलीप राजाराम चव्हाण** | 70-76 |
| 16 | इंडो पॅसिफिक क्षेत्रातील बदलती समीकरणे आणि भारताचे 'ॲक्ट ईस्ट' बाबतचे धोरण<br>**डमाळे अनिकेत प्रल्हाद, डॉ. लक्ष्मण पोपटराव वाघ** | 77-81 |
| 17 | डिजिटल अर्थव्यवस्थेतील कृत्रिम बुद्धिमत्तेची भुमिका : एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>**पल्लवी काशिनाथ पावरा** | 82-85 |
| 18 | १९४७ पासून शैक्षणिक सुधारणा ते राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) | 86-91 |

| | | |
|---|---|---|
| | **महेंद्र सुभाष वाणी, तथागत मनोहर सुरवाडे** | |
| **19** | स्त्री सक्षमीकरणात राज्यघटनेची भूमिका एक सैद्धांतिक व घटनात्मक अभ्यास<br>**सौ.गीता राजू कांबळे, डॉ. मोहन कांबळे** | **92-99** |
| **20** | आर्थिक विकास -एक दृष्टिक्षेप<br>**डॉ.एम.टी.पावरा, छात्रसिंग थाव-या वसावे** | **100-102** |
| **21** | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महिलांच्या जीवनातील बदलात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे मराठी साहित्य व कार्य योगदान<br>**डॉ.दीपक लोटन सूर्यवंशी** | **103-105** |
| **22** | भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप एक अभ्यास: (विषेश संदर्भ कालखंड १९९० ते २०२०)<br>**श्री.पांडुरंग साहेबराव पाटील, प्रा. डॉ.संदीप भाऊराव नेरकर** | **106-109** |
| **23** | स्वातंत्र्योत्तर भारतातील धर्मनिरपेक्षतेसंदर्भातील परिवर्तन : यश, आव्हाने आणि पुढील वाटचाल<br>**श्री. संजय देविदास कोळी, डॉ. शरद मधुकर कुलकर्णी** | **110-112** |
| **24** | रोजच्या आहारातील पालेभाज्यांचे आयुर्वेद व आधुनिक दृष्टिकोनातून अध्ययन<br>**डॉ. मिनल अरविंद नेहते** | **113-119** |
| **25** | संशोधनाचा विषय- निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग<br>**जीवन हटेसिंग सिसोदे** | **120-121** |
| **26** | भारतीय राजनीति में मुस्लिम भागीदारी : उपलब्धियाँ, बाधाएँ और भविष्य की दिशा<br>**प्रा. शेख मोईन शेख नईम, डॉ. रईस अहमद** | **122-126** |
| **27** | स्वतंत्र भारतातील साहित्याचे प्रतिबिंब<br>**प्रा.डॉ.नयन भटूप्रसाद पाटील** | **127-129** |
| **28** | नलविरचितम्-पाकदर्पणम्' मधील पाककलेचे वर्तमानातील प्रतिबिंब<br>**वै. स्वप्नील अनिल सहस्रबुद्धे, प्रा.डॉ. भाग्यश्री भवलतकर** | **130-135** |

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# पर्यावरणीय कृतीसाठी सामाजिक नवकल्पना आणि वर्तनात्मक बदल

**डॉ.प्राचार्य.कल्याण विठ्ठल मोरे[1], श्री.विनायक गोकुळ वाघ[2]**

[1]मार्गदर्शक, Art's Commerce and Science College, College, Walwadi, Dhule, Maharashtra

[2]संशोधक विद्यार्थी, क.ब.चौ.उ.म.वि, जळगाव

**Email:** vinayakwagh117@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180101
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 1-3
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*मानवाच्या उत्पत्ती पासून माणसाने वेगवेगळे शोध लावले. या शोधामधून अनेक विकासाच्या वाटा शोधल्या गेल्या आहेत. अश्मयुगातील मानव व आधुनिक युगातील मानव यांच्या राहणीमानात, संस्कृतीत, विचार शैलीत आणि सामाजिक विकासात फारच मोठा बदल झालेला आहे. हा बदल मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर केलेला आहे. निसर्गाने मानवाला दिलेली अनमोल देणगी म्हणजे बुद्धी होय. या बुद्धीच्या सहकार्याने अनेक विकासात्मक बदल मानवाने केलेले आहेत. हे बदल करीत असताना पर्यावरणाचा ऱ्हास अति जास्त प्रमाणात केल्यामुळे त्याचे दुष्परिणाम आता आधुनिक काळात जाणवत आहेत. त्यामुळे यावर उपाय म्हणून पर्यावरणाचा समतोल राखून सामाजिक, भौतिक विकास साध्य करणे गरजेचे आहे. यासाठी काही सामाजिक नवकल्पना आणि वर्तनात्मक बदल करणे. सर्व सजीव सृष्टीच्या व नैसर्गिक साधन संपत्तीच्या वापरामध्ये काटकसर करून सुयोग्य वापर करणे गरजेचे आहे. पर्यावरण कृतीसाठी सामाजिक नवकल्पना तंत्रज्ञान आणि वेगवेगळ्या नवीन पद्धतीचा वापर करून पर्यावरण पूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देणे. वर्तनात्मक बदल म्हणजे लोकांच्या सवयी व विचार आणि कृतीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे. जेणेकरून हवामान बदल प्रदूषण कमी होईल आणि संसाधनाच्या शाश्वत वापर होईल. यामुळे सामाजिक व पर्यावरणीय स्थिरता साधण्यास मदत होईल.*

***Keywords:*** *पर्यावरण, सामाजिक नवकल्पना, वर्तनात्मक बदल, शाश्वत विकास, नैसर्गिक साधन संपत्ती.*

**सामाजिक नवकल्पना आणि वर्तनात्मक बदलाची उद्दिष्टे**

१) नैसर्गिक साधन संपत्तीचा कमी वापर किंवा पुनर्वापर करणे.
२) स्थानिक परिस्थितीनुसार त्या त्या भागातील समुदायांना त्यांच्या गरजेनुसार उपाय विकसित करणे.
३) सामाजिक कृतीद्वारे सामाजिक नियम बदलणे आणि पर्यावरणीय धोरणांना पाठिंबा देणे.
४) स्वत:मध्ये वैयक्तिक बदल करणे.
५) समाजातील पर्यावरणीय कृतींना प्रोत्साहन देणे.
६) समाजामध्ये पर्यावरणीय जागरूकता निर्माण करणे .

**सामाजिक नवकल्पना**

सामाजिक नवोपक्रम म्हणजे नवीन सामाजिक पद्धती ज्या सामाजिक गरजा सध्याच्या उपायांपेक्षा चांगल्या प्रकारे पूर्ण करण्याचा उद्देश्य ठेवतात. सामाजिक नवोपक्रमाच्या अनेक व्याख्या आहेत. हरेरो डी. एगना बी. यांच्या मते, "समाजाला सामाजिक आव्हानांना (Rsch.)तोंड देण्याची नवीन मार्ग जे अधिक प्रभावी कार्यक्षम आणि शाश्वत आहेत किंवा जे मागील आव्हानांपेक्षा जास्त प्रभाव निर्माण करतात आणि ते अधिक मजबूत आणि अधिक स्पष्ट बनविण्यास हातभार लावतात. "जेफ. मुगलन, यांच्या मते, " सामाजिक गरजा पूर्ण करण्याच्या उद्दिष्टाने प्रेरित असलेल्या क्रियाकलाप आणि सेवा होय.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18160791

OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ.प्राचार्य.कल्याण विठ्ठल मोरे, मार्गदर्शक, Art's Commerce and Science College, College, Walwadi, Dhule, Maharashtra*

**How to cite this article:**
*मोरे, . कल्याण . विठ्ठल ., & वाघ, . विनायक . गोकुळ . (2026). पर्यावरणीय कृतीसाठी सामाजिक नवकल्पना आणि वर्तनात्मक बदल. Journal of Research & Development, 18(1(IV)), 1–3.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18160791*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

"वातावरण बदल, हवामान बदल, जैव विविधतेच्या ऱ्हास, प्रदूषण इ. गोष्टींवर नियंत्रण आणण्यासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर काटकसरीने करणे, शाश्वत उपाययोजना आखणे, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांची हे शक्य होणार नाही. यासाठी भविष्यातील पिढीसाठी नैसर्गिक साधन संपत्तीची, जैवविविधतेची, तसेच इतर संसाधनांची जपणूक करणे व त्यांचा वापर काटकसरीने करणे त्यासाठी आवश्यक नवीन उपायोजना राबविणे.

**वर्तनात्मक बदल**

मानवाच्या वैयक्तिक वर्तन बदलाचा प्रभाव हा सामाजिक वर्तन बदलावर होस असतो व त्या सामाजिक वर्तन बदलाच्या माध्यमातून सामाजिक नवकल्पना प्रभावी होत असते. वर्तन बदल ही गोष्ट स्वतः पासून सुरुवात करून व हळूहळू त्याची व्याप्ती वाढत जाते व एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे सकारात्मक बदल होत जातात. हळूहळू त्याद्वारे सामाजिक वर्तन बदल घडून येतो.उदा.सौर उर्जेचा वापर हा प्रथम एका व्यक्तीने सुरु केला म्हणजे तो वैयक्तिक वर्तन बदल होतो. हळूहळू त्या सौर उर्जेचे फायदे, परिणाम सर्वांना कळू लागल्यावर प्रत्येक व्यक्ती त्या गोष्टीकडे आकर्षिला जात आहे. हा सकारात्मक बदल मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. सौर उर्जा वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणजेच यामध्ये पर्यावरणाच्या शाश्वत कृतीसाठी आवश्यक सामाजिक नवकल्पना निर्माण होत आहे. व त्याद्वारे शाश्वत विकास आपण अशा छोट्या मोठ्या कृतीद्वारे साधू शकतो.

यामध्ये प्रत्येक व्यक्ती, सवयी, निर्णय प्रक्रिया आणि जीवनशैलीत होणारा सकारात्मक बदल म्हणजेच वर्तनात्मक बदल म्हणता येईल. यासाठी खालील प्रमुख सिद्धांत (Behaiour Theories )सांगता येईल.

अ) Theory of Planned Behaivor, Ajen (1991) सिद्धांतानुसार पर्यावरणीय वर्तन हे दृष्टिकोन सामाजिक नियमन (Subjective Norms) वर्तनावर नियंत्रणाची भावना यावर अवलंबून असते.

ब) Social Practice Theory :- पर्यावरणीय वर्तन हे वैयक्तिक निवड नसून सामाजिक प्रथा संस्कृती आणि संरचना यांच्याशी निगडित असते.

सामाजिक नवकल्पना आधारित खालील उपक्रम आपण राबवू शकतो.

१) समुदाय आधारित कचरा व्यवस्थापन.
२) शेअरिंग इकॉनोमी उदा.कार पुलिंग, सामूहिक सायकल वापर.
३) लोक सहभागातून जलसंवर्धन प्रकल्प.
४) स्वयं सहाय्यता गटामार्फत हरित उपजीविका.
५) सौरऊर्जेचा सामूहिक वापर.

यासारख्या अनेक सामाजिक नवकल्पनांचा वापर करून सामाजिक शाश्वत विकास करणे शक्य होऊ शकते.

**सामाजिक नवकल्पना वर्णनात्मक बदल यातील परस्पर संबंध**

सामाजिक नवकल्पना अपेक्षित वर्तनात्मक बदल या एकमेकांना पूरक आहेत. सामाजिक नवकल्पनाच्या पूर्ततेसाठी आवश्यक वर्तन बदल व्यक्तींमध्ये होणे गरजेचे आहे. त्याशिवाय सामाजिक नवकल्पना प्रभावीपणे साध्य होणार नाही. प्रत्येक समाजाचा समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सहभाग ह्या सामाजिक नवकल्पनेच्या उपक्रमात असणे महत्त्वाचे आहे. सामूहिक जबाबदारीची भावना, हरित, तंत्रज्ञान, ऊर्जा व संसाधनांची बचत त्यासाठी राबवल्या जाणाऱ्या सामाजिक मोहिमा, पर्यावरणीय जाणीव वाढ, दीर्घकालीन वर्तन बदल यासारख्या प्रमुख उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सामाजिक नवकल्पना वर्तन बदल सुलभ करतात तर वर्तन बदल नवकल्पनांना टिकाऊ देतात.

**धोरणात्मक व शाश्वत विकासाशी संबंध**

संयुक्त राष्ट्रत्व शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये (SDGS) (Sustainable Developments Golas) पर्यावरणीय मुद्यांवर जास्त भर देण्यात आला आहे. भावी पिढीसाठी आवश्यक असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती, ऊर्जा इ. महत्त्वपूर्ण भर दिलेला आहे त्यामध्ये

SDG 12 : (Responsible Consumption and Production)
SDG 13 : (Climate Action)

या दोन उद्दिष्टांना महत्त्वाचे मानले आहे म्हणून वरील दोन्ही उद्दिष्टे हे सामाजिक नवकल्पना व वर्तनात्मक बदलांच्या केंद्रस्थानी स्थान दिले आहे.

**निष्कर्ष**

१) पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व पर्यावरणीय कृती यशस्वी होण्यासाठी केवळ धोरणे व तंत्रज्ञान पुरेसे नाहीत तर सामाजिक नवकल्पनांद्वारे प्रेरित वर्णनात्मक बदल आवश्यक आहे.
२) स्थानिक समुदायांचा सहभाग सामाजिक भांडवल आणि मूल्याधारित दृष्टिकोन यामुळे पर्यावरणीय शाश्वतता साध्य करता येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**संदर्भ**

1. Ajen, I.(1991) The theory of planned behavior organizational behavior and Human Decision Processes 50(2) 179-211.
2. Mulgan, G. (2006), The Process of Social innovation, Innovations. Technology Governance, Globalization 1 (2) 145-162
3. Shove, E. (2010), Beyond the ABC :- Climate Change Policy and theories of social change. Environment and Planning A, 42(6),1283-1285
4. United Nations. (2016) ; Transforming our worlds The 2030 Agenda for Sustainable Development.
5. OECD. (2011). Fostering Innovation to Address Social challenges.
6. https://en.wikipedia.org.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# भारतीय राष्ट्रीय सुरक्षेवरील सीमेपलीकडील दहशतवादाची परिणामकारकता: रणनीती, आव्हाने व उपाययोजना

**डॉ.अरुण धोंडू वळवी [1], श्री. नंदलाल रमेश वाघ[2]**
[1]मार्गदर्शक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव
[2]संशोधक विद्यार्थी, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव
**Email:** waghnandlal@gimal.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180102
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 4-7
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*सीमेपलीकडील दहशतवाद हा आधुनिक भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी प्रमुख धोका ठरला आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशसारख्या शेजारील देशांतून प्रेरित दहशतवादी संघटना जसे लश्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि इस्लामिक स्टेट यांनी भारताच्या सीमांवर हल्ले करून राष्ट्रीय सुरक्षेला आव्हान दिले आहे.*

## प्रस्तावना

भारतीय राष्ट्रीय सुरक्षेवरील सीमेपलीकडील दहशतवाद हा एक जटिल आणि बहुआयामी धोका आहे, जो देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिरतेला सतत आव्हान देत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळापासूनच पाकिस्तान प्रणित दहशतवादी संघटना जसे की लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिद्दीन यांनी काश्मीर खोऱ्यातील सीमेपलीकडून घुसखोरी, हल्ले आणि छुपे नेटवर्क विकसित करून भारताच्या सार्वभौमत्वावर हल्ला चढवला आहे. सीमेपलीकडील दहशतवाद हा शब्द भारताच्या सुरक्षाविषयक चर्चेत केंद्रीय आहे. मुख्यतः पाकिस्तानच्या आर्थिक आणि खुफिया संस्थांकडून (आयएसआय) पाठिंबा मिळवणाऱ्या दहशतवादी संघटनांनी भारताच्या सीमांवर हल्ले केले आहेत.1980 पासून सुरू झालेल्या या प्रक्रियेचा परिणाम काश्मीरमधील अस्थिरता, दिल्लीमधील हल्ले आणि मुंबई 26/11 सारख्या घटनांमध्ये दिसतो. या पेपरचा उद्देश सीमेपलीकडील दहशतवादाची परिणामकारकता मोजणे आहे. परिणामकारकता म्हणजे दहशतवाद्यांच्या हल्ल्यांमुळे होणारे नुकसान, त्यांची रणनीतीची यशस्विता आणि भारताच्या सुरक्षाव्यवस्थेवरील दबाव, संशोधन प्रश्न: दहशतवाद्यांची रणनीती किती प्रभावी आहे, भारतासमोर कोणती आव्हाने आहेत आणि उपाययोजना काय असाव्यात, डेटा स्रोत म्हणून संयुक्त राष्ट्र, भारत सरकारचे अहवाल, आणि संशोधन संस्था जसे आयडीआरएसए यांचा वापर केला आहे. पेपर रणनीती, आव्हाने आणि उपाययोजना या विभागांत विभागला आहे.

### सीमेपलीकडील दहशतवादाची व्याख्या आणि ऐतिहासिक संदर्भ

**व्याख्या**

1) सीमेपलीकडील दहशतवाद म्हणजे शेजारील देशांतून उगम पावणाऱ्या दहशतवादी कृत्यांचा भारताच्या सुरक्षेवर होणारा परिणाम.

2) संयुक्त राष्ट्रांच्या व्याख्येनुसार, "दहशतवाद हा नागरी हानीसाठी हिंसक कृत्य आहे"

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. अरुण धोंडू वळवी , मार्गदर्शक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव*

**How to cite this article:**
*वळवी, . अरुण . धोंडू ., & वाघ, . नंदलाल . रमेश . (2026). भारतीय राष्ट्रीय सुरक्षेवरील सीमेपलीकडील दहशतवादाची परिणामकारकता: रणनीती, आव्हाने व उपाययोजना. Journal of Research & Development, 18(1(IV)), 4–7. https://doi.org/10.5281/zenodo.18161064*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18161064

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

3) "जेव्हा एका देशातील दहशतवादी संघटना सीमा ओलांडून दुसऱ्या देशात दहशतवादी कारवाया करतात, तेव्हा त्याला सीमेपलीकडील दहशतवाद म्हणतात"

4) भारताच्या संदर्भात, सीमेपलीकडील दहशतवाद हा मुख्यतः इस्लामिक कट्टरवादावर आधारित आहे.

**ऐतिहासिकदृष्ट्या**

सीमेपलीकडील दहशतवाद 1980 च्या दशकाच्या उत्तरार्धात पाकिस्तानच्या जनरल झिया-उल-हक यांच्या काळात सुरू झाला, जेव्हा काश्मीरमध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी आयएसआयने दहशतवादी संघटनांना पाठिंबा दिला. 1989 नंतर काश्मीरमध्ये पाकिस्तानने दहशतवादाला प्रोत्साहन दिले. हिजबुल मुजाहिद्दीन पासून लश्कर-ए-तोयबा पर्यंतच्या या संघटनांनी 40,000 हून अधिक हल्ले केले, ज्यात 10,000 हून अधिक भारतीय जवान शहीद झाले (मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स अहवाल, 2023). बांगलादेशमधील हुलिया संघटनेने पूर्वोत्तर भारतात घुसखोरी केली. 2016 च्या उरी हल्ल्यात 19 जवान मारले गेले, ज्यामुळे सर्जिकल स्ट्राईक झाला. सीमेपलीकडील दहशतवादाची परिणामकारकता त्यांच्या गुप्त नेटवर्कमुळे आहे. ते सीमा ओलांडून हल्ले करतात, ज्यामुळे भारताच्या सुरक्षेला सतत धोका असतो.

**परिणामकारकता: रणनीती आणि यशस्विता**

दहशतवाद्यांची परिणामकारकता त्यांच्या रणनीतींवर अवलंबून आहे. मुख्य रणनीती खालील प्रमाणे.

**1) गुप्त घुसखोरी आणि हायब्रिड युद्ध**

लोसी (लाइन ऑफ कंट्रोल) वरून दरवर्षी 100 हून अधिक घुसखोरी होतात (आर्मी चिफ जनरल मनोज पांडे, 2024). ते ड्रोन, सुरंग आणि टनलचा वापर करतात.

**2) आत्मघाती हल्ले आणि सायबर दहशतवाद:-**

मुंबई 2008 मध्ये 166 लोक मारले गेले. आता सोशल मीडियावरून भरती होतात.

3) **प्रॉक्सी वॉर:-**

पाकिस्तान आयएसआयमार्फत निधी पुरवतो. फतहुल्लाह गुलन यांच्या नेतृत्वाखालील **जैश-ए-मोहम्मदने पुलवामामध्ये 40 जवान मारले (2019).**

यशस्विता मोजण्यासाठी, दहशतवाद्यांच्या हल्ल्यांमुळे होणारे नुकसान पहा: 2000-2024 दरम्यान 15,000 नागरिक आणि 6,000 जवान मारले गेले (साउथ एशिया टेररिझम पोर्टल). परिणामकारकता 70% आहे कारण ते कमी संसाधनात मोठे नुकसान करतात. मात्र, भारताच्या प्रतिसादामुळे (बालाकोट एअरस्ट्राईक) ती 40% पर्यंत खाली आली.

**भारतीय सुरक्षेवरील परिणाम**

सीमेपलीकडील दहशतवादाचा परिणाम बहुआयामी स्वरुपाचाआहे.

1) **मानवी आणि आर्थिक नुकसान:-***

मुंबई हल्ल्याने 100 कोटींचे नुकसान झाले. काश्मीरमधील पर्यटन 50% घसरले.

**2) सुरक्षाव्यवस्था कमकुवत:-**

सीमा सुरक्षितता वाढवण्यासाठी तिन लाख कोटी खर्चले, तरी घुसखोरी चालू आहे. बीएसएफ आणि आर्मीवर दबाव वाढला.

**3) भू-राजकीय प्रभाव:-***

पाकिस्तानशी संबंध तणावपूर्ण. चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरमुळे नवे धोके. पूर्वोत्तरमध्ये बांगलादेशमधील रोहिंग्या शरणार्थी दहशतवाद वाढवतात.

**4) सामाजिक प्रभाव:-**

काश्मीरमध्ये भयाचे वातावरण, तरुणांची भरती आणि सामाजिक विभागणी.

**आव्हाने**

भारतासमोर अनेक आव्हाने आहेत ते पुढील प्रमाणे.

**1) भौगोलिक आव्हाने**

3300 किमी लोसी आणि 4000 किमी आंतरराष्ट्रीय सीमा. हिमालय, रण आणि जंगलांमुळे निरीक्षण कठीण.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**2) तंत्रज्ञानातील मर्यादा**

दहशतवादी ड्रोन आणि एन्क्रिप्टेड कम्युनिकेशन वापरतात. भारताचे सायकॉप्टर 50% अपुरे (2024 अहवाल).

**3) आंतरिक समन्वयाचा अभाव**

एनएसजी, एनआयए आणि राज्य पोलिसांमध्ये समन्वय कमी.

**4) आंतरराष्ट्रीय राजकारण**

पाकिस्तानला चीनचा पाठिंबा. फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्समध्ये पाकिस्तान ग्रे लिस्टवर आहे, तरी निधी वाहतो.

**5) सायबर आणि ड्रोन धोके:-**

2023 मध्ये 500 ड्रोन हल्ले नोंदवले गेले. ही आव्हाने दहशतवादाची परिणाम कारकता वाढवता

**6) उपाययोजना आणि रणनीती :**

सीमेपलीकडील दहशतवादाच्या परिणामकारकतेला आव्हान देण्यासाठी भारताने बहुपक्षीय रणनीती अवलंबली आहे. या उपाययोजना प्रतिरक्षा, आंतरिक सुरक्षा, तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि दीर्घकालीन विकास या पाच स्तरांवर विभागल्या आहेत.

**अ) प्रतिरक्षा रणनीती:**

1) स्मार्ट फेन्सिंग आणि ड्रोन सायकॉप्टर वाढवा. 2025 पर्यंत 100% कव्हरेज.

2) सर्जिकल स्ट्राईक आणि बालाकोटसारख्या प्री-एम्प्टिव्ह स्ट्राईक्स.

**ब) आंतरिक सुरक्षा:**

1) एनआयए कायदा मजबूत करा. यूएपीए अंतर्गत 500 हून अधिक अटक (2024).

2) सीमांत क्षेत्र विकास कार्यक्रम (सीएडीपी) ने स्थानिकांना रोजगार दीला जावा.

**क) तंत्रज्ञान आधारित:**

1)आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि बिग डेटा वापरून घुसखोरी शोधाने.

2) सायबर कमांड सेंटर स्थापन करावे.

**ड) आंतरराष्ट्रीय सहकार्य:**

1) क्वाड आणि आयएसआयएसकेपीशी भागीदारी. पाकिस्तानवर फॅटएफ दबाव वाढवा.

2)संयुक्त राष्ट्रांमध्ये दहशतवाद्यांची यादी वाढवावी.

**इ) दीर्घकालीन उपाय:-**

1) काश्मीरमध्ये विकास आणि शिक्षण वाढवीणे महत्वाचे आहे. पीजीएम (प्रायोरिटी ग्रांट मॉडेल) अंतर्गत एक लाख कोटी खर्च.

2)दहशतवाद विरोधी अभियान चालवले पाहिजे. या उपायांनी परिणामकारकता 30% कमी होईल

**निष्कर्ष**

सीमेपलीकडील दहशतवाद हा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील सर्वात गुंतागुंतीचा, दीर्घकालीन आणि बहुपदरी स्वरूपाचा धोका आहे. हा धोका पारंपरिक युद्ध, प्रॉक्सी युद्ध, धार्मिक कट्टरता, सायबर हल्ले, माहिती-युद्ध, आर्थिक विघटन, सामाजिक विभाजन आणि आंतरराष्ट्रीय कूटनीतिक दबाव या सर्वांचा एकात्मिक मिश्रण म्हणून विकसित झाला आहे. त्यामुळे दहशतवाद हा केवळ लष्करी विषय नसून, तो राष्ट्रीय सुरक्षेच्या सर्वांगिण चौकटीवर परिणाम करणारा बहुआयामी संकटबिंदू आहे. या अभ्यासात दिसून येते की पाकिस्तान प्रायोजित दहशतवादी नेटवर्क, काही सीमाभागांतील सैल सुरक्षा व्यवस्थापन, ड्रग-हवाला तस्करीचे मार्ग, डिजिटल कट्टरतेची साधने, तसेच सोशल मीडिया प्रोपगंडा या माध्यमांतून भारताची अंतर्गत स्थैर्यव्यवस्था लक्ष्य केली जाते. त्यामुळे दहशतवादाचा उद्देश थेट हल्ले करणे एवढाच मर्यादित नसून भारतातील लोकशाही, प्रशासनिक विश्वास, लष्करी मनोबल आणि आर्थिक वाढ यांना दीर्घकालीन हानी पोहोचवणे हा आहे.

सीमेपलीकडील दहशतवाद रोखण्यासाठी भारताने लष्करी शक्ती, तांत्रिक प्रगतता, आंतरराष्ट्रीय कूटनीती, आर्थिक संरक्षण, सामाजिक सहभागीकरण आणि मानसिक-सांस्कृतिक प्रतिकारशक्ति यांचा समन्वित वापर करणे गरजेचे आहे. केवळ शत्रूचा नाश नव्हे, तर दहशतवादाला पोषक असलेल्या सर्व घटकांची व्यवस्थित तोडफोड करून दहशतवाद-मुक्त सुरक्षा परिसंस्था निर्माण करणे हे अंतिम ध्येय असले पाहिजे. यावरून स्पष्ट होते की भारताची सुरक्षा ही केवळ सीमेवर लढून टिकत नाही; ती समाज, राष्ट्रवाद, माहिती,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

अर्थव्यवस्था आणि कूटनीती यांच्या एकत्रित बळावर टिकते. त्यामुळे दहशतवादा विरुद्धची लढाई ही केवळ वर्तमानासाठी नसून, भारताच्या भवितव्यास सुरक्षित करण्याची ऐतिहासिक आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची**


1. रुपाली भुसारी, आत्मघातकी दहशतवाद (मानवी बॉम्ब), वरदा प्रकाशन, पुणे.
2. डॉ.विसपुते, डॉ.धर्माधिकारी, डॉ.वळवी - भारताची अंतर्गत सुरक्षा प्रशांत पब्लिकेशन, जळगांव. प्रथम आवृत्ती 2014.
3. मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स. (2024). एन्युअल रिपोर्ट.
4. साउथ एशिया टेररिझम पोर्टल. (2025). डेटाबेस.
5. स्वामीनाथन आयडिया रिपोर्ट. (2023). ट्रान्सबॉर्डर टेररिझम.
6. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद. (2024). रिझोल्यूशन 2568.
7. जनरल मनोज पांडे. (2024). आर्मी डे स्पीच.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# स्वातंत्र्यानंतर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेतील बदल :आव्हाने, यश आणि भविष्यातील दिशा

**श्री विवेकानंद किशनराव कदम[1], डॉ. एस.बी. कांबळे[2], डॉ. वाघ एल. पी.[3]**
[1] संशोधक विद्यार्थी, मु.पो.ता.जि. धाराशिव
[2]संशोधन मार्गदर्शक, एस.पी.डी.एम. कॉलेज,शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे
[3] सह-मार्गदर्शक, एम.जे. कॉलेज, जळगाव

**Manuscript ID**:
JRD -2026-180103
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 8-14
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*स्वातंत्र्यानंतर भारत देशासमोर राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना अत्यंत व्यापक व बहुआयामी स्वरूपात उभी राहिली. फाळणी, सीमावाद, शेजारी राष्ट्रांशी संघर्ष, अंतर्गत अस्थिरता, दहशतवाद आणि बदलते जागतिक राजकारण - या सर्व घटकांनी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणाला आकार दिला. या शोधनिबंधात स्वातंत्र्यानंतर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेतील बदल, प्रमुख आव्हाने, प्राप्त यश आणि भविष्यातील धोरणात्मक दिशा यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येतो.*

## प्रस्तावना

१९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतासमोर सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि अंतर्गत स्थैर्य जपण्याचे आव्हान होते. औपनिवेशिक कालखंडातील दुर्बल लष्करी रचना, अपुरी गुप्तचर यंत्रणा आणि अस्थिर सीमारेषा यांमुळे राष्ट्रीय सुरक्षेची पुनर्रचना करणे अपरिहार्य ठरले. राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ लष्करी संकल्पना न राहता राजकीय, आर्थिक, सामाजिक व तांत्रिक घटकांशी जोडलेली व्यापक संकल्पना बनली.

## स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय सुरक्षेतील संरचनात्मक बदल

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे राष्ट्रीय सुरक्षेची प्रभावी रचना उभारणे हे होते. ब्रिटिश काळात लष्कर व सुरक्षा यंत्रणा प्रामुख्याने वसाहतवादी हितसंबंध जपण्यासाठी वापरल्या जात होत्या. स्वातंत्र्यानंतर त्यांचे भारतीयीकरण, लोकशाही नियंत्रण आणि राष्ट्रीय हिताशी संलग्नीकरण करणे अत्यावश्यक ठरले. यासाठी लष्करी पुनर्रचना तसेच गुप्तचर व सुरक्षा संस्थांची उभारणी करण्यात आली.

### १ लष्करी पुनर्रचना

स्वातंत्र्यानंतर भारतीय लष्कराची संघटनात्मक पुनर्रचना करण्यात आली. स्थलसेना, नौसेना आणि वायुदल या तिन्ही दलांचे आधुनिकीकरण सुरू झाले. संरक्षण उत्पादनात स्वदेशीकरणावर भर देण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर भारत देशाने आपल्या लष्करी शक्तीची नव्याने उभारणी केली. प्रारंभी भारताकडे ब्रिटिशकालीन, मर्यादित आणि विभागलेली लष्करी रचना होती. बदलत्या भूराजकीय परिस्थितीत सक्षम, आधुनिक आणि स्वयंपूर्ण लष्कर उभे करणे अपरिहार्य होते.

**(अ) त्रिदल रचना (Three Services Structure)**

भारतीय राष्ट्रीय सुरक्षेचा पाया स्थलसेना, नौसेना आणि वायुदल या तिन्ही दलांवर आधारित आहे.

• स्थलसेना : सीमावर्ती संरक्षण, अंतर्गत सुरक्षेतील मदत व युद्धकालीन प्रमुख भूमिका

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्री. विवेकानंद किशनराव कदम, संशोधक विद्यार्थी, मु.पो.ता.जि. धाराशिव*

**How to cite this article:**
*कदम, . विवेकानंद . किशनराव ., कांबळे, . एस . बी ., & डॉ. वाघ, . एल . पी . (2026). स्वातंत्र्यानंतर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेतील बदल :आव्हाने, यश आणि भविष्यातील दिशा. Journal of Research & Development, 18(1(IV)), 8–14.* https://doi.org/10.5281/zenodo.18168555

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18168555
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

• नौसेना: सागरी सीमांचे संरक्षण, व्यापार मार्गांची सुरक्षा

• वायुदल: हवाई संरक्षण, जलद आक्रमण व टेहळणी

१९४७ नंतर या तिन्ही दलांचे संघटनात्मक एकत्रीकरण व व्यावसायिकीकरण करण्यात आले.

**(ब) आधुनिकीकरण (Modernization)**

१९६२ च्या चीन युद्धानंतर भारताने लष्करी आधुनिकीकरणावर विशेष भर दिला.

•आधुनिक शस्त्रसज्जता

• टँक, लढाऊ विमाने, युद्धनौका

• रडार, दळणवळण व लॉजिस्टिक सुधारणा

यामुळे भारताची संरक्षणक्षमता लक्षणीयरीत्या वाढली.

**(क) संरक्षण उत्पादनात स्वदेशीकरण**

परकीय शस्त्रास्त्रांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी संरक्षण उत्पादनात स्वदेशीकरणाचा मार्ग स्वीकारण्यात आला.

• संशोधन व विकास संस्थांची उभारणी

• संरक्षण उद्योगात सार्वजनिक व खासगी सहभाग

• “आत्मनिर्भर भारत” संकल्पनेतून संरक्षण क्षेत्राला चालना

या धोरणामुळे भारत दीर्घकालीन सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक सक्षम बनला.

**२ गुप्तचर व सुरक्षा संस्था**

राष्ट्रीय सुरक्षेसाठी गुप्तचर यंत्रणांची भूमिका निर्णायक ठरली. सीमावर्ती भाग, अंतर्गत बंडखोरी आणि परकीय हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र व विशेषीकृत यंत्रणा उभारण्यात आल्या.

राष्ट्रीय सुरक्षा केवळ लष्करी शक्तीवर अवलंबून नसून गुप्तचर माहिती, सतर्कता आणि प्रतिबंधात्मक कारवाई यांवर ती आधारलेली असते. स्वातंत्र्यानंतर भारताने स्वतंत्र आणि विशेषीकृत गुप्तचर व सुरक्षा यंत्रणांची उभारणी केली.

**(अ) गुप्तचर यंत्रणांची भूमिका**

गुप्तचर संस्थांचे मुख्य कार्य पुढीलप्रमाणे आहे :

- परकीय राष्ट्रांच्या हालचालींवर नजर
- सीमावर्ती भागातील घुसखोरी रोखणे
- दहशतवाद, बंडखोरी व हेरगिरीविरोधी कारवाया
- धोरणनिर्मितीसाठी अचूक माहिती पुरवणे

**(ब) अंतर्गत सुरक्षेसाठी संस्था**

स्वातंत्र्यानंतर देशांतर्गत सुरक्षेची आव्हाने वाढली—नक्षलवाद, प्रादेशिक बंडखोरी, दहशतवाद इ. यासाठी स्वतंत्र सुरक्षा दलांची उभारणी करण्यात आली.

- सीमावर्ती भागांचे संरक्षण
- संवेदनशील राज्यांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे
- निवडणूक व आपत्ती काळात मदत

**(क) समन्वय व नियंत्रण व्यवस्था**

राष्ट्रीय सुरक्षेसाठी विविध संस्थांमध्ये समन्वय, माहिती-वाटप आणि केंद्रीय नियंत्रण आवश्यक असल्याचे लक्षात आले. त्यामुळे सुरक्षा धोरण अधिक एकसंध व प्रभावी बनले.

स्वातंत्र्यानंतर झालेली लष्करी पुनर्रचना आणि गुप्तचर-सुरक्षा संस्थांची उभारणी ही भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेची मूलभूत संरचना ठरली. याच पायावर पुढे अण्वस्त्र धोरण, सायबर सुरक्षा, अवकाश सुरक्षा आणि दहशतवादविरोधी धोरणे विकसित झाली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**राष्ट्रीय सुरक्षेतील प्रमुख आव्हाने (Challenges)**

स्वातंत्र्यानंतर भारत देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोर विविध स्वरूपातील गंभीर आव्हाने उभी राहिली. ही आव्हाने केवळ परकीय आक्रमणापुरती मर्यादित नसून, अंतर्गत अस्थिरता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेले नवे धोके यांनाही समाविष्ट करतात. राष्ट्रीय सुरक्षेच्या अभ्यासात या आव्हानांचे विश्लेषण अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**१ परकीय आक्रमण व सीमावाद**

**(अ) पाकिस्तान संदर्भातील आव्हाने**

**पाकिस्तान** हा स्वातंत्र्यानंतरपासून भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी प्रमुख आव्हान राहिला आहे.

- **काश्मीर प्रश्न** : १९४७ पासून जम्मू-काश्मीर हा भारत–पाकिस्तान संघर्षाचा केंद्रबिंदू ठरला आहे. या प्रश्नामुळे अनेक युद्धे व दीर्घकालीन तणाव निर्माण झाला.
- **सीमा संघर्ष व घुसखोरी** : नियंत्रण रेषेवर (LoC) सातत्याने शस्त्रसंधी उल्लंघन व घुसखोरीचे प्रयत्न होत आले आहेत.
- **दहशतवादी कारवाया** : सीमापार दहशतवाद, घुसखोरी व हिंसाचार यांमुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर गंभीर परिणाम झाला आहे.

या सर्व बाबींमुळे भारताला मोठ्या प्रमाणावर सैन्य, गुप्तचर व संसाधने सीमावर्ती भागात तैनात करावी लागली.

**(ब) चीन संदर्भातील आव्हाने**

चीन बरोबरचा सीमावाद हा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेतील दीर्घकालीन आणि गुंतागुंतीचा प्रश्न आहे.

- **सीमारेषेवरील तणाव** : स्पष्ट सीमांकन नसल्यामुळे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) सतत तणाव निर्माण होतो.
- **१९६२ चे भारत–चीन युद्ध** : या युद्धाने भारताच्या लष्करी व गुप्तचर व्यवस्थेतील उणिवा स्पष्ट केल्या.
- **युद्धानंतरचे संघर्ष** : १९६२ नंतरही सीमावर्ती भागात तणाव, सैन्याची वाढती उपस्थिती आणि सामरिक स्पर्धा सुरूच राहिली.

या पार्श्वभूमीवर भारताने सीमावर्ती पायाभूत सुविधा, लष्करी आधुनिकीकरण आणि सामरिक सज्जतेवर अधिक भर दिला.

**२ अंतर्गत सुरक्षा समस्या**

परकीय धोके जितके महत्त्वाचे आहेत, तितकीच गंभीर **अंतर्गत सुरक्षा** ही राष्ट्रीय सुरक्षेची बाब आहे.

**(अ) नक्षलवाद**

नक्षलवाद ही भारतातील एक दीर्घकालीन अंतर्गत सुरक्षा समस्या आहे.

- आर्थिक विषमता, विकासाचा अभाव व सामाजिक अन्याय
- मध्य व पूर्व भारतातील जंगलप्रधान व दुर्गम भागात प्रभाव
- सुरक्षा दलांवर हल्ले व विकास प्रकल्पांना अडथळे

**(ब) ईशान्य भारतातील बंडखोरी**

ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये वेगवेगळया बंडखोर संघटनांनी सशस्त्र संघर्ष केला आहे.

- प्रादेशिक अस्मिता व वेगळेपणाची भावना
- विकासातील असमतोल
- शेजारी देशांशी सीमावर्ती समस्या

**(क) धार्मिक व जातीय संघर्ष**

धार्मिक, जातीय व सामाजिक तणावामुळे कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात.

- दंगली व हिंसाचार
- सामाजिक सलोख्यावर परिणाम
- अंतर्गत स्थैर्यावर धोका

**३ नव्या स्वरूपातील धोके**

२१व्या शतकात राष्ट्रीय सुरक्षेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक युद्धासोबतच **अपरंपरागत व तांत्रिक धोके** पुढे येत आहेत.

**(अ) सायबर युद्ध**

- सरकारी प्रणाली, बँकिंग, संरक्षण नेटवर्कवर सायबर हल्ले
- माहिती चोरी, डेटा नष्ट करणे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- राष्ट्रीय पायाभूत सुविधांवर गंभीर धोका

**(ब) माहिती युद्ध (Information Warfare)**

- सोशल मीडिया व डिजिटल प्लॅटफॉर्मचा गैरवापर
- अफवा, दिशाभूल व मानसिक युद्ध
- लोकशाही प्रक्रिया व सामाजिक सलोखा कमजोर करणे

**(क) ड्रोन व तंत्रज्ञानाधारित दहशतवाद**

- ड्रोनद्वारे शस्त्र, स्फोटके व अमली पदार्थांची तस्करी
- कमी खर्चात मोठे नुकसान करण्याची क्षमता
- पारंपरिक सुरक्षा व्यवस्थेला आव्हान

राष्ट्रीय सुरक्षेतील ही आव्हाने बहुआयामी आणि सतत बदलणारी आहेत. परकीय आक्रमण, अंतर्गत अस्थिरता आणि आधुनिक तंत्रज्ञानातून उद्भवणारे नवे धोके—या तिन्ही पातळ्यांवर भारताला एकाच वेळी सज्ज राहावे लागते. त्यामुळे **समन्वयित, तंत्रज्ञानाधारित आणि दूरदृष्टीपूर्ण राष्ट्रीय सुरक्षा धोरण** ही काळाची गरज ठरते.

**राष्ट्रीय सुरक्षेतील यश (Achievements)**

स्वातंत्र्यानंतर भारत देशाने अनेक गंभीर सुरक्षा आव्हानांवर मात करत राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात ठोस आणि दीर्घकालीन यश संपादन केले आहे. लष्करी क्षमता, गुप्तचर कार्यक्षमता, धोरणात्मक समन्वय आणि स्वदेशी तंत्रज्ञान—या सर्व घटकांमुळे भारताची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम व विश्वासार्ह बनली आहे.

**१ अण्वस्त्र क्षमता व प्रतिबंधक धोरण (Nuclear Deterrence)**

भारताने अण्वस्त्र क्षमता विकसित करून राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने एक निर्णायक पाऊल उचलले.

•अण्वस्त्र धोरणामुळे प्रतिबंधक शक्ती (Deterrence) निर्माण झाली.

•"पहिला वापर नाही" (No First Use) या धोरणातून जबाबदार राष्ट्राची भूमिका अधोरेखित झाली.

•सामरिक समतोल राखण्यात आणि परकीय दबाव कमी करण्यात अण्वस्त्र क्षमतेचा मोठा वाटा राहिला.

या धोरणामुळे भारताची सामरिक स्वायत्तता आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विश्वासार्हता वाढली.

**२ सीमावर्ती सुरक्षेचे बळकटीकरण**

स्वातंत्र्यानंतर सीमावर्ती भागात सुरक्षितता निर्माण करणे हे मोठे आव्हान होते.

•आंतरराष्ट्रीय सीमांवर कुंपण, रस्ते व पायाभूत सुविधा

•आधुनिक देखरेख प्रणाली व तैनाती

•सीमावर्ती दलांचे सशक्तीकरण

यामुळे घुसखोरी, तस्करी आणि दहशतवादी हालचालींवर मोठ्या प्रमाणावर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

**३ संयुक्त कमांड व संरक्षण समन्वय**

आधुनिक युद्ध हे एकाच दलावर आधारित नसून त्रिदल समन्वयावर आधारित असते, हे भारताने ओळखले.

•स्थलसेना, नौसेना व वायुदल यांच्यात समन्वय

•संयुक्त सराव व ऑपरेशन्स

•धोरणात्मक नियोजनात एकसंध दृष्टीकोन

या समन्वयामुळे निर्णयक्षमता वाढली आणि संकटाच्या काळात जलद प्रतिसाद देणे शक्य झाले.

**४ दहशतवादविरोधी कारवायांमध्ये यश**

भारताने दहशतवादविरोधी धोरणात लक्षणीय प्रगती केली आहे.

•गुप्तचर आधारित अचूक कारवाया

•सीमापार दहशतवादाला आळा

•अंतर्गत सुरक्षेतील समन्वय वाढवणे

या कारवायांमुळे दहशतवादी संघटनांच्या क्षमतेवर मोठा परिणाम झाला असून नागरिकांच्या सुरक्षेत सुधारणा झाली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**५ संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास**

परकीय शस्त्रास्त्रांवरील अवलंबित्व कमी करणे हे भारताचे दीर्घकालीन उद्दिष्ट राहिले आहे.

•संरक्षण संशोधन व विकास संस्थांची भूमिका

•क्षेपणास्त्रे, रडार, संरक्षण प्रणालींची निर्मिती

•"आत्मनिर्भरता" संकल्पनेतून संरक्षण उद्योगाला चालना

स्वदेशी तंत्रज्ञानामुळे भारताची लष्करी क्षमता टिकाऊ, किफायतशीर आणि सुरक्षित बनली आहे.

राष्ट्रीय सुरक्षेतील ही यशस्वी पावले भारताच्या **रणनीतिक प्रगल्भतेचे** द्योतक आहेत. अण्वस्त्र प्रतिबंधक धोरण, सीमावर्ती सुरक्षा, त्रिदल समन्वय, दहशतवादविरोधी यश आणि स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान—या सर्व बाबींनी भारताला एक **सक्षम, जबाबदार आणि आत्मनिर्भर सुरक्षा शक्ती** म्हणून घडवले आहे.

**राष्ट्रीय सुरक्षेतील धोरणात्मक बदल**

स्वातंत्र्यानंतर भारताने अहिंसक परराष्ट्र धोरण स्वीकारले असले तरी, बदलत्या परिस्थितीनुसार वास्तववादी सुरक्षा धोरण अंगीकारले. संरक्षण खर्चात वाढ, आंतरराष्ट्रीय सामरिक भागीदारी आणि बहुपक्षीय सहकार्य यांवर भर दिला गेला.

स्वातंत्र्यानंतर भारत देशाने परराष्ट्र धोरणात अहिंसा, शांततावाद आणि सार्वभौमत्वाचा आदर या तत्त्वांवर आधारित भूमिका स्वीकारली. तथापि, जागतिक व प्रादेशिक राजकारणातील बदल, शेजारी देशांशी संघर्ष आणि नव्या स्वरूपातील सुरक्षा धोके लक्षात घेता भारताने कालांतराने वास्तववादी व व्यवहार्य राष्ट्रीय सुरक्षा धोरण अंगीकारले.

**१ अहिंसक परराष्ट्र धोरण ते वास्तववादी सुरक्षा दृष्टीकोन**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने युद्धापेक्षा संवाद, सहअस्तित्व आणि शांततामय सहकार्याला प्राधान्य दिले.

- आंतरराष्ट्रीय शांततेला पाठिंबा
- वसाहतवाद व साम्राज्यवादाविरोधी भूमिका
- संघर्ष टाळण्याचा प्रयत्न

परंतु १९४७, १९६२ व त्यानंतरच्या संघर्षांनी केवळ नैतिक भूमिकेपुरते मर्यादित राहणे अपुरे असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे भारताने सैन्यसज्जता व प्रतिबंधक क्षमता वाढवण्याकडे धोरणात्मक वळण घेतले.

**२ संरक्षण खर्चात वाढ व लष्करी सज्जता**

राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजेनुसार संरक्षण खर्चात सातत्याने वाढ करण्यात आली.

- लष्कराचे आधुनिकीकरण
- नवीन शस्त्रप्रणाली, तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा
- सीमावर्ती भागात रस्ते, दळणवळण व लॉजिस्टिक व्यवस्था

या गुंतवणुकीमुळे भारताची प्रतिसादक्षमता (Response Capability) लक्षणीयरीत्या वाढली.

**३ आंतरराष्ट्रीय सामरिक भागीदारी :** शीतयुद्ध काळात भारताने असंलग्नतावाद स्वीकारला; मात्र बदलत्या जागतिक व्यवस्थेत सामरिक सहकार्याचे महत्त्व वाढले.

- संरक्षण व गुप्तचर सहकार्य
- संयुक्त लष्करी सराव
- तंत्रज्ञान व प्रशिक्षणाची देवाणघेवाण

यामुळे भारताला जागतिक सुरक्षेच्या चौकटीत सक्रिय भूमिका बजावणे शक्य झाले.

**४ बहुपक्षीय सहकार्य व प्रादेशिक सुरक्षा**

भारताने केवळ द्विपक्षीय नव्हे तर बहुपक्षीय मंचांवरही सुरक्षा सहकार्य वाढवले.

- प्रादेशिक स्थैर्यासाठी सामूहिक प्रयत्न
- सागरी सुरक्षा व दहशतवादविरोधी सहकार्य
- आंतरराष्ट्रीय नियमाधारित व्यवस्थेला पाठिंबा

या धोरणामुळे भारताची जागतिक विश्वासार्हता आणि सामरिक वजन वाढले.

राष्ट्रीय सुरक्षेतील धोरणात्मक बदल हे भारताच्या परिपक्व राजकीय व सामरिक विचारसरणीचे प्रतिबिंब आहेत. अहिंसेच्या तत्त्वांना कायम ठेवत, वास्तववादी सुरक्षा धोरण स्वीकारल्यामुळे भारताने शांततावाद आणि सामरिक सज्जता यांचा समतोल साधला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

आहे. संरक्षण खर्च, आंतरराष्ट्रीय भागीदारी आणि बहुपक्षीय सहकार्य यांच्या माध्यमातून भारताने स्वतःला एक जबाबदार, सक्षम व प्रभावी सुरक्षा शक्ती म्हणून स्थापित केले आहे.

**भविष्यातील दिशा (Future Directions)**

२१व्या शतकात भारत देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेचे स्वरूप अधिक तंत्रज्ञानाधारित, बहुआयामी आणि गतिशील होत आहे. पारंपरिक लष्करी सामर्थ्याबरोबरच माहिती, अवकाश, सायबर आणि सामाजिक स्थैर्य हे घटकही राष्ट्रीय सुरक्षेचे अविभाज्य भाग बनले आहेत. त्यामुळे भविष्यातील सुरक्षा धोरणे ही दूरदृष्टीपूर्ण व समन्वयित असणे आवश्यक आहे.

**१ कृत्रिम बुद्धिमत्ता व बिग डेटा आधारित सुरक्षा**

भविष्यातील युद्ध व सुरक्षा व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि बिग डेटा विश्लेषण निर्णायक भूमिका बजावणार आहेत.

- गुप्तचर माहितीचे जलद व अचूक विश्लेषण
- संभाव्य धोके ओळखण्यासाठी भविष्यवाणी प्रणाली
- सीमावर्ती देखरेख व स्वयंचलित निर्णय सहाय्य

AI आधारित प्रणालींमुळे मानवी चुका कमी होतील आणि वेळेवर प्रतिसाद देणे शक्य होईल.

**२ अवकाश व उपग्रह सुरक्षेवर लक्ष :** अवकाश हे राष्ट्रीय सुरक्षेचे नवे महत्त्वाचे क्षेत्र बनत आहे.

- दळणवळण, नेव्हिगेशन व गुप्तचर उपग्रहांचे संरक्षण
- शत्रुराष्ट्रांच्या अवकाशीय क्षमतांवर नजर
- अवकाशातील संभाव्य संघर्षांसाठी धोरणात्मक तयारी

उपग्रह सुरक्षेमुळे लष्करी, आर्थिक आणि नागरी सेवा सुरक्षित राहतील.

**३ सायबर व माहिती युद्धासाठी स्वतंत्र धोरण :** डिजिटल युगात सायबर हल्ले व माहिती युद्ध हे गंभीर धोके ठरत आहेत.

- राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण बळकट करणे
- महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे डिजिटल संरक्षण
- अफवा, दिशाभूल व मानसिक युद्धाला प्रतिबंध

स्वतंत्र सायबर व माहिती युद्ध धोरणामुळे डिजिटल सार्वभौमत्व मजबूत होईल.

**४ संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भरता :** राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता अत्यावश्यक आहे.

- स्वदेशी संशोधन व नवोन्मेष
- सार्वजनिक–खासगी भागीदारी
- आयात अवलंबित्व कमी करणे

यामुळे दीर्घकालीन सुरक्षा, खर्च कार्यक्षमता आणि सामरिक स्वायत्तता वाढेल.

**५ अंतर्गत सुरक्षा व सामाजिक सलोखा यांचा समन्वय :** भविष्यातील राष्ट्रीय सुरक्षा केवळ शस्त्रबळावर आधारित न राहता सामाजिक स्थैर्यावरही अवलंबून असेल.

- समावेशक विकास व सामाजिक न्याय
- प्रादेशिक व सांस्कृतिक सलोखा
- नागरिकांचा विश्वास व सहभाग

अंतर्गत शांतता आणि सामाजिक ऐक्य हे राष्ट्रीय सुरक्षेचे मूलभूत आधारस्तंभ ठरतील.

भविष्यात भारताची राष्ट्रीय सुरक्षा ही तंत्रज्ञान, अवकाश, सायबर क्षमता, आत्मनिर्भर संरक्षण उद्योग आणि सामाजिक सलोखा यांच्या समन्वयातून साकार होईल. दूरदृष्टीपूर्ण धोरणे आणि समन्वयित अंमलबजावणीद्वारे भारत बदलत्या जागतिक सुरक्षा वातावरणात स्वतःचे सार्वभौमत्व व स्थैर्य यशस्वीपणे जपू शकेल.

**निष्कर्ष (Conclusion)**

स्वातंत्र्यानंतर भारत देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेने दीर्घ, गुंतागुंतीचा आणि परिवर्तनशील प्रवास केला आहे. १९४७ नंतर फाळणी, सीमावाद, परकीय आक्रमणे, अंतर्गत अस्थिरता आणि दहशतवाद यांसारख्या गंभीर आव्हानांचा सामना करत भारताने हळूहळू एकात्म, सक्षम आणि प्रभावी सुरक्षा संरचना उभारली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

लष्करी पुनर्रचना, गुप्तचर व सुरक्षा संस्थांची मजबुती, अण्वस्त्र प्रतिबंधक धोरण, सीमावर्ती सुरक्षेचे बळकटीकरण आणि दहशतवादविरोधी यशस्वी कारवाया—या सर्व घटकांनी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला भक्कम पाया दिला आहे. त्याचबरोबर संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास आणि त्रिदल समन्वयामुळे भारताची रणनीतिक स्वायत्तता वाढली आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताने शांततावादी भूमिकेला प्राधान्य देत, तरीही वास्तववादी व व्यवहार्य सुरक्षा धोरण स्वीकारले. यामुळे भारत आज जबाबदार, विश्वासार्ह आणि सक्षम सामरिक शक्ती म्हणून ओळखला जातो. जागतिक व प्रादेशिक स्थैर्यात भारताची भूमिका सातत्याने महत्त्वाची होत चालली आहे.

भविष्यात, राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ पारंपरिक लष्करी सामर्थ्यावर आधारित न राहता तंत्रज्ञानाधारित, समन्वयपूर्ण आणि समावेशक धोरणांवर अवलंबून असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर व अवकाश सुरक्षा, संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरता तसेच अंतर्गत सुरक्षा व सामाजिक सलोखा—हे सर्व घटक भारताच्या स्थैर्याचे प्रमुख आधारस्तंभ ठरतील. दूरदृष्टीपूर्ण धोरणनिर्मिती आणि प्रभावी अंमलबजावणीद्वारे भारत भविष्यातही आपले सार्वभौमत्व, सुरक्षा आणि राष्ट्रीय एकात्मता यशस्वीपणे जपू शकेल.

**संदर्भ (References)**

1. कौटिल्य (चाणक्य), "*अर्थशास्त्र*, भारतीय विद्या भवन", नवी दिल्ली, 2003.
2. राहुल बेदी, "*भारताची संरक्षण सज्जता*", राजहंस प्रकाशन, पुणे, 2016.
3. भारत सरकार, *भारताचे संविधान*, विधी व न्याय मंत्रालय, नवी दिल्ली, 1950.
4. K. Subrahmanyam, "*India's National Security: A Reader*", Oxford University Press, New Delhi, 2008.
5. Bharat Karnad, "*Nuclear Weapons and Indian Security*", Macmillan India, New Delhi, 2002.
6. Sumit Ganguly, "*Conflict Unending: India–Pakistan Tensions Since 1947*", Oxford University Press, New Delhi, 2001.
7. Srinath Raghavan, "*War and Peace in Modern India*", Palgrave Macmillan, New Delhi, 2010.
8. Neville Maxwell, "*India's China War*", Jonathan Cape, London, 1970.
9. Prakash Singh, "*The Naxalite Movement in India*", Rupa Publications, New Delhi, 1995.
10. P. W. Singer & Allan Friedman, "*Cybersecurity and Cyberwar*", Oxford University Press, New York, 2014.
11. Amit Cowshish, "*Defence Procurement in India*", IDSA / Routledge India, New Delhi, 2013.

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article


# भारताची सामाजिक चळवळ: स्वातंत्र्य संग्रामापासून सामाजिक न्यायापर्यंत


**प्रा.डॉ.बसवेश्वर पांडागळे**

सहयोगी प्राध्यापक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ओदे ता.विक्रमगड जि.पालघर



**Manuscript ID**:
JRD -2026-180104
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 15-18
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*भारतातील सामाजिक चळवळींचा इतिहास हा समाजातील अन्याय, विषमता व शोषणाविरुद्धच्या संघर्षाचा इतिहास आहे. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात या चळवळी राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कार्यरत होत्या. अस्पृश्यता निवारण, महिला सक्षमीकरण, शिक्षण प्रसार आणि जातिभेद निर्मूलन यांना त्या काळात विशेष महत्त्व देण्यात आले. स्वातंत्र्यानंतरही समाजातील सर्व घटकांना समान संधी व न्याय मिळाला नाही. त्यामुळे दलित, महिला, आदिवासी, शेतकरी, कामगार व मागासवर्गीय यांच्या हक्कांसाठी विविध सामाजिक चळवळी उदयास आल्या. भारतीय राज्यघटनेने दिलेले मूलभूत हक्क, समानता व सामाजिक न्याय या मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे हे या चळवळींचे मुख्य उद्दिष्ट राहिले. आजच्या काळात सामाजिक चळवळी सामाजिक न्याय, मानवी हक्क, पर्यावरण संरक्षण आणि समावेशक विकास यांवर केंद्रित आहेत. अशा प्रकारे स्वातंत्र्यसंग्रामापासून सुरू झालेला सामाजिक परिवर्तनाचा प्रवास आजही सामाजिक न्यायाच्या लढ्यातून पुढे चालू आहे. भारतातील सामाजिक चळवळींनी वसाहतवादी जोखडातून मुक्त होण्याच्या लढ्यापासून सुरुवात करून, स्वातंत्र्यानंतर समता, बंधुता आणि सर्वसमावेशक विकासावर आधारित 'सामाजिक न्याय' प्रस्थापित करण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे, ज्यात प्रत्येक नागरिकाला समान संधी आणि सन्मान मिळावा यासाठी विविध गट संघर्ष करत आहेत.*



**शब्दसूची** : *सामाजिक चळवळ, स्वातंत्र्यसंग्राम, सामाजिक न्याय, लोकशाही,मानवी हक्क, दलित, महिला, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, कामगार,*


**प्रस्तावना**

भारताची सामाजिक चळवळ ही केवळ राजकीय सत्तांतरासाठीची चळवळ नव्हती, तर ती समाजरचनेत मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याचा व्यापक प्रयत्न होता. स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय या दोन संकल्पना परस्परपूरक असल्याचे या चळवळींमधून स्पष्ट होते. ब्रिटिश सत्तेविरुद्धचा स्वातंत्र्यलढा सुरू असताना भारतीय समाजात खोलवर रुजलेली जातिव्यवस्था, अस्पृश्यता, स्त्री-अन्याय आणि आर्थिक विषमता ही मोठी आव्हाने होती. त्यामुळे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती मिळवणे पुरेसे नव्हते, तर अंतर्गत सामाजिक गुलामगिरीतूनही मुक्ती आवश्यक होती. या जाणिवेतूनच सामाजिक सुधारक आणि नेत्यांनी सामाजिक न्यायाला स्वातंत्र्य चळवळीशी जोडले. महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आणि सामाजिक समतेवर भर दिला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाला कायदेशीर व घटनात्मक चौकट प्रदान केली.


Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*प्रा.डॉ.बसवेश्वर पांडागळे, सहयोगी प्राध्यापक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ओदे ता.विक्रमगड जि.पालघर*



DOI:
10.5281/zenodo.18169072

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*पांडागळे, . बसवेश्वर. (2026). भारताची सामाजिक चळवळ: स्वातंत्र्य संग्रामापासून सामाजिक न्यायापर्यंत. Journal of Research & Development, 18(1(IV)), 15–18. https://doi.org/10.5281/zenodo.18169072*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

यामुळे सामाजिक चळवळींना वैचारिक स्पष्टता आणि दीर्घकालीन दिशा मिळाली. स्त्री, दलित, शेतकरी आणि कामगार चळवळींनी वंचित घटकांना आवाज दिला आणि लोकशाही अधिक समावेशक केली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने या चळवळींच्या उद्दिष्टांना मूर्त रूप दिले. समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही मूल्ये स्वीकारून सामाजिक न्याय हा राष्ट्रनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरवण्यात आला. तरीही सामाजिक विषमता पूर्णतः नष्ट झालेली नाही, हे वास्तव आहे.

एकूणच, भारताची सामाजिक चळवळ ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. स्वातंत्र्य ही केवळ राजकीय संकल्पना नसून सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समतेशिवाय ती अपूर्ण आहे, हे या चळवळींच्या विश्लेषणातून स्पष्टपणे दिसून येते.
भारताची सामाजिक चळवळ ही राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय या दोन महत्त्वाच्या ध्येयांभोवती केंद्रित आहे. या चळवळींचे उद्दिष्ट केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती मिळवणे नव्हते, तर भारतीय समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण दूर करून समताधिष्ठित समाज घडवणे हे होते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

- ब्रिटिश सत्तेपासून भारताला मुक्त करून स्वशासन (स्वराज्य) प्रस्थापित करणे हे मुख्य उद्दिष्ट होते.
- जातिभेद, अस्पृश्यता आणि सामाजिक उच्च-नीचता नष्ट करून सर्व नागरिकांना समान दर्जा मिळवून देणे.
- वंचित, दलित, आदिवासी, मागास वर्ग यांना हक्क, संरक्षण आणि संधी देऊन न्याय्य समाजरचना निर्माण करणे.
- स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य, कायदेशीर हक्क आणि सामाजिक सन्मान मिळवून देणे.
- शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांचे शोषण थांबवून त्यांना आर्थिक सुरक्षितता व न्याय मिळवून देणे.
- स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा समाजजीवनात स्वीकार व अंमलबजावणी करणे.
- राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोखा
- धर्म, जात, भाषा, प्रदेश या पलीकडे जाऊन राष्ट्रीय ऐक्य मजबूत करणे. परिवर्तनशील आणि समतावादी समाजनिर्मिती करण्यासाठी.

**शोधनिबंधाची ग्रहीतके** :

- ब्रिटिश सत्तेसोबतच सामाजिक गुलामगिरीचाही अंत होणे आवश्यक आहे.राजकीय स्वातंत्र्याशिवाय सामाजिक सुधारणा शक्य नाहीत.
- सर्व भारतीय समान असून त्यांना समान हक्क मिळाले पाहिजेत.ऐतिहासिक अन्याय भरून काढण्यासाठी आरक्षण आवश्यक आहे.
- दुर्बल घटकांना विशेष संरक्षण हवे व लोकशाही टिकण्यासाठी सामाजिक समता महत्त्वाची आहे.कायदेशीर समानता असूनही सामाजिक समानता प्रत्यक्षात नाही.
- राज्यघटनेतील हक्कांची अंमलबजावणी आवश्यक आहे व त्यासाठी सामाजिक न्यायासाठी संघटित संघर्ष गरजेचा आहे.

भारताची सामाजिक चळवळ ही दीर्घकालीन, बहुआयामी आणि परिवर्तनकारी प्रक्रिया आहे. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात सुरू झालेली ही चळवळ केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्ध मर्यादित न राहता, सामाजिक विषमता, अन्याय आणि शोषणाविरुद्धच्या संघर्षात रूपांतरित झाली. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्यापासून सामाजिक न्यायापर्यंतचा प्रवास हा भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा इतिहास ठरतो. भारतातील सामाजिक चळवळींनी स्वातंत्र्य संग्रामाच्या राष्ट्रीय ध्येयापासून सुरू होऊन स्वातंत्र्यानंतर सामाजिक न्यायाच्या व्यापक ध्येयांपर्यंत प्रवास केला आहे, ज्यात सती प्रथा बंदी, बालविवाह विरोध, जातिव्यवस्थेविरुद्ध लढा, स्त्रियांचे हक्क, आदिवासी हक्क, आणि पर्यावरण न्याय यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण बदलांचा समावेश आहे, ज्यांनी आधुनिक भारताची सामाजिक-राजकीय ओळख घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**स्वातंत्र्यसंग्राम (वसाहती काळ) आणि सामाजिक सुधारणा:**

**राजा राम मोहन रॉय:**

सती प्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व यांसारख्या कुप्रथांविरुद्ध लढा देऊन भारतीय पुनर्जागरणाचे जनक म्हणून ओळखले जातात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**गांधीवादी युग:**

महात्मा गांधींनी सत्याग्रह आणि अहिंसक असहकार चळवळींद्वारे उदा. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग. जनतेला एकत्र आणले, ज्याचा उद्देश केवळ राजकीय स्वातंत्र्यच नव्हे तर सामाजिक सुधारणाही होता, ज्यात अस्पृश्यता निर्मूलनाचा समावेश होता.

**स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक न्यायाकडे वाटचाल:**

आंबेडकरवादी चळवळ: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील चळवळीने दलित आणि मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि सामाजिक न्यायाचा पाया रचला.

**भूमि सुधारणा चळवळी:**

जमीनदारी नष्ट करून भूमिहीन मजुरांना हक्क मिळवून देण्यासाठी लढा दिला.
महिला हक्क चळवळी: १९७० नंतर स्त्रियांच्या हक्कांसाठी, लैंगिक समानतेसाठी आणि घरगुती हिंसाचाराविरोधात आवाज उठवण्यात आला.

**आदिवासी हक्क चळवळी:**

वनहक्क कायदा, २००६ सारख्या कायद्यांच्या निर्मितीसाठी आदिवासी समुदायांनी संघर्ष केला.
पर्यावरणीय न्याय चळवळी: नर्मदा बचाव आंदोलन (Narmada Bachao Andolan) सारख्या चळवळींनी पर्यावरणीय न्यायासाठी जागतिक स्तरावर प्रभाव पाडला.

**समकालीन चळवळी:**

LGBTQ+ हक्क, अल्पसंख्याकांचे हक्क आणि इतर सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज उठवणाऱ्या चळवळी आजही सक्रिय आहेत.

**१. स्वातंत्र्यसंग्राम आणि सामाजिक जाणीव**

स्वातंत्र्यसंग्रामाने भारतीयांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण केली. या काळात समाजातील जातिभेद, अस्पृश्यता, स्त्री-अन्याय आणि आर्थिक शोषण यांकडे लक्ष वेधले गेले. स्वातंत्र्याशिवाय सामाजिक सुधारणांना गती मिळणे कठीण आहे, ही जाणीव दृढ झाली.

**२. समाजसुधारकांचे योगदान**

राजा राममोहन रॉय यांनी धार्मिक अंधश्रद्धा आणि सामाजिक कुप्रथा दूर करण्याचा प्रयत्न केला.महात्मा जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली.महर्षी शिंदे, शाहू महाराज यांनी अस्पृश्यता निवारण व आरक्षणाची संकल्पना पुढे आणली.

**३. राष्ट्रीय चळवळीत सामाजिक न्याय**

महात्मा गांधींनी स्वातंत्र्यसंग्रामाला व्यापक सामाजिक स्वरूप दिले. हरिजन उद्धार, ग्रामस्वराज्य, स्वावलंबन यांवर त्यांनी भर दिला.तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित आणि वंचित घटकांसाठी सामाजिक न्यायाचा लढा उभारला आणि घटनात्मक अधिकार मिळवून दिले.

**४. स्त्री, शेतकरी व कामगार चळवळी**

स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात आणि त्यानंतर स्त्रीसमानता, शेतकरी हक्क, कामगार हक्क यांसाठी विविध चळवळी उदयास आल्या. यामुळे सामाजिक न्यायाची व्याप्ती वाढली.

**५. स्वातंत्र्योत्तर काळ आणि संविधान**

१९५० मध्ये अंमलात आलेल्या भारतीय संविधानाने समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही मूल्ये राष्ट्रजीवनाची पायाभरणी ठरवली. आरक्षण, मूलभूत हक्क आणि सामाजिक कल्याणकारी धोरणांमुळे सामाजिक न्यायाला संस्थात्मक आधार मिळाला.

**६. समकालीन सामाजिक चळवळी**

आजच्या काळातही आदिवासी हक्क, स्त्रीसुरक्षा, शैक्षणिक व आर्थिक समानता, पर्यावरण न्याय यांसाठी सामाजिक चळवळी सुरू आहेत. यावरून सामाजिक न्यायाचा संघर्ष अजूनही संपलेला नाही, हे स्पष्ट होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**निष्कर्ष**

स्वातंत्र्यसंग्रामापासून सामाजिक न्यायापर्यंत भारताची सामाजिक चळवळ ही सातत्यपूर्ण संघर्षाची कथा आहे. राजकीय स्वातंत्र्याने सामाजिक परिवर्तनाचा मार्ग खुला केला, तर सामाजिक न्यायाने लोकशाही अधिक सम.तावादी आणि समावेशक बनवली. ही प्रक्रिया आजही चालू आहे आणि भारतीय समाजाच्या प्रगतीचा आधारस्तंभ ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची** :

१. य दि. फडके,विसाव्या शतकातील महाराष्ट्र, के. सागर पब्लिकेशन्स,१ जानेवारी २०१३.

२. सदानंद मोरे,महात्मा फुले आणि सामाजिक क्रांती, सकाळ प्रकाशन,२०२४.

३.शरद पाटील,भारतीय जातिव्यवस्थेचा इतिहास.

४.https://mr.wikipedia.org

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# भारताचे स्वातंत्र्योत्तर परिवर्तन :-महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता, प्रगती व आव्हाने

श्वेता रविकिरण पाटकरी[1], प्रा.डॉ. शरद मधूकर कुलकर्णी[2]
[1]संशोधक विद्यार्थी
[2]संशोधक मार्गदर्शक

**Manuscript ID**:
JRD -2026-180105
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 19-24
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*1947 मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही, समावेशकता आणि सामाजिक न्याय या मुल्यांवर आधारित व्यापक परिवर्तनाचा मार्ग स्विकारला.या परिवर्तनात महिला सक्षमीकरण व लिंग समानता हे मुलभूत घटक ठरले. भारतीय संविधानाने, मुलभूत हक्क, राज्याच्या मार्गदर्शक तत्वे आणि सकारात्मक भेदभावाच्या तरतुदी मधुन लिंग न्यायाचा भक्कम पाया घातला शिक्षण, राजकीय सहभाग, रोजगार आणि कायदेशीर हक्क्या क्षेत्रात महिलांची लक्षणीय प्रगती झाली असली तरी पितृसत्ताक सामाजिक रचना, सांस्कृतिक रूढी आणि आर्थिक असामानता यांमुळे लिंग विषमता अद्याप कायम आहे. हा संशोधन लेख स्वातंत्र्योत्तर काळातील महिला सक्षमीकरण व लिंग समानतेच्या प्रक्रियेचे संविधानिक तरतुदी, धोरणात्मक उपक्रम, राजकीय सहभाग आणि विद्यमान आव्हाने यांच्या आधारे समालोचनात्मक विश्लेषण करतो आहे. कायदेशीर व संस्थात्मकचौकट मजबूत असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी वा सामाजिक परिवर्तना शिवाय वास्तविक समानता साध्य होऊ शकत नाही, असा या लेखाचा निष्कर्ष आहेत.*

***मुख्यशब्द:*** *महिला सक्षमीकरण, लिंग समानता, स्वातंत्र्योत्तर भारत, राजकीय सहभाग, समाजिक परिवर्तन, सुधारणा.*

### अभ्यासाची उदिष्टे

- भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील महिला सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा आणि तिच्या विकास प्रक्रियेचा अभ्यास करणे.
- स्वातंत्र्यानंतर माहिलांसाठी राबविण्यात आलेल्या घटनात्मक तरतुदी, कायदे, धोरणे आणि योजनांचा आढावा घेणे.
- महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करणे.
- महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांचा अभ्यास करणे.

### संशोधन पद्धती :

सदर लेख हा दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे दुय्यम साधनसामग्री म्हणजे विविध एजन्सीद्वारे वेगवेगळ्या उद्देशासाठी गोळा केलेली माहिती आणि ही माहिती विविध प्रकाशनांमधून आणि इतर अभ्यासपुर्ण कारणांसाठी गोळा केलेली आहे

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा श्वेता रविकिरण पाटकरी, संशोधक विद्यार्थी*

**How to cite this article:**
*पाटकरी, . श्वेता . रविकिरण ., & कुलकर्णी, . शरद . मधूकर . (2026). भारताचे स्वातंत्र्योत्तर परिवर्तन :-महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता, प्रगती व आव्हाने. Journal of Research & Development, 18(1(IV)), 19–24. https://doi.org/10.5281/zenodo.18169099*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169099
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

ज्यात सरकारी आणि गैरसरकारी, प्रकाशने आणि अहवाल शैक्षणिक जर्नल्स, वर्तमान पत्र आणि विविध वेबसाईट्स इत्यादींचा समावेश आहे.

**प्रस्तावना :**

भारताचे स्वातंत्र्य हे केवळ राजकीय स्वातंत्र्य नसून समाजिक व आर्थिक परिवर्तनाची सुरुवात होती. औपनिवेशिक आणि पारंपारिक समाजरचनेत महिलांना शिक्षण मालकी हक्क, रोजगार व निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान होते. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत महिलांचा समान सहभाग अत्यावश्यक आहे, ही जाणीव स्वातंत्र्योत्तर भारतीय राज्यव्यवस्थेला होती.त्यामुळे महिला समक्षमीकरण व लिंग समानता ही राष्ट्रीय विकासाची अनिवार्य अट मानली गेली.

**स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने केलेले उपाय :**

1947 मध्ये भारताच्या स्वातंत्र्यापासून महिलांच्या सामाजिक आर्थिक, राजकीय सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वपूर्ण प्रयत्न झाले.या संदर्भात काही प्रमुख विकास आणि उपक्रम पुढील प्रमाणे सांगता येतील.

**1) लिंग समानतेसाठी संविधानिक चौकट:**

भारतीय संविधानाने महिलांना समानतेचे ठोस कायदेशीर संरक्षण दिले आहे. त्यातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे

- कलम 14 – कायद्यापुढे समानता
- कलम 15 – लिंगाच्या आधारे भेदभावास मनाई
- कलम 16 – सार्वजनिक रोजगारात समान संधी
- कलम 39 (ड) – समान कामासाठी समान वेतन
- कलम 42 – मातृत्व संरक्षण व मानवीय कामकाजाच्या अटी

या तरतुदी लिंग समानतेच्या दृष्टीने राज्याच्या बांधिलकीचे स्पष्ट प्रतिबिंब आहेत.

**2) कायदेशीर सुधारण आणि महिला हक्क:**

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे करण्यात आले.

- हिंदू कोड बील विधेयक
- हुंडाबंदी कायदा, 1961
- कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, 2005
- कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, 2013

हे कायदे महिलांच्या हक्कांचे सरंक्षण करतात, मात्र अंमलबजावणीतील त्रुटी व सामाजिक दबावामुळे अपेक्षित परिणाम साध्य होत नाही.

**3) शिक्षण:**

शिक्षण हे सक्षमीकरणाचा आधारस्तंभ आहे. साक्षरता दर आणि दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता तसेच शाळा महाविद्यालयांमध्ये महिलांची नोंदणी वाढविण्यासाठी विविध धोरणे आणि कार्यक्रम सुरु करण्यात आले. राष्ट्रीय शिक्षण धोरण (1968) आणि दुसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण (1986) हे शिक्षणाची उपलब्धता वाढवण्याच्या उद्देशाने प्रेरित होते.

- सर्वशिक्षा अभियान – (2000) 14 वर्षापर्यंतच्या सर्व मुलांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण.
- कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (2004) वंचित पार्श्वभूमीतील मुलींसाठी निवासी शाळा

वरील सुधारणामुळे गेल्या 75 वर्षात भारतीय महिला साक्षरता दरात लक्षणीय सुधारणा झाली आहे.स्वातंत्र्याच्या वेळी 9% वरुन आज 77% पेक्षा जास्त झाली आहे.

**4) आरोग्य सेवा:**

भारतात देशातील महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी अनेक आरोग्य उपक्रम आणि कार्यक्रम राबविले गेले आहेत.

- माता आणि बाल आरोग्य, पुन:त्पादक आरोग्य, पोषण आणि लिंग आधारित हिंसाचार यांचा समावेश आहे
- एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनांद्वारे माता आणि बाल आरोग्य सुधारण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- 6 वर्षा खालील मुलांना आणि गर्भवती, स्तनपान देणाऱ्या महिलांना पुरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, लसीकरण आणि पुर्व शिक्षण प्रदान करते.
- ग्रामीण भागातील महिलासाठी जननी सुरक्षा योजना (JSY) ज्यामुळे संस्थात्मक प्रसूतीना प्रोत्साहन देवून माता मृत्यूदर कमी होण्यास प्रोत्साहन दिले.

गेल्या 75 वर्षात , भारताने माता मृत्यूदर कमी करण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. 1947 मध्ये प्रति 1000 जन्मामागे 200 वरून 2021 मध्ये प्रति 1000 जन्मांमागे 103 पर्यंत घट झाली आहे.

**5) सामाजिक जागरूकता:**

विविध स्वयंसेवी संस्था आणि महिला हक्क संघटनांनी लैंगिक समस्यांबदल जागरुकता निर्माण करण्यासाठी, महिला हक्कांसाठी वकिली करण्यासाठी आणि हिंसाचार किंवा भेदभाव, बालविवाह आणि हुंडा यासारख्या समस्यांना तोंड देणाऱ्या महिलांना आधार देण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत ज्याचा उद्देश सामाजिक दृष्टीकोन बदलणे आहे. आर्थिक सक्षमीकरणासाठी आथिक संसाधने उत्पन्न, रोजगाराच्या संधी आणि उद्योजकतेवर प्रवेश आणि नियंत्रण यांचा समावेश आहे.

**6) रोजगाराच्या संधी:**

भारतात महिलांसाठी विविध क्षेत्रांमध्ये आरक्षण लागू केले आहे. प्रामुख्याने सरकारी नोकऱ्या, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सरकारी मालकीच्या, महामंडळांमध्ये, पोलिस आणि निमलष्करी दल, शैक्षणिक संस्था, विद्यापीठ अध्यापन आणि प्रशासकीय पदांवर महिलांसाठी आरक्षण प्रदान केलेले आहे. आर्थिक सक्षमीकरणासाठी खालील योजना दिसून येतात कारण आर्थिक स्वालंबनाशिवाय महिला सक्षमीकरण अपुर्ण आहे.

- स्वय – सहायता गट (SHGs)
- राष्ट्रीय ग्रामिण उपजिविका अभियान
- स्टॅंड – अप इंडिया व स्किल इंडिया योजना

या उपक्रमामुळे महिलांच्या उत्पन्नाच्या संधी वाढल्या. महिलांचा कारभार सहभाग दर कमी असून वेतन असमानता, असंघटित खेत्रातील रोजगार व विनामूल्य घरगुती श्रम ही आव्हाने अद्याप कायम आहेत.

**7) राजकीय सहभाग आणि लिंग समानता:**

राजकीय सक्षमीकरण हे लोकशाहीचे महत्वाचे अंग आहे.

- 73 वी व 74 वी घटनादुरुस्तीमुळे (1992) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 33% आरक्षण मिळाले यामुळे - तळागाळातील महिला नेतृत्व विकसित झाले. स्थानिक पातळीवर महिलांशी संबंधित प्रश्नांना महत्व मिळाले. तसेच महिला आरक्षण कायदा, 2023 अंतर्गत लोकसभा व विधानसभांमध्ये 33% आरक्षणची तरतुद ही लिंग समानतेच्या दिशेने टाकलेले ऐतिहासिक पाऊल आहे.

**महिला सक्षमीकरण :**

महिला सक्षमीकरण म्हणजे पुरुष आणि महिलांमधील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय असमानता दूर करण्याची प्रक्रिया. महिला सक्षमीकरण म्हणजे सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग. जीवनाच्या विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी समान संधी सुनिश्चित करणे. त्याचे उदिष्टे महिलांना त्यांचे शिक्षण, आरोग्य, जीवनशैली आणि करिअर याबाबत निर्णय घेण्याचे स्वांतत्र्य वापरण्यास सक्षम करणे आहे.महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क, दर्जा आणि शक्ती मिळावी आणि समाजात समानता आणि समावेशकता वाढावी हे प्रमूख उदिष्टे आहे.

**महिला सक्षमीकरणाचे प्रकार :**

महिला सक्षमीकरण ही सामाजिक शैक्षणिक, आर्थिक राजकीय पैलू असलेली एक बहुआयामी संकल्पना आहे. यापैकी प्रत्येक संकल्पना महिलांना समाजात समान हक्क, संधी आणि दर्जा मिळावा यासाठी महत्वाची भूमिका बजावते.

- सामाजिक सक्षमीकरण
- शैक्षणिक सक्षमीकरण
- आर्थिक सक्षमीकरण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- राजकीय सक्षमीकरण

या सर्व घटकांतून महिला सक्षमीकरण घडत असते.

**2014 नंतर महिला सक्षमीकरणासाठी सरकारचे एकात्मीक दृष्टीकोन :**

"भारताच्या विकासासाठी महिला सक्षमीकरण महत्वाचे आहे.महिलांना गृहिणी म्हणून पाहण्याचे दिवस गेले आहेत. आता महिलांना राष्ट्रनिर्माता म्हणून पाहावे लागेल" असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते. स्वातंत्र्यानंतर भारताने महिला सक्षमीकरण साध्य करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. या कृतीमुळे 1990 पासून मानव विकास निर्देशांक (HDI) आणि 2007 पासून लिंग असमानता निर्देशांक GII) वर भारताचे स्थान सुधारले आहे. काही उपक्रम खालील प्रमाणे-

- प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) - 70% पेक्षा जास्त घरांना महिलांच्या नावे मालकी हक्क देण्यात आले. 2014 पासून महिलांच्या मालकीची 1.72 कोटी घरे.
- प्रधानमंत्री मुद्रा योजना :- भारत सरकारच्या आकडे वारीनूसार मुद्रा योजना कार्यक्रमातील 40 कोटी कर्जेदारा पैकी 69% महिला उद्योजक आहे. महिला लाभार्थ्यांना एकुण 27 कोटी रुपयांचे मुद्रा कर्ज वाटप करण्यात आले.
- प्रधानमंत्री उज्वला योजना - आतापर्यंत 9.6 कोटी गॅस कनेक्शन मोफत देण्यात आले आहेत.
- स्वच्छ भारत अभियान - या अंतर्गत शौचालयांच्या बांधकामामुळे महिलांचा सन्मान वाढविण्यात महत्वपूर्ण योगदान.
- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान (PMSMA) 2016 मोफत प्रसूतीपुर्व काळजी प्रदान करते.
- प्रधानमंत्री मातृवंदना योजना - 2017 गरोदर व स्तनदा माताना पोषण विषयक गरजांसाठी आर्थिक मदत करणे आहे.
- बेटी बचाओ बेटी पढाओ - 2015

**उदिष्टे:**

लिंग पक्षपाती, लिंग निवडक गर्भपात प्रतिबंध, मुलींचे संरक्षण आणि अस्तित्व सुनिश्चित करणे, मुलींचा सहभाग आणि शिक्षण सुनिश्चित करणे.

- वन स्टॉप सेंटर :- 2016

उदिष्टे -महिलांवरील सर्व प्रकारच्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर, मानसिक आणि समुपदेशन सहाय्यासह विविध सेवांमध्ये तात्काळ, गैर – आणिबाणी आणि आपत्कालीन प्रवेशाची सुविधा प्रदान करणे.

- महिला हेल्पलाइन योजना - 2016

उदिष्टे - हिंसाचारात पिडीत महिलांना मदत आणि माहिती मिळवण्यासाठी 24 तास टोल फी टेलिकॉम सेवा

- स्वधर गृह - 2015

उदिष्टे - कोणालाही समाजिक आणि आर्थिक पांठिबा शिवाय संकटात असलेल्या महिलांच्या प्राथमिक गरजा पुर्ण करणे.

- स्वधर गृह - 2015

उदिष्टे - कोणालाही समाजिक आणि आर्थिक पाठिंबाशिवाय संकटात असलेल्या महिलांच्या प्राथमिक गरजापुर्ण करणे.

- सखी निवास - 1972

उदिष्टे - काम करणाऱ्या महिलांसाठी सुरक्षित आणि सोयिस्कर ठिकाणी राहण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देणे.

- नारीशक्ती पुरस्कार - 2016

उदिष्टे - दरवर्षी 8 मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनी हा पुरस्कार दिला जातो.

- मिशन शक्ती :- 2016

उदिष्टे - गरजू महिलांना व्यापक आणि तात्काळ काळजी समर्थन आणि मदत प्रदान करणे.

- निर्भया निधी - 2013

महिलांच्या सुरक्षिततेवर आणि सुरक्षेच्या चितांवर थेट परिणाम.

- प्रसूती रजा धोरण :-

ऑगस्ट 2016 मध्ये प्रसूती रजेचा कालावधी 12 आठवड्यांवरुन 26 आठवड्यापर्यंत करण्यात आला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- तिहेरी तलाक :-

तिहेरी तलाक म्हणजे मुस्लिम समुदायांमध्ये प्रचलित असलेले एक प्रथा आहे, जिथे पती 'तलाक' शब्द सलग तीन वेळा उच्चारुन एकतर्फी घटस्फोट देऊ शकत होता.भारत सरकारने मुस्लिम महिला कायदा 2019 लागू केला तिहेरी तलाक दंडनीय गुन्हा ठरवला.

- 128 वे संविधान दुरुस्ती विधेयक :-

महिलांचे राजकीय सक्षमीकरण साध्य करण्यासाठी केंद्रिय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी 19/9/2023 मध्ये लोकसभेत 33% महिला आरक्षण विधेयक'नारी शक्ती वंदन अधिनियम' या नावाने सादर केले. दि.29/09/2023 रोजी राष्ट्रपतींनी या विधेयकाला मान्यता दिल्यानंतर 'नारी शक्ती वंदन अधिनियम' विधेयक कायदा बनले या सह भारताने महिला सक्षमिकरण साध्य करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे.

**महिला सक्षमीकरणातील आव्हाने :**

भारतातील महिला सक्षमीकरण ही एक हळूहळू आणि कठिण प्रक्रिया आहे जी खोलवर रुजलेले सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अडथळयामुळे विस्कळीत आहे. महिला सक्षमीकरणातील काही प्रमुख अडचणी व आव्हाने आहेत.

- **लोकसंख्याशास्त्रीय असंतुलन :**

राष्ट्रीय कुंटूब आरोग्य सर्वेक्षण 5 मध्ये एकुण प्रजनन दर (TFR) 2015-2016 मध्ये 2.2 वरुन 2019-2020 मध्ये 2.0 पर्यंत घसरला जो प्रगती दर्शवितो तथापी जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर (SRB) 2021 मध्ये प्रति 1000 पुरुषांमागे 937 महिलांवर कायम आहे. तर प्रति 100 मुलीमांगे 108.1 मुले आहेत हे लिंग गुणोत्तर लिंगभेद अधोरेखीत करते, उत्तराखंड, हरियाना आणि दिल्ली सारख्या राज्यांमध्ये अंत्यत असंतुलित प्रमाणात नोंदवले जात आहे. जे समाजात महिलांच्या स्थितीला कमी लेखणारी पितृसत्ताक मानसिकता अधोरेखीत करते.

- **आरोग्य समस्या :**

महिलांचे आरोग्य हे भारतातील सर्वात दुर्लक्षित क्षेत्रांपैकी एक आहे. जवळजवळ 70% किशोरवयीन मुलींना अशक्तपनाचा त्रास होतो. माता मृत्यूदर 113 (2016-18) होता आणि सुमारे 70% महिला पुर्नउत्पादक मार्गाच्या संसर्गाने ग्रस्त आहेत ज्यामुळे वंध्रैव किंवा गर्भधारणेच्या गुंतागुंत होतात

- **स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष:**

महिला शिक्षण अजूनही मागे आहे.युनोस्कोच्या आकडेवारीनुसार 2022 मध्ये भारतातील महिला साक्षरता दर 70.3% होता जो जागतिक सरासरी 79% पेक्षा खूपच कमी आहे. बिहार, राजस्थान सारखी राज्य सर्वात वाईट कामगिरी करणाऱ्या राज्यामध्ये आहेत.

- **महिलांवरील हिंसाचार:**

महिला आणि मुलीवंरील हिंसाचार हा मानवी हक्कांच्या सर्वात व्यापक उल्लंघनापैकी एक आहे.राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (NCRB) च्या आकडेवारीनुसार 2021 मध्ये महिलांवरील गुन्हांमध्ये 15.3% वाढ झाली आहे.घरगुती हिंसाचार, लैगिक छळ, तस्करी आणि हत्या हे महिलांच्या स्वांतत्र्याला आणि प्रतिष्ठेला धक्का देत आहेत.

**महिलांवरील हिंसाचाराचे प्रकार-**

- घरगुती हिंसाचार – मौखिक, अशाब्दीक, शारिरीक, लैगिंक, भावनिक, मानसिक छळ
- स्त्री भृणहत्या / स्त्रीहत्या
- ऑनलाईन हिंसाचार / सायबर गुन्हे – सायबर स्टॉकिंग
- लैगिक हिंसाचार, लैगिक छळ, बलात्कार, लैगिंक टिपण्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**मानवी तस्करी –**

**बालविवाह –**

आजही महिला सक्षमीकरणासमोर पितृसत्ताक, मानसिकता लिंगाधारित हिंसा आर्थिक अवलंबित्व, आरोग्य व पोषणातील असमानता, जात, वर्ग, ग्रामीण – शहरी विषमता यासारखे अनेक अडथळे आहेत जे कायदेशीर समानता आणि सामाजिक वास्तव यांतील दरी स्पष्ट करते.

**निष्कर्ष:**

भारताच्या स्वांतत्र्योत्तर परिवर्तनात महिला सक्षमीकरण व लिंग समानतेच्या दिशेने महत्वपुर्ण प्रगती झाली आहे.संविधानिक तरतुदी, धोरणात्मक उपक्रम आणि राजकीय सुधारणा यामुळे महिलांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला आहे. तथापि, वास्तविक लिंग समानतेसाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत, सामाजिक दृष्टीकोनात परिवर्तन, प्रभावी अमंलबजावणी आणि आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे. महिला सशक्त सहभाग हा भारताच्या शाश्वत व समताधिष्ठित विकासाचा कणा आहे.

**(References) संदर्भ ग्रंथसूची**

1) प्रा. डॉ. संभाजी देसाई – महिला सक्षमीकरण
2) प्रेस इन्फॉमेशन ब्युरो
3) पीएम आयएनडीए वेब पोर्टल (PMINDA)
4) राव नम्रता (2018) भारतातील महिलांचा राजकीय सहभाग :
समस्या व आव्हाने नवी दिल्ली अकादमीक प्रकाशन
5) जागतिक आर्थिक मंच (World Economic Forum) (2023) जागतिक लिंग अंतर अहवाल न्यूर्याक
6) भारतीय शासन व राजनिती : डॉ. बी. एल फाडिया
7) विकिपिडिया, इंटरनेट
8) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) पोर्टल
https@//Womenchild.Maharashtra.gov.in/

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# स्वातंत्र्यानंतर भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि आव्हाने : एक अभ्यास

**डॉ. महादेव उत्तम तोंडे**
विभाग प्रमुख संरक्षणशास्त्र, धनदाई कला व विज्ञान महाविद्यालय
अमळनेर, जि. जळगाव कबचौ. उमवि. जळगाव, महाराष्ट्र
**Email:** mahadevtonde07@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180106
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 25-29
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*या अभ्यासात संबंधित विषयाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, संशोधन पद्धती आणि निष्कर्षांचा संक्षिप्त आढावा घेण्यात आला आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व तांत्रिक घटकांचा अभ्यास करून त्यांच्या परिणामांचे विश्लेषण करण्यात आले आहे. उपलब्ध माहिती व संदर्भांच्या आधारे निष्कर्ष मांडले असून, भविष्यातील संशोधनासाठी दिशा सूचित करण्यात आली आहे. हा अभ्यास धोरणनिर्मिती, संशोधन व व्यवहार्य अंमलबजावणीस उपयुक्त ठरतो.*

***मुख्यशब्द:*** *संशोधन, विश्लेषण, विकास, धोरण, सामाजिक बदल*

**प्रस्तावना:**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, राष्ट्र लहान असो की मोठे असो प्रत्येक राष्ट्राला आपल्या सुरक्षेसाठी प्रयत्नशील रहावेच लागेते. देशाच्या सिमा सुरक्षित ठेवुन आपल्या देशाची सुरक्षा अबाधित ठेवावीच लागते. भारत स्वतंत्र झाल्यावर भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांच्या नवोदित सरकार समोर ज्या अनेक समस्या उभ्या राहिल्या त्यापैकी सेना व त्यांची विभागणी करणे ही प्रमुख समस्या होती. या सशस्त्र सेनेच्या वाटनीत भारताच्या वाट्याला पायदळाच्या 15 रेजिमेंटस, रणगाडा दलाचे 12 रेजिमेंटस, तोफखाण्याच्या 18.5 रेजिमेंटस, तसेच नौसेनेची 18 लढाऊ जहाजे व 14 इतर जहाजे आणि वायुसेनेचे 7 स्क्वाड्रन लढाऊ विमाने व 1 वाहतुक विमानांचे स्क्वाड्रन भारताला मिळाले होते. दक्षिण आशियातील तसेच आंतरराष्ट्रीय बदलती सामारिक स्थिती, आंतरराष्ट्रिय राजकारण, दहशतवाद, युध्दाचा धोका, भारत-चिन सीमावाद, चिन व पाकिस्तान मैत्री यामुळे भारताच्या सुरक्षा धोरणावर होणारा परिणाम याबरोबरच पाकिस्तानची काश्मीर व सियाचीन संबंधिची भूमिका, अण्विक स्पर्धा, चिनची आण्विक शस्त्र क्षमता आणि आपल्या सीमेच्या पलीकडे जावुन विस्तार करण्याची महत्वकांक्षा, हिंदी महासागरावरील बड्या शक्तींचे वाढते वर्चस्व आणि शस्त्र स्पर्धा, बांग्लादेशातुन होणारी घुसखोरी, नक्षलवादी कारवाया, सागरी चाचेगिरी भारताचे शेजारील राष्ट्रांशी असलेले संबंध या बाबींचा विचार करता भारताला आपल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत अत्यंत जागृक रहाणे आवश्यक आहे. तसेच स्वातंत्र्यानंतर भारतासमोर अनेक आव्हाणेही होती. त्यात प्रामुख्याने दहशतवाद, नक्षलवाद, सिमा समस्या, जातीयवाद, फुटीरवाद, भाषा विवाद, धर्मवाद इत्यादी या सर्व आव्हानांचा देशाच्या अंतर्गत सुरक्षेवर व आर्थिक विकासावर आणि पर्यायाने देशाच्या प्रगतीवर परिणाम होतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. महादेव उत्तम तोंडे, विभाग प्रमुख संरक्षणशास्त्र विभाग, धनदाई कला व विज्ञान महाविद्यालय अमळनेर, जि. जळगाव कबचौ. उमवि. जळगाव, महाराष्ट्र*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18169129

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*तोंडे, . महादेव . उत्तम . (2026). स्वातंत्र्यानंतर भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि आव्हाने : एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(IV)), 25–29. https://doi.org/10.5281/zenodo.18169129*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

म्हणून बाह्य सुरक्षा जेवढी महत्वाची तेवढीच देशाची अंतर्गत सुरक्षा व देशाचे अंतर्गत स्वरुप महत्वाचे ठरते. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी राष्ट्रीय एकता, सचोटी, प्रादेशिक संलग्नता, नैतिकता, नागरीतत्वाचा अभिमान, आर्थिक शक्तीसाठी संसाधणांचा पुर्ण उपयोग करण्याची क्षमता, लष्करी क्षमता यांची आवश्यकता आहे. भारताच्या सुरक्षेसाठी अखंड सावधानता हा महत्वाचा भाग आहे. सीमापार धोक्यांपासुन राष्ट्रहिताच्या रक्षणासाठी, लष्करासाठी लागणारी शस्त्रात्रे व आधुनिक साधन सामुग्रीमध्ये सातत्याने होत असलेल्या आधुनिकिकरणात स्वयंपुर्ण होणे आवश्यक आहे. तसेच भारताच्या शेजारील देशांमध्ये आणि हिंदी महासागर क्षेत्रात सत्ता आणि शस्त्र स्पर्धा सुरु झालेली आहे. त्यामुळे भारतानेही आपली राष्ट्रीय सुरक्षा अबाधीत ठेवण्यासाठी आणि सर्व आव्हाने पेलण्यासाठी आपले भुदल, नौदल व हवाईदल आधुनिक आणि सक्षम केलेले आहे. म्हणजेच सैन्य क्षमतेच्या बाबतीत भारत सक्षम बनलेला आहे व आणखी वरचेवर त्यामध्ये प्रगती करत आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे. या शोधनिबंधात लागणारी माहिती ही दुय्यम साधनातील (Secondary Data) आहे. यात प्रामुख्याने राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय घडामोडीवर प्रकाश टाकणारे ग्रंथ, संकेत स्थळे इत्यादी साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचा उद्देश:**

- स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा अभ्यास करणे.
- लढाऊ जहाजे व लढाऊ विमानांचा अभ्यास करणे.
- राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्य:**

- स्वातंत्र्यानंतरची भारताची राष्ट्रीय सुरक्षा अत्यंत महत्वपुर्ण आहे.
- लढाऊ जहाजे व लढाऊ विमाने राष्ट्र सुरक्षेसाठी अत्यावश्यक आहेत.
- राष्ट्र सुरक्षेसमोरील आव्हाने राष्ट्र सुरक्षेत बाधा निर्माण करतात.
- **विषय विवेचन:**
- **स्वातंत्र्यानंतरच्या भारताची राष्ट्रीय सुरक्षा:**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर दिवसेंदिवस विज्ञान तंत्रज्ञानामुळे शस्त्रात्रांमध्ये खुप मोठ्या प्रमाणावर बदल झाला. युध्दाला विज्ञान तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे युध्द अधिकच आधुनिक व विध्वंसक होत गेले. तसेच या स्वातंत्र्यानंतरच्या काळात व 21 व्या शतकात अत्याधुनिक शस्त्रात्रे युध्दात वापरली जात आहेत. यात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा विचार करता भारताकडे प्रामुख्याने पायदळ, नौदल आणि हवाईदल कार्यरत आहे. तसेच रणगाडे, तोफखाना आणि पृथ्वी, अग्नी, नाग, आकाश, त्रिशुल, धनुश, ब्रम्होस अशी अत्याधुनिक क्षेपणास्त्रे आहेत. ज्याच्या जोरावर भारत आपली राष्ट्रीय सुरक्षा अबाधित ठेऊ शकतो. भारताची राष्ट्रीय सुरक्षा अबाधित ठेवणाऱ्या तिन्ही दलांची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

**1) पायदळ:**

भारतीय पायदळ हे तिन्ही सेना दलात सर्वाधिक प्रचीन सेना विभाग आहे. जवळजवळ 2 हजार वर्षाचा अत्यंत प्राचीन व उज्वतम वारसा भारतीय पायदळाचा आहे. स्वातंत्र्यानंतर या पायदळात दिवसेंदिवस विकास होत गेला. सैन्य संख्या ही वाढत गेली. सध्या भारतीय पायदळात सुमारे 13.25 लाख सक्रिय सैनिक आहेत, तसेच राखीव सैनिकही भारतीय पायदळात आहेत. स्वातंत्र्यानंतर ते आजतगायत भारताची राष्ट्रीय सुरक्षा अबाधित ठेवण्यात पायदळाचा सिंहाचा वाटा आहे. याचे उदाहरण म्हणजे 1947-48 चा भारत-पाकिस्तान संघर्ष तसेच 1965, 1971 भारत-पाक युध्दातील भारतीय पायदळाची महत्वपुर्ण कामगीरी तसेच 1999 चे कारगील युध्द या सर्वच युध्दात भारतीय पायदळाने आपले शौर्य सिध्द केलेले आहे आणि भारताची सुरक्षा भक्कमपणे टिकवुन ठेवली आहे.

भरतीय पायदळाकडे प्रामुख्याने पुढील प्रमाणे रायफल आहेत. त्यात INSA रायफल, AK-203 रायफल, SIG SAUER 716 रायफल, M4 कार्बाईन, AK-47 रायफल, मशीन गन, पिस्तोल इत्यादी शस्त्रात्र आहेत. तसेच भारतीय पायदळाकडे दर्जेदार असे रणगाडे आहेत, त्यामध्ये अर्जुन रणगाडा, विजयंता रणगाडा, T-90 भीष्म रणगाडा, T-72 अजेय रणगाडा असे हे रणगाडे आहेत. तसेच बोफोर्स, धनुष, पिनाका-MBRL, K-9 वज्र, M-777 हॉवित्झर या तोफा आहेत. ज्यामुळे स्वातंत्र्यानंतर पायदळ अत्याधुनिक आणि सक्षम बनले आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थित ते देशाची सुरक्षा सक्षमपणे करू शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**2) नौदल:**

स्वातंतत्र्यानंतर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेत महत्वपुर्ण भुमिका बजावणारे दुसरे दल म्हणजे नौदल होय. स्वातंत्र्यानंतर भारतीय नौदल अत्याधुनिक आणि अत्यंत सक्षम झालेले आहेत. शत्रुच्या हल्यापासुन आपल्या सागरी सिमांची सुरक्षा करण्यात नौदल सक्षम आहे. त्याचा प्रत्यय आपल्याला 1971 च्या भारत-पाकिस्तान युध्दात आलेला आहे. तसेच 2025 मध्ये झालेल्या ऑपरेशन सिंदुर मध्येही भारतीय नौदलाची सक्षमता संपुर्ण जगाला दिसून आली. भारतीय नौदलात विमानवाहू जहाजांपासुन ते आण्विक पाणबुड्यांपर्यंत सर्व प्रकारच्या लढाऊ जहातांचा समावेश आहे. ते पुढील प्रमाणे...

- **INS विक्रमादित्य :**

  हे भारतीय नौदलातील अत्यंत महत्वपुर्ण असे विमानवाहु जहाज आहे.

- **INS विराट :**

  1987 साली हि विमानवाहू नौका भारतीय नौदलात सामील करण्यात आली.

- **INS विक्रांत :**

  INS विक्रांत ही संपुर्णपणे भारतीय बनावटीची पहिली विमानवाहू नौका आहे.

- **स्कॉर्पिन पाणबुडी :**

  या पाणबुडीचा समुद्राखालील वेग तासी 37 कि.मी. आहे. तसेच या पाणबुडीची लांबी 230 फुट, रुंदी 20 फुट आणि वजन 1750 टन आहे.

- **INS कलवरी :**

  सध्या भारताला पाकिस्तान, चीन अशा राष्ट्रांकडून असणारा धोका पाहता ही अत्यंत महत्वाची पाणबुडी राष्ट्र सुरक्षेसाठी आहे. याची वैशिष्ट्ये म्हणजे नेमके व अचुक लक्ष्यभेद करणारी यंत्रणा याच्यात आहे.

- **INS खांदेरी :**

  भारताने फ्रांन्सच्या मदतीने बनवलेली ही स्वदेशी पाणबुडी आहे. जानेवारी 2017 ला हीचे जलावतरण करण्यात आले. या अत्याधुनिक पाणबुडीमुळे स्वदेशी बनावटीच्या संरक्षण साहित्यात भारताने मोठी कामगिरी केल्याचे मानले जाते.

- **INS अरिहंत :**

  हि एकच वेळी 16 अण्वस्त्रधारी क्षेपणास्त्रे आपल्यसोबत वाहून नेऊ शकते. तसेच ही अण्विक शक्तीवर चालणारी पाणबुडी आहे.

- **INS कोलकत्ता :**

  ही युध्द नौका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतीय नौदलात सामील करण्यात आली. तसेच ही युध्द नौका 164 मीटर लांबी, 18 मीटर रुंद आणि साडेसात हजार टन वजनाची आहे.

- **INS कोची :**

  हि युध्दनौका 2015 साली भारतीय नौदल दाखल झाली. माजगांव गोदीने बनविलेली ही 25 वी युध्दनौका होती.

- **INS चेन्नई :**

  या युध्द नौकाचा नोव्हेंबर 2016 ला भारतीय नौदलात समावेश करण्यात आला या जहाजावर ब्रम्होस, क्षेपणास्त्रासह कवच यंत्रणेचा समावेश करण्यात आलेला आहे.

- **INS ब्रम्हपुत्रा :**

  हि भारताने तयार केलेली आहे. हि 3850 टन वजनाची असुन 126 मीटर लांबीची आहे.

असे हे स्वातंत्र्यानंतरच्या भारताचे आधुनिक आणि सक्षम असे नौदल आहे. जे कोणत्याही परिस्थितीत भारताची राष्ट्रीय सुरक्षा सक्षमपणे करू शकते.

**3) हवाईदल:**

स्वातंत्र्यानंतर भारताची राष्ट्रीय सुरक्ष सक्षमपणे सांभाळणारे दल म्हणजे हवाई दल. हवाईदल हे भुदल आणि नौदल यांना देखील युध्दात मोठ्या प्रमाणावर मदत करीत असते. तसेच शस्त्रुपासुन देशाची राष्ट्रीय सुरक्षा करण्यासाठी हवाई सिमांचे संरक्षण करण्याचे काम हवाई दल करीत असते. स्वतंत्र भारताकडे पुढील प्रमाणे लढाऊ विमाने आहेत.

- **जग्वार :**

  हे दोन इंजिने असलेले भारतीय हवाई दलाचे छोटे लढाऊ विमान आहे. हे रणभुमीवर अत्यंत जलद गतीने कृती करीत असते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- **मिग-21 :**

1969 मध्ये भारताकडे एकुण 120 मिग-21 विमाने होती. 1971 च्या भारत-पाकिस्तान युध्दात व 1999 च्या कारगील युध्दात या विमानाने उत्कृष्ट कामगिरी पार पाडलेली आहे. हे एक सुरसॉनिक प्रकारातील एक इंजिनाचे रशियन बनावटीचे लढाऊ विमान आहे.

- **मिग-27 :**

या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो. हे विमान रशियन बनावटीचे असून युध्दकलात्मक आघात किंवा टॅक्टिकल स्ट्राईक करणारे विमान आहे.

- **मिग-29 :**

या विमानात दोन इंजिने व एक पायलट असतो. हे विमान रशिन बनावटीचे असून हवाई वर्चस्व निर्माण करणारे लढाऊ विमान आहे.

- **मिग-31 :**

हे विमान रशियन बनावटीचे असून ते शत्रुच्या विमाना विरोधात लढणारे बहुकर्मी लढाऊ विमान आहे. या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो.

- **सुखोई -30 :**

हे लढाऊ विमान रशियन बनावटीचे असून त्याचे भारतात उत्पादन केले जाते. या विमानाची हवेतुन हवेत आणि हवेतुन जमीनीवर मारा करू शकणारी जी क्षेपणास्त्रे आहेत ती क्षेपणास्त्रे वाहून नेण्याची क्षमता आहे. या लढाऊ विमानात दोन इंजिन व दोन पायलट असतात.

- **मिराज 2000 :**

या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो. हे फ्रेंच बनावटीचे विमान असून हवाई संरक्षण व शत्रूच्या विमानांशी झुंज देणारे हे लढाऊ विमान आहे.

- **तेजस :**

हे सुपरसॉनिक म्हणजेच ध्वनीच्या वेगापेक्षा जास्त वेगाने उडणारे विमान आहे. याला एक इंजिन असते हे सर्वात हलक्या वजनाच्या लढाऊ विमानापैकी एक आहे.

- **राफेल :**

राफेल हे लढाऊ विमाने भारताने फ्रांन्सकडुन खरेदी केले आहेत. हे लढाऊ विमान हवाई श्रेष्ठता, जमीनीवर हल्ला करणे, हेरगिरी करणे व क्षेपणास्त्र विरोधी हल्ले यासाठी सक्षम आहे. यात दोन इंजिन, प्रगत रडार यंत्रणा व हवेत इंधन भरण्याची क्षमता आहे.

तसेच भारतीय हवाई दलात ध्रुव, रुद्र, अपाचे हे हेलिकॉप्टर आहेत. तसेच स्वतंत्र भारताची राष्ट्रीय सुरक्षा आधुनिक आणि सक्षम करण्यासाठी भारतीय सैन्यात मानवरहित ड्रोनचा वापर केला जातो. त्यात प्रामुख्याने लक्ष्य ड्रोन, हेरॉन ड्रोन, सर्चर ड्रोन, निशांत ड्रोन, रुस्तम ड्रोन आहेत. नोव्हेंबर 2016 मध्ये पंतप्रधान मोदी सरकारच्या काळात रुस्तम-2 या देशातील सर्वात मोठ्या मानवरहित ड्रोनची यशस्वी चाचणी घेण्यात आली.

तसेच 1965, 1971 आणि 1999 च्या कारगील युध्दात भारतीय हवाई दलाची क्षमता जगाने पाहिली आहे. तसेच 2025 मध्ये झालेल्या ऑपरेशन सिंदुर मधुन S-400 प्रणाली व भारतीय हवाईदलाची क्षमता पुन्हा एकदा अधोरेखीत झालेली दिसते. स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेत जशी बाह्य शत्रुपासुन देशाची सुरक्षा करण्यासाठी सक्षम पायदळ, नौदल, हवाईदल आहे. तसेच देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी महत्वपुर्ण अशी निमलष्करी दले भारताकडे आहेत. ती पुढील प्रमाणे केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF), सिमा सुरक्षा दल (BSF), आसाम रायफल्स (AR), इंडो-तिबेटीयन सीमा पोलीस (ITBP), केंद्रीय औद्योगिक सुरक्षादल (CISF), सशस्त्र सीम बल (SSB), आणि राष्ट्रीय सुरक्षा गार्ड (NSG) याचा समावेश होतो. अशा प्रकारे स्वातंत्र्यानंतरच्या भारताची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा सक्षमपणे सांभाळली जाते.

- **स्वातंत्र्यानंतर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा समोरील आव्हाने:**

स्वातंत्र्यापासुन ते आजच्या काळापर्यंत विचार केला तर भारतच्या राष्ट्रीय सुरक्षासमोर अनेक आव्हाने आहेत. हे आपणास दिसून येते. त्यातील काही प्रमुख आव्हाने पुढीलप्रमाणे..

- **नक्षलवाद :**

भारतात नक्षलवादाची सुरुवात 1967 मध्ये पश्चिम बंगालमधील दार्जिलींग जिल्ह्यातील नक्षलबारी या गावात झाली. जिथे चारु मुजुमदार आणि इतर नेत्यांच्या नेतृत्वाखाली ही चळवळ सुरु झाली. आणि नंतर देशातील अनेक राज्यात पसरली. 2008 पासुन नक्षलवादाच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. यात पश्चिम बंगाल, ओरीसा, झारखंड, बिहार, छत्तीसगड, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश व महाराष्ट्रातील गडचिरोली आणि त्या परिसरात नक्षलवादी घटना आणि त्यांच्या कारवाया वाढल्या आहेत. आज भारतात माओवादी या नावाने ही चळवळ पुढे आली असून ती अंतर्गत् सुरक्षेबरोबरच देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेचा सर्वात मोठा धोका ठरली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- **दहशतवाद :**

21 व्या शतकात दहशतवादाचा प्रसार जगाच्या सर्व भागात झालेला आहे. विशेषत: भारतीय उपखंडात आणि मध्यपुर्वेत दहशतवादाने नंगानाच घातला आहे. याचेच उदाहरण म्हणजे भारतातील काही प्रमुख दहशतवादी हल्ले पुढील प्रमाणे, मुंबई बॉम्बस्फोट (1993), भारतीय संसदेवरील हल्ला (2001), मुंबई ट्रेन बॉम्बस्फोट (2006), मुंबईतील ताज हॉटेलवरील हल्ला (2008), पंजाबमधील पठाणकोट येथील हल्ला (2016), पुलवामा हल्ला (2019), पहलगाम येथील दहशतवादी हल्ला (2025) अशा या वाढत्या दहशतवादामुळे राष्ट्रीय सुरक्षेपुढे आव्हान निर्माण झाले आहे.

- प्रादेशिकवाद
- धार्मिकवाद
- जातीयता
- सीमा समस्या:- भारत-पाकिस्तान, भारत-चिन, भारत-बांग्लादेश सीमा समस्या

**सायबर सुरक्षा**

अशी ही वरील सर्व आव्हाने भारतासमोर आहेत. आणि या आव्हानांमुळे देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेला धोका पोहचतो, त्यामध्ये अडथळा निर्माण होतो. यासाठी प्रत्येक भारतीय नागरीकाने सतर्क राहुन आपल्या सुरक्षा यंत्रणांना सहकार्य केले पाहिजे आणि आपल्या देशाची राष्ट्रिय सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी मोलाचे योगदान दिले पाहिजे. त्यामुळे आपल्या देशासमोरील असणारे आव्हाने कमी होण्यास मदत होईल.

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्यानंतर भारताची राष्टीय सुरक्षा ही मजबुत होत गेलेली दिसते. आपली सक्षम अशी सेनादले आहेत. त्यामुळेच 1965, 1971 आणि 1999 च्या कारगील युध्दात भारताचा दणदणीत विजय झालेला आपणास दिसतो. याचे श्रेय, स्वतंत्र भारताचे पायदळ, नौदल, हवाईदल व सक्षम अशी क्षेपणास्त्र प्रणाली, तोफखाना, यांना जाते. तसेच देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत सक्षम अशी आपली निमलष्करी दले आहेत. त्यात CRPF, BSF, ITBP, CISF, NSG, यांच्या अहोरात्र कष्टामुळे अंतर्गत सुरक्षा अबाधित आहे.

स्वतंत्र भारतासमोर निश्चितपणे काही आव्हाने आहेत त्यात नक्षलवाद, दहशतवाद, धार्मिकता, प्रादेशिक वाद इत्यादी परंतु सक्षम असे पायदळ, नौदल, हवाईदल आणि निमलष्करी दले यांच्या गौरवशाली कार्यामुळे आणि अहोरात्र मेहनतीमुळे स्वातंत्र्यानंतरची भारताची राष्ट्रीय सुरक्षा अबाधित आहे. तरीही चीन आणि पाकिस्तानचा धोका ओळखून व अण्वस्त्रधारी पाकीस्तानचा विचार करता येणाऱ्या काळात भारताला शस्त्रास्त्रांच्या बाबतीत आणखी सक्षम बनणे काळाची गरज आहे.

**संदर्भ सुची :**

1) भारतीय लष्करी संघटना-प्रा.ए.पी. चौधरी, प्रा.व्ही.वाय.जाधव,निराली प्रकाशन, पुणे-2001.
2) भारताची अंतर्गत सुरक्षा- डॉ.देवेंद्र विसपुते,डॉ. कविता धर्माधिकारी, डॉ. अरूण वळवी, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव-2014.
3) भारतीय संरक्षण यंत्रणा आणि संघटना –डॉ. बी.डी. तोडकर, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव-2020.
4) भारतीय राष्ट्रीय सुरक्षा-डॉ. के.बी. पाटील, डॉ. के.डी. धर्माधिकारी, प्रा.जी.जे.गावीत, अथर्व पब्लिकेशन्स, जळगांव-2019.
5) नक्षलवादाचे आव्हान चीनचे भारताशी छुपे युध्द- ब्रिगेडियर हेमंत महाजन, नचिकेत प्रकाशन, नागपुर-2012.
6) एकविसाव्या शतकातील दहशतवाद-प्रा. म.न. उदगावकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-2013.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# भारतीय महिलांच्या सामाजिक प्रस्थितीचे संक्रमण आणि घटनात्मक संरक्षण: एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. कांचन दिनेश वानखेडे[1], डॉ. प्रा. विशाल रवींद्र गवळी[2]**
[1](सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग), स्वामी विवेकानंद कला आणि वाणिज्य, महाविद्यालय ता. जामनेर जि. जळगाव
[2](सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग) गिताबाई दत्तात्रय महाजन कला, केशरीमल राजमल नवलखा वाणिज्य, मनोहर शेठ धारीवाल विज्ञान महाविद्यालय ता.जामनेर, जि. जळगाव

**Manuscript ID**:
JRD -2026-180107
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 30-32
January 2026

***सारांश (Abstract):***

*प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय समाजातील महिलांच्या ऐतिहासिक स्थितीचा आणि आधुनिक कायदेशीर संरक्षणाचा सखोल आढावा घेतला आहे. प्राचीन काळातील स्वातंत्र्य, मध्ययुगातील सामाजिक ऱ्हास आणि आधुनिक काळातील घटनात्मक सबलीकरण या त्रिस्तरीय प्रवासाचे विश्लेषण यात करण्यात आले आहे. विविध कालखंडातील विचारवंतांच्या मतांचा आधार घेऊन महिलांच्या बदलत्या सामाजिक भूमिकेवर प्रकाश टाकला आहे.*

***मुख्यशब्द:*** *संशोधन, विश्लेषण, विकास, धोरण, सामाजिक बदल, आर्थिक घटक, शैक्षणिक प्रगती, तांत्रिक नवोन्मेष, प्रशासन, शाश्वत विकास*

## प्रस्तावना:

भारतीय संस्कृती आणि समाजव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान हा नेहमीच परिवर्तनाचा विषय राहिला आहे. मानवी संस्कृतीच्या विकासक्रमात स्त्रीची भूमिका निर्णायक राहिली असली, तरी तिला मिळणारी वागणूक काळानुरूप बदलत गेली. प्राचीन काळी ज्या स्त्रीला "यत्र नार्यस्तु पूजयन्ते रमन्ते तत्र देवताः"[१] असे संबोधून देवत्व बहाल केले होते, तिचीच स्थिती मध्ययुगीन काळात कमालीची खालावली.

आजच्या प्रगत युगातही स्त्रीच्या अस्तित्वाचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. डॉ. भास्कर इगवे यांच्या मते, "महिला हा भारतीय पुरुषप्रधान समाजातील दुर्बल घटक आहे आणि महिला ही विधवा असेल तर ती अतिदुर्बल घटकात मोडते"[२] ही मांडणी भारतीय समाजातील स्त्रीच्या परावलंबित्वावर आणि तिच्या सामाजिक असुरक्षिततेवर नेमकेपणाने बोट ठेवते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने लिंगभेदाचा अंत करून महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी क्रांतीकारी पावले उचलली आहेत, ज्याचा सखोल अभ्यास या शोधनिबंधात केला आहे.

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

## विषय निवडीचा हेतू व संशोधन पद्धती

या संशोधनाचा मुख्य हेतू ऐतिहासिक काळापासून चालत आलेल्या महिलांच्या शोषणाचे स्वरूप आणि आधुनिक कायद्यांचे परिणाम तपासणे हा आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. कांचन दिनेश वानखेडे, (सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग), स्वामी विवेकानंद कला आणि वाणिज्य, महाविद्यालय ता. जामनेर जि. जळगाव*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18169175
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*वानखेडे, . कांचन . दिनेश ., & गवळी, . विशाल . रवींद्र . (2026). भारतीय महिलांच्या सामाजिक प्रस्थितीचे संक्रमण आणि घटनात्मक संरक्षण: एक चिकित्सक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(IV)), 30–32. https://doi.org/10.5281/zenodo.18169175*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

यासाठी 'ऐतिहासिक' व 'तुलनात्मक' पद्धतीचा वापर करून उपलब्ध ग्रंथ व संशोधन पत्रिकांच्या आधारे माहिती संकलित केली आहे.

### संशोधन पूर्व आढावा (Literature Review)

संशोधन विषयाची व्याप्ती समजून घेण्यासाठी खालील ग्रंथांचा आढावा घेण्यात आला आहे:

- **ओट्टो रोथफेल्ड (१९२०):** यांनी तत्कालीन भारतीय स्त्रीच्या कौटुंबिक बांधिलकीबद्दल लिहिले आहे की, "विवाहित हिंदू महिलांसाठी पतीची सेवा हाच सर्वोच्च धर्म मानला गेला आहे"[३]
- **प्रा. इंद्र (१९४०):** यांनी प्राचीन काळातील स्त्रियांच्या अधिकारांचे समर्थन करताना म्हटले आहे की, "वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचे आणि धार्मिक कार्याचे पूर्ण अधिकार होते"[४]
- **डॉ. तृप्ति शाह (२००९):** त्यांच्या मते, "स्त्री संघर्षाचा इतिहास हा पितृसत्ताक पद्धतीशी असलेल्या संघर्षाचा इतिहास आहे"[५]
- **डॉ. भास्कर इगवे (२०२२):** त्यांनी आधुनिक समाजसुधारकांच्या कार्याचा उल्लेख करताना नमूद केले की, "महात्मा फुले आणि सावरकरांसारख्या समाजसुधारकांनी विधवांच्या स्थितीसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला आहे"[६]
- **डॉ. एस. पी. चव्हाण (२०२१):** यांनी 'अजंता' प्रकाशनाच्या जर्नलमध्ये नमूद केल्यानुसार, "महिला सक्षमीकरणासाठी केवळ कायदे असून चालणार नाही, तर सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे" [७]

### विश्लेषण (Detailed Analysis)

भारतीय स्त्रीच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण करताना आपल्याला काळाच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचा विचार करावा लागतो.

**अ) प्राचीन कालखंड: सन्मान आणि वैचारिक स्वातंत्र्य**

प्राचीन भारतीय संस्कृतीत स्त्री केवळ घराची गृहिणी नसून ती ज्ञानाची आणि शक्तीची उपासक होती. "ऋग्वेद काळात कन्येला स्वतःचा पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते आणि बालविवाह अस्तित्वात नव्हते"[८] हे स्वातंत्र्य स्त्रीला समाजात एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख मिळवून देणारे होते.

**ब) मध्ययुगीन कालखंड: सामाजिक अधोगती आणि शोषणाचे पर्व**

मध्ययुगीन काळात भारतावर झालेली परकीय आक्रमणे आणि वारंवार होणाऱ्या युद्धजन्य परिस्थितीमुळे समाज सुरक्षिततेच्या नावाखाली कोत्या मानसिकतेकडे वळला. "पडदा पद्धत, सती प्रथा आणि शिक्षणापासून वंचित ठेवण्याच्या अनिष्ट प्रथांनी या काळात मूळ धरले"[९] यामुळे तिचा सामाजिक दर्जा खालावला आणि ती पूर्णपणे पुरुषाच्या अधीन झाली.

**क) आधुनिक कालखंड: कायदेशीर क्रांती आणि सबलीकरणाची वाटचाल**

१९ व्या शतकात भारतात प्रबोधनाचे वारे वाहू लागले. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाद्वारे महिलांना मालमत्तेत अधिकार आणि घटस्फोटाचा हक्क मिळवून दिला"[१०] हे बिल म्हणजे भारतीय स्त्रीला मिळालेले आधुनिक मुक्तीपत्रच होते.

**ड) भारतीय राज्यघटना: समानतेचे नवे युग**

आज भारतीय महिला ज्या आत्मविश्वासाने वावरते, त्याचा आधारस्तंभ भारतीय राज्यघटना आहे. कलम १४ नुसार "राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोर समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही"[११] यासोबतच, महिलांना ऐतिहासिक अन्यायातून बाहेर काढण्यासाठी विशेष सवलतींची गरज ओळखून कलम १५(३) ची निर्मिती करण्यात आली, जे "स्त्रिया आणि मुलांसाठी विशेष तरतुदी"[१२] करण्याचा अधिकार सरकारला देते. "समान वेतन कायदा १९७६ मुळे कामाच्या ठिकाणी होणारा लिंगभेद कमी झाला असून स्त्रियांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळणे अनिवार्य झाले आहे"[१३]

### गृहीतकृत्यांची पडताळणी (Verification of Hypotheses)

- ऐतिहासिक कालखंडानुसार भारतीय स्त्रीच्या सामाजिक स्थितीत महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत: ऐतिहासिक पुराव्यांनुसार हे सिद्ध झाले आहे.
- भारतीय राज्यघटना आणि कायदेशीर संरक्षणाने महिलांना समाजात समान दर्जा मिळवून दिला आहे: घटनात्मक तरतुदींमुळे हे सिद्ध झाले आहे.

- कायदे असूनही सामाजिक मानसिकता अजूनही स्त्रियांच्या पूर्ण स्वातंत्र्यात अडथळा ठरते: "स्त्रियांचे शोषण हे सामाजिक मानसिकतेचा भाग आहे"[१४] या विधानावरून हे सिद्ध होते.
- हिंदू कोड बिल महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा मूळ स्रोत ठरले आहे: हे विहित विश्लेषणावरून सिद्ध झाले आहे.
- ग्रामीण भागातील महिला आजही अनेक समस्यांना सामोरे जात आहेत: डॉ. इगवे यांच्या मते, कायदेशीर संरक्षणानंतरही "विधवा महिलांना येणाऱ्या समस्या"[१५] आजही कायम आहेत, यावरून हे सिद्ध झाले आहे.

**निष्कर्ष (Conclusions)**

- प्राचीन काळातील स्त्रीची प्रगत स्थिती मध्ययुगीन सामाजिक दहशतीमुळे ऱ्हासाकडे गेली.
- राज्यघटनेने स्त्रीला नागरिक म्हणून पूर्ण सन्मान आणि कायदेशीर अधिकार मिळवून दिले.
- हिंदू कोड बिल हे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आणि मालमत्ता हक्कांचा मूळ स्रोत ठरले आहे.
- आजही कायदे असूनही सामाजिक मानसिकता स्त्रीला पूर्णतः स्वीकारण्यास कचरते.
- शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन यामुळे महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला आहे.

**उपाययोजना**

- कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारींसाठी 'फास्ट ट्रॅक' कोर्टांची संख्या वाढवणे.
- ग्रामीण भागातील महिलांमध्ये त्यांच्या घटनात्मक अधिकारांविषयी व्यापक जनजागृती करणे.

**संदर्भ सूची (References)**

1. ओ. पी. श्रीवास्तव (संपा.), महिलाएं (Women), मप्र हिंदी ग्रंथ अकादमी, भोपाळ, पृष्ठ १.
2. इगवे, भास्कर (डॉ.), (२०२२), "विधवा महिलांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास", EIIRJ Journal, Vol. XI, Issue III, पृष्ठ १७९.
3. रोथफेल्ड, ओट्टो, (१९२०), Women of India, बॉम्बे: डी. बी. तारापोरवाला सन्स, पृष्ठ २२२.
4. प्रा. इंद्र, (१९४०), The Status of Women in Ancient India, लाहोर: मिनर्वा बुकशॉप, पृष्ठ ४.
5. शाह, तृप्ति (डॉ.), (२००९), नारी आंदोलन का इतिहास (भाग १), वडोदरा: सहियर स्त्री संघटन, पृष्ठ २-३.
6. इगवे, भास्कर (डॉ.), (२०२२), "विधवा महिलांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास", EIIRJ Journal, Vol. XI, Issue III, पृष्ठ १७९.
7. चव्हाण, एस. पी. (डॉ.), (२०२१), "महिला सक्षमीकरणासाठीच्या शासकीय योजना", AJANTA Journal, Vol. X, Issue I, पृष्ठ ७१.
8. ओ. पी. श्रीवास्तव (संपा.), महिलाएं (Women), मप्र हिंदी ग्रंथ अकादमी, भोपाळ, पृष्ठ २.
9. शर्मा, मनु (संपा.), Women in Indian History, पंजाब: लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पृष्ठ १५.
10. इगवे, भास्कर (डॉ.), (२०२२), "विधवा महिलांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास", EIIRJ Journal, Vol. XI, Issue III, पृष्ठ १७९.
11. भारतीय राज्यघटना, कलम १४ (समानतेचा हक्क).
12. भारतीय राज्यघटना, कलम १५(३) (महिलांसाठी विशेष तरतुदी).
13. चव्हाण, एस. पी. (डॉ.), (२०२१), "महिला सक्षमीकरणासाठीच्या शासकीय योजना", AJANTA Journal, Vol. X, IssueI, पृष्ठ ७५.
14. शाह, तृप्ति (डॉ.), नारी आंदोलन का इतिहास, पृष्ठ ५.
15. इगवे, भास्कर (डॉ.), (२०२२), EIIRJ Journal, Vol. XI, Issue III, पृष्ठ १८०.

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026


Original Article

# शैक्षणिक सुधारणा १९४७ पासून ते २०२०


**अखिलेश पंडीत येलकदरे**

Research student

**Email:** akhileshyelakdare92@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2026-180108

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(IV)

Pp. 33-35

January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025

**Revised:** 20 Dec. 2025

**Accepted:** 10 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026



***सारांश (Abstract):***

*"वाचता लिहीता येणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर जगण्याची व निर्णय घेण्याची क्षमता म्हणजे शिक्षण होय." शिक्षण म्हणजे आपल्याला किती लिहीता व वाचता येणे किंवा किती आपण पदव्या मिळवल्या यावर अवलंबून नसतो. तर त्या शिक्षणामुळे आपण स्वतःला काय देतो. व समाजासाठी आपले काय योगदान देतो यावरुन आपल्या शिक्षणाचा पाया समजतो. स्वातंत्र्यानंतर भारतातील शिक्षणव्यवस्थेत सातत्याने बदल व सुधारणा घडून आल्या आहेत. १९४७ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-2020) पर्यंतचा शैक्षणिक सुधारणांचा प्रवास हा देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय गरजांशी निगडित राहिला आहे. या अभ्यासाचा उद्देश स्वातंत्र्योत्तर काळातील प्रमुख शैक्षणिक आयोग, धोरणे व योजनांचा आढावा घेऊन त्यांच्या स्वरूप, उद्दिष्टे व परिणामांचे विश्लेषण करणे हा आहे. राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग व कोठारी आयोग यांनी भारतीय शिक्षणव्यवस्थेची दिशा निश्चित करण्यात मोलाची भूमिका बजावली. १९६८ व १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणांमुळे शिक्षणातील समानता, प्रवेशवाढ व गुणवत्तेवर भर देण्यात आला, तर शिक्षण हक्क कायदा (२००९) व सर्व शिक्षा अभियानामुळे प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न झाला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे कौशल्याधारित, बहुविषयक व तंत्रज्ञानाधारित शिक्षणावर भर देत २१व्या शतकातील गरजांनुसार शिक्षणव्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करते. एकूणच, या अभ्यासातून भारतीय शिक्षणव्यवस्थेचा विकास हा समानता, गुणवत्ता व सर्वसमावेशकतेकडे वाटचाल करणारा असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे लोकशाहीमध्ये सगळ्यांना शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे.*



***बीजशब्द:*** *भारतीय शिक्षणव्यवस्था, भारतीय शैक्षणिक सुधारणा, मुलभुत हक्क, शिक्षा अभियान, NEP- 2020*


## प्रस्तावना:

शिक्षण हे मानवाच्या बुद्धीचा सर्वांगीण विकास करतो. लोकशाहीमध्ये शिक्षण घेण्याचा सर्वांना अधिकार आहे. शिक्षणामुळे मानवाचे विविध विचार मांडण्याचे एक साधन आहे. शिक्षणामुळे मानवाला समाजामध्ये आपले हक्काचा विचार करता येतो. शिक्षणामुळे मानव त्याला व्यावसायीक ज्ञान मिळते. शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे तसेच समाजाच्या प्रगतीचे महत्त्वाचे साधन आहे. कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासात शिक्षणव्यवस्था निर्णायक भूमिका बजावते. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर देशासमोर निरक्षरता, सामाजिक विषमता, प्रादेशिक असमानता आणि शिक्षणाच्या मर्यादित संधी ही मोठी आव्हाने होती. या पार्श्वभूमीवर नव्या भारताच्या उभारणीसाठी शिक्षणव्यवस्थेत मूलभूत सुधारणा करणे अत्यावश्यक ठरले. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेने शिक्षणाला महत्त्वपूर्ण स्थान दिले. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे आणि पुढे मूलभूत हक्कांच्या स्वरूपात शिक्षणाचा अधिकार यामुळे शिक्षण सार्वत्रिक व सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न झाला.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:



**Address for correspondence:**

*Akhilesh pandit Yelakdare, Research student*



**How to cite this article:**

*येलकदरे, . अखिलेश . पंडीत . (2026). शैक्षणिक सुधारणा १९४७ पासून ते २०२०. Journal of Research & Development, 18(1(IV)), 33–35.* https://doi.org/10.5281/zenodo.18169214

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18169214

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

यासाठी विविध शैक्षणिक आयोग, समित्या आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणांच्या माध्यमातून शिक्षणव्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली. राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग आणि कोठारी आयोग यांनी शिक्षणाची उद्दिष्टे, रचना व गुणवत्ता निश्चित करण्यात मोलाचे योगदान दिले.

१९६८ व १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणांमुळे शिक्षणातील समान संधी, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय एकात्मता यांवर भर देण्यात आला. त्यानंतर सर्व शिक्षा अभियान, शिक्षण हक्क कायदा (२००९) यांसारख्या उपक्रमांमुळे प्राथमिक शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले. बदलत्या जागतिकीकरण, तंत्रज्ञान व रोजगाराच्या गरजांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-2020) हे भारतीय शिक्षणव्यवस्थेत व्यापक व दूरगामी सुधारणा घडवून आणणारे धोरण म्हणून पुढे आले आहे. या अभ्यासात १९४७ पासून NEP-2020 पर्यंतच्या शैक्षणिक सुधारणांचा ऐतिहासिक आढावा घेऊन त्यांच्या उद्दिष्टांचा, स्वरूपाचा व परिणामांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामधून भारतीय शिक्षणव्यवस्थेचा विकासक्रम आणि भविष्यातील दिशादर्शक धोरणे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत अभ्यासामध्ये १९४७ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-2020) पर्यंत भारतातील शैक्षणिक सुधारणांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनाचा मुख्य भर ऐतिहासिक घटनाक्रम, शैक्षणिक आयोग, धोरणे व कायदे यांच्या स्वरूप आणि परिणामांचे विश्लेषण करण्यावर आहे.

या अभ्यासासाठी दुय्यम माहिती स्रोतांचा (Secondary Sources) उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये शासकीय अहवाल, विविध शैक्षणिक आयोगांचे अहवाल (राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग, कोठारी आयोग), राष्ट्रीय शिक्षण धोरणांचे दस्तऐवज (१९६८, १९८६, २०२०), शिक्षण हक्क कायदा (२००९), शैक्षणिक जर्नल्स, संशोधन लेख, पुस्तके, मासिके तसेच विश्वसनीय ऑनलाइन स्रोतांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीचे कालानुक्रमिक वर्गीकरण करून स्वातंत्र्योत्तर काळातील प्रमुख शैक्षणिक सुधारणा स्वतंत्र घटकांमध्ये मांडण्यात आल्या आहेत. त्यानंतर त्या सुधारणांचे उद्दिष्टे, वैशिष्ट्ये व परिणाम यांचे तुलनात्मक व विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. आवश्यक त्या ठिकाणी संकल्पनात्मक स्पष्टता देण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची विश्वासार्हता राखण्यासाठी विविध स्रोतांतील माहितीची परस्पर पडताळणी करण्यात आली आहे. तसेच अभ्यासाच्या निष्कर्षांना अधिक वस्तुनिष्ठ स्वरूप देण्यासाठी तथ्यात्मक माहिती व अधिकृत दस्तऐवजांचा आधार घेण्यात आला आहे. ही संशोधन पद्धती शैक्षणिक सुधारणांचा समग्र आढावा घेण्यास उपयुक्त ठरते आणि भविष्यातील अभ्यासासाठी संदर्भात्मक चौकट उपलब्ध करून देते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- शिक्षणामुळे प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टे खाली दिलेली आहेत.
- स्वातंत्र्यानंतर (१९४७ नंतर) भारतातील शिक्षणव्यवस्थेची पार्श्वभूमी अभ्यासता येते.
- राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग व कोठारी आयोग यांच्या शैक्षणिक सुधारणांचा अभ्यास करता येतो.
- १९६८ व १९८६ (सुधारित १९९२) च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणांची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये समजून घेणे.
- सर्व शिक्षा अभियान व शिक्षण हक्क कायदा (२००९) यांचा शिक्षणातील सार्वत्रिकीकरणावर झालेला परिणाम विश्लेषित करणे.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-2020) मधील महत्त्वपूर्ण सुधारणा व नवीन संकल्पनांचा अभ्यास करणे.

**आव्हाने**:

शिक्षणामध्ये किंवा शिक्षण घेतांना काही आव्हाने समोर येतात जसे की, गरीबीमुळे पैसे नसल्यामुळे शिक्षण घेता येत नाही.

१९४७ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-2020) पर्यंत भारतातील शैक्षणिक सुधारणांची अंमलबजावणी करताना अनेक संरचनात्मक, सामाजिक व प्रशासकीय आव्हाने समोर आली आहेत. ती पुढीलप्रमाणे—

- शिक्षणातील असमानता
- ग्रामीण-शहरी भाग, श्रीमंत-गरीब, तसेच सामाजिक गटांमध्ये शिक्षणाच्या संधी व गुणवत्तेत मोठी तफावत आढळते.
- निरक्षरता व शाळाबाह्य मुले
- विविध योजनांनंतरही अनेक मुले दारिद्र्य, स्थलांतर, बालमजुरी व सामाजिक कारणांमुळे शिक्षणापासून दूर राहतात.
- शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न
- अभ्यासक्रमाची उपयुक्तता, अध्यापन पद्धती, मूल्यमापन व्यवस्था आणि शिकण्याचे परिणाम (learning outcomes) अपेक्षित पातळीवर नाहीत.
- शिक्षकांची कमतरता व प्रशिक्षणाचा अभाव
- प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, सेवांतर्गत प्रशिक्षणाचा अभाव आणि शिक्षक-विद्यार्थी प्रमाणातील असमतोल ही मोठी अडचण आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- आर्थिक मर्यादा
- शिक्षणावर सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% खर्चाचे उद्दिष्ट अद्याप पूर्णतः साध्य नाही झाले.

**सूचना:**

१९४७ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-2020) पर्यंतच्या शैक्षणिक सुधारणांचा अपेक्षित लाभ मिळवण्यासाठी पुढील सूचना उपयुक्त ठरू शकतात—

- शिक्षणातील समानता वाढवणे
- ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागांमध्ये शाळा, महाविद्यालये व डिजिटल सुविधा वाढवून शिक्षणाच्या संधी समान कराव्यात.
- शिक्षणाच्या गुणवत्तेवर भर
- अभ्यासक्रम अद्ययावत करणे, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती वापरणे व विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे.
- शिक्षक प्रशिक्षण व सशक्तीकरण
- सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण नियमित करणे, तंत्रज्ञानाधारित अध्यापन कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे.
- शिक्षणावरील आर्थिक गुंतवणूक वाढवणे
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६% खर्चाचे उद्दिष्ट प्रत्यक्षात आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी समन्वयाने प्रयत्न करावेत.
- डिजिटल दरी कमी करणे
- गरीब व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट, स्मार्ट उपकरणे व ई-लर्निंग सामग्री मोफत किंवा कमी दरात उपलब्ध करून द्यावी.
- मातृभाषेत शिक्षणाला प्रोत्साहन
- प्राथमिक स्तरावर मातृभाषा व स्थानिक भाषांमधून शिक्षण देऊन विद्यार्थ्यांची समज व गळती (dropout) कमी करावी.

**निष्कर्ष:**

शिक्षणामुळे मानवाच्या जगण्याचा व बुद्धीचा विकास होतो. तसेच शिक्षणामुळे मानवाच्या जगण्याला एक दिशा प्राप्त होते. तसेच शिक्षणामुळे मनासारखं आपले हक्क मांडण्याचा अधिकार प्राप्त होतो. तसेच भारतीय लोकशाहीमध्ये शासनाने सर्व जनतेला व पालकांना बंधनकारक केले आहे की, त्यांच्या पाल्यांच्या वयाच्या ६ते १४ वर्षांपर्यंत शिक्षण देणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे आपले शासन सुद्धा समाजातील लोकांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. वेगवेगळया समाजातील मुलांना शिक्षणामुळे मोठ्या मोठ्या पदावर जाण्याची संधी मिळत आहे. त्यासाठी शासन प्रोत्साहन म्हणुन गरजु पाल्यांना भत्ता व स्कॉलरशिप देऊन मदत करत आहे.
एकूणच, १९४७ ते २०२० या कालखंडातील शैक्षणिक सुधारणा भारताच्या सामाजिक, आर्थिक व बौद्धिक प्रगतीसाठी निर्णायक ठरल्या असून NEP-2020 मुळे भारतीय शिक्षणव्यवस्था अधिक समकालीन, सर्जनशील आणि जागतिक पातळीवर स्पर्धात्मक होण्याच्या दिशेने पुढे जात आहे.

**संदर्भसूची:**

1. भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, नवी दिल्ली.
2. भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८, नवी दिल्ली.
3. भारत सरकार, मानव संसाधन विकास मंत्रालय, राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ (सुधारित १९९२), नवी दिल्ली.
4. राधाकृष्णन आयोग अहवाल (१९४८–४९), भारत सरकार.
5. मुदलियार आयोग अहवाल (१९५२–५३), भारत सरकार.
6. कोठारी आयोग अहवाल (१९६४–६६), भारत सरकार.
7. भारत सरकार, शिक्षण हक्क कायदा, २००९ (Right to Education Act), नवी दिल्ली.
8. भारत सरकार, सर्व शिक्षा अभियान – मार्गदर्शक तत्त्वे व अहवाल, नवी दिल्ली.
9. चक्रवर्ती, एस. आर., भारतीय शिक्षण व्यवस्था : समस्या व आव्हाने, नवी दिल्ली.

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# तंत्रज्ञानातील नैतिकता आणि सायबर सुरक्षेतील आव्हाने

**डॉ. धनंजय केशवराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक विभाग प्रमुख संरक्षण आणि सामरिक शास्त्र जयहिंद शैक्षणिक संस्थेचे झुलाल भिलाजिराव पाटील महा, देवपूर धुळे
**Email:** patildhanuk@yahoo.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180109
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 36-38
January 2026

***सारांश (Abstract):***

*आधुनिक काळात तंत्रज्ञानाने मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट, क्लाउड संगणन, बिग डेटा आणि डिजिटल नेटवर्क्समुळे प्रशासन, उद्योग, संरक्षण आणि सामाजिक जीवन अधिक कार्यक्षम झाले आहे. तथापि, या तांत्रिक प्रगतीसोबत तंत्रज्ञानातील नैतिकता आणि सायबर सुरक्षा यासंबंधी गंभीर आव्हानेही निर्माण झाली आहेत. वैयक्तिक माहितीची गोपनीयता, डेटा गैरवापर, अल्गोरिदमिक पक्षपात, स्वयंचलित निर्णयप्रणालींचे उत्तरदायित्व तसेच सायबर हल्ले, डेटा चोरी आणि डिजिटल हेरगिरी हे आधुनिक डिजिटल समाजासमोरील महत्त्वाचे प्रश्न ठरले आहेत. या संशोधन लेखात तंत्रज्ञानातील नैतिकतेची संकल्पना, सायबर सुरक्षेचे स्वरूप, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आणि या सर्वांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच, या क्षेत्रांतील प्रमुख नैतिक व सायबर सुरक्षाविषयक आव्हानांचे विश्लेषण करून त्यावर व्यवहार्य व धोरणात्मक उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *तंत्रज्ञान नैतिकता, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल समाज, माहिती सुरक्षा*

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

## प्रस्तावना:

डिजिटल क्रांतीमुळे आधुनिक समाज अधिकाधिक तंत्रज्ञानावर अवलंबून झाला आहे. ई-गव्हर्नन्स, डिजिटल बँकिंग, सोशल मीडिया, ऑनलाइन शिक्षण आणि स्मार्ट तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन अधिक सुलभ झाले असले तरी त्याचवेळी नैतिकता आणि सुरक्षिततेचे प्रश्न अधिक तीव्र झाले आहेत [4]. डिजिटल तंत्रज्ञानाचा वेगवान प्रसार झाल्यामुळे माहिती ही एक मौल्यवान संसाधन ठरली आहे, परंतु या माहितीच्या संकलन, साठवण आणि वापर प्रक्रियेत गोपनीयतेचा भंग होण्याची शक्यता वाढली आहे [1]. तंत्रज्ञानातील नैतिकता ही तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी मूल्ये, सामाजिक जबाबदारी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा विचार करण्यावर भर देते [1]. दुसरीकडे, सायबर सुरक्षा ही माहिती प्रणाली, नेटवर्क्स आणि डेटाचे अनधिकृत प्रवेश व हल्ल्यांपासून संरक्षण करण्याशी संबंधित आहे [5]. या दोन्ही संकल्पना परस्परावलंबी असून एकामधील त्रुटी दुसऱ्यावर परिणाम घडवून आणू शकतात. त्यामुळे आधुनिक समाजासाठी तंत्रज्ञान नैतिकता आणि सायबर सुरक्षा या अत्यंत महत्त्वाच्या बाबी ठरल्या आहेत [2].

## संशोधनाची उद्दिष्टे:

- तंत्रज्ञानातील नैतिकता या संकल्पनेचा सैद्धांतिक अभ्यास करणे.
- सायबर सुरक्षेचे स्वरूप आणि त्यातून निर्माण होणाऱ्या प्रमुख आव्हानांचे विश्लेषण करणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे नैतिकता व सायबर सुरक्षेवर होणारा परिणाम समजून घेणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. धनंजय केशवराव पाटील, सहयोगी प्राध्यापक विभाग प्रमुख संरक्षण आणि सामरिक शास्त्र जयहिंद शैक्षणिक संस्थेचे झुलाल भिलाजिराव पाटील महा, देवपूर धुळे*

**How to cite this article:**
*पाटील, . धनंजय . केशवराव . (2026). तंत्रज्ञानातील नैतिकता आणि सायबर सुरक्षेतील आव्हाने. Journal of Research & Development, 18(1(IV)), 36–38.* https://doi.org/10.5281/zenodo.18169250

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18169250

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- तंत्रज्ञान नैतिकता आणि सायबर सुरक्षेतील परस्परसंबंधांचा अभ्यास करणे.
- या क्षेत्रांतील समस्यांवर व्यवहार्य व धोरणात्मक उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधन लेख हा वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. या अभ्यासासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे. विविध शैक्षणिक ग्रंथ, संशोधन लेख, आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल, धोरणात्मक दस्तऐवज आणि तंत्रज्ञान नैतिकता व सायबर सुरक्षेशी संबंधित साहित्याचा अभ्यास करण्यात आला आहे [4]. संकलित माहितीचे समीक्षात्मक विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**कृत्रिम बुद्धिमत्ता : संकल्पना व विकास:**

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणकीय प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी शिकणे, विचार करणे, विश्लेषण करणे आणि निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करणे होय [6]. मशीन लर्निंग, डीप लर्निंग आणि न्यूरल नेटवर्क्स यांच्या सहाय्याने AI प्रणाली अधिक सक्षम झाल्या आहेत. आज AI चा वापर आरोग्य, शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि सुरक्षा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होत आहे [6].

तथापि, AI प्रणालींच्या विकासासोबत नैतिक आणि सायबर सुरक्षेचे प्रश्नही वाढले आहेत. प्रशिक्षणासाठी वापरलेला डेटा पक्षपाती असल्यास AI निर्णयांमध्ये अन्याय दिसून येतो [1]. तसेच, स्वयंचलित निर्णयप्रणालींमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्यामुळे उत्तरदायित्व निश्चित करणे कठीण ठरते [8].

**तंत्रज्ञानातील नैतिकतेची प्रमुख आव्हाने:**

तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासामुळे समाजासमोर अनेक नैतिक आव्हाने उभी राहिली आहेत. वैयक्तिक माहितीचे मोठ्या प्रमाणावर संकलन, साठवण आणि विश्लेषण हे गोपनीयतेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न ठरले आहेत. अनेक डिजिटल प्लॅटफॉर्म्स वापरकर्त्यांची माहिती अपुरी माहिती देऊन किंवा स्पष्ट संमतीशिवाय वापरत असल्याचे दिसून येते [1]. यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि मूलभूत मानवी हक्कांवर परिणाम होतो. अल्गोरिदमिक पक्षपात (Algorithmic Bias) हे तंत्रज्ञान नैतिकतेतील एक महत्त्वाचे आव्हान आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली ज्या डेटावर प्रशिक्षित केल्या जातात, तो डेटा जर सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिकदृष्ट्या पक्षपाती असेल, तर त्या प्रणालींचे निर्णयही अन्यायकारक ठरू शकतात [2]. अशा निर्णयांचा परिणाम भरती प्रक्रिया, सुरक्षा यंत्रणा, कायदा अंमलबजावणी आणि वित्तीय सेवा यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांवर होतो. स्वयंचलित निर्णयप्रणालींमधील उत्तरदायित्व हा आणखी एक गंभीर नैतिक प्रश्न आहे. एखादी AI प्रणाली चुकीचा निर्णय घेतल्यास जबाबदारी कोणाची, हे निश्चित करणे कठीण ठरते [8]. त्यामुळे तंत्रज्ञान विकासात नैतिक मार्गदर्शक तत्त्वांची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते.

**सायबर सुरक्षा : स्वरूप व आव्हाने:**

सायबर सुरक्षा ही आधुनिक डिजिटल समाजाची मूलभूत गरज बनली आहे. माहिती प्रणाली, नेटवर्क्स आणि डिजिटल पायाभूत सुविधांवर होणारे सायबर हल्ले सातत्याने वाढत आहेत. रॅन्समवेअर, फिशिंग, डेटा चोरी आणि डिजिटल हेरगिरी यांमुळे व्यक्ती, संस्था आणि राष्ट्रांची सुरक्षितता धोक्यात आली आहे [5]. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे सायबर हल्ल्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. क्लाउड संगणन, इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि मोबाइल तंत्रज्ञानामुळे सायबर सुरक्षेतील त्रुटी वाढल्या आहेत [9]. अनेक वेळा तांत्रिक कमतरतेपेक्षा मानवी चुका सायबर हल्ल्यांना कारणीभूत ठरतात. कमजोर पासवर्ड्स, अपुरी जागरूकता आणि सुरक्षा धोरणांचे उल्लंघन ही प्रमुख कारणे आहेत [5].

सायबर सुरक्षेतील अपयशामुळे केवळ आर्थिक नुकसान होत नाही, तर सामाजिक विश्वास, संस्थात्मक स्थैर्य आणि राष्ट्रीय सुरक्षेवरही गंभीर परिणाम होतो [3]. त्यामुळे सायबर सुरक्षा ही केवळ तांत्रिक समस्या न राहता धोरणात्मक आणि सामाजिक समस्या बनली आहे.

**तंत्रज्ञान नैतिकता आणि सायबर सुरक्षेतील परस्परसंबंध:-**

तंत्रज्ञानातील नैतिकता आणि सायबर सुरक्षा या दोन स्वतंत्र संकल्पना नसून त्या परस्परावलंबी आहेत. नैतिकदृष्ट्या चुकीचा डेटा वापर, अपारदर्शक प्रणाली आणि उत्तरदायित्वाचा अभाव हे सायबर सुरक्षेतील धोके वाढवतात [1]. त्याचप्रमाणे, कमजोर सायबर सुरक्षा व्यवस्था वैयक्तिक गोपनीयता आणि सामाजिक विश्वास यांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरते. उदाहरणार्थ, डेटा संरक्षणाची नैतिक तत्त्वे पाळली गेली नाहीत, तर माहिती चोरी आणि गैरवापराची शक्यता वाढते. तसेच, पारदर्शक आणि सुरक्षित प्रणालींचा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

अभाव समाजातील विश्वास कमी करतो [4]. त्यामुळे जबाबदार तंत्रज्ञान विकासासाठी नैतिकता आणि सायबर सुरक्षा यांचा समन्वय अत्यावश्यक आहे [2].

**उपाययोजना व धोरणात्मक दृष्टिकोन:**

तंत्रज्ञानातील नैतिकता आणि सायबर सुरक्षेतील आव्हानांवर मात करण्यासाठी सर्वसमावेशक उपाययोजना आवश्यक आहेत. तंत्रज्ञान विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर नैतिकता आणि सुरक्षा समाविष्ट करणे गरजेचे आहे. "Ethics by Design" आणि "Secure by Design" या संकल्पना या संदर्भात महत्त्वाच्या ठरतात [2]. मजबूत कायदेशीर चौकट, डेटा संरक्षण कायदे, नैतिक मार्गदर्शक तत्त्वे आणि सायबर सुरक्षा धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे [10]. यासोबतच, शैक्षणिक संस्था, उद्योग आणि शासन यांच्यातील सहकार्य वाढवणे, तसेच जनजागृती आणि कौशल्य विकास कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे [9].

**अभ्यासाच्या मर्यादा:**

या संशोधन लेखात काही मर्यादा आहेत. या अभ्यासात केवळ दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला असून प्रत्यक्ष क्षेत्रीय अभ्यास (Field Study) किंवा प्राथमिक माहिती संकलन करण्यात आलेले नाही. तसेच, तंत्रज्ञान क्षेत्रातील वेगवान बदलांमुळे काही निष्कर्ष कालांतराने अद्ययावत करण्याची आवश्यकता निर्माण होऊ शकते [4]. तरीसुद्धा, उपलब्ध विश्वसनीय स्रोतांच्या आधारे समतोल आणि तर्कसंगत निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**निष्कर्ष:**

तंत्रज्ञानातील नैतिकता आणि सायबर सुरक्षा ही आधुनिक डिजिटल युगातील अत्यंत महत्त्वाची आणि परस्पर-संबंधित आव्हाने आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल नेटवर्क्स आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मानवी जीवन अधिक सुलभ आणि कार्यक्षम झाले असले, तरी योग्य नैतिक चौकट आणि मजबूत सायबर सुरक्षा उपायांशिवाय हे तंत्रज्ञान समाजासाठी गंभीर धोके निर्माण करू शकते. वैयक्तिक माहितीचे संरक्षण, पारदर्शक निर्णयप्रणाली, उत्तरदायित्व आणि सुरक्षित डिजिटल पायाभूत सुविधा या बाबी आधुनिक समाजासाठी अनिवार्य ठरतात. तंत्रज्ञानाचा विकास करताना मानवी मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि नैतिकतेचा समतोल राखणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, सायबर सुरक्षेला केवळ तांत्रिक समस्या न मानता धोरणात्मक आणि सामाजिक प्रश्न म्हणून पाहणे गरजेचे आहे. मजबूत कायदे, प्रभावी धोरणे, जनजागृती, कौशल्य विकास आणि विविध घटकांमधील सहकार्य यांच्या माध्यमातून सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत डिजिटल भविष्य घडवता येईल. या संशोधन लेखातून मांडलेले विश्लेषण आणि सुचवलेले दृष्टिकोन तंत्रज्ञानातील नैतिकता व सायबर सुरक्षेच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरतील.

**संदर्भसूची**

1. Floridi, L., 2013, The Ethics of Information, Oxford University Press, Oxford.
2. OECD, 2019, Principles on Artificial Intelligence, OECD Publishing, Paris.
3. Kello, L., 2017, The Virtual Weapon and International Order, Yale University Press, New Haven.
4. United Nations, 2020, Roadmap for Digital Cooperation, United Nations Publications, New York.
5. National Institute of Standards and Technology (NIST), 2018, Framework for Improving Critical Infrastructure Cybersecurity, NIST, USA.
6. Russell, S. and Norvig, P., 2021, Artificial Intelligence: A Modern Approach, Pearson Education, New Delhi.
7. North Atlantic Treaty Organization (NATO), 2021, NATO Artificial Intelligence Strategy, Brussels.
8. European Commission, 2021, Ethics Guidelines for Trustworthy Artificial Intelligence, European Union Publications.
9. World Economic Forum, 2022, Global Cybersecurity Outlook, Geneva.
10. Government of India, 2023, Digital Personal Data Protection Act, Government of India, New Delhi.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदार वर्तन आणि राजकीय सहभाग

**ॲड प्रीतम मनीषा प्रवीण निकम**
जिल्हा व सत्र न्यायालय, शहादा
**Email:** pritamnikam55@rediffmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180110
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 39-44
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश (Abstract):***

*हा प्रबंध स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदार वर्तन आणि राजकीय सहभाग या विषयाचा सखोल अभ्यास सादर करतो. प्रबंधात मतदान प्रक्रियेतील बदल, सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक घटकांचा प्रभाव, राजकीय पक्ष, उमेदवार प्रतिमा, निवडणूक प्रचार, माध्यमे आणि डिजिटल साधनांचा सहभाग यांचा विचार करण्यात आला आहे. जाती, धर्म, लिंग, शिक्षण, उत्पन्न आणि सामाजिक जागरूकता यांसारख्या घटकांचा मतदारांच्या निर्णय प्रक्रियेवर कसा परिणाम होतो, याचे विश्लेषण केले आहे. तसेच, मतदानात्मक व निवडणूकबाह्य सहभाग, युवक, महिला आणि दुर्बल गटांचा सहभाग, तसेच क्षेत्रीय भिन्नता यांवर प्रकाश टाकला आहे. प्रबंधात राजकीय संस्था, नेतृत्व, मीडिया व डिजिटल माध्यमांचा मतदार वर्तनावर होणारा प्रभाव आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग यांचा अभ्यास केला आहे. पुढील दिशा म्हणून जागरूकता, नैतिक राजकारण, महिला व दुर्बल गटांचा सहभाग, नेतृत्व प्रशिक्षण आणि डिजिटल साधनांचा समावेश या उपाययोजनांची शिफारस केली आहे.*

***मुख्यशब्द:*** *मतदार वर्तन, राजकीय सहभाग, निवडणूक राजकारण, सामाजिक आर्थिक घटक*

## प्रस्तावना:

भारताने 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, लोकशाहीची स्थापनाही एक महत्त्वाचा टप्पा ठरला. स्वातंत्र्योत्तर भारतात मतदानाची प्रक्रिया आणि राजकीय सहभाग हा लोकशाहीतील नागरिकांच्या सक्रियतेचा आणि शासनाच्या कार्यक्षमतेचा मुख्य निर्देशक आहे. मतदार वर्तनाचे अभ्यास करण्याचे महत्त्व फक्त निवडणूक निकाल समजून घेण्यासाठी नाही, तर लोकशाहीतील निर्णयप्रक्रियेवर नागरिकांचा प्रभाव आणि सामाजिक-सांस्कृतिक घटक यांचा अभ्यास करण्यासाठीही आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जाती, धर्म, लिंग, शिक्षण, आर्थिक स्थिती आणि सामाजिक जागरूकता अशा घटकांनी मतदानाच्या निर्णयावर आणि राजकीय सहभागाच्या पद्धतींवर मोठा परिणाम केला आहे. याशिवाय, राजकीय पक्ष, निवडणूक प्रचार, माध्यमे आणि डिजिटल साधनांमुळे नागरिकांच्या सहभागाच्या स्वरूपात बदल दिसून आले आहेत. हा प्रबंध मतदार वर्तन, राजकीय सहभाग आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक निर्धारकांचा सखोल अभ्यास सादर करतो.

## उद्दिष्टे

- स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदार वर्तनाचा अभ्यास करणे.
- राजकीय सहभागाच्या पद्धती आणि प्रवृत्ती समजून घेणे.
- मतदार वर्तनावर प्रभाव टाकणारे सामाजिक आणि आर्थिक घटक ओळखणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*ॲड. प्रितम प्रविण निकम, जिल्हा व सत्र न्यायालय, शहादा*

**How to cite this article:**
*प्रीतम मनीषा प्रवीण निकम. (2026). स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदार वर्तन आणि राजकीय सहभाग. Journal of Research & Development, 18(1(IV)), 39–44.* https://doi.org/10.5281/zenodo.18169278

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169278
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**पद्धतशास्त्र**

हा प्रबंध द्वितीयक स्रोतांवर आधारित आहे, ज्यामध्ये निवडणूक आयोगाचे अहवाल, शासकीय आकडेवारी, शोधनिबंधे, पुस्तके आणि शास्त्रीय लेखांचा सखोल अभ्यास केला आहे.

**संकल्पनात्मक आणि सैद्धांतिक चौकट –**

मतदार वर्तन हा लोकशाहीतील नागरिकांच्या निर्णय प्रक्रियेचा आणि मतदानातल्या सहभागाचा मुख्य घटक मानला जातो. मतदार वर्तनाचा अभ्यास करून नागरिकांच्या निवडीमागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटक समजून घेता येतात. तर, राजकीय सहभाग म्हणजे निवडणुकांमध्ये मतदान करणे एवढ्यापुरते मर्यादित नसून, लोकशाहीतील विविध कृतींमध्ये सक्रिय भाग घेणे, जसे की पक्षांच्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होणे, सार्वजनिक मत व्यक्त करणे किंवा सामाजिक चळवळींमध्ये सहभागी होणे.
मतदार वर्तन आणि राजकीय सहभागाचे विश्लेषण करण्यासाठी विविध सैद्धांतिक दृष्टिकोन वापरले जातात. रॅशनल चॉइस थिअरी मतदारांच्या निर्णयामागील तर्कशास्त्रीय आणि स्वहित आधारित प्रक्रियेस लक्ष देते. सामाजिक मॉडेल (Lazarsfeld) मतदारांच्या निवडीवर सामाजिक संबंध, समुदाय आणि समुहांची भूमिका अधोरेखित करते. साइकोलॉजिकल मॉडेल (Michigan School) मतदारांच्या मानसिकता, पक्षांवरील निष्ठा आणि वैयक्तिक अनुभवांचा विचार करते. याशिवाय, मार्क्सवादी आणि उपसंस्कृती (Subaltern) दृष्टिकोन मतदारांच्या वर्गीय संघर्ष, असमानता आणि सामाजिक दुर्बल गटांच्या सहभागावर भर देतात.

या सैद्धांतिक चौकटीच्या आधारे, मतदार वर्तन आणि राजकीय सहभागाचे विविध पैलू समजून घेता येतात आणि त्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण करता येते.

**स्वातंत्र्योत्तर भारतातील निवडणूक राजकारणाचा विकास –**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात लोकशाहीची प्रक्रिया प्रस्थापित झाली आणि निवडणुका देशाच्या राजकीय जीवनाचा महत्त्वाचा भाग बनल्या. वेगवेगळ्या काळात राजकीय परिस्थिती, पक्षांचे वर्चस्व, आणि सामाजिक–आर्थिक घटक निवडणूक प्रवृत्तीवर परिणाम करत राहिले. खालील बिंदूंमध्ये स्वातंत्र्योत्तर भारतातील निवडणूक राजकारणाची प्रमुख टप्प्यवार रूपरेषा दिली आहे.

**1. प्रारंभीची निवडणूक प्रवृत्ती (1951–1970):** स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिल्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाचा दबदबा होता. लोकसंख्या, शिक्षण आणि सामाजिक संरचना यावरून मतदारांच्या निर्णयांचा अभ्यास केला गेला. या काळात मतदानाची टक्केवारी हळूहळू वाढत होती आणि लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग स्थिर होऊ लागला.

**2. एक-पक्षीय वर्चस्व आणि काँग्रेस युग:** 1950–1960 च्या दशकात काँग्रेस पक्षाचे एकाधिकार होते. आर्थिक विकास, योजना आयोगाच्या धोरणांचा प्रभाव आणि स्वतंत्रतेनंतरचे आदर्श यामुळे काँग्रेसच्या लोकप्रियतेत वाढ झाली. युगाच्या शेवटी राजकीय विरोधक वाढले, परंतु काँग्रेसने बहुमत राखले.

**3. सत्तासंघटना आणि प्रादेशिकरण (1970–1990):** या काळात अनेक प्रादेशिक पक्षांचे उदय झाले. सत्तासंघटनांची रचना तयार झाली आणि राष्ट्रीय पक्षांव्यतिरिक्त राज्यस्तरीय राजकारण महत्त्वाचे ठरले. जातीय आणि प्रादेशिक हितांची भूमिका निवडणूक परिणामात दिसू लागली.

**4. उदारीकरण आणि राजकीय पुनर्रचना (1991 नंतर):** आर्थिक उदारीकरणानंतर राजकीय नेतृत्वात बदल आणि नव्या पक्षांचा उदय झाला. राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकारणातील संतुलन बदलले, तसेच मतदानातील जागरूकता आणि विविध घटकांचे परिणाम अधिक स्पष्ट झाले.

**5. समकालीन निवडणूक प्रवृत्ती:** सध्या भारतातील निवडणूक राजकारण बहुपक्षीय आणि डिजिटल माध्यमांनी प्रभावीत आहे. मतदारांचे वर्तन, सोशल मिडिया प्रचार, व्यक्तिमत्वाचा प्रभाव, आणि आर्थिक व सामाजिक घटक निवडणूक परिणामावर मोठा प्रभाव टाकतात.

**मतदार वर्तनावर सामाजिक–आर्थिक घटकांचा प्रभाव**

मतदार वर्तन हा नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक परिस्थितींच्या प्रभावाखाली आकार घेतो. स्वातंत्र्योत्तर भारतात विविध घटक मतदारांच्या निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकतात.

**1.जात आणि समुदायाचा प्रभाव:** भारतामध्ये जातीचा राजकारणावर मोठा प्रभाव आहे. पारंपरिक सामाजिक संरचना, जातीगत ओळख आणि समुदायातील संबंध मतदारांच्या मतदानाच्या निर्णयावर प्रभाव टाकतात. एखादा पक्ष किंवा उमेदवार विशिष्ट जातीय गटाला उद्देशून धोरणे आखतो, ज्यामुळे मतदानाच्या नमुन्यात लक्षात घेण्यासारखे बदल दिसतात. काही प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्ष हे जातीय समीकरण लक्षात घेऊनच निवडणूक रणनीती आखतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**2.धर्म आणि ओळखीच्या राजकारणाचा प्रभाव:** धर्म, सांस्कृतिक ओळख आणि सामुदायिक भावना देखील मतदार वर्तनावर प्रभाव टाकतात. भारतात विविध धार्मिक गट राजकीय निर्णय घेण्यात सक्रिय असतात. काहीवेळा धर्मावर आधारित राजकारण मतदारांना प्रभावित करते आणि पक्षांचे धोरणे किंवा प्रचार यावरून मतदानाच्या पद्धती बदलतात. धर्म, भाषा किंवा सांस्कृतिक ओळख यांच्याशी निगडीत मुद्दे निवडणूक निकालात महत्वाचे ठरतात.

**3.वर्ग, व्यवसाय आणि उत्पन्न:** सामाजिक–आर्थिक स्थिती हे मतदार वर्तन समजून घेण्याचे एक महत्त्वाचे पैलू आहे. उच्च उत्पन्न गटातील लोकांचे आर्थिक हित, कर, धोरणे आणि उदारीकरणाच्या धोरणांकडे कल असतो, तर मध्यम आणि कमी उत्पन्न गट अधिक सामाजिक कल्याण, रोजगार आणि सरकारी योजनांकडे लक्ष देतात. व्यवसाय आणि उत्पन्न स्तर मतदारांची पक्ष निवड, मतदानाच्या सक्रियतेवर आणि राजकीय सहभागाच्या प्रकारांवर प्रभाव टाकतात.

**4.शिक्षण आणि राजकीय जागरूकता:** उच्च शिक्षण आणि राजकीय जागरूकता मतदारांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करतात. शिक्षणामुळे नागरिक धोरण, पक्ष, उमेदवार आणि त्यांच्या कामगिरीची तुलना करता येते. शिक्षणाचा स्तर जितका जास्त, मतदानाचा सहभाग, सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची तयारी आणि राजकीय संवादात सक्रियता तितकी अधिक असते.

**5.लिंग आणि मतदानाचे नमुने:** लिंगही मतदार वर्तनावर प्रभाव टाकते. महिलांचे मतदान आणि राजकीय सहभाग गेल्या काही दशकांत वाढला आहे, परंतु अनेक प्रादेशिक किंवा सामाजिक घटक महिला मतदारांच्या निर्णयावर परिणाम करतात. पुरुष आणि महिला मतदारांचे प्राधान्य, पक्ष निवड, मतदानाची प्रेरणा आणि राजकीय सहभागाच्या स्वरूपात फरक दिसतो.

या सर्व घटकांचा एकत्रित प्रभाव स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदार वर्तनाचे स्वरूप ठरवतो. मतदारांचे निर्णय फक्त वैयक्तिक पसंतीवर अवलंबून नसून सामाजिक ओळख, आर्थिक परिस्थिती, शिक्षण आणि जागरूकतेच्या स्तरावर अवलंबून असतात. राजकीय पक्ष या घटकांचा अभ्यास करून धोरणे आखतात आणि प्रचाराचे माध्यम ठरवतात, ज्यामुळे मतदानाचे नमुने आणि राजकीय सहभागात बदल दिसून येतात.

**राजकीय सहभागाचे नमुने (Patterns)**

लोकशाहीमध्ये नागरिकांचा सहभाग फक्त मतदानापुरता मर्यादित नाही; विविध स्वरूपाचे राजकीय सहभागाचे नमुने भारतात दिसून येतात. या नमुन्यांमुळे लोकशाही प्रक्रियेतील नागरिकांची सक्रियता आणि सामाजिक सहभाग समजून येतो. खालिल मुद्द्यांद्वारे या विविध प्रकारच्या सहभागाची समीक्षा पुढे केली आहे.

**1. निवडणूकात्मक सहभाग (Voting Turnout):** निवडणूकात्मक सहभाग म्हणजे मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावणे. भारतातील लोकसभा निवडणुकीत 2024 मध्ये सुमारे **65.79%** मतदारांनी मतदान केले, म्हणजे जवळपास 642 दशलक्ष लोकांनी हक्क वापरला, जे देशाच्या लोकशाही प्रक्रियेचे एक महत्त्वाचे उदाहरण आहे.

वेगवेगळया विधानसभा आणि स्थानीय पातळीच्या निवडणुकांमध्येही मतदानाची टक्केवारी बदलते; काही ठिकाणी 60% पेक्षा अधिक मतदान नोंदले गेले आहे, जसे की महाराष्ट्रातील विविध नगरपालिका निवडणुकांमध्ये 60–68% पर्यंत मतदान झालेले दिसते. या उपस्थितीपासून स्पष्ट होते की नागरिक मोठ्या प्रमाणावर मतदानातून आपल्या मताचा उपयोग करतात, परंतु काही ठिकाणी मतदानाची टक्केवारी सुधारण्याची गरज आहे.

**2. निवडणूकबाह्य सहभाग (Non-electoral Participation):** मतदानाव्यतिरिक्त लोक अनेक राजकीय चळवळी, निदर्शने, सामाजिक आंदोलन, सार्वजनिक परिषदा, आणि समर्थन कार्यक्रम यात सहभागी होतात. उदाहरणार्थ, विविध सामाजिक मुद्द्यांवर लोक घराघरातून सार्वजनिक बैठका, मोर्चे, स्वस्थ आंदोलन ह्यांमध्ये सहभागी होत आहेत. हे प्रकार लोकांना त्यांच्या हक्कांच्या बाबतीत जागरूक करतात आणि सरकार व पक्षांना त्यांच्या मागण्यांकडे लक्ष देण्यास भाग पाडतात. तसेच स्वयंसेवी संघटना आणि सामाजिक संघटनांचे अभियान राजकीय जागरूकता वाढवण्यास मदत करतात. यामुळे नागरिकांचे सत्ताप्राप्तींवर दबाव निर्माण होतो आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा अधिक प्रभाव वाढतो.

**3. युवकांचा सहभाग (Youth Participation):** युवक वर्ग राजकीय प्रक्रियेत मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहे. निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीत प्रथमच मतदान करणाऱ्या तरुणांची संख्या लक्षणीय आहे, जसे महाराष्ट्रातील चर्चेत 19.48 लाख प्रथमच मतदार होते. परंतु काही संघटनात्मक निवडणुकांमध्ये तरुणांचा सहभाग कमी नोंदला गेला आहे. उदाहरणार्थ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या निवडणुकीत 67% मतदान झाले तरी मागील वेळी ते अधिक होते. युवक वर्गातील राजकीय सक्रियता सोशल मिडिया, ऑन-लाइन चर्चांद्वारे वाढली असली तरी प्रत्यक्ष राजकीय चळवळींमध्ये आणि पक्ष संघटनांमध्ये सहभागासाठी अजूनही आव्हाने आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**4. महिलांचा आणि दुर्बल गटांचा सहभाग (Participation of Women and Marginalized Groups):**
महिला मतदारांचा सहभाग सतत वाढत आहे. 2024 लोकसभा निवडणुकीत महिला मतदानाचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत जवळपास समान किंवा त्याहून अधिक होते, ज्यात महिलांनी अनेक राज्यांमध्ये पुरुषांपेक्षा जास्त मतदान केले.
उदाहरणार्थ, पंचायती पातळीवरील निवडणुकांमध्ये महिला मतदानाची 69.07% अशी उच्च टक्केवारी नोंदली गेली, ज्यामुळे महिला राजकीय सक्षमीकरणाचे स्पष्ट उदाहरण दिसते. दुर्बल गट — अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, लिंगांकडे दुर्लक्ष झालेले समाज आणि दिव्यांग व्यक्ती — यांनीही विविध लोकशाही प्रक्रियेत सहभाग वाढविला आहे, विशेषतः आरक्षण योजनांमुळे आणि मतदान केंद्रांवरील सुविधांमुळे.
**5. भागीदारीतील क्षेत्रीय भिन्नता (Regional Variations):** राजकीय सहभागाचे नमुने प्रादेशिक स्वरूपानुसार बदलतात. काही राज्यांमध्ये मतदानाचे प्रमाण जास्त असते; उदा. बिहारच्या 2025 विधानसभा निवडणुकीत 64.66% ही उच्च मतदानाची नोंद आहे. ही विविधता सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय कारणांमुळे उद्भवते. विविध प्रदेशांमध्ये मुद्दे, पक्षांची ताकद आणि स्थानिक आकांक्षा यामुळे मतदारांचा सहभाग वेगळा दिसून येतो

**राजकीय संस्था आणि निवडणूक मोहिमेतील सक्रियता –**

राजकीय संस्थांचा आणि निवडणूक प्रक्रियेतल्या मोहिमांचा राजकीय सहभागावर मोठा प्रभाव असतो. स्वातंत्र्योत्तर भारतात राजकीय पक्ष हे नागरिकांच्या मतदार वर्तनावर थेट परिणाम करणारे मुख्य घटक आहेत. पक्ष विविध धोरणे, प्रचार आणि योजनांद्वारे मतदारांपर्यंत पोहोचतात. राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्ष मतदारांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अपेक्षांवर आधारित रणनीती आखतात. नेतृत्व आणि उमेदवाराची प्रतिमा हे देखील मतदारांच्या निर्णयावर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकतात. मतदार उमेदवाराची व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये, पारदर्शकता, नेतृत्व क्षमता, मागील कामगिरी आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचा विचार करून मतदान करतात. नेतृत्व आणि उमेदवाराची छबी पक्षाची लोकप्रियता वाढविण्यास मदत करते आणि मतदारांमध्ये विश्वास निर्माण करते.
निवडणूक प्रचार आणि राजकीय संवाद हे नागरिकांपर्यंत पक्षांचे संदेश पोहोचविण्यासाठी महत्वाचे आहेत. प्रचार मोहिमा प्रिंट, इलेक्ट्रॉनिक मीडिया, रोड शो, रॅली, पंपलेट्स आणि डिजिटल माध्यमांवर आधारित असतात. यामुळे मतदारांना पक्षांची धोरणे, उमेदवारांची भूमिका आणि निवडणुकीशी संबंधित मुद्दे समजतात. माध्यमे, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्म हे सध्या राजकीय संवादाचे प्रभावी माध्यम बनले आहेत. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲपसारख्या प्लॅटफॉर्मवर मतदारांपर्यंत थेट संदेश पोहोचवणे शक्य झाले आहे. डिजिटल माध्यमांमुळे युवा आणि शहरी मतदारांचा सहभाग वाढला असून प्रचाराची गती आणि प्रभाव अधिक व्यापक झाला आहे. शिवाय, सिव्हिल सोसायटी आणि दबाव गटांचे (Pressure Groups) योगदान देखील महत्त्वाचे आहे. सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, शैक्षणिक संस्था, सामाजिक चळवळी आणि व्यावसायिक संघटनांचे हस्तक्षेप नागरिकांच्या जागरूकतेत वाढ करतात, निवडणुकीतील पारदर्शकता सुनिश्चित करतात आणि मतदानास प्रोत्साहन देतात.
एकत्रितपणे, राजकीय संस्था, उमेदवार प्रतिमा, प्रचार मोहीम, माध्यमे आणि सामाजिक संघटना यांचा समन्वय मतदार वर्तन, राजकीय सहभाग आणि लोकशाही प्रक्रियेच्या सुदृढतेवर निर्णायक परिणाम करतो.

**उभरती प्रवृत्ती आणि समकालीन आव्हाने –**

स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदान आणि राजकीय सहभागाच्या नमुन्यात अनेक उभरत्या प्रवृत्ती आणि आव्हाने दिसून येत आहेत. काही राज्यांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढत असताना, काही ठिकाणी ती कमी होत आहे. उदाहरणार्थ, 2014 ते 2019 लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय मतदान टक्केवारी 66.38% वर पोहोचली, तर काही स्थानिक निवडणुकांमध्ये ती 50% पेक्षा कमी होती. ही असमानता राजकीय सहभागाच्या दर्जावर चिंताजनक परिणाम करते. राजकीय विचारसरणीवर लोकशाहीतल्या लोकप्रियता व राष्ट्रीयत्ववाद (Populism and Nationalism) यांचा प्रभाव वाढत आहे. पक्ष अनेकदा भावनात्मक आणि राष्ट्रवादी मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करून मतदारांमध्ये समर्थन वाढवतात. यामुळे धोरणात्मक चर्चेऐवजी भावनांवर आधारित मतदान वाढलेले दिसते.
पैशाचा प्रभाव आणि राजकारणातील गुन्हेगारीकरण हे आणखी एक आव्हान आहे. आर्थिक ताकद आणि पक्षाच्या निधीमुळे निवडणूक मोहीम अधिक प्रभावी बनते, परंतु यामुळे नैतिकतेला धक्का पोहोचतो. काही ठिकाणी उमेदवारांचा गुन्हेगारी इतिहास असूनही मतदारांचा निर्णय प्रभावित होतो. राजकारणाबद्दल निराशा आणि उदासीनता (Political apathy and distrust) वाढल्याचेही दिसते. नागरिकांचे राजकीय संस्थांवरील विश्वास कमी झाला असून, बहुतेक निर्णयांमध्ये मतदान ही एक जबाबदारी म्हणून पाहिली जाते. शेवटी, डिजिटल दरी (Digital divide) आणि राजकीय सहभाग हे आधुनिक काळातील महत्त्वाचे मुद्दे आहेत. सोशल मीडिया आणि

डिजिटल प्लॅटफॉर्मनी नागरिकांमध्ये जागरूकता वाढवली असली तरी, ग्रामीण आणि दुर्बल गटांमध्ये डिजिटल प्रवेशाची मर्यादा असल्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग अजूनही कमी आहे.

एकत्रितपणे, मतदानात वाढ किंवा घट, भावनात्मक राजकारण, पैशाचा प्रभाव, राजकीय निराशा आणि डिजिटल अंतर ही समकालीन आव्हाने लोकशाही प्रक्रियेच्या सुदृढतेवर परिणाम करतात. यावर उपाययोजना करणे आणि नागरिकांचा समावेश सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे.

**पुढील दिशा / उपाययोजना –**

**1.मतदार जागरूकता वाढवणे:** शाळा, कॉलेज, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व समजावणे.

**2.राजकीय प्रशिक्षण आणि नेतृत्व विकास:** युवांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आणि नेतृत्व विकास उपक्रम राबवणे.

**3.नैतिक राजकारण प्रोत्साहित करणे:** पैशाचा आणि गुन्हेगारीचा प्रभाव कमी करण्यासाठी पारदर्शक निवडणूक प्रक्रिया आणि कडक नियम राबवणे.

**4.महिला आणि दुर्बल गटांचा सहभाग वाढवणे:** आरक्षण, सुविधाजनक मतदान केंद्रे आणि माहितीच्या उपलब्धतेद्वारे सर्वसमावेशक सहभाग सुनिश्चित करणे.

**5.डिजिटल साधनांचा समावेश आणि सुधारणा:** सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा सकारात्मक वापर करून नागरिकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे, तसेच डिजिटल अंतर कमी करणे.

**निष्कर्ष –**

स्वातंत्र्योत्तर भारतातील मतदार वर्तन आणि राजकीय सहभाग हे लोकशाहीच्या सुदृढतेसाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. मतदान, पक्षांच्या धोरणांचा प्रभाव, नेतृत्व आणि उमेदवाराची प्रतिमा, सामाजिक-आर्थिक घटक, मीडिया व डिजिटल माध्यमांचा वापर, तसेच सिव्हिल सोसायटी व दबाव गटांच्या क्रियाकलापामुळे नागरिकांचा सहभाग आकार घेतो. यामुळे निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकशाहीतील विश्वास वृद्धिंगत होतो. तथापि, मतदानातील असमानता, भावनांवर आधारित राजकारण, पैशाचा प्रभाव, राजकीय निराशा आणि डिजिटल अंतर ही समकालीन आव्हाने राहिलेली आहेत. या आव्हानांचा सामना करून नागरिकांचा सर्वसमावेशक सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. भविष्यातील धोरणे, शिक्षण, प्रशिक्षण, महिलांचा आणि दुर्बल गटांचा सहभाग, तसेच डिजिटल साक्षरता या माध्यमातून भारताची लोकशाही अधिक सशक्त आणि सक्षम होऊ शकते. लोकशाहीची गुणवत्ता फक्त संस्थांवर नव्हे, तर सक्रिय, जागरूक आणि समर्पित नागरिकांवर देखील अवलंबून आहे.

**संदर्भ –**

1. कुमार, स., & राय, प. (2013). भारतामधील मतदान वर्तनाचे मापन. SAGE Publications.
2. राठौर, स., & मीना, च. (2024). भारतातील मतदान वर्तन: सर्वसमावेशक आढावा. RESEARCH HUB International Multidisciplinary Research Journal, 11(4), 40–44. https://doi.org/10.53573/rhimrj.2024.v11n4.007
3. भारत में मतदान व्यवहार पर मीडिया का प्रभाव. (2025). Journal of Advances and Scholarly Researches in Allied Education, *22*(01), 402–409. https://doi.org/10.29070/x5t99p71
4. भारतीय राजनीति में मतदान व्यवहार को प्रभावित करने वाले कारकों का विश्लेषणात्मक अध्ययन. (2025). International Journal of Multidisciplinary Research in Arts, Science and Technology, 3(11), 15–21. https://doi.org/10.61778/ijmrast.v3i11.196
5. मर्सी, स. क. (2025). तमिळ मतदारांना काय प्रभावित करते? European Journal of Theoretical and Applied Sciences. https://doi.org/10.59324/ejtas.2025.3(3).17
6. कुमार, स., & मिश्रा, ज. (2020). राजकारणात सहभाग: मतदान व वर्तन. In Political Participation and Electoral Politics (pp. xx–xx). Taylor & Francis.
7. पाल, र., कुमार, अ. क., & संथानम, म. स. (2025). मतदानाचे प्रमाण आणि मुख्य निवडणूक आकडेवारी. arXiv. https://arxiv.org/abs/2501.01896
8. चॅटरजी, ज. (2024). भारतातील राष्ट्रीय आणि राज्य निवडणुकांवर परिणाम करणारे महत्त्वाचे घटक: सिस्टेमॅटिक लिटरेचर रिव्ह्यू. Frontiers in Political Science.

9. झा, प. (2017). बीजेपी कशी जिंकते: भारताच्या सर्वात मोठ्या निवडणूक यंत्रणेमागील अंतर्गत माहिती. Juggernaut Books.
10. वैष्णव, म. (2017). जेव्हा गुन्हेगारी फायदेशीर ठरते: भारतातील पैशाचा आणि ताकदवान राजकारण. Yale University Press.s

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग

**मुकेश एकनाथ भालेराव**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, के.सी.ए.एस.मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालय, जळगाव

**Manuscript ID:**
JRD -2026-180111
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 45-49
January 2026

***सारांश (Abstract):***

या अभ्यासात विषयाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, संशोधन पद्धती आणि निष्कर्षांचा संक्षिप्त आढावा घेण्यात आला आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व तांत्रिक घटकांचा विचार करून त्यांच्या परिणामांचे विश्लेषण करण्यात आले आहे. उपलब्ध माहिती व संदर्भांच्या आधारे निष्कर्ष मांडले असून, भविष्यातील संशोधन व धोरणात्मक निर्णयांसाठी उपयुक्त दिशा सूचित करण्यात आली आहे.

**मुख्यशब्द:** संशोधन, विश्लेषण, विकास, धोरण, सामाजिक बदल, आर्थिक घटक, शैक्षणिक प्रगती

**प्रस्तावना:**

लोकशाही व्यवस्थेचा पाया निवडणूक प्रक्रियेवर अवलंबून असतो (Fadia 12). स्वच्छ, पारदर्शक व विश्वासार्ह निवडणुका झाल्या तरच नागरिकांचा लोकशाहीवर विश्वास दृढ होतो. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने भरलेल्या देशात निवडणूक प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी वेळोवेळी निवडणूक सुधारणा (Electoral Reforms) करण्यात आल्या आहेत. या सुधारणा केवळ प्रशासकीय बदल नसून त्या थेट नागरिकांच्या राजकीय सहभागाशी निगडित आहेत. लोकशाही शासनव्यवस्थेचा कणा म्हणजे मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका. लोकशाहीमध्ये नागरिकांना मतदानाचा अधिकार देऊन त्यांच्या इच्छेनुसार प्रतिनिधी निवडण्याची संधी दिली जाते. तथापि, केवळ मतदानाचा अधिकार अस्तित्वात असणे पुरेसे नसून नागरिकांचा प्रत्यक्ष राजकीय सहभाग, जागरूकता आणि विश्वास असणे तितकेच आवश्यक आहे. आजच्या काळात राजकीय उदासीनता, मतदानातील घटती टक्केवारी, पैसा व बाहुबलींचा प्रभाव, जातीय व धार्मिक ध्रुवीकरण आणि राजकीय पक्षांवरील अविश्वास ही गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत.

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

या समस्यांवर उपाय म्हणून निवडणूक सुधारणा सुचविल्या जातात. निवडणूक सुधारणा म्हणजे निवडणूक प्रक्रियेत आवश्यक ते बदल करून ती अधिक न्याय्य, समावेशक आणि परिणामकारक बनविण्याचा प्रयत्न. या सुधारणा केवळ कायदेशीर किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या नसून त्यांचा थेट परिणाम नागरिकांच्या राजकीय सहभागावर होतो. त्यामुळे निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग यांचा परस्परसंबंध अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**बीजशब्द:** निवडणूक सुधारणा, राजकीय सहभाग, EPIC, EVM, VVPAT, NOTA.

**उद्दिष्टे:**

- भारतातील निवडणूक सुधारणांचा ऐतिहासिक आढावा घेणे.
- निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग यांतील परस्परसंबंधाचा अभ्यास करणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*मुकेश एकनाथ भालेराव, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, के.सी.ए.एस.मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालय, जळगाव*

**How to cite this article:**
*भालेराव, . मुकेश . एकनाथ . (2026). निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग. Journal of Research & Development, 18(1(IV)), 45–49.* https://doi.org/10.5281/zenodo.18169301

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169301
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- भारतातील निवडणूक सुधारणा आणि त्यांचा राजकीय सहभागावर झालेला परिणाम विश्लेषित करणे.
- राजकीय सहभागाची संकल्पना आणि त्याचे विविध प्रकार समजावून घेणे.
- निवडणूक प्रक्रियेतील आव्हाने व मर्यादा समजून घेणे.
- राजकीय सहभागातील अडथळे (उदा. गुन्हेगारीकरण, पैसा) शोधणे.
- डिजिटल युगातील निवडणूक आव्हाने अभ्यासणे.
- भविष्यातील प्रभावी निवडणूक सुधारणांसाठी सूचना मांडणे.

**महत्व:**

- राजकीय सहभाग ही संकल्पना केवळ मतदानापुरती मर्यादित नसून तिचे विविध स्वरूप या संशोधनातून स्पष्ट होते.
- निवडणूक सुधारणा आणि नागरिकांचा राजकीय सहभाग यांतील परस्परसंबंध अधोरेखित करून लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कसा वाढतो हे स्पष्ट केले आहे.
- महिला, तरुण आणि दुर्बल घटकांचा राजकीय सहभाग वाढविण्यात निवडणूक सुधारणांची भूमिका स्पष्ट करण्यास हा अभ्यास उपयुक्त ठरतो.
- निवडणूक सुधारणा आणि सक्रीय राजकीय सहभाग यांच्या माध्यमातून उत्तरदायी, पारदर्शक आणि लोकाभिमुख शासनव्यवस्था कशी निर्माण होऊ शकते हे स्पष्ट केले आहे.
- प्रस्तुत संशोधन पेपर लोकशाही व्यवस्थेतील निवडणूक प्रक्रिया आणि नागरिकांचा राजकीय सहभाग यांचे महत्त्व स्पष्ट करून लोकशाही सुदृढतेच्या अभ्यासास शैक्षणिक आधार प्रदान करतो.
- EVM, VVPAT, EPIC, NOTA यांसारख्या तांत्रिक व संस्थात्मक सुधारणांचा राजकीय सहभागावर झालेला परिणाम समजून घेण्यास मदत होते.

**संशोधन पद्धती:-** सदर संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये दुय्यम माहिती स्रोतांचा (Secondary Data) वापर करण्यात आला आहे. पुस्तके, शासकीय अहवाल, निवडणूक आयोगाचे दस्तऐवज, संशोधन नियतकालिके, वर्तमानपत्रे व विश्वासार्ह संकेतस्थळे यांचा अभ्यास करून माहिती संकलित करण्यात आली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**निवडणूक सुधारणा : संकल्पना व अर्थ**

निवडणूक सुधारणा म्हणजे निवडणूक प्रक्रियेत असलेल्या त्रुटी दूर करून ती अधिक निष्पक्ष, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनविण्यासाठी करण्यात येणारे कायदेशीर, प्रशासकीय व संरचनात्मक बदल. या सुधारणांचा उद्देश लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे आणि नागरिकांचा राजकीय प्रक्रियेवरील विश्वास वाढविणे हा असतो.

**भारतातील निवडणूक सुधारणांचा ऐतिहासिक आढावा:**

भारतातील निवडणूक सुधारणा:-ऐतिहासिक पार्श्वभूमी:- स्वातंत्र्यानंतर भारताने प्रौढ मताधिकार स्वीकारून व्यापक लोकशाहीची पायाभरणी केली. 1951-52 पासून आजपर्यंत निवडणूक प्रक्रियेत सातत्याने सुधारणा केल्या गेल्या आहेत. निवडणूक आयोगाची स्थापना, कायदेशीर दुरुस्त्या आणि तांत्रिक नवकल्पना यांमुळे प्रक्रिया अधिक सक्षम झाली आहे. विशेषतः 1989 नंतर झालेल्या सुधारणांमुळे निवडणूक प्रक्रियेत अधिक शिस्त आणि पारदर्शकता आली आहे. महिला मतदारांची संख्या वाढली असून शहरी तसेच ग्रामीण भागात मतदानाची टक्केवारी वाढताना दिसून येते. तथापि, पैसा आणि बाहुबलींचा प्रभाव, तसेच राजकीय पक्षांच्या वित्तपुरवठ्यातील अपारदर्शकता ही आव्हाने अद्याप कायम आहेत.

**प्रमुख निवडणूक सुधारणा (कालानुक्रमिक):**

| वर्ष | सुधारणा | उद्देश |
| --- | --- | --- |
| 1961 | लोकप्रतिनिधित्व कायदा | निवडणूक कायदा आचारसंहिता व प्रक्रिया स्पष्ट करणे |
| 1989 | EPIC ( Electors Photo Identity Card ) (मतदार ओळखपत्र) | बनावट मतदान रोखणे |
| 2003 | ऑनलाइन मतदार नोंदणी | मतदार नोंदणी सुलभ करणे |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

| | | |
|---|---|---|
| 2004 | EVM चा व्यापक वापर | मतदानातील पारदर्शकता |
| 2013 | NOTA | मतदारांचा नकाराधिकार |
| 2017 | VVPAT ( Voter Verifiable Paper Audit Trail) | मतदान पडताळणी व विश्वास |

**निवडणूक सुधारणा : स्वरूप व प्रकार**

- **कायदेशीर सुधारणा:-** लोकप्रतिनिधी कायदा (1951) मध्ये वेळोवेळी दुरुस्त्या करण्यात आल्या. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांबाबत माहिती जाहीर करणे, निवडणूक खर्चाची मर्यादा निश्चित करणे अशा तरतुदी यामध्ये येतात.
- **प्रशासकीय सुधारणा:-** निवडणूक आयोगाची स्वायत्तता वाढवणे, निवडणूक यंत्रणा अधिक सक्षम करणे, मतदान केंद्रांवरील सुविधा सुधारणे इत्यादी बाबींचा समावेश होतो.
- **तांत्रिक सुधारणा:-** ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, ऑनलाइन प्रणाली, सामाजिक माध्यमांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष यंत्रणा अशा सुधारणा तांत्रिक स्वरूपाच्या आहेत.

**राजकीय सहभाग : संकल्पना**

राजकीय सहभाग म्हणजे नागरिकांनी राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे. मतदान करणे, राजकीय चर्चेत भाग घेणे, आंदोलनात सहभागी होणे, राजकीय पक्षांचे सदस्य होणे, निवडणूक लढवणे इत्यादी गोष्टी राजकीय सहभागात येतात.

मॅकसोलीच्या मते, “शासकाच्या निवड प्रक्रियेत व सार्वजनिक धोरण निर्मिती प्रक्रियेत लोकांचा जो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग असतो त्याला राजकीय सहभाग असे म्हणतात. ( पाटील 128) रॉबर्ट ढालच्या मते, राजकीय सहभागात चार प्रकारच्या वर्गांचा समावेश होतो. 1.सत्ताधारी वर्ग 2. सत्तेसाठी प्रयत्न करणारा वर्ग 3.राजकारणात आवड असलेला वर्ग 4.राजकारणात उदासीन वर्ग (पाटील 127)

रिझमनने परंपरालक्षी, आत्मलक्षी आणि बहिर्लक्षी ह्या तीन गटात व्यक्तींचे वर्गीकरण करून त्यांच्या राजकीय सहभागच्या धारणांमधला फरक स्पष्ट केलेला आहे.

- **परंपरालक्षी:-** व्यक्तीत स्वतंत्र राजकीय मते धारण करण्याची क्षमता नसल्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग मर्यादित प्रमाणात असतो.
- **आत्मलक्षी:-** व्यक्ति केंद्रित प्रवृत्तीच्या असतात. राजकीय लाभ मिळत असेल तर त्या व्यक्ति राजकीय सहभाग दर्शवितात.
- **बहिर्लक्षी:-** व्यक्तीचा समाजात मुक्तपणे संपर्क असतो. अशा स्वभावाच्या व्यक्तींच्या राजकीय सहभागाचे प्रमाण जास्त असते. (पाटील 131)

**राजकीय सहभागावर प्रभाव पाडणारे घटक:-**

- व्यक्तिगत घटक
- राजकीय चेतनेचे घटक
- राजकीय व्यवस्थेचे घटक
- राजकीय पक्ष
- दबावगट वा हितसंबंध गट
- प्रादेशीकता
- शिक्षण, उत्पन्न, लिंग व वय

**राजकीय सहभागाचे प्रकार:-**

लेस्टर मिलबॅथ यांनी *'पोलिटिकल पार्टिसिपेशन'* ग्रंथात ग्लॅडिएटर, ट्रान्झिशनल, स्पेक्टेटोरियल अशा तीन प्रकारात वर्गीकरण केलेले आहे. माईरन कीन यांनी स्वायत्त राजकीय सहभाग (Autonomous) आणि परियोजित राजकीय सहभाग (Mobilized) हे राजकीय सहभागाच्या दोन प्रकारात वर्गीकरण केलेले आहे. (पाटील 137)

विविध अभ्यासकांनी राजकीय सहभागाचे जे वर्गीकरण केलेले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026




- **निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग यांचे नाते:-** निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग हे एकमेकांवर अवलंबून आहेत.
- सुधारणा → विश्वास → सहभाग
- सहभाग → जबाबदार शासन → सुदृढ लोकशाही म्हणूनच, लोकशाही मजबूत करण्यासाठी निरंतर निवडणूक सुधारणा आणि सक्रीय राजकीय सहभाग अत्यावश्यक आहेत. खालील मुद्द्यांद्वारे हे स्पष्ट करता येईल.
- **मतदारांचा विश्वास वाढणे:-** ईव्हीएम व व्हीव्हीपॅटमुळे मतदान प्रक्रियेवर विश्वास वाढला आहे (ECI). त्यामुळे मतदार मतदानासाठी अधिक उत्सुकतेने सहभागी होतात.
- **युवकांचा सहभाग:-** ऑनलाइन मतदार नोंदणी, सोशल मीडिया प्रचार आणि जनजागृती मोहिमांमुळे युवकांचा राजकीय सहभाग वाढलेला दिसून येतो (Kumar 48).
- **महिलांचा सहभाग:-** महिलांसाठी स्वतंत्र मतदान केंद्र, सुरक्षित वातावरण, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण यामुळे महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे.
- **वंचित घटकांचा सहभाग:-** अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग, स्थलांतरित कामगार यांच्यासाठी विशेष उपाययोजना केल्यामुळे त्यांचा सहभाग वाढवण्यास मदत झाली आहे.

**मतदान टक्केवारीतील बदल (आकडेवारी)**

| **निवडणूक वर्ष** | **मतदान टक्केवारी** |
|---|---|
| 1991 | 55.9% |
| 1999 | 59.9% |
| 2009 | 58.2% |
| 2014 | 66.4% |
| 2019 | 67.4% |

स्त्रोत:- भारतीय निवडणूक आयोग

**निवडणूक सुधारणा : आव्हाने व मर्यादा:** सुधारणांनंतरही काही आव्हाने कायम आहेत:
- पैशांचा व बाहुबलींचा प्रभाव
- गुन्हेगारीकरण
- खोटी माहिती व सोशल मीडियाचा गैरवापर
- कमी मतदान टक्केवारी काही भागांत

**सुधारणा अधिक प्रभावी करण्यासाठी सूचना:**
- राजकीय पक्षांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता.
- गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांवर कठोर निर्बंध.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- मतदार शिक्षण व जनजागृती कार्यक्रम वाढवणे.
- परदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी सुलभ मतदान व्यवस्था.

**निष्कर्ष:**

निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग यांचे नाते अतिशय घनिष्ठ आणि परस्परावलंबी आहे. निवडणूक प्रक्रिया जितकी अधिक निष्पक्ष, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनते, तितका नागरिकांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास दृढ होतो आणि त्यातून सक्रीय राजकीय सहभाग वाढतो. EPIC, EVM, VVPAT, NOTA, ऑनलाइन मतदार नोंदणी आणि आदर्श आचारसंहिता यांसारख्या निवडणूक सुधारणांमुळे मतदान प्रक्रिया अधिक सुलभ, सुरक्षित व पारदर्शक झाली असून महिला, तरुण आणि दुर्बल घटकांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. तसेच, या सुधारणांमुळे मतदारांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण होऊन शासन अधिक उत्तरदायी बनण्यास मदत होते. तथापि, पैसा व बाहुबलाचा प्रभाव, राजकीय पक्षांच्या वित्तपुरवठ्यातील अपारदर्शकता आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव ही आव्हाने अद्याप कायम आहेत. त्यामुळे निवडणूक सुधारणा ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया मानली पाहिजे. प्रभावी निवडणूक सुधारणा आणि व्यापक राजकीय शिक्षण यांच्या माध्यमातूनच नागरिकांचा सक्रीय राजकीय सहभाग वाढवता येईल आणि लोकशाही अधिक सुदृढ, समावेशक व अर्थपूर्ण बनू शकेल.

**संदर्भ सूची:**

1. जोशी, सुहास. “भारतामधील निवडणूक प्रक्रिया व सुधारणा.” राज्यशास्त्र संशोधन नियतकालिक, खंड 8, अंक 2, 2019, पृ. 60–68.
2. पाटील, महेंद्र. “राजकीय समाजशास्त्राचा परिचय.” प्रशांत पब्लिकेशन्स, 2020. पृ. 126-154
3. Kumar, Sanjay. “Electoral Reforms and Democratic Participation in India.” Economic and Political Weekly, vol. 45, no. 12, 2010, pp. 45–52.
4. Government of India. The Representation of the People Act, 1951. Ministry of Law and Justice.
5. Fadia, B. L. Indian Government and Politics. Sahitya Bhavan, 2018.
6. Verma, S. P. Electoral Reforms in India. Deep and Deep Publications, 2004.
7. "Political Participation and Women." Press Information Bureau (PIB), 2023.
8. देशपांडे, सुहास. भारतीय लोकशाही आणि निवडणूक राजकारण. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स, 2021.
9. यादव, योगेंद्र. Making Sense of Indian Democracy. New Delhi: Oxford University Press, 2020.
10. भारत निवडणूक आयोग. निवडणूक सुधारणांवरील अहवाल. नवी दिल्ली: ईसीआय प्रकाशन, 2023. Election Commission of India.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# भारताचा स्वातंत्र्योत्तर प्रवास: आव्हाने, यश आणि पुढील वाटचाल

**दिगंबरराव आनंदराव पाटील[1], डॉ.श्री. देवेंद्र गंगाधर विसपुते[2]**
[1]संशोधक विद्यार्थी विद्यावर्धिनी सभेचे क.वा.विज्ञान महाविद्यालय साक्री रोड, धुळे
[2]संशोधन मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, विद्यावर्धिनी सभेचे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय साक्री रोड, धुळे

**Manuscript ID**:
JRD -2026-180112
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 50-58
January 2026

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश (Abstract):***

*१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लोकशाहीचा स्वीकार केला आणि एका नव्या राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. या प्रक्रियेत कायदे आणि राजकीय व्यवस्थांइतकेच महत्त्व 'सॉफ्ट पॉवर' म्हणजेच माध्यम, चित्रपट आणि कला यांना होते.*

*१९४७ पासून भारताच्या राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेत माध्यम, चित्रपट आणि कला हे केवळ मनोरंजनाचे स्रोत न राहता सामाजिक बदलाचे मुख्य कणा ठरले आहेत. या शोधनिबंधाचा सारांश खालील प्रमुख मुद्द्यांवर आधारित आहे:*

- *ऐतिहासिक स्थित्यंतर: स्वातंत्र्योत्तर काळात मुद्रित माध्यमांनी लोकशाहीच्या रक्षकाची भूमिका बजावली, तर 'मदर इंडिया' सारख्या चित्रपटांनी कृषीप्रधान भारताचे स्वप्न मांडले.*
- *डिजिटल क्रांतीचा प्रभाव: अलीकडील काळात इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे माहितीचे लोकशाहीकरण झाले आहे. FICCI-EY (२०२४) च्या अहवालानुसार, भारताचा डिजिटल मीडिया उद्योग ट्रिलियन रुपयांवर पोहोचला असून, तो तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचला आहे.*
- *प्रादेशिक सिनेमाचा उदय: प्रादेशिक चित्रपटांनी (मराठी, तमिळ, मल्याळम) भाषेच्या सीमा ओलांडून जातीव्यवस्था, लिंगभेद आणि मानवी हक्क यांसारख्या वास्तववादी विषयांना जागतिक स्तरावर स्थान मिळवून दिले आहे.*
- *प्रमुख आव्हाने: आर्थिक प्रगती होत असली तरी, 'रिपोर्टर्स विदाऊट बॉर्डर्स' (RSF) च्या अहवालानुसार, प्रेस फ्रीडम इंडेक्समधील भारताचे स्थान घसरले आहे. राजकीय दबाव आणि सेन्सॉरशिप हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यासमोर मोठे आव्हान ठरत आहेत.*
- *निष्करष: हा शोधनिबंध असा निष्कर्ष काढतो की, माध्यम आणि कलांनी अनेकदा प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारून सामाजिक न्यायाचा मार्ग मोकळा केला आहे. डिजिटल साक्षरता आणि स्वायत्तता टिकवून ठेवल्यास भविष्यात अधिक सर्वसमावेशक समाज घडवण्यात हे घटक मोलाची भूमिका बजावतील. या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक परिवर्तनामध्ये या घटकांनी बजावलेली भूमिका तपासणे हा आहे.*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

**Address for correspondence:**
*दिगंबरराव आनंदराव पाटील, संशोधक विद्यार्थी विद्यावर्धिनी सभेचे क.वा.विज्ञान महाविद्यालय साक्री रोड, धुळे*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169317
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*पाटील, . दिगंबरराव . आनंदराव ., & विसपुते, . देवेंद्र . गंगाधर . (2026). भारताचा स्वातंत्र्योत्तर प्रवास: आव्हाने, यश आणि पुढील वाटचाल. Journal of Research & Development, 18(1(IV)), 50–58. https://doi.org/10.5281/zenodo.18169317*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

*मुद्रित माध्यमांपासून ते डिजिटल क्रांतीपर्यंत, समांतर चित्रपटांपासून ते बॉलीवूडच्या मुख्य प्रवाहापर्यंत आणि पथनाट्यांपासून ते समकालीन कलेपर्यंत, या साधनांनी केवळ मनोरंजनाचे काम केले नाही, तर समाजाचा आरसा म्हणूनही काम केले आहे. या पेपरमध्ये गुणात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर करून, या क्षेत्रातील आव्हाने, यश आणि भविष्यातील दिशा यांचा उहापोह करण्यात आला आहे.*

- ***कळीचे मुद्दे (Keywords):*** *माध्यम, चित्रपट, कला, सामाजिक परिवर्तन*

**प्रस्तावना (Introduction)**

"कला आणि माध्यमे ही केवळ समाजाचा आरसा नसतात, तर तो आरसा ज्या चौकटीत बसवला आहे, ती चौकट बदलण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते."

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा देशासमोर गरिबी, निरक्षरता, जातीय भेदभाव आणि फाळणीच्या जखमा अशी अनेक आव्हाने होती. एका विखंडित समाजाला एकात्मिक राष्ट्रात रूपांतरित करण्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेसी नव्हती; त्यासाठी जनमानसाची जडणघडण करणे आवश्यक होते. या प्रक्रियेत प्रसारमाध्यमे, चित्रपट आणि कला यांनी 'चेंज एजंट' (Change Agents) म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (साहित्य आणि कलेच्या संदर्भात) यांच्या मते"*ज्या साहित्यातून समता, बंधुता आणि न्यायाची प्रेरणा मिळत नाही, ते साहित्य समाज परिवर्तनास असमर्थ ठरते.*"

माध्यमे आणि कला ही केवळ माहिती प्रसारित करणारी साधने नसून ती सामाजिक निकष (Social Norms) आणि मूल्ये (Values) घडवणारी powerful साधने आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात, माध्यमांनी लोकशाहीचा 'चौथा स्तंभ' म्हणून काम केले, तर चित्रपटांनी भारतीय संस्कृती आणि आधुनिकता यांच्यातील द्वंद्व पडद्यावर मांडले. हा शोधनिबंध असा युक्तिवाद करतो की, भारतीय माध्यमांनी आणि कलाविश्वाने अनेकदा प्रतिगामी विचारसरणीला आव्हान दिले आणि सामाजिक न्यायासाठी लढा उभारला, तरीही व्यापारीकरण आणि राजकीय दबावामुळे या भूमिकेत अनेकदा विरोधाभास दिसून येतो (Gopal, 2018).

**संशोधनाची उद्दिष्टे (Research Objectives)**

- स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक परिवर्तनामध्ये प्रसारमाध्यमे, चित्रपट आणि कला यांच्या ऐतिहासिक उत्क्रांतीचा अभ्यास करणे.
- डिजिटल क्रांतीमुळे माहितीच्या प्रसारात आणि सामाजिक जनजागृतीमध्ये झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.
- भारतीय चित्रपट (विशेषतः प्रादेशिक सिनेमा) सामाजिक प्रश्न मांडण्यात किती प्रभावी ठरला आहे, हे तपासणे.
- माध्यम आणि कला क्षेत्रासमोर असलेली आव्हाने (उदा. सेन्सॉरशिप, राजकीय दबाव) आणि त्यांचे समाजावरील परिणाम शोधणे.

**संशोधनाची गृहीतके (Research Hypotheses)**

- **गृहितक १:** स्वातंत्र्योत्तर काळात माध्यम आणि चित्रपटांनी भारतीय समाजातील अनिष्ट प्रथा (उदा. अस्पृश्यता, हुंडाबळी) कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.
- **गृहितक २:** तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि ओटीटी (OTT) प्लॅटफॉर्ममुळे उपेक्षित आणि प्रादेशिक कथांना राष्ट्रीय आणि जागतिक ओळख मिळाली आहे.
- **गृहितक ३:** राजकीय हस्तक्षेप आणि आर्थिक व्यापारीकरणामुळे माध्यमांची 'सामाजिक बदलाचा दूत' ही मूळ भूमिका कमकुवत होत आहे.

**पद्धत (Methodology)**

या विषयाच्या सखोल अभ्यासासाठी 'मिश्र संशोधन पद्धती' (Mixed-Method Approach) वापरण्यात आली आहे:

**अ) प्राथमिक संशोधन (Primary Research):**

- **मुलाखती:** माध्यम प्रतिनिधी, चित्रपट अभ्यासक आणि कलाकारांशी चर्चा करून त्यांचे प्रत्यक्ष अनुभव नोंदवले आहेत.
- **सर्वेक्षण/प्रश्नावली:** सामाजिक बदलावर माध्यमांचा किती प्रभाव पडतो, हे जाणून घेण्यासाठी एक मर्यादित सर्वेक्षण केले गेले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**ब) दुय्यम संशोधन (Secondary Research):**

- **अहवाल विश्लेषण:** FICCI-EY (२०२४) आणि RSF (२०२३) यांसारख्या विश्वासार्ह संस्थांच्या अहवालांचा अभ्यास करून सांख्यिकीय माहिती गोळा केली आहे.
- **साहित्य आढावा (Literature Review):** विविध विद्यापीठांचे शोधनिबंध, जर्नल्स, ऐतिहासिक पुस्तके आणि चित्रपटांचे परीक्षण यातून माहिती संकलित केली आहे.
- **केस स्टडी:** 'मदर इंडिया', 'सैराट' आणि 'भ्रष्टाचाराविरुद्धची आंदोलने' यांसारख्या प्रमुख ऐतिहासिक घटनांचे Case Study म्हणून विश्लेषण केले आहे. उदा. प्रकाश झा यांचे सर्व चित्रपट

**ऐतिहासिक पार्श्वभूमी (Historical Context)**

स्वातंत्र्याच्या वेळी भारताची साक्षरता केवळ १२% होती. अशा परिस्थितीत, लोकशाही मूल्ये तळागाळापर्यंत पोहोचवणे हे एक मोठे आव्हान होते.

| निकष (Parameters) | १९४७ (स्वातंत्र्यावेळी) | २०२४ (सद्यस्थिती - अंदाजित) |
|---|---|---|
| साक्षरता दर | १२% - १८% | ७७.७% (NSO अहवाल) |
| वृत्तपत्रे/प्रकाशने | २०० - ३०० (मर्यादित पोहोच) | १,४०,०००+ (RNI डेटा) |
| रेडिओ कव्हरेज | ६ केंद्रांसह मर्यादित | ९९% लोकसंख्येपर्यंत (AIR) |
| चित्रपट निर्मिती (वार्षिक) | २०० पेक्षा कमी | १,५०० - २,००० (जगातील सर्वाधिक) |
| इंटरनेट वापरकर्ते | ० | ८२० दशलक्ष+ (IAMAI अहवाल) |

- **माध्यम स्थिती:** स्वातंत्र्यापूर्वीची पत्रकारिता ही 'मिशनरी' स्वरूपाची होती, जिचा मुख्य उद्देश स्वातंत्र्यलढा होता. स्वातंत्र्यानंतर, माध्यमांनी 'नेशन बिल्डिंग' (Nation Building) च्या प्रक्रियेत सरकारला सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारली, परंतु आणीबाणीच्या (१९७५-७७) काळात माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आली आणि त्यानंतर पत्रकारितेच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाला (Jeffrey, 2000).
- **चित्रपट आणि कला:** १९५० चे दशक हे भारतीय चित्रपटांचे 'सुवर्ण युग' मानले जाते. बिमल रॉय, मेहबूब खान आणि राज कपूर यांसारख्या दिग्दर्शकांनी समाजवादी विचारसरणीचा प्रभाव असलेल्या चित्रपटांची निर्मिती केली. कलेच्या क्षेत्रात, 'प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुप' (PAG) ची स्थापना झाली, ज्याने भारतीय कलेला पारंपारिक चौकटीतून बाहेर काढून आधुनिकतेशी जोडले.

**सामाजिक परिवर्तनात माध्यमांची भूमिका (Role of Media in Social Transformation)**

माध्यमांनी माहितीचा प्रसार आणि जनमत तयार करण्यात दुहेरी भूमिका बजावली आहे.

**१. मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे:** वर्तमानपत्रांनी सुरुवातीच्या काळात विकासात्मक पत्रकारितेवर (Development Journalism) भर दिला. हरित क्रांती आणि धवल क्रांतीच्या यशात नभोवाणी (Radio) आणि वृत्तपत्रांचा मोठा वाटा होता. दूरदर्शनच्या आगमनानंतर, 'हम लोग' (१९८४) सारख्या मालिकांनी कुटुंब नियोजन आणि स्त्री सक्षमीकरणाचे संदेश घराघरात पोहोचवले (Singhal & Rogers, 1999).

**२. केस स्टडी: भ्रष्टाचाराविरुद्ध लढा आणि महिला हक्क:** जे Jessica Lal हत्याकांड प्रकरण किंवा निर्भया प्रकरण (२०१२) घडले, तेव्हा इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांनी जो आक्रमक पवित्रा घेतला, त्यामुळे न्यायव्यवस्थेला आणि सरकारला कठोर पावले उचलणे भाग पडले. माध्यमांच्या या सक्रियतेमुळे (Media Activism) मध्यमवर्गीय समाज रस्त्यावर उतरला, हे सामाजिक परिवर्तनाचे उत्तम उदाहरण आहे.

**सिनेमा निर्देशक श्री. प्रकाश झा: सामाजिक आणि राजकीय वास्तववादावर भाष्य करणारे चित्रपट**

**१. दामुल (Damul - १९८५):** हा चित्रपट बिहारमधील सरंजामशाही, बंधबिगारी आणि दलितांच्या शोषणावर आधारित आहे. ग्रामीण भारतातील जातीव्यवस्थेचे भीषण वास्तव या चित्रपटाने पहिल्यांदा इतक्या प्रखरतेने मांडले.

**२. मृत्युदंड (Mrityudand - १९९७):** स्त्री सक्षमीकरण आणि सामाजिक अन्यायाविरुद्धचा लढा हा या चित्रपटाचा गाभा आहे. पुरुषसत्ताक पद्धतीत महिलांना भोगावा लागणारा त्रास आणि त्यांनी दिलेला लढा यात प्रभावीपणे दाखवला आहे.

**३. गंगाजल (Gangaajal - २००३):** पोलीस प्रशासन आणि राजकारण यांचे साटेलोटे तसेच गुन्हेगारी व्यवस्थेवर हा चित्रपट भाष्य करतो. "समाजाला हवा तसाच पोलीस मिळतो" हा महत्त्वाचा संदेश यातून दिला गेला आहे.

**४. अपहरण (Apaharan - २००५):** बिहारमधील अपहरण उद्योग आणि गुन्हेगारीचे झालेले राजकीयीकरण यावर हा चित्रपट प्रकाश टाकतो. सत्ता मिळवण्यासाठी गुन्हेगारीचा वापर कसा केला जातो, याचे हे जिवंत चित्रण आहे.

**५. राजनीति (Raajneeti - २०१०):** महाभारताच्या पार्श्वभूमीवर आधुनिक काळातील लोकशाही आणि सत्तेसाठी होणारा रक्ताचा खेळ यात दाखवला आहे. लोकशाहीत नैतिकतेपेक्षा सत्तेला कसे महत्त्व दिले जाते, हे याचे मुख्य सूत्र आहे.

**६. आरक्षण (Aarakshan - २०११):** भारतातील शिक्षण व्यवस्थेचे व्यापारीकरण आणि आरक्षणासारखा संवेदनशील विषय या चित्रपटाने हाताळला. सामाजिक समता आणि गुणवत्तेचा संघर्ष यात पाहायला मिळतो.

**७. चक्रव्यूह (Chakravyuh - २०१२):** नक्षलवादाची समस्या आणि त्यामागील सामाजिक-आर्थिक कारणे प्रकाश झा यांनी या चित्रपटातून मांडली. विकास आणि आदिवासींचे हक्क यांच्यातील संघर्षावर हा चित्रपट भाष्य करतो.

**८. सत्याग्रह (Satyagraha - २०१३):** अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनापासून प्रेरित होऊन हा चित्रपट बनवण्यात आला. मध्यमवर्गीयांचा असंतोष आणि शांततामय मार्गाने होणारे आंदोलन याचे हे चित्रण आहे.

प्रकाश झा यांच्या चित्रपटांनी प्रेक्षकांना केवळ मनोरंजन दिले नाही, तर व्यवस्थेतील त्रुटींवर प्रश्न विचारायला प्रवृत्त केले. त्यांच्या चित्रपटांमुळे 'राजकीय सिनेमा' हा प्रकार भारतात अधिक प्रगल्भ झाला.

**३. सोशल मीडियाचा प्रभाव:** समकालीन भारतात, सोशल मीडियाने संवादाचे लोकशाहीकरण केले आहे. #MeToo चळवळीने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या शोषणाविरुद्ध महिलांना आवाज दिला. पारंपारिक माध्यमे ज्या बातम्यांकडे दुर्लक्ष करतात, त्या बातम्या सोशल मीडियामुळे मुख्य प्रवाहात येत आहेत.

4. "फिक्की-ईवाय मीडिया अँड एंटरटेनमेंट रिपोर्ट २०२४" (FICCI-EY Media & Entertainment Report 2024) - या अहवालानुसार, भारताचा मीडिया आणि मनोरंजन उद्योग २०२३ मध्ये **२.३ ट्रिलियन रुपये** इतका वाढला आहे. यामध्ये डिजिटल मीडियाचा वाटा सर्वाधिक वेगाने वाढत आहे, ज्यामुळे ग्रामीण भारतात माहितीचा प्रसार आणि सामाजिक जागरूकता पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने वाढली आहे.

**डिजिटल क्रांती: माहितीचे लोकशाहीकरण आणि सामाजिक प्रभाव**

भारतातील डिजिटल क्रांती ही केवळ तंत्रज्ञानातील बदल नसून ती एक सामाजिक क्रांती ठरली आहे. FICCI-EY (२०२४) अहवालानुसार, भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ८२० दशलक्षांच्या पुढे गेली आहे, ज्याचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागावर झाला आहे.

- **माहितीचे लोकशाहीकरण:** पूर्वी माहितीवर केवळ मुख्य प्रवाहातील माध्यमांची मक्तेदारी होती. आज सोशल मीडियामुळे (YouTube, Instagram, Twitter) तळागाळातील व्यक्ती आपले प्रश्न मांडू शकते. यामुळे उपेक्षितांच्या आवाजाला (Voice of the Voiceless) ताकद मिळाली आहे.

- **थेट संवाद आणि उत्तरदायित्व:** डिजिटल माध्यमांमुळे नागरिक आणि शासन यांच्यात थेट संवाद सुरू झाला आहे. तक्रार निवारण आणि सामाजिक मोहिमा (उदा. #CleanIndia, #BetiBachao) डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे जनचळवळीत रूपांतरित झाल्या आहेत.
- **नकारात्मक बाजू (RSF च्या संदर्भात):** मात्र, डिजिटल क्रांतीसोबतच 'फेक न्यूज' (Fake News) आणि ऑनलाइन ध्रुवीकरणाचा धोका वाढला आहे. RSF अहवाल इशारा देतो की, डिजिटल माध्यमांवरील वाढता सरकारी हस्तक्षेप आणि ट्रोलिंगमुळे 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' धोक्यात येऊ शकते.

**चित्रपटांचा प्रभाव (Impact of Cinema)**

**१. बॉलीवूड आणि प्रादेशिक सिनेमा:** १९५७ चा 'मदर इंडिया' हा चित्रपट केवळ मनोरंजन नव्हता, तर तो कृषीप्रधान भारताच्या संघर्षाचे आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक होता. त्याचप्रमाणे, 'अछूत कन्या' (१९३६) पासून ते अलीकडच्या 'आर्टिकल १५' (२०१९) पर्यंत, हिंदी सिनेमाने जातीय भेदभावावर सातत्याने भाष्य केले आहे. प्रादेशिक सिनेमात, मराठीतील 'सिंहासन' (१९७९) आणि तमिळमधील 'जय भीम' (२०२१) सारख्या चित्रपटांनी राजकीय आणि सामाजिक वास्तवाचे दाहक चित्रण केले आहे.

२. सामाजिक बदलाची नांदी: **'रंग दे बसंती' (२००६)** सारख्या चित्रपटाने तरुणांना भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी प्रेरित केले. **'तारे जमीन पर' (२००७)** ने डिस्लेक्सिया (Dyslexia) आणि शिक्षण व्यवस्थेबद्दल पालकांचा दृष्टिकोन बदलण्यास भाग पाडले. **'पॅडमॅन'** सारख्या चित्रपटाने मासिक पाळीसारख्या टॅबू विषयावर उघड चर्चा घडवून आणली.

**३. माहितीपट (Documentaries):** आनंद पटवर्धन यांचे 'राम के नाम' किंवा निष्ठा जैन यांचे 'गुलाबी गँग' यांसारखे माहितीपट मुख्य प्रवाहातील माध्यमांनी दुर्लक्षित केलेले प्रश्न मांडतात आणि सामाजिक जाणीव जागृत करतात (Valicha, 1988).

**बॉलीवूड आणि सामाजिक वास्तव यावर आधारीत चित्रपट**

- **१९५०-६० (नेहरू युगीन समाजवाद):**
  - *विषय:* गरिबी, शेती, राष्ट्रउभारणी.
  - *उदा.* मदर इंडिया, नया दौर.
- **१९७०-८० (अँग्री यंग मॅन - असंतोष):**
  - *विषय:* बेरोजगारी, भ्रष्टाचार, कामगार लढा.
  - *उदा.* जंजीर, दीवार, अर्धसत्य.
- **१९९०-२००० (जागतिकीकरण आणि एनआरआय):**
  - *विषय:* कौटुंबिक मूल्ये, पाश्चिमात्य संस्कृतीशी जुळवून घेणे.
  - *उदा.* दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे.
- **२०१०-पुढील (न्यू वेव्ह आणि वास्तववाद):**
  - *विषय:* लिंगभेद, जातीय वास्तव, LGBTQ+ हक्क.
  - *उदा.* आर्टिकल १५, बधाई दो, सैराट.

**४. प्रादेशिक सिनेमाचा उदय: स्थानिक प्रश्नांना जागतिक व्यासपीठ**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय सिनेमा म्हणजे केवळ 'बॉलीवूड' (हिंदी सिनेमा) असे मानले जात असे. मात्र, गेल्या दशकात प्रादेशिक सिनेमाने ही व्याख्या बदलून टाकली आहे.

- **भाषेची सीमा ओलांडून:** FICCI-EY (२०२४) नुसार, प्रादेशिक चित्रपटांचा प्रेक्षकवर्ग आता केवळ त्या भाषेपुरता मर्यादित राहिला नसून तो राष्ट्रीय आणि जागतिक झाला आहे. 'सैराट' (मराठी), 'कांतारा' (कन्नड), 'जय भीम' (तमिळ) यांसारख्या चित्रपटांनी जातीव्यवस्था, ग्रामीण वास्तव आणि मानवी हक्कांवर भाष्य करत संपूर्ण देशाला विचार करायला लावले.
- **वास्तववादी मांडणी:** प्रादेशिक सिनेमा अनेकदा बॉलीवूडच्या 'ग्लॅमर' पेक्षा 'वास्तववादावर' (Realism) भर देतो. हे चित्रपट स्थानिक संस्कृती, बोलीभाषा आणि तिथल्या जमिनी प्रश्नांना मोठ्या पडद्यावर आणतात. यामुळे एका बाजूला सांस्कृतिक अस्मिता जोपासली जात आहे, तर दुसरीकडे प्रस्थापित सामाजिक उतरंडीला आव्हान दिले जात आहे.
- **ओटीटीचे योगदान:** ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे भाषेचा अडथळा दूर झाला आहे. आज एक मराठी प्रेक्षक मल्याळम चित्रपट पाहतो आणि त्यातील सामाजिक विषयाशी स्वतःला जोडून घेतो. या 'क्रॉस-कल्चरल' संवादातून एक अधिक प्रगल्भ भारतीय समाज घडत आहे.

"डिजिटल क्रांतीमुळे माहितीचा 'प्रसार' (Reach) वाढला आहे, तर प्रादेशिक सिनेमाच्या उदयामुळे भारतीय कथानकांची 'खोली' (Depth) वाढली आहे. या दोन्ही घटकांनी मिळून भारताच्या सामाजिक परिवर्तनाला एक नवी, वास्तववादी आणि सर्वसमावेशक दिशा दिली आहे."

**कलेचा प्रभाव (Influence of Art)**

केवळ चित्रपटच नाही, तर साहित्य, चित्रकला आणि रंगमंच यांनीही परिवर्तनात मोलाची कामगिरी केली आहे.

**१. दृश्य कला आणि रंगमंच:** सफदर हश्मी यांचे 'जन नाट्य मंच' (Janam) सारख्या पथनाट्य चळवळींनी कामगार आणि शोषितांचे प्रश्न थेट लोकांच्या अंगणात मांडले. कलेचा उपयोग केवळ सौंदर्यासाठी न करता, राजकीय निषेधासाठी (Protest Art) केला गेला.

**२. साहित्य आणि सामाजिक कथा:** दलित साहित्याचा उदय हा स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात मोठी सांस्कृतिक क्रांती मानली जाते. दया पवार, नामदेव ढसाळ यांसारख्या लेखकांनी प्रस्थापित साहित्याला हादरे देत, उपेक्षितांचे दुःख जगासमोर मांडले. यामुळे साहित्याची आणि समाजाची अभिरुची बदलण्यास मदत झाली.

**३. कला महोत्सवांची भूमिका:** कोची-मुझिरिस बिएनाले (Kochi-Muziris Biennale) सारख्या महोत्सवांमुळे कलेचा संवाद सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला आहे. येथे पर्यावरण, लिंगभेद आणि स्थलांतर यांसारख्या जागतिक समस्यांवर कलेच्या माध्यमातून भाष्य केले जाते.

कलेच्या माध्यमातून सामाजिक बदल - प्रमुख चळवळी दर्शवणारा तक्ता

| दशक | कला चळवळ | सामाजिक प्रभाव |
|---|---|---|
| १९४०-५० | इप्टा (IPTA) आणि प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुप | स्वातंत्र्यलढा आणि बंगालच्या दुष्काळाचे चित्रण. |
| १९७०-८० | दलित पँथर साहित्य चळवळ | जातीय शोषणाविरुद्ध विद्रोही आवाज आणि साहित्याचे लोकशाहीकरण. |
| १९९०-०० | पथनाट्य (उदा. जनम) | कामगार हक्क आणि कोमुवाद विरोधी प्रचार. |
| २०१०-पुढे | कोची-मुझिरिस बिएनाले (Kochi Biennale) | समकालीन जागतिक प्रश्नांवर (पर्यावरण, स्थलांतर) संवादाचे माध्यम. |

**६. समोरील आव्हाने (Challenges Faced)**

**१. FICCI-EY अहवाल सारांश (सकारात्मक बाजू आणि वाढ)**

**अहवालाचे शीर्षक:** The Window of Opportunity - FICCI-EY Report on Media & Entertainment Sector 2024

**प्रमुख निष्कर्ष (Key Findings):**

- **उद्योगाची प्रचंड वाढ:** भारतीय मीडिया आणि मनोरंजन क्षेत्र (M&E) २०२३ मध्ये ८% ने वाढून **२.३३ ट्रिलियन (२.३३ लाख कोटी)** रुपयांपर्यंत पोहोचले आहे. ही वाढ दर्शवते की माध्यमांचा प्रभाव भारतीय जनमानसावर किती खोलवर रुजला आहे.
- **डिजिटल मीडियाचे वर्चस्व:** पारंपारिक टेलिव्हिजनला मागे टाकत, डिजिटल मीडिया हा जाहिराती आणि माहितीचा सर्वात मोठा स्रोत बनला आहे. इंटरनेटच्या स्वस्त दरांमुळे ग्रामीण भारतात माहितीचा प्रसार वेगाने होत आहे, ज्यामुळे 'माहितीचे लोकशाहीकरण' (Democratization of Information) झाले आहे.
- **प्रादेशिक कथेला महत्त्व (Rise of Regional Content):** अहवालानुसार, केवळ हिंदीच नव्हे तर प्रादेशिक भाषेतील (मराठी, तमिळ, तेलुगू, मल्याळम) आशयाचा खप ५०% पेक्षा जास्त आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

*सामाजिक अर्थ*: स्थानिक संस्कृती आणि तिथल्या समस्या आता राष्ट्रीय स्तरावर पोहोचत आहेत (उदा. 'कांतारा' किंवा 'सैराट' सारखे चित्रपट).

- **ओटीटी (OTT) प्लॅटफॉर्म:** सशुल्क ओटीटी सबस्क्रिप्शनमध्ये वाढ झाली आहे. यामुळे निर्मात्यांना बॉक्स ऑफिसच्या दबावाशिवाय सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे आणि धाडसी विषय (उदा. 'पंचायत' किंवा 'पाताल लोक') मांडता येत आहेत.

**संशोधनातील निष्कर्ष:** हा अहवाल सिद्ध करतो की तंत्रज्ञानामुळे सामाजिक कथा (Narratives) आता केवळ शहरांपुरत्या मर्यादित राहिल्या नसून त्या ग्रामीण भागापर्यंत झिरपल्या आहेत.

**RSF (Reporters Without Borders) अहवाल सारांश (टीकात्मक बाजू आणि आव्हाने)**

**अहवालाचे शीर्षक:** World Press Freedom Index 2023/2024

**प्रमुख निष्कर्ष (Key Findings):**

- **भारताचे मानांकन (Ranking):** २०२३ च्या जागतिक पत्रकारिता स्वातंत्र्य निर्देशांकात १८० देशांपैकी भारताचे स्थान **१६१ वे** होते (जे चिंतेची बाब आहे). जरी २०२४ मध्ये यात काही अंशी सुधारणा दिसली असली, तरी एकूण स्थिती 'गंभीर' (Serious) या श्रेणीत मोडते.
- **पत्रकारांची सुरक्षा:** अहवालात नमूद केले आहे की, भारतात पत्रकारांवर होणारे हल्ले, ऑनलाइन ट्रोलिंग आणि कायदेशीर छळ (Legal Harassment) यांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः जे पत्रकार सरकार किंवा बड्या कॉर्पोरेट घराण्यांविरुद्ध लिहित आहेत, त्यांना लक्ष्य केले जात आहे.
- **माध्यमांचे केंद्रीकरण (Media Concentration):** भारतातील अनेक प्रमुख माध्यमे आता काही मोजक्याच बड्या उद्योगपतींच्या मालकीची झाली आहेत. RSF च्या मते, यामुळे बातम्यांमध्ये विविधता कमी झाली असून 'संपादकीय स्वातंत्र्य' (Editorial Independence) धोक्यात आले आहे.
- **सेल्फ-सेन्सॉरशिप:** भीतीपोटी अनेक पत्रकार स्वतःहून संवेदनशील विषयांवर लिहिणे टाळतात (Self-censorship), ज्यामुळे समाजातील वास्तवाचे खरे चित्र समोर येत नाही.

**संशोधनातील निष्कर्ष:** हा अहवाल स्पष्ट करतो की जरी माध्यमांचा विस्तार (Quantity) वाढला असला, तरी त्यांची गुणवत्ता आणि स्वातंत्र्य (Quality and Freedom) यावर प्रश्नचिन्ह आहे. सामाजिक परिवर्तनासाठी मुक्त पत्रकारिता आवश्यक असते, जी सध्या धोक्यात आहे.

**तुलनात्मक विश्लेषण**

"एकीकडे FICCI-EY अहवाल (२०२४) दर्शवतो की भारतीय माध्यम उद्योग आर्थिकदृष्ट्या भरभराटीला येत आहे आणि डिजिटल माध्यमांमुळे खेड्यापाड्यात पोहोचला आहे. मात्र, दुसरीकडे RSF अहवाल इशारा देतो की या विस्तारासोबतच पत्रकारितेच्या गाभ्याला धक्का लागत आहे. म्हणजेच, भारतात 'माध्यमांची पोहोच' (Reach) वाढत आहे, पण 'माध्यमांचा आवाज' (Voice) काहीसा दडपला जात आहे. सामाजिक परिवर्तनासाठी या दोन्ही अहवालांमधील विरोधाभास समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे."

या क्षेत्रासमोर खालीलप्रमाणे अनेक गंभीर आव्हाने आहेत. सेन्सॉरशिप आणि राजकीय दबाव: सर्जनशील स्वातंत्र्यावर अनेकदा 'सेन्सॉर बोर्ड' (CBFC) किंवा राजकीय गटांकडून निर्बंध लादले जातात. 'उडता पंजाब' किंवा 'पद्मावत' सारख्या चित्रपटांच्या प्रदर्शनावेळी झालेला वाद हे त्याचे उदाहरण आहे (Mehta, 2018).

- **व्यापारीकरण (**Commercialization): टीआरपी (TRP) च्या शर्यतीत माध्यमांनी सामाजिक भान गमावले आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. 'सनसनाटी' बातम्यांना मिळणारे महत्त्व गंभीर सामाजिक प्रश्नांना मागे टाकते.
- **सनातनी विरोध:** कलेच्या माध्यमातून मांडले जाणारे पुरोगामी विचार अनेकदा समाजातील सनातनी घटकांना रुचत नाहीत, ज्यामुळे कलाकारांना धमक्या किंवा हिंसाचाराला सामोरे जावे लागते.
- **भारतीय माध्यम आणि कला क्षेत्राचे SWOT विश्लेषण**

खालील तक्ता भारताच्या माध्यम आणि कला क्षेत्रातील सामर्थ्य, उणिवा, संधी आणि धोके यांचे एकत्रित चित्रण करतो:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

| S - सामर्थ्य (Strengths) | W - उणिवा (Weaknesses) |
|---|---|
| * **प्रचंड व्याप्ती:** जगातील सर्वात मोठी चित्रपट निर्मिती आणि वृत्तपत्र बाजारपेठ. | * **माध्यम केंद्रीकरण:** मोजक्याच कॉर्पोरेट कंपन्यांच्या हातात माध्यमांची सत्ता. |
| * **सांस्कृतिक विविधता:** विविध भाषा आणि प्रादेशिक संस्कृतींचा समृद्ध वारसा. | * **नैतिकतेचा अभाव:** टीआरपी (TRP) साठी सनसनाटी आणि चुकीच्या बातम्यांचे (Fake News) प्रमाण. |
| * **लोकशाही परंपरा:** अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा घटनात्मक अधिकार. | * **आर्थिक विषमता:** स्वतंत्र कलाकार आणि छोट्या पत्रकारांसमोर उदरनिर्वाहाचे संकट. |
| **O - संधी (Opportunities)** | **T - धोके (Threats)** |
| * डिजिटल क्रांती: ओटीटी (OTT) आणि सोशल मीडियामुळे ग्रामीण भागातील कलाकारांना जागतिक व्यासपीठ. | * सेन्सॉरशिप: सरकारी आणि सामाजिक गटांकडून सर्जनशील स्वातंत्र्यावर येणारी बंधने. |
| * शिक्षण आणि जाणीव: मनोरंजनाद्वारे (Edutainment) आरोग्य आणि शिक्षणाबाबत जागृती करण्याची क्षमता. | * डिजिटल फूट (Digital Divide): तंत्रज्ञानाचा अभाव असलेल्या वर्गाचे माहितीपासून वंचित राहणे. |
| * जागतिक बाजारपेठ: भारतीय आशयाला (Content) आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढती मागणी. | * अल्गोरिदमचा प्रभाव: सोशल मीडिया अल्गोरिदममुळे समाजात निर्माण होणारी ध्रुवीकरण (Polarization). |

### यश आणि प्रगती (Achievements and Progress)

आव्हानांवर मात करत, माध्यम आणि कलेने काही ठोस यश मिळवले आहे:

- **जनजागृती:** पोलिओ निर्मूलन मोहीम असो किंवा स्वच्छ भारत अभियान, माध्यमांच्या सहभागामुळे या मोहिमा जनचळवळी बनल्या.
- **कायदेशीर बदल:** माध्यमांनी आणि चित्रपटांनी उठवलेल्या आवाजामुळे अनेकदा कायदे बदलले आहेत किंवा त्यांची अंमलबजावणी कठोर झाली आहे.
- **जागतिक ओळख:** भारतीय चित्रपट आणि कलाकारांना ऑस्कर, कान्स आणि बुकर यांसारख्या मंचावर मिळालेली ओळख हे सिद्ध करते की भारतीय कथांमध्ये जागतिक संवेदना भिडवण्याची ताकद आहे.

### भविष्याचा वेध (The Road Ahead)

भविष्यात तंत्रज्ञान हा सामाजिक परिवर्तनाचा मुख्य कणा असणार आहे.

- **ओटीटी (OTT) प्लॅटफॉर्म:** नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राईम यांसारख्या माध्यमांमुळे सेन्सॉरशिपच्या पलीकडे जाऊन कथा सांगणे शक्य झाले आहे. यामुळे अधिक वास्तववादी आणि धाडसी विषय हाताळले जात आहेत.
- **डिजिटल साक्षरता:** सामाजिक परिवर्तनासाठी इंटरनेटचा वापर ग्रामीण भागातही वाढत आहे. भविष्यात 'हायपर-लोकल' (Hyper-local) पत्रकारिता महत्त्वाची भूमिका बजावेल.
- **शिफारसी:** माध्यमांनी नैतिक पत्रकारितेची मूल्ये जपावीत आणि कलाकारांनी केवळ मनोरंजनाऐवजी सामाजिक दायित्वाचे भान ठेवून कलाकृती निर्माण कराव्यात, अशी अपेक्षा आहे.

### निष्कर्ष (Conclusion)

भारताच्या स्वातंत्र्योत्तर प्रवासात माध्यम, चित्रपट आणि कला या घटकांनी समाजाला आरसा दाखवण्याचे आणि प्रसंगी दिशा देण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. त्यांनी अस्पृश्यता, हुंडाबळी, भ्रष्टाचार आणि लिंगभेद यांसारख्या अनिष्ट प्रथांविरुद्ध जनमत तयार केले. जरी आज व्यापारीकरण आणि राजकीय हस्तक्षेपामुळे या क्षेत्रांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असले, तरी सामाजिक लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी त्यांचे अस्तित्व अपरिहार्य आहे. एक अधिक सर्वसमावेशक आणि प्रगत समाज घडवण्यासाठी कला आणि माध्यमांना त्यांचे स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा लागेल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

वर चर्चा केलेल्या सर्व अहवालांचा आणि मुद्द्यांचा विचार करता, भारताचा स्वातंत्र्योत्तर प्रवास हा माध्यम आणि कलेच्या सक्षम खांद्यावर स्वार होऊन झाला आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. जरी RSF अहवाल आपल्याला स्वातंत्र्यावर येणाऱ्या गदेबद्दल सावध करत असला, तरी FICCI-EY अहवालातील डिजिटल आणि प्रादेशिक विकासाची आकडेवारी आपल्याला एक नवी आशा देते.

भविष्यात सामाजिक परिवर्तन केवळ कायद्यांनी होणार नाही, तर ते डिजिटल क्रांतीच्या वेगातून आणि प्रादेशिक सिनेमाच्या प्रामाणिक कथेतून घडेल. कला आणि माध्यमांनी जर आपले सामाजिक उत्तरदायित्व जपले, तर भारत खऱ्या अर्थाने एक प्रगत आणि न्याय्य समाज म्हणून उभा राहील.

**संदर्भ सूची (References)**

**अहवाल (Reports):**

1. FICCI-EY**.** (2024). The Window of Opportunity: India's Media and Entertainment Sector Report 2024. New Delhi: FICCI.
2. Reporters without Borders (RSF**).** (2023). World Press Freedom Index 2023: India Analysis. Paris: RSF Publication.
3. **पुस्तके** (Books):
4. Gopal, S**.** (2018). Media, Cinema, and Society in Modern India. New Delhi: Academic Press.
5. Jeffrey, R. (2000). India's Newspaper Revolution: Capitalism, Politics and the Indian Language Press. New Delhi: Oxford University Press.
6. Rajadhyaksha, A., & Willemen, P**.** (1999). Encyclopaedia of Indian Cinema. Oxford University Press.
7. Mehta, N. (2018). Censorship and the State in India. Oxford University Press.
8. Sen, A. (2005). The Argumentative Indian. Penguin Books.
9. Singhal, A., & Rogers, E. M. (1999). Entertainment-Education: A Communication Strategy for Social Change. Lawrence Erlbaum Associates.
10. Valicha, K. (1988). The Moving Image: A Study of Indian Cinema. Orient Longman.
11. Vasudev, A. (1986). The New Indian Cinema. Macmillan India.
12. दळवी, प्र. (२०१०). *भारतीय प्रसारमाध्यमांचा इतिहास*. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
13. जर्नल्स आणि लेख (Journals & Articles):
14. Singhal, A., & Rogers, E. M. (1999). Entertainment-Education: A Communication Strategy for Social Change. Journal of Development Communication.
15. Virdi, J. (2003). The Cinematic Imagi-Nation: Indian Popular Cinema as Social History. Rutgers University Press.

JOURNAL OF
# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# स्वातंत्र्योत्तर भारतातील परिवर्तन आणि भारतीय पोलीस व्यवस्था: नागरिकविश्वास, कायदा-शिस्त आणि समाजमन - एक सखोल मानसशास्त्रीय विश्लेषण

**सचिन नागेश घरत**[1], **डॉ. ललिता धनाजी निकम**[2]
[1](संशोधक विद्यार्थी, मानसशास्त्र विभाग) मुळजी जेठा, महाविद्यालय जळगाव
[2](विभागप्रमुख, मानसशास्त्र विभाग)कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, महाराष्ट्र

**Manuscript ID**:
JRD -2026-180113
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 59-65
January 2026

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश (Abstract):***

*स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने घटनात्मक लोकशाही, कल्याणकारी राज्य, नियोजन ते उदारीकरण, अंतर्गत सुरक्षा आव्हाने, आणि डिजिटल अर्थव्यवस्था अशा बहुआयामी संक्रमणांचा अनुभव घेतला. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी पोलीस व्यवस्था उभी राहते कायदा-शिस्त राखणे, गुन्हे अन्वेषण, नागरिकांचे हक्क संरक्षित करणे, आणि राज्याची वैधता (legitimacy) दैनंदिन पातळीवर निर्माण/कमकुवत करणे. हा शोधनिबंध स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक-राजकीय परिवर्तनाच्या संदर्भात भारतीय पोलीस व्यवस्थेचे मानसशास्त्रीय विश्लेषण सादर करतो. प्रक्रियात्मक न्याय (procedural justice), सामाजिक ओळख आणि पूर्वग्रह, सामूहिक स्मृती/आघात, तसेच पोलीस संघटनात्मक संस्कृती व व्यावसायिक ताण-तणाव या चौकटींवर आधारित, नागरिकविश्वास कसा तयार होतो किंवा ढासळतो, कायदा-शिस्तीच्या धोरणांचा समाजमनावर काय परिणाम होतो, आणि 'कठोर पोलीसिंग' विरुद्ध 'लोकशाही पोलीसिंग' या द्वंद्वात सुधारणा कशा शक्य आहेत, याचा मागोवा घेतला आहे. दुय्यम माहिती कायदे, सर्वोच्च न्यायालयीन निर्देश, गृह मंत्रालय/सरकारी प्रसिद्धीपत्रे, India Justice Report, NHRC वार्षिक अहवाल, तसेच Status of Policing in India Report (SPIR) यांसारख्या दस्तऐवजांच्या आधारे हा लेख (1) वसाहती वारशामुळे टिकून राहिलेल्या नियंत्रणकेंद्री प्रवृत्ती, (2) राजकीय हस्तक्षेप व संसाधन तुटवडा, (3) सार्वजनिक अपेक्षा, भीती आणि माध्यमनिर्मित दबाव, आणि (4) मानवाधिकार-उत्तरदायित्व यंत्रणांची अपुरी अंमलबजावणी या घटकांचा विश्वासावर होणारा परिणाम स्पष्ट करतो. अखेरीस, कायदेशीर-प्रशासकीय सुधारणा, तपास-व्यवस्थेचे व्यावसायिकीकरण, समुदायाभिमुख पोलीसिंग, तंत्रज्ञान-शासन (tech governance), आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य/नीतिमूल्ये यांवर केंद्रित भविष्यातील आराखडा सुचविला आहे.*

***कीवर्ड:*** *स्वातंत्र्योत्तर परिवर्तन, पोलीस व्यवस्था, नागरिकविश्वास, प्रक्रियात्मक न्याय, वैधता, समाजमन, मानवाधिकार, समुदाय पोलीसिंग, पोलीस सुधारणा*

## प्रस्तावना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने 'औपनिवेशिक प्रशासन' ते 'संवैधानिक लोकशाही' असा निर्णायक संस्थात्मक बदल अनुभवला.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सचिन नागेश घरत, (संशोधक विद्यार्थी, मानसशास्त्र विभाग) मुळजी जेठा, महाविद्यालय जळगाव*

**How to cite this article:**
*घरत, . सचिन . नागेश ., & निकम, . ललिता . धनाजी . (2026). स्वातंत्र्योत्तर भारतातील परिवर्तन आणि भारतीय पोलीस व्यवस्था: नागरिकविश्वास, कायदा-शिस्त आणि समाजमन - एक सखोल मानसशास्त्रीय विश्लेषण. Journal of Research & Development, 18(1(IV)), 59–65.* https://doi.org/10.5281/zenodo.18169349

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18169349

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

तथापि, पोलिसिंगसारख्या "दैनंदिन राज्य" (everyday state) कार्यात वसाहती काळातील कायदेशीर चौकट, पदानुक्रम, आणि कामाची शैली दीर्घकाळ टिकून राहिल्याचे दिसते. पोलीस ही केवळ सुरक्षा यंत्रणा नसून नागरिकांच्या दृष्टीने राज्याचा सर्वाधिक दृश्यमान चेहरा आहे: तक्रार नोंदवताना, रस्त्यावर गस्तीत, आंदोलन/दंगलीत, किंवा सायबर फसवणुकीत राज्य 'कसे वागते' हे पोलीसांच्या व्यवहारातूनच नागरिकांना कळते. त्यामुळे पोलीस व्यवस्थेचा प्रश्न हा केवळ "गुन्हे कमी झाले का?" असा नसून "नागरिकांना न्याय्य, आदरयुक्त आणि निष्पक्ष वागणूक मिळाली का?" असा मूलभूत मानसशास्त्रीय प्रश्नही आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील परिवर्तन बहुस्तरीय राहिले: घटनात्मक अधिकार, सामाजिक न्याय कार्यक्रम, आर्थिक उदारीकरणामुळे वाढलेली स्थलांतर-शहरीकरण प्रक्रिया, आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे वेगवान सामाजिक संवाद. या बदलांमुळे गुन्ह्यांचे स्वरूप आणि लोकांच्या सुरक्षेच्या अपेक्षा बदलल्या. परिणामी पोलीसांवर एकाचवेळी "परिणाम द्या" (effectiveness) आणि "न्याय्य पद्धतीने द्या" (fairness) असा दुहेरी दबाव निर्माण झाला.

या संदर्भात नागरिकविश्वास (trust) आणि पोलीस वैधता (legitimacy) यांचा विचार अत्यावश्यक ठरतो. संशोधनानुसार लोक पोलिसांकडून मिळालेल्या "परिणामांपेक्षा" (उदा., गुन्हेगार पकडला) अनेकदा "प्रक्रियेवर" (कशी वागणूक मिळाली, निष्पक्षता होती का, ऐकून घेतले का) अधिक संवेदनशील असतात. प्रक्रियात्मक न्यायाचा अनुभव नागरिकांना पोलीस "आपली संस्था" वाटण्याची शक्यता वाढवतो आणि हीच भावना दीर्घकालीन सहकार्य, माहिती पुरवठा, आणि कायद्याचे पालन यांची पायाभरणी करते.

### उद्दिष्टे, संशोधन प्रश्न आणि व्याप्ती

- **उद्दिष्टे**
- स्वातंत्र्योत्तर भारतातील परिवर्तनाच्या टप्प्यांमध्ये पोलीस व्यवस्थेची भूमिका आणि बदलांचा मागोवा घेणे.
- नागरिकविश्वास व पोलीस वैधता यांची मानसशास्त्रीय निर्मिती स्पष्ट करणे.
- 'कायदा-शिस्त' धोरणांचा समाजमन, भीती, वर्तन, आणि सामाजिक सलोख्यावर होणारा परिणाम विश्लेषित करणे.
- प्रमुख आव्हाने (राजकीय हस्तक्षेप, संसाधन तुटवडा, मानवाधिकार प्रश्न, तपासाचा दर्जा, पोलीस कल्याण) आणि उपलब्धी (आधुनिकीकरण, समुदाय पोलीसिंग, मानक-सुधारणा) मांडणे.
- भविष्यातील सुधारणांसाठी मानसशास्त्रीयदृष्ट्या आधारभूत धोरणसूचना देणे.

### संशोधन प्रश्न

- औपनिवेशिक वारसा आणि स्वातंत्र्योत्तर संस्थात्मक बदल यांचा पोलीस संस्कृती/वर्तनावर काय प्रभाव पडतो?
- नागरिकविश्वास वाढविण्यासाठी प्रक्रियात्मक न्याय कसा निर्णायक ठरतो?
- 'कठोर पोलीसिंग'विषयी सामाजिक मागणी कशी तयार होते आणि ती लोकशाही मूल्यांशी कशी संघर्ष करते?
- पोलीस ताण-तणाव, बर्नआउट, आणि कामाचे धोके यांचा निर्णय-क्षमता/वर्तनावर काय परिणाम होतो?
- उत्तरदायित्व/सुधारणा यंत्रणा प्रभावी करण्यासाठी कोणती मानसशास्त्रीय तत्त्वे आवश्यक आहेत?

### व्याप्ती आणि मर्यादा

पोलीस हा राज्य विषय असल्यामुळे राज्यनिहाय फरक मोठे आहेत; हा लेख "राष्ट्रीय-स्तरीय प्रवृत्ती" आणि "सैद्धांतिक/दस्तऐवजी निष्कर्ष" यांवर भर देतो. येथे प्राथमिक क्षेत्रकार्य न करता दुय्यम माहितीवर आधारित संकल्पनात्मक विश्लेषण केले आहे.

### ऐतिहासिक पार्श्वभूमी: वसाहती वारसा ते लोकशाही पोलीसिंग

- **Police Act, 1861 आणि नियंत्रणकेंद्री तर्क**

आधुनिक भारतीय पोलीस व्यवस्थेची मूलरेषा Police Act, 1861 या वसाहती कायद्यात दिसते ज्याचा उद्देश 1857 नंतर नियंत्रण मजबूत करणे, पदानुक्रम आणि आज्ञापालन रचना तयार करणे असा होता. या चौकटीत पोलीसांची "सेवा"पेक्षा "नियंत्रण" भूमिका अधिक ठळक राहिली.

स्वातंत्र्यानंतर संविधानाने मूलभूत हक्क, न्याय्य प्रक्रिया आणि लोकशाही उत्तरदायित्व यांची स्पष्ट बांधिलकी दिली; पण संस्थात्मक मार्गावलंबन (path dependence)मुळे 1861 च्या चौकटीवर अनेक दशके विविध नियम/अधिसूचना जोडल्या जात राहिल्या. याचा मानसशास्त्रीय परिणाम असा की नागरिकांच्या मनात पोलीसांविषयी "भीती" आणि "अंतर" ही प्राथमिक भावना तयार होण्याचा धोका कायम राहिला विशेषतः ज्या समुदायांना ऐतिहासिक दडपशाहीचा अनुभव आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- **सुधारणा मानके: Model Police Act, 2006 आणि “सुधारणा-आर्किटेक्चर”**

Model Police Act, 2006 सारख्या दस्तऐवजांनी पोलीसांना अधिक नागरिकाभिमुख, उत्तरदायी आणि अधिकार-संरक्षणाभिमुख बनविण्याचा उद्देश मांडला. यात तक्रार प्राधिकरण, राज्य सुरक्षा आयोग, आणि आस्थापना मंडळ इत्यादी संस्थात्मक उपाय सुचविलेले दिसतात. यासोबत, गृह मंत्रालयाने वेळोवेळी पोलीस सुधारणा स्थितीबाबत चर्चा/दस्तऐवजी मांडणी केली आहे.

- **सर्वोच्च न्यायालयीन निर्देश: Prakash Singh (2006)**

सर्वोच्च न्यायालयाच्या 2006 मधील निर्देशांनी (Prakash Singh प्रकरण) पोलीस सुधारणा रचनेला दिशा दिली ज्यात राज्य सुरक्षा आयोग, पोलीस आस्थापना मंडळ, पोलीस तक्रार प्राधिकरण, DGP निवड प्रक्रिया/किमान कार्यकाळ, आणि तपास-विभाजनासारख्या घटकांचा समावेश चर्चेत येतो.

**सैद्धांतिक चौकट: मानसशास्त्रीय दृष्टिकोन**

- **प्रक्रियात्मक न्याय आणि वैधता**

Tyler यांच्या प्रक्रियात्मक न्याय चौकटीत (voice, neutrality, respect, trustworthiness) लोक संस्थांचे मूल्यांकन “कशी वागणूक मिळाली” यावरून करतात. न्याय्य प्रक्रिया अनुभवली की संस्थेची वैधता वाढते; वैधता वाढली की लोक स्वेच्छेने सहकार्य करतात आणि “कायदा पाळणे” हे केवळ भीतीने नव्हे, तर नैतिक-मानसिक मान्यतेने घडते.

- **सामाजिक ओळख, पूर्वग्रह आणि “आपण-विरुद्ध-ते”**

पोलीसिंगमध्ये नागरिक अनेकदा समूह-ओळखांच्या चष्म्यातून वाचले जातात (जात/धर्म/वर्ग/लिंग/स्थलांतरित). समूह-श्रेणीकरणामुळे पूर्वग्रह, स्टीरिओटाइपिंग आणि भेदभाव वाढू शकतो. परिणामी “अतिपोलिसींग” (over-policing) आणि “अल्प-संरक्षण” (under-protection) असा अनुभव काही समुदायांना येतो जो विश्वास ढासळवतो आणि सहकार्य कमी करतो.

- **सामूहिक स्मृती/आघात आणि राज्याची प्रतिमा**

औपनिवेशिक दमन, दंगलीतील अनुभव, किंवा कोठडीतील हिंसा यांसारख्या घटना समाजात कथांद्वारे टिकतात; त्या सामूहिक स्मृती “पोलीस म्हणजे संरक्षण” किंवा “पोलीस म्हणजे भीती” अशा भावनिक स्कीमा तयार करतात. त्यामुळे विश्वास उभारणी ही फक्त प्रशासकीय कृती नसून भावनिक-सांस्कृतिक प्रक्रिया आहे.

- **संघटनात्मक संस्कृती, ताण-तणाव, आणि नैतिक विच्छेदन**

पोलीस कामात धोका, अनिश्चितता, आणि सतत निकाल-दाब असतो. संशोधनात पोलीस संस्कृती/वर्किंग पर्सनॅलिटीच्या चर्चेत संशय, अंतर्गत एकजूट आणि बाह्य अलगाव हे घटक वारंवार येतात.

ताण/बर्नआउट वाढल्यास सहानुभूती कमी होणे, चिडचिड, आणि आक्रमक प्रतिसाद वाढण्याची शक्यता असते म्हणूनच पोलीस कल्याण हे “मानव संसाधन” नाही तर “लोकशाही पोलीसिंग”चा घटक आहे.

**संशोधन पद्धती आणि माहिती स्रोत**

हा शोधनिबंध गुणात्मक, दस्तऐवज-आधारित विश्लेषणावर आधारित आहे:

- कायदे/धोरण दस्तऐवज (Police Act, 1861; Model Police Act, 2006; नवीन फौजदारी कायदे)
- सर्वोच्च न्यायालयीन निर्देश (Prakash Singh)
- India Justice Report 2025 (पायाभूत/प्रवृत्ती निर्देशक)
- NHRC Annual Report 2023-24 (कोठडीतील मृत्यू/हिंसा सूचनांची नोंद)
- SPIR 2025 (पोलीस कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनांचा सर्वे)
- पोलीस आधुनिकीकरण संबंधित सरकारी प्रसिद्धीपत्रे/दस्तऐवज

**स्वातंत्र्योत्तर परिवर्तनाचे टप्पे आणि पोलीस व्यवस्थेची उत्क्रांती**

- **1947-1966: राज्यनिर्माण आणि प्रशासनिक सातत्य**

या टप्प्यात संविधान, पुनर्वसन, सीमावाद, आणि विकास कार्यक्रमांमुळे राज्यनिर्माणाची घाई होती. पोलीसांवर स्थैर्य राखण्याचा भार वाढला; पण प्रशिक्षण/पायाभूत सुविधा मर्यादित राहिल्या. परिणामी “आदेश-केंद्रित” शैली टिकण्याचा धोका राहिला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- **1967-1990: राजकीय स्पर्धा, आंदोलने, आणि आणीबाणीचा छाया-परिणाम**

आंदोलने, दंगली, आणि आणीबाणीच्या अनुभवामुळे पोलीस "राजकीय साधन" बनण्याची भीती वाढली. मानसशास्त्रीयदृष्ट्या, या काळातील काही सामूहिक अनुभवांनी राज्य-प्रतिमेत "दंडात्मक सत्ता"चा ठसा निर्माण केला जो पुढील काळातील विश्वासावर प्रभाव टाकतो.

- **1991-2013: उदारीकरण, शहरीकरण, गुन्ह्यांचा बदलता नमुना**

उदारीकरणानंतर आर्थिक गुन्हे, संघटित गुन्हे, आणि सायबर धोके वाढले. तपास-क्षमता, फॉरेन्सिक, आणि डेटा-सिस्टम्सची गरज वाढली. परंतु रिक्त पदे/प्रशिक्षण तुटवडा यांमुळे पोलीस अनेकदा प्रतिक्रियात्मक कामकाजात अडकतात.

- **2014-2025: डिजिटल युग, दृश्यमान उत्तरदायित्व, आणि कायदेशीर संक्रमण**

डिजिटल युगामुळे पोलीस कारवाईचे सार्वजनिक परीक्षण वाढले. India Justice Report 2025 नुसार पोलीस स्टेशनमध्ये CCTV उपलब्धतेत वाढ (आणि 2017 ते 2023 दरम्यान ग्रामीण पोलीस स्टेशन्स कमी होणे/शहरी वाढ) अशी प्रवृत्ती नोंदली आहे. याच टप्प्यात 1 जुलै 2024 पासून नवीन फौजदारी कायदे (BNS/BNSS/BSA) लागू झाले औपनिवेशिक कायद्यांऐवजी "नवीन" चौकट म्हणून. मानसशास्त्रीयदृष्ट्या, कायदे बदलणे हे प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाचे असले तरी नागरिकविश्वास तेव्हाच वाढेल जेव्हा नागरिकांना प्रक्रियात्मक न्यायाचा प्रत्यक्ष अनुभव अधिक सातत्याने मिळेल.

**नागरिकविश्वासाचे मानसशास्त्र: "परिणाम"पेक्षा "प्रक्रिया"**

- **विश्वासाचे घटक**

नागरिकविश्वासात चार घटक निर्णायक ठरतात:

- **कार्यक्षमता (competence):** गुन्हा/तक्रार हाताळण्याची क्षमता
- **सद्भावना (benevolence):** नागरिकहिताची भावना
- **निष्पक्षता/प्रामाणिकपणा (integrity/neutrality):** पक्षपातरहित निर्णय

**आदर (respect):** प्रतिष्ठेने वागणूक

प्रक्रियात्मक न्याय सिद्धांतानुसार हे घटक तक्रार नोंदणी, चौकशी, संवाद, आणि कारणमीमांसा या "मायक्रो-क्षणां"मध्ये तयार होतात.

**तक्रार देण्याची तयारी आणि "विश्वास-कार्यक्षमता" चक्र**

विश्वास वाढला की लोक तक्रार देणे, साक्ष देणे, आणि माहिती पुरवणे अधिक करतात; त्यामुळे तपास क्षमता वाढते आणि गुन्हे नियंत्रण सुधारते. उलट, अविश्वासामुळे under-reporting वाढतो जो पोलीस कार्यक्षमतेलाच कमी करतो. त्यामुळे विश्वास हा "नैतिक मुद्दा" तर आहेच, पण तो "कार्यक्षमता वाढवणारा संसाधन"ही आहे.

**असमानता आणि विश्वासाचे विषम वितरण**

दलित/आदिवासी/अल्पसंख्याक/गरीब/स्थलांतरित समुदायांच्या अनुभवात जर सातत्याने अपमान, विलंब, किंवा भेदभाव जाणवत असेल तर "संस्था माझी नाही" अशी ओळख तयार होते. सामाजिक ओळख सिद्धांतानुसार, अशा अनुभवातून संस्थेविषयी नकारात्मक समूहमन (collective distrust) तयार होते जे एका चांगल्या कृतीने सहज बदलत नाही; सातत्याने न्याय्य प्रक्रिया आणि संवाद आवश्यक असतो.

**तंत्रज्ञान आणि "विश्वास-दृश्यता"**

CCTV/डिजिटल नोंदी विश्वास वाढवू शकतात कारण पडताळणी शक्य होते. पण तंत्रज्ञान हे साधन आहे, पर्याय नाही: योग्य SOP, डेटा संरक्षण, आणि पारदर्शक ऑडिट नसल्यास ते "निगराणीची भीती" वाढवू शकते. IJR 2025 मध्ये CCTV उपलब्धतेतील वाढ नोंदवली आहे, जी उत्तरदायित्वासाठी संधी ठरू शकते.

**पोलीस कर्मचाऱ्यांचे दृष्टिकोन: "व्यवस्था असमान आहे" ही भावना**

SPIR 2025 मध्ये पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये "श्रीमंत आणि शक्तिशाली लोकांना न्याय मिळतो" अशी धारणा मोठ्या प्रमाणावर दिसते; तसेच काही हक्क-संबंधित प्रक्रियांबाबत व्यवहार्यतेविषयी शंका नोंदल्या आहेत. याचा अर्थ नागरिकविश्वासाची चर्चा करताना पोलीस कर्मचाऱ्यांचा "संस्था न्याय" (organizational justice) अनुभवही महत्त्वाचा ठरतो: जर आतूनच व्यवस्था अन्याय्य/दबावग्रस्त वाटली, तर नागरिकांशी प्रक्रियात्मक न्याय दाखवणे अधिक कठीण होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**कायदा-शिस्त, भीती आणि समाजमन: "सुरक्षेचे मनोवैज्ञानिक राजकारण"**

**मोरल पॅनिक, मीडिया, आणि कठोर कारवाईची मागणी**

धक्कादायक गुन्हे, व्हायरल व्हिडिओ, आणि राजकीय भाष्य यांमुळे "जोखीम" वाढून दिसते. समाजात भीती/राग वाढला की "त्वरित न्याय"ची मागणी होते ज्यात कठोर कारवाई लोकप्रिय ठरू शकते. परंतु दीर्घकालीन स्थैर्यासाठी "न्याय्य प्रक्रिया" हीच वैधतेची आणि सहकार्याची अट राहते.

**एन्काउंटर व हिंसा: अंतर्गत संस्कृती आणि शिकण्याजोगा नमुना**

SPIR 2025 मध्ये एन्काउंटरविषयी भूमिका आणि शिक्षणाशी संबंधित फरक नोंदले आहेत, म्हणजे "कठोरता" ही अपरिहार्य नसून प्रशिक्षण/संस्कृती/नेतृत्वावर बदलणारी गोष्ट आहे. मानसशास्त्रीयदृष्ट्या, हिंसा कधी कधी "नैतिक सबबी"ने (greater good) समर्थित होते; पण लोकशाही व्यवस्थेत तो मार्ग विश्वासाचा नाश करतो, आणि दीर्घकालीन गुन्हे नियंत्रणालाही बाधा आणू शकतो (कारण सहकार्य कमी होते).

**जमाव नियंत्रण: प्रतिष्ठा, संवाद आणि निष्पक्षता**

आंदोलने/दंगलीत "आदर" आणि "संवाद" हे तितकेच महत्त्वाचे असतात जितके "अधिकार". अपमानजनक वागणूक समूह-ओळख पेटवू शकते आणि संघर्ष वाढवू शकतो. म्हणून crowd management मध्ये प्रक्रियात्मक न्यायाधारित SOP (पहिले संवाद, स्पष्ट चेतावणी, प्रमाणबद्ध बलप्रयोग, आणि नंतर कारणमीमांसा) हा विश्वास टिकवण्यासाठी आवश्यक आहे.

**नवीन फौजदारी कायदे आणि समाजमन**

BNS/BNSS/BSA लागू झाल्यामुळे काहींसाठी "औपनिवेशिक कायदे गेले" ही न्याय-प्रतिमेची गोष्ट ठरू शकते; तर काहींसाठी नवीन तरतुदी/अंमलबजावणीची भीती वाढू शकते. म्हणून कायद्यांच्या अंमलबजावणीत नागरिक शिक्षण, पारदर्शकता, आणि हक्कांबाबत स्पष्ट संवाद आवश्यक आहे.

**प्रमुख आव्हाने: संरचना, संस्कृती, आणि उत्तरदायित्व**

**राजकीय हस्तक्षेप आणि संस्थात्मक स्वायत्तता**

Prakash Singh निर्देशांचा हेतू राजकीय हस्तक्षेप कमी करून व्यावसायिक स्वायत्तता आणि उत्तरदायित्व वाढवणे हा आहे. हस्तक्षेप वाढला की पोलीस "सेवा"ऐवजी "सत्ता"शी संलग्न भासतात, आणि वैधता घसरते.

**संसाधन तुटवडा, पोलीस स्टेशन नेटवर्क, आणि "वेळेचा ताण"**

IJR 2025 नुसार 2017 ते 2023 या कालावधीत ग्रामीण पोलीस स्टेशन्स कमी होण्याची प्रवृत्ती नोंदली आहे. यामुळे ग्रामीण सेवा-पहुंच, प्रतिसाद वेळ, आणि विश्वासावर परिणाम होऊ शकतो. संसाधन तुटवड्याचा मानसशास्त्रीय परिणाम म्हणजे "वेळेचा ताण": तक्रारदाराला ऐकून घेणे, कारणमीमांसा देणे, आणि निष्पक्ष प्रक्रिया पाळणे या गोष्टींना वेळ लागतो तो वेळ/मनःस्थिती नसली की प्रक्रियात्मक न्याय ढासळतो.

**तपासाचा दर्जा, कबुलीजबाब-आधारित प्रवृत्ती, आणि फॉरेन्सिक**

SPIR 2025 मध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या काही दृष्टिकोनांमधून कबुलीजबाब-आधारित तपासाला महत्त्व दिल्याचे संकेत दिसतात. पुरावा-आधारित तपास, फॉरेन्सिक, आणि डिजिटल पुरावा हाताळणी यांचे व्यावसायिकीकरण हा येथे केंद्रस्थानी मुद्दा आहे.

**कोठडीतील हिंसा/मृत्यू आणि विश्वासाचा ऱ्हास**

DK Basu मार्गदर्शक तत्त्वे अटक/कोठडीतील किमान हक्क मानके ठरवतात. तरीही NHRC च्या वार्षिक अहवालानुसार 2023-24 मध्ये पोलिस कोठडीत मृत्यूंबाबत 160 नवीन सूचना मिळाल्याचे नमूद आहे. अशा घटनांचा समाजमनावर प्रभाव "भीती" आणि "अन्याय" या भावनांद्वारे होतो आणि तो वैधतेला थेट धक्का देतो. उत्तरदायित्व स्वतंत्र, पारदर्शक, आणि वेळबद्ध असेल तरच विश्वास पुनर्बांधता येतो.

**पोलीस कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य**

पोलीसांमध्ये ताण/बर्नआउटवरील भारतीय संदर्भातील अभ्यास उपलब्ध आहेत. ताण वाढला की सहानुभूती कमी होणे, प्रतिक्रिया-आक्रमकता, आणि निर्णयातील चुका वाढतात म्हणून "पोलीस कल्याण" हा नागरिकविश्वासाचा अप्रत्यक्ष पण निर्णायक घटक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**उपलब्धी आणि सकारात्मक संक्रमण**

- **सुधारणा-मानके आणि सार्वजनिक चर्चा**

Model Police Act 2006 आणि Prakash Singh निर्देशांमुळे "सुधारणा-आर्किटेक्चर" स्पष्ट झाले. अंमलबजावणी मिश्र असली तरी मानके स्पष्ट झाल्यामुळे उत्तरदायित्वाची सार्वजनिक अपेक्षा वाढली.

- **आधुनिकीकरण: MPF आणि MHA संरचना**

2017 मध्ये केंद्र सरकारने Modernisation of Police Forces (MPF) योजनेसाठी 2017-18 ते 2019-20 या कालावधीसाठी मोठ्या आर्थिक तरतुदी व वैशिष्ट्ये जाहीर केल्याचे PIB प्रसिद्धीपत्रात दिसते (उदा., mobility, weapons, wireless, CCTNS, e-prison, forensics).

गृह मंत्रालयाच्या Police Modernisation Division च्या कामकाजात राज्य पोलीस आधुनिकीकरण, police reforms इत्यादी विषय समाविष्ट असल्याचेही दिसते.

**समुदाय पोलीसिंग उपक्रम**

Janamaithri Suraksha (Kerala) सारखी उदाहरणे भारतात समुदाय पोलीसिंगची दिशा दाखवतात. मानसशास्त्रीय लाभ: परस्पर संपर्कातून पूर्वग्रह कमी होणे, माहिती प्रवाह वाढणे, आणि "पोलीस - भागीदार" ही ओळख तयार होणे.

**भविष्यातील वाटचाल: मानसशास्त्रीयदृष्ट्या आधारभूत सुधारणा आराखडा**
**संस्थात्मक-रचनात्मक सुधारणा**

- **वसाहती चौकटीतून बाहेर पडणे:** Police Act 1861 च्या नियंत्रणकेंद्री वारशाऐवजी सेवा-आणि-हक्क आधारित राज्य-कायदे (Model Police Act मार्गदर्शक म्हणून).
- **स्वायत्तता + उत्तरदायित्व:** State Security Commission/PEB/PCA यांची प्रभावी रचना व सार्वजनिक अहवाल पद्धती (Prakash Singh निर्देशांच्या हेतूस अनुरूप).
- **तपास विभाजन आणि व्यावसायिकीकरण:** तपासासाठी स्वतंत्र पथके, करिअर-ट्रॅक, फॉरेन्सिक/सायबर कौशल्य, आणि अभियोजन समन्वय.

**व्यावसायिक-मानवी सुधारणा**

- **प्रक्रियात्मक न्याय प्रशिक्षण:** voice-neutrality-respect-trustworthiness हे चार स्तंभ "कामगिरी मूल्यांकनात" समाविष्ट करणे.
- **नेतृत्व आणि संस्कृती बदल:** "कसे साध्य केले" हे "काय साध्य केले"इतकेच महत्त्वाचे.
- **मानसिक आरोग्य/कल्याण:** शिफ्ट नियोजन, काउन्सेलिंग, कुटुंब सहाय्य, आणि व्यावसायिक धोके कमी करण्यासाठी आरोग्य उपाय.
- **विविधता आणि समावेशन:** महिला/विविध सामाजिक गट प्रतिनिधित्व, संवेदनशीलता, आणि भेदभाव प्रतिबंध यंत्रणा.

**तंत्रज्ञान-शासन आणि समुदाय-शासन**

1. **CCTV/Body-cam governance:** SOP, डेटा संरक्षण, स्वतंत्र ऑडिट. (IJR 2025 मध्ये CCTV उपलब्धतेतील वाढ ही संधी ठरू शकते.)
2. **डेटा-आधारित पोलीसिंगची नैतिकता:** गोपनीयता, अल्गोरिदमिक पूर्वग्रह टाळणे, आणि पारदर्शकता.
3. **समुदाय सहउत्पादन:** बीट-स्तर संवाद, नागरिक समित्या, शाळा-समन्वय, आणि समस्या-आधारित पोलीसिंग.

**मापन: "विश्वास निर्देशांक"**

गुन्हे-दर/दोषसिद्धीबरोबर "नागरिक अनुभव" निर्देशक मोजणे: FIR सुलभता, प्रतिसाद वेळ, तक्रार समाधान, आदरयुक्त वागणूक, आणि प्रक्रियात्मक न्याय अनुभव.

**निष्कर्ष**

स्वातंत्र्योत्तर भारतातील परिवर्तनाचा प्रवास हा संस्थात्मक आणि मानसशास्त्रीय दोन्ही पातळ्यांवर समजून घ्यावा लागतो. पोलीस व्यवस्था ही या प्रवासातील केंद्रस्थानी असलेली संस्था आहे जी नागरिकांना सुरक्षा देते, पण तिच्याच वर्तनातून राज्याची वैधता दृढ किंवा कमजोर होते. औपनिवेशिक वारसा, राजकीय हस्तक्षेप, संसाधन तुटवडा, आणि कोठडीतील हिंसा/उत्तरदायित्वातील अपुऱ्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

यंत्रणा यांमुळे विश्वास ढासळतो; तर मानक-सुधारणा, आधुनिकीकरण, समुदाय पोलीसिंग आणि पारदर्शकता वाढली तर विश्वासाची पुनर्बांधणी शक्य होते. या लेखाचा मुख्य निष्कर्ष असा की प्रक्रियात्मक न्याय हा सुरक्षितता आणि हक्क यांच्यातील सर्वात प्रभावी मानसशास्त्रीय पूल आहे. न्याय्य प्रक्रिया असेल तर वैधता वाढते; वैधता वाढली की स्वेच्छा सहकार्य वाढते; आणि सहकार्य वाढले की प्रत्यक्ष गुन्हे नियंत्रण क्षमता सुधारते हे एक टिकाऊ “विश्वास-कार्यक्षमता” चक्र आहे.

**संदर्भ सूची**

1. Government of India. The Police Act, 1861 (Act 5 of 1861).
2. Government of India. Model Police Act, 2006.
3. PRS Legislative Research. Police Reforms – Overview and Supreme Court directives (Prakash Singh, 2006).
4. India Justice Report 2025. National Press Release / Key Findings (police stations, CCTV, rural vs urban police stations).
5. National Human Rights Commission (NHRC). Annual Report 2023-24 (custodial deaths intimations).
6. Common Cause & Lokniti-CSDS. Status of Policing in India Report 2025.
7. Press Information Bureau (MHA). Modernisation of Police Forces (MPF) scheme (2017-18 to 2019-20).
8. Ministry of Home Affairs. Police Modernisation Division (role/updates).
9. Reuters/PIB/Official summaries on BNS/BNSS/BSA coming into force from 1 July 2024.
10. Tyler, T.R. (2015). Procedural Justice, Legitimacy, and Effective Law Enforcement (PSPI).

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# समाज माध्यमांचा राजकीय प्रक्रियेवर होणारा प्रभाव : भारतीय लोकशाहीचा अभ्यास

**प्रा. डॉ. अतुल पद्माकर खोसे**
एच. आर. पटेल कला व विज्ञान महाविद्यालय शिरपूर जि. धुळे

**Manuscript ID**:
JRD -2026-180114
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 66-69
January 2026

***सारांश (Abstract):***

*एकविसाव्या शतकात माहिती व संवाद तंत्रज्ञानाने मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. या परिवर्तनाचा सर्वाधिक प्रभाव समाज माध्यमांच्या स्वरूपात दिसून येतो. समाज माध्यमे केवळ मनोरंजन किंवा वैयक्तिक संवादाचे साधन न राहता, ती सामाजिक, सांस्कृतिक तसेच राजकीय व्यवहारांची महत्त्वाची व्यासपीठे बनली आहेत. विशेषतः राजकारणाच्या क्षेत्रात समाज माध्यमांनी पारंपरिक राजकीय संवादाची रचना बदलून टाकली आहे. पूर्वी राजकीय माहिती वृत्तपत्रे, रेडिओ आणि दूरदर्शन या माध्यमांतून नियंत्रित स्वरूपात जनतेपर्यंत पोहोचत असे. परंतु समाज माध्यमांच्या उदयानंतर राजकीय संवाद अधिक खुला, वेगवान आणि द्विमार्गी झाला आहे. नागरिक, राजकीय नेते, पक्ष, कार्यकर्ते आणि माध्यम संस्था यांच्यात थेट संवाद शक्य झाला आहे. या पार्श्वभूमीवर समाज माध्यमे आणि राजकारण यांच्यातील संबंधांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधन लेखात समाज माध्यमांचा राजकीय प्रक्रियेवर होणारा प्रभाव भारतीय लोकशाहीच्या संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *संशोधन, विश्लेषण, विकास, सामाजिक बदल, आर्थिक प्रगती, शैक्षणिक सुधारणा, तांत्रिक नवोन्मेष, धोरणनिर्मिती, प्रशासन, शाश्वत विकास*

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

**प्रस्तावना**

२१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात समाज माध्यमांचा उदय ही केवळ तांत्रिक क्रांती नव्हती, तर मानवी संवादाच्या स्वरूपात आलेली आमूलाग्र बदल होती. वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी आणि रेडिओ यांसारख्या पारंपरिक माध्यमांनी दशकानुदशके माहितीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवले, तर समाज माध्यमांनी प्रत्येक नागरिकाला संवाद साधणारा, प्रतिक्रिया देणारा आणि स्वतःचे मत मांडणारा व्यासपीठ उपलब्ध करून दिला. भारतासारख्या विशाल लोकशाहीत हा बदल अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. जिथे अब्जावधी नागरिक विविध भाषा, संस्कृती आणि विचारधारा धारण करतात, तिथे समाज माध्यमांनी राजकीय संवादाची व्याप्ती अभूतपूर्व पातळीवर नेली आहे. राजकारण आणि माध्यमे यांचे नाते नवीन नाही. तथापि, समाज माध्यमांनी या नात्याला जी गतिशीलता आणि तीव्रता दिली आहे, ती अपूर्व आहे. नेते आणि जनता यांच्यातील अंतर कमी झाले आहे. मतदार आता केवळ ऐकणारे नाहीत, तर सक्रिय सहभागी बनले आहेत. हा संशोधन लेख समाज माध्यमांच्या या बहुआयामी प्रभावाचा भारतीय लोकशाहीच्या संदर्भात गहन अभ्यास करतो. यात राजकीय प्रक्रियांवरील सकारात्मक परिणाम, निर्माण झालेल्या आव्हानांची चाचपणी आणि लोकशाही मूल्यांसाठी उपलब्ध झालेल्या संधी-धोक्यांचे संतुलित विश्लेषण सादर केले आहे.

**समाज माध्यमांची संकल्पना व स्वरूप**

समाज माध्यमे ही अशी डिजिटल व्यासपीठे आहेत जी वापरकर्त्यांना स्वतःची सामग्री निर्माण करण्याची, त्याची सहभागिता करण्याची आणि परस्परसंवाद साधण्याची संधी देतात. पारंपरिक माध्यमांमध्ये माहितीचा प्रवाह एकेरी दिशेने असतो, तर समाज माध्यमांमध्ये द्विमार्गी संवाद शक्य होतो. फेसबुक, एक्स, यूट्यूब, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम अशा विविध व्यासपीठांनी आपापल्या वैशिष्ट्यांनुसार राजकीय संवादाला वेगवेगळे आयाम दिले आहेत.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. अतुल पद्माकर खोसे, एच. आर. पटेल कला व विज्ञान महाविद्यालय शिरपूर जि. धुळे*

**How to cite this article:**
*खोसे, . अतुल . पद्माकर . (2026). समाज माध्यमांचा राजकीय प्रक्रियेवर होणारा प्रभाव : भारतीय लोकशाहीचा अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(IV)), 66–69. https://doi.org/10.5281/zenodo.18169400*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169400
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

फेसबुक हे व्यक्तिगत मते, गट चर्चा आणि कार्यक्रम आयोजनासाठी लोकप्रिय असताना, एक्सवर त्वरित प्रतिक्रिया आणि चर्चा रंगतात. यूट्यूबवर दृश्यश्राव्य सामग्रीद्वारे तपशीलवार विवेचन शक्य होते, तर व्हॉट्सअॅपच्या गट संवादातून माहिती झपाट्याने पसरते. इन्स्टाग्रामवर दृश्य माध्यमांद्वारे राजकीय प्रतिमा घडवली जाते. या प्रत्येक व्यासपीठाची तांत्रिक रचना आणि वापरकर्त्यांचे वर्तन वेगळे असले तरी, त्या सर्वांचे एक सामान्य वैशिष्ट्य म्हणजे माहितीचा वेग आणि व्याप्ती. समाज माध्यमांची मूलभूत वैशिष्ट्ये म्हणजे तात्काळिकता, परस्परसंवाद, सामग्रीची सहभागिता आणि मुक्त अभिव्यक्तीची संधी. कोणत्याही नागरिकाकडे आता प्रकाशक बनण्याची क्षमता आहे. हे लोकशाही सशक्तीकरणाचे साधन असू शकते, परंतु त्याचवेळी गैरसमजुतींचा प्रसार करणारे साधन देखील बनू शकते.

**राजकारणाची बदलती रचना आणि डिजिटल माध्यमे**

आधुनिक राजकारण हे केवळ संसदीय वादविवाद आणि निवडणूक रॅलींपुरते मर्यादित राहिलेले नाही. डिजिटल तंत्रज्ञानाच्या आगमनाने राजकीय संवादाची रूपे बदलली आहेत. राजकीय पक्ष आणि नेते आता दूरचित्रवाणीच्या वृत्तभाष्यकारांवर किंवा वृत्तपत्रांच्या संपादकांवर अवलंबून नाहीत. त्यांच्याकडे आता स्वतःचे डिजिटल व्यासपीठ आहे, जिथे ते आपले विचार अप्रत्यक्षपणे लाखो-कोट्यवधी नागरिकांपर्यंत पोहोचवू शकतात. निवडणूक प्रचाराचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे. पूर्वी मोठमोठ्या सभांद्वारे आणि घरोघरी जाऊन केलेला प्रचार आता डिजिटल जाहिरातींनी, व्हिडिओ संदेशांनी आणि संवादात्मक पोस्ट्सनी पूरक झाला आहे. राजकीय प्रतिमा निर्माण करण्याच्या प्रक्रियेत समाज माध्यमांची भूमिका केंद्रस्थानी आली आहे. एखाद्या नेत्याचा एकच ट्विट किंवा व्हिडिओ काही तासांत व्हायरल होऊन जनमानसावर प्रभाव टाकू शकतो. जनतेशी थेट संवाद साधण्याची संधी यामुळे उपलब्ध झाली आहे. नेते आता मध्यस्थांशिवाय आपल्या अनुयायांशी संवाद साधू शकतात, त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेऊ शकतात आणि आपले धोरण अथवा विधाने त्यानुसार मांडू शकतात. या बदलामुळे राजकीय संवादाची गतिशीलता वाढली आहे, परंतु त्याचवेळी माहितीच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

**समाज माध्यमे आणि राजकीय जनमत निर्मिती**

जनमत निर्मितीची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असते. समाज माध्यमे या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. विशिष्ट मुद्दे किंवा घटना कशा रीतीने मांडल्या जातात, त्यांना किती वेळा पुनरावृत्ती केली जाते आणि त्यांची चर्चा कोणत्या स्वरूपात होते, यावर जनमताचा आकार अवलंबून असतो. ट्रेंडिंग हॅशटॅग्स, व्हायरल पोस्ट्स आणि ऑनलाइन मोहिमा या सर्वांचा एकत्रित परिणाम मतदारांच्या विचारसरणीवर होतो. समाज माध्यमांवर सामग्री कशी प्रसारित होते हे त्याच्या लोकप्रियतेवर अवलंबून असते. आवडी, सहभागिता आणि टिप्पण्या यांच्या आधारे विशिष्ट मुद्दे अधिक दृश्यमान होतात. यामुळे काही वेळा महत्त्वपूर्ण परंतु कमी लोकप्रिय मुद्दे दुर्लक्षित होतात, तर तुलनेने क्षुल्लक परंतु भावनिक मुद्दे मोठी चर्चा निर्माण करतात. सार्वजनिक चर्चेची दिशा नियोजितपणे किंवा नैसर्गिकपणे बदलली जाऊ शकते. राजकीय पक्ष आणि विचारगट समाज माध्यमांवरील चर्चेला आकार देण्यासाठी सुसंघटित प्रयत्न करतात. विशिष्ट हॅशटॅग्स चालवणे, समर्थक गटांमार्फत सामग्री पसरवणे आणि विरोधकांवर टीका करणे या सर्व गोष्टी नियोजित स्वरूपात घडतात. यामुळे नैसर्गिक जनमत आणि निर्मित जनमत यांतील फरक ओळखणे कठीण होत जाते.

**निवडणूक प्रक्रिया आणि समाज माध्यमे**

निवडणुकांच्या काळात समाज माध्यमांचा वापर चरम मर्यादेला पोहोचतो. राजकीय पक्ष डिजिटल प्रचारावर मोठमोठी रक्कम खर्च करतात. डेटा विश्लेषणाच्या आधारे लक्षित मतदारांना विशिष्ट संदेश पोहोचवले जातात. व्हिडिओ जाहिराती, इन्फोग्राफिक्स, आभासी सभा आणि संवादात्मक चर्चा मंच यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. भारतातील निवडणुकांमध्ये समाज माध्यमांचा वापर वेगाने वाढला आहे. २०१४ आणि २०२५ च्या लोकसभा निवडणुकांत डिजिटल प्रचाराने पारंपरिक प्रचाराला पूरक म्हणून काम केले. राजकीय पक्षांनी सोशल मीडिया सेल स्थापन केले, ज्यांचे काम दररोज अनेक पोस्ट्स प्रकाशित करणे, विरोधी पक्षांच्या विधानांना प्रतिसाद देणे आणि आपल्या पक्षाची प्रतिमा सकारात्मक ठेवणे असे आहे. लक्षित जाहिराती हे समाज माध्यमांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. विशिष्ट भौगोलिक क्षेत्र, वयोगट, व्यवसाय किंवा आवडीनिवडींच्या आधारे मतदारांना वेगवेगळे संदेश पाठवले जातात. यामुळे प्रचाराची परिणामकारकता वाढते, परंतु याच तंत्रज्ञानाचा वापर भ्रामक माहिती पसरवण्यासाठी देखील होऊ शकतो. मायक्रो-टार्गेटिंग या पद्धतीमुळे वेगवेगळया गटांना वेगवेगळी माहिती देऊन त्यांच्या मते प्रभावित करणे शक्य झाले आहे.

**समाज माध्यमे : लोकशाहीसाठी संधी**

समाज माध्यमांनी लोकशाहीला अनेक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्वात महत्त्वाची संधी म्हणजे नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे. पूर्वी राजकीय चर्चा मर्यादित वर्तुळापुरती मर्यादित होती, आता प्रत्येक नागरिक आपले विचार मांडू शकतो, धोरणांवर प्रश्न विचारू शकतो आणि सत्ताधाऱ्यांना जबाबदार धरू शकतो. वंचित आणि दुर्लक्षित घटकांना समाज माध्यमांनी व्यासपीठ दिले आहे. स्त्रिया, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि इतर अनेक समुदाय आता आपल्या समस्या सार्वजनिक मंचावर मांडू शकतात. पारंपरिक माध्यमांमध्ये ज्यांना प्रतिनिधित्व मिळत नव्हते, त्यांना आता स्वतःचा आवाज उंचावण्याची संधी मिळाली आहे. या अर्थाने समाज माध्यमे लोकशाही समावेशकतेला चालना देतात. सत्ताधाऱ्यांवर टीका करण्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रक्रिया सुलभ झाली आहे. भ्रष्टाचार, अन्याय किंवा नागरी हक्कांचे उल्लंघन या मुद्द्यांवर त्वरित प्रतिक्रिया व्यक्त होते. अनेक वेळा या प्रतिक्रियांमुळे सामाजिक चळवळींना चालना मिळते आणि शासनाला आपली भूमिका पुनर्विचार करावी लागते. समाज माध्यमांनी पारदर्शकता आणि जबाबदारीसाठी नवीन मार्ग खुले केले आहेत. माहितीचा लोकशाहीकरण झाल्याने सामान्य नागरिकांना राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. धोरणांबाबत चर्चा, शासकीय निर्णयांचे विश्लेषण आणि वैकल्पिक दृष्टिकोन मांडणे हे सर्व आता सर्वसामान्यांना शक्य झाले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**समाज माध्यमे : राजकारणातील आव्हाने आणि धोके**

समाज माध्यमांच्या संधींबरोबरच गंभीर आव्हाने आणि धोके देखील निर्माण झाले आहेत. खोटी माहिती आणि अफवा पसरवणे ही सर्वात मोठी समस्या आहे. समाज माध्यमांवर कोणतीही माहिती प्रकाशित करण्यासाठी प्रमाणीकरणाची आवश्यकता नसल्याने दिशाभूल करणारी सामग्री मोठ्या प्रमाणावर पसरते. भारतातील अनेक घटनांमध्ये खोट्या बातम्यांमुळे सांप्रदायिक तणाव, हिंसाचार आणि सामाजिक अशांतता निर्माण झाली आहे. द्वेषपूर्ण भाषण आणि विभाजनकारी प्रवचन यांचा समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर वापर होतो. धर्म, जात, भाषा आणि प्रदेश यांच्या आधारे समाजाचे ध्रुवीकरण करणारी सामग्री जाणीवपूर्वक पसरवली जाते. यामुळे सामाजिक एकात्मता धोक्यात येते आणि लोकशाही मूल्यांना धक्का बसतो. समाज माध्यमांच्या प्रतिध्वनी कक्षात व्यक्ती केवळ आपल्याच विचारांच्या लोकांशी संपर्कात राहते, ज्यामुळे पूर्वग्रह बळकट होतात. सायबर प्रचार आणि बॉट्सचा वापर करून कृत्रिम जनमत तयार केले जाते. हजारो खोटी ओळख निर्माण करून विशिष्ट मुद्द्यांवर प्रचंड चर्चा असल्याचा आभास निर्माण केला जातो. या तंत्रज्ञानाचा वापर विरोधी पक्षांना बदनाम करण्यासाठी, त्यांच्या विधानांना विकृत स्वरूपात मांडण्यासाठी आणि आपल्या पक्षाची प्रतिमा उजळवण्यासाठी केला जातो. खाजगीपणाचा भंग आणि डेटा गैरवापर हे देखील महत्त्वाचे धोके आहेत. राजकीय पक्ष आणि गट मतदारांचा वैयक्तिक डेटा गोळा करून त्यांच्या वर्तनाचा अभ्यास करतात आणि त्यानुसार त्यांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात. याचा लोकशाही प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर विपरित परिणाम होतो.

**भारतातील समाज माध्यमे आणि राजकारण : अभ्यासात्मक दृष्टिकोन**

भारतीय संदर्भात समाज माध्यमांचा प्रभाव अत्यंत विविधतापूर्ण आहे. भारतीय समाजाची बहुभाषिकता, विविध सांस्कृतिक परंपरा आणि क्षेत्रीय विविधता यामुळे समाज माध्यमांचा वापर देखील वेगळ्या स्वरूपात होतो. व्हॉट्सअॅप हे भारतात सर्वाधिक वापरले जाणारे व्यासपीठ आहे आणि राजकीय संदेश पसरवण्याचे हे प्रमुख साधन बनले आहे. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी चळवळीत समाज माध्यमांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या चळवळीला देशभर पाठिंबा मिळवून देण्यात फेसबुक आणि ट्विटरचा मोलाचा वाटा होता. तसेच, नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात झालेल्या आंदोलनांमध्ये देखील समाज माध्यमांचा मोठा वापर झाला. निदर्शने आयोजित करण्यासाठी, आंदोलकांमध्ये समन्वय साधण्यासाठी आणि आपला संदेश व्यापक जनसमुदायापर्यंत पोहोचवण्यासाठी डिजिटल व्यासपीठांचा उपयोग झाला. परंतु याच समाज माध्यमांचा वापर सांप्रदायिक हिंसा भडकवण्यासाठी देखील झाला आहे. मुसलमानांविरुद्ध तयार केलेले व्हिडिओ, खोटी बातमी आणि द्वेषपूर्ण सामग्री पसरवून समाजात तणाव निर्माण केला गेला आहे. कोरोना महामारीच्या काळात देखील समाज माध्यमांवर पसरलेल्या अफवांमुळे सामाजिक विद्वेष वाढला. भारतातील निवडणूक आयोगाने डिजिटल प्रचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. तथापि, या नियमांची अंमलबजावणी करणे अत्यंत आव्हानात्मक आहे. समाज माध्यमांच्या जागतिक स्वरूपामुळे राष्ट्रीय कायद्यांची परिणामकारकता मर्यादित राहते.

**निष्कर्ष**

समाज माध्यमे आणि राजकारण यांच्यातील परस्परसंबंध अत्यंत गुंतागुंतीचा आहे. एकीकडे समाज माध्यमांनी लोकशाही सहभागाला चालना दिली आहे, नागरिकांना सशक्त केले आहे आणि सत्तेला जबाबदार ठेवण्याची नवी साधने उपलब्ध करून दिली आहेत. दुसरीकडे खोटी माहिती, द्वेषयुक्त भाषण, ध्रुवीकरण आणि सायबर प्रचार यांसारख्या गंभीर समस्यांनी लोकशाही मूल्यांनाच धोका निर्माण केला आहे. भारतीय लोकशाहीच्या संदर्भात हे अधिक महत्त्वाचे बनते. विशाल लोकसंख्या, विविधता आणि डिजिटल माध्यमांचा वेगाने होणारा प्रसार या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे समाज माध्यमांची भूमिका निर्णायक होत चालली आहे. सकारात्मक संधींचा उपयोग करताना धोक्यांविषयी जागरूक राहणे आवश्यक आहे. भविष्यात समाज माध्यमांवर नियंत्रण आणि नियमन यांबाबत सर्वसमावेशक धोरण आवश्यक आहे. हे धोरण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करताना खोटी माहिती आणि द्वेषयुक्त भाषणाला आळा घालेल अशी अपेक्षा आहे. डिजिटल साक्षरता वाढवणे, तथ्यतपासणीच्या यंत्रणा मजबूत करणे आणि व्यासपीठ कंपन्यांची जबाबदारी निश्चित करणे या उपाययोजना आवश्यक आहेत. समाज माध्यमे ही तटस्थ साधने आहेत. त्यांचा वापर लोकशाही मजबूत करण्यासाठी किंवा त्याला कमकुवत करण्यासाठी केला जाऊ शकतो. भारतीय लोकशाहीला या आव्हानाला तोंड देण्यासाठी सजग नागरिक, जबाबदार राजकीय नेतृत्व आणि परिणामकारक नियामक यंत्रणा यांची गरज आहे. समाज माध्यमे आणि राजकारण यांच्यातील संबंध अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी आहेत. समाज माध्यमांनी राजकीय संवाद लोकाभिमुख केला असला, तरी त्याचबरोबर नवीन आव्हानेही निर्माण केली आहेत. लोकशाहीच्या सुदृढतेसाठी समाज माध्यमांचा वापर विवेकपूर्ण, नैतिक आणि जबाबदारीने होणे आवश्यक आहे. भविष्यात समाज माध्यमे राजकारणावर अधिक प्रभाव टाकणार हे निश्चित आहे. त्यामुळे या माध्यमांचे नियमन, माध्यम साक्षरता आणि नागरिकांची जागरूकता वाढवणे, ही लोकशाहीच्या हितासाठी अत्यावश्यक बाब ठरते.

**संदर्भ**

1. कस्तूरीरंगन, एम. (२०२०). डिजिटल भारत आणि राजकीय परिवर्तन. नवी दिल्ली: सेज पब्लिकेशन्स.
2. देशपांडे, सुधीर. (२०१९). सोशल मीडिया आणि भारतीय निवडणूक. मुंबई: लोकवाणी प्रकाशन.
3. पाटील, रमेश. (२०२१). "समाज माध्यमे आणि राजकीय संवाद: एक विश्लेषण." भारतीय समाजशास्त्र संशोधन, खंड ४३, अंक २, पृष्ठ १२३-१४८.
4. भारतीय निवडणूक आयोग. (२०२२). डिजिटल प्रचारावरील मार्गदर्शक सूचना. नवी दिल्ली: निवडणूक आयोग प्रकाशन.
5. राजपुत, अनिता. (२०१८). "व्हॉट्सअॅप आणि राजकीय माहितीचा प्रसार." संप्रेषण अभ्यास, खंड १५, अंक ३, पृष्ठ ८९-११२.
6. सामंत, विजय. (२०२३). लोकशाही आणि डिजिटल युग. पुणे: मेहता प्रकाशन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

7. शर्मा, राकेश व देशमुख, प्रिया. (२०२०). "सायबर प्रचार आणि भारतीय राजकारण." राजकीय अभ्यास त्रैमासिक, खंड ५२, अंक १, पृष्ठ ४५-७०.
8. सिंह, अमरेंद्र. (२०१९). भारतातील सोशल मीडिया: प्रवाह आणि प्रभाव. दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# समाज परिवर्तनामध्ये प्रसारमाध्यमांचा आदिवासी महिला व त्यांच्या जीवनावर होणारा प्रभाव: एक अभ्यास

**रूपाली सोपान सपकाळ[1], प्रा. डॉ. दिलीप राजाराम चव्हाण[2]**
[1]संशोधक विद्यार्थी
[2]मार्गदर्शक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, ज. जी. म. वि. प्र. सह समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**Manuscript ID**:
JRD -2026-180115
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 70-76
January 2026

***सारांश (Abstract):***

*प्रसारमाध्यमांचा आदिवासी महिलांच्या जीवनावर होणारा परिणाम हा आधुनिक सामाजिक परिवर्तनातील एक महत्त्वाचा विषय आहे. दूरदर्शन, रेडिओ, मोबाईल व इंटरनेटसारख्या माध्यमांमुळे आदिवासी महिलांमध्ये शिक्षण, आरोग्य-जागरूकता, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक सहभाग वाढला आहे. शासनाच्या योजना, हक्क आणि संधींबद्दलची माहिती उपलब्ध झाल्याने त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत. तथापि, सोशल मीडियावरील चुकीची माहिती, सायबर-सुरक्षेचे धोके, अवास्तव जीवनशैलीचे आकर्षण आणि सांस्कृतिक मूल्यांवरील परिणाम ही नकारात्मक बाजूही प्रकर्षाने दिसून येते. पारंपरिक ओळख आणि आधुनिकतेतील संघर्षामुळे काही सामाजिक व मानसिक समस्याही वाढू शकतात. त्यामुळे प्रसारमाध्यमांच्या वापराबाबत जागरूकता, माध्यम साक्षरता आणि सुरक्षित इंटरनेट शिक्षण यांची गरज अधोरेखित होते. एकूणच, प्रसारमाध्यमे आदिवासी महिलांसाठी प्रगतीची संधी निर्माण करत असली तरी त्याचा उपयोग संतुलित, मार्गदर्शित आणि सजगपणे करण्याची आवश्यकता आहे.*

***मुख्यशब्द:*** *संशोधन, विश्लेषण, विकास, सामाजिक बदल, आर्थिक घटक, शैक्षणिक प्रगती, तांत्रिक नवोन्मेष, धोरणनिर्मिती, प्रशासन, शाश्वत विकास*

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

## प्रस्तावना

भारतामधील आदिवासी समाज हा पारंपारिक, सांस्कृतिक वारसा जपणारा आणि भौगोलिकदृष्ट्या काही प्रमाणात मुख्य प्रवाहापासून दूर असलेला समाज आहे. विशेषतः आदिवासी महिला या समाजातील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक आधारस्तंभ मानल्या जातात. आधुनिक काळात टीव्ही, मोबाईल, रेडिओ, वृत्तपत्रे आणि सोशल मीडिया यासारखी प्रसार माध्यमे समाज परिवर्तनाची महत्त्वपूर्ण साधने ठरली आहेत. आजच्या युगात प्रसार माध्यमे ही समाजाचा चौथा आधारस्तंभ मानला जात असून माहिती, संवाद, शिक्षण, संस्कृती व मनोरंजन यांचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण काम माध्यमांद्वारे केली जाते. आज आदिवासी भागात मोबाईल नेटवर्क विस्तार, शासकीय योजना, शिक्षणातील वाढ आणि डिजिटल साक्षरतेमुळे महिलांमध्ये प्रसारमाध्यमांचा वापर वाढलेला दिसतो. आदिवासी भागांमध्ये आरोग्य विषयक समस्या जसे की कुपोषण, एनिमिया, लसीकरणाचा अभाव, माता व बालकांचे आरोग्य व स्वच्छता याबाबतीत मागासलेपणा दिसून येतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*रूपाली सोपान सपकाळ,संशोधक विद्यार्थी*

**How to cite this article:**
*सपकाळ, . रूपाली . सोपान ., & चव्हाण, . दिलीप . राजाराम . (2026). समाज परिवर्तनामध्ये प्रसारमाध्यमांचा आदिवासी महिला व त्यांच्या जीवनावर होणारा प्रभाव: एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(IV)), 70–76.* https://doi.org/10.5281/zenodo.18169430

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18169430

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

पूर्वी आरोग्य विषयक माहिती प्रामुख्याने आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका किंवा ग्रामसभा द्वारे दिली जात असे. परंतु गेल्या काही वर्षात मोबाईल फोन, इंटरनेट, टीव्ही, रेडिओ व सोशल मीडिया यांचा प्रसार वाढल्यामुळे आरोग्य विषयक माहिती आदिवासी महिलांपर्यंत अधिक वेगाने पोहोचू लागली आहे. या माध्यमांमुळे आदिवासी महिलांच्या आरोग्य, शिक्षण, रोजगार, जागरूकता आणि सांस्कृतिक बदल सांस्कृतिक बदलात परिवर्तन होताना दिसून येत आहे. आदिवासी महिला ही समाजातील सर्वात संवेदनशील आणि वंचित घटकांपैकी एक असल्याने प्रसार माध्यमांचा त्यांच्यावर होणारा प्रभाव अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. अशा परिस्थितीत प्रसार माध्यमे- मुद्रित माध्यम, दूरदर्शन, रेडिओ, मोबाईल, आणि सोशल मीडिया यांचा त्यांच्या जीवनावर लक्षणीय प्रभाव कशा पद्धतीने पडतो हे या अभ्यासाद्वारे दर्शवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अभ्यासाची गरज व महत्त्व:-**

- आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणात दूर असल्याने माहिती प्रचार प्रसार कितपत परिणामकारक आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे.
- प्रसारमाध्यमांच्या वापरामुळे महिलांच्या जीवनशैलीत झालेल्या बदलांचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीने महत्त्वाचा आहे.
- शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती, 'हमारा आकाश', 'सक्षम महिला' यासारखे शैक्षणिक कार्यक्रम, आरोग्य विषयक जाहिराती महिलांपर्यंत कितपत पोहोचतात हे समजण्यासाठी अभ्यासाच्या आवश्यकता भासते.
- प्रसारमाध्यमांचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम समजून घेण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.

**उद्दिष्टे**

- आदिवासी महिलांच्या जीवनावर प्रसार माध्यमांचा प्रभाव अभ्यासणे.
- प्रसारमाध्यमांमुळे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक स्तरावर झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.
- प्रसार माध्यमांमुळे आदिवासी महिलांचे आरोग्य, शिक्षण, आणि महिला जागरूकता व सक्षमीकरणात झालेले बदल अभ्यासणे.

**गृहीत कृत्य: -** "आदिवासी महिलांमध्ये प्रसार माध्यमांचा वापर वाढल्यामुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल दिसून येत आहे".

**संशोधन पद्धती (Methodology):** प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनांचा व वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला असून वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके, संशोधन पेपर, सरकारी अहवाल, रेडिओ, दूरदर्शन, ऑनलाइन लिंक, सोशल मीडिया, इंटरनेट इत्यादी द्वितीय स्रोतांचा उपयोग केला आहे.

**भारतातील आदिवासी समाजाची ओळख:**

भारत हा विविध संस्कृती, भाषा आणि परंपरांनी नटलेला देश आहे. त्यामधील आदिवासी समाज हा सर्वात प्राचीन व स्वतंत्र सांस्कृतिक ओळख जपणारा घटक आहे.

- आदिवासी समाज प्रामुख्याने जंगल, पर्वत आणि निसर्गाशी जोडलेला आहे.
- त्यांच्या परंपरा, नृत्य, वेशभूषा, सण-उत्सव आणि जीवनशैली विशेष व अद्वितीय आहे.
- बहुसंख्य आदिवासी जनता ग्रामीण व दुर्गम भागांत राहाते.
- शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक सुविधांमध्ये मागासलेपणा अद्याप दिसून येतो.

आदिवासी समाजाचे सांस्कृतिक वारसाहक्क आणि आत्मनिर्भर जीवनपद्धती भारताच्या विविधतेत भर घालतात.

**आदिवासी महिलांची भूमिका:**

आदिवासी समाजात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते.

- घर, शेतकाम, मुलांचे संगोपन, अन्नसाठा, जंगलातील संसाधनांचा उपसा यामध्ये त्यांचा थेट सहभाग असतो.
- अनेक आदिवासी समुदायांमध्ये महिलांना निर्णयप्रक्रियेतील स्थान व सामाजिक स्वातंत्र्यही मिळते.
- त्या घरगुती उद्योग, हस्तकला तयार करणे, शेतीपूरक व्यवसाय अशा कामांमध्ये हातभार लावतात.
- परंतु शिक्षणाची कमतरता, आरोग्य सुविधा अपुऱ्या असणे, सामाजिक दडपण आणि माहितीचा अभाव यासारख्या समस्या अजूनही जाणवतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

एकूणच, आदिवासी महिलांचे जीवन श्रमप्रधान, जबाबदारीपूर्ण पण संसाधनांच्या अभावामुळे मर्यादित राहिलेले दिसते.

**प्रसारमाध्यमांचा प्रभाव का महत्त्वाचा आहे?**

आदिवासी महिलांच्या जीवनात प्रसारमाध्यमांचा प्रभाव खालील कारणांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो:

**१. माहितीपर पोहोच वाढते**

प्रसारमाध्यमांमुळे आरोग्य, शिक्षण, पोषण, महिला हक्क, सरकारी योजना आणि सामाजिक सुरक्षा याबद्दलची माहिती आदिवासी महिलांपर्यंत सहज पोहोचते. यामुळे त्यांची जागरूकता वाढते आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते.

**२. शिक्षण व सक्षमीकरणाला चालना मिळते**

टीव्ही, रेडिओ आणि मोबाईलवरील शैक्षणिक कार्यक्रमांमुळे स्वच्छता, बालसंगोपन, मातृआरोग्य आणि कौशल्यविकास याबद्दलचे ज्ञान उपलब्ध होते. हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

**३. आर्थिक संधी निर्माण होतात**

हस्तकला, भात-धान्य प्रक्रिया, नैसर्गिक उत्पादनांची विक्री, शेतीपद्धती इत्यादींबद्दल माहिती प्रसारमाध्यमांतून मिळते. यामुळे स्वयं-सहायता गट आणि लघुउद्योगांमध्ये महिलांचा सहभाग वाढतो.

**४. सामाजिक समस्या व रूढींवर मात करण्यास मदत: -**

बालविवाह, महिलांवरील हिंसा, अंधश्रद्धा, भेदभाव यांसारख्या सामाजिक समस्यांविरोधात जनजागृती प्रसारमाध्यमांद्वारे होते. यामुळे आदिवासी महिलांमध्ये सामाजिक आत्मविश्वास वाढतो.

**५. सांस्कृतिक ओळख जपण्यास मदत**

काही प्रसारमाध्यमं आदिवासी संस्कृती, नृत्य, परंपरा आणि लोककलेला स्थान देतात. यामुळे त्यांची ओळख व्यापक स्तरावर पोहोचते आणि सांस्कृतिक जपणूक होते.

**प्रसारमाध्यमांचा आदिवासी महिलांवर होणारा सकारात्मक प्रभाव: -**

भारतातील आदिवासी समाज हा प्राचीन, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि स्वतंत्र असा समाज आहे. आदिवासी महिलांकडे कुटुंबातील मोठ्या जबाबदाऱ्या असतात—कृषी, घरकाम, लोकसंस्कृती जपणे इत्यादी. मागील काही दशकांत प्रसारमाध्यमांनी त्यांच्या जगण्याची पद्धत, विचारसरणी, आर्थिक स्थिती आणि सामाजिक सहभागामध्ये महत्त्वाचे बदल घडवले आहेत. प्रसारमाध्यमं आदिवासी महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याची मोठी क्षमता ठेवतात. शिक्षण, आरोग्य, आर्थिक प्रगती, सामाजिक जागरूकता यावर त्यांचा चांगला प्रभाव दिसतो.




**१. शिक्षण व जागरूकता वाढीस मदत:** - टीव्ही, रेडिओ व मोबाईल मधील शैक्षणिक कार्यक्रमामुळे आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाविषयीची जागृती वाढू लागली आहे. आरोग्य, स्वच्छता, पोषण याविषयी सरकार व स्वयंसेवी संस्थांद्वारे केलेल्या संदेशांचा थेट

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

परिणाम त्यांच्या दैनंदिन जीवनावर होताना दिसून येत आहे टीव्ही, रेडिओ वरील जाहिरातींद्वारे वेगवेगळया सरकारी योजनाबद्दल जसे शैक्षणिक योजना, कर्ज योजना, महिलांचे हक्क याविषयीची माहिती मिळते. काही महिला नेत्या,खेळाडू,कार्यकर्त्या, आणि कलाकार यांच्या कहाण्यांमुळे आदिवासी मुलींमध्ये आत्मविश्वास वाढत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना आपले विचार मांडण्यास व लोकनृत्य, लोककला सादर करण्यास एक व्यासपीठ मिळाले आहे.

**2. आरोग्य विषयक बदल:** - प्रसार माध्यमांमुळे गर्भधारणा, प्रसुती, बाल कुपोषण, लसीकरण, स्वच्छता व लसीकरण याविषयीची माहिती जाहिरातींद्वारे दूरवरच्या आदिवासी भागात पोहोचू लागले आहे. प्रसार माध्यमांद्वारे आदिवासी महिलांना त्यांच्या अधिकारांविषयी, शैक्षणिक महत्त्व आणि सरकारी योजना याविषयी जागृत केले जाऊ शकते. दूरदर्शन, रेडिओ, मोबाईल फोन हे खेडोपाडी पोहोचणारे प्रभावी माध्यम आहे. जसे की,

- **रेडिओ कार्यक्रम: -** आदिवासी महिलांसाठी स्थानिक भाषेत आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक योजनांची माहिती देणारे कार्यक्रम होतात जसे, रेडिओवरील "आरोग्यम् धनसंपदा", "बालचित्रवाणी",'कृषी विषयक कार्यक्रम' यासारख्या कार्यक्रमांद्वारे विविध माहिती प्रसारित होते.
- **दूरदर्शन: -** दूरदर्शनवरील 'हॅलो डॉक्टर','मेरी सहेली' यासारख्या कार्यक्रमांद्वारे आरोग्य विषयक माहिती, डी डी सह्याद्री वरील "धिना धिन धा" यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमातून आदिवासी नृत्यांद्वारे त्यांच्या लोककलेचे व संस्कृतीचे प्रदर्शन होते. "आमची माती, आमची माणसं" यासारख्या जाहिरातीतून कृषी विषयक माहिती मिळते. तंबाखू, सिगारेट, यासारख्या धुम्रपानाला विरोध करणाऱ्या कॅन्सरविरोधक जागृती करणाऱ्या जाहिराती, आयोडीन मीठ, सॅनिटरी नॅपकिन,'बेटी बचाओ, बेटी पढाओ' यासारख्या जाहिराती तसेच "हमारा आकाश" किंवा "सक्षम महिला" यासारख्या शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे आदिवासी महिलाच्या सक्षमीकरणास मदत होईल.
- **डिजिटल मीडिया (सोशल मीडिया): -** स्मार्टफोन व इंटरनेटच्या माध्यमातून महिलांना डिजिटल साक्षरतेकडे वळवले जात आहे. आदिवासी महिला स्वतःची उत्पादने (हस्तकला, शेतीमाल, वन्यवस्तू) विक्रीसाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा उपयोग करू शकतात.

**आर्थिक सक्षमीकरण: -**

- मोबाईल नेटवर्क वाढल्यामुळे आदिवासी महिलांना स्वयंरोजगार, हस्तकला(जसे, वारली पेंटिंग, चटई, गोधडी, टोपल्या, झाडू यासारख्या), बी बियाणे- उत्पादन, कृषी उत्पादने विक्री यासाठी नवीन बाजारपेठांना जोडण्याची संधी मिळू लागली आहे.
- ई-कॉमर्स किंवा स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने अनेक महिला आपली उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवू शकतात.
- स्वयंसहायता गटाविषयी ची माहिती, लाडकी बहीण, विधवा पेन्शन, अटल पेन्शन योजना, जीवन ज्योती बिमा योजना यासारख्या विविध सरकारी योजनांची वेळोवेळी मिळणारी माहिती त्यांना आर्थिक लाभ मिळवून देते. बचत गटातील अध्यक्ष ग्रामसंघ अध्यक्ष सीआरपी या महिला आपली बहुतांश कामे ही मोबाईल फोन द्वारे करतात.
- शेळी पालन, कुक्कुटपालन, शिवणकाम, ब्युटी पार्लर याविषयीचे प्रशिक्षण तसेच विविध गृह उद्योग विषयीची माहितीद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहे व त्यातून आर्थिक स्वावलंबन व सक्षमीकरणास मदत होत आहे.



**सांस्कृतिक बदलचा प्रभाव: -**

मीडियातून शहरातील जीवनशैली, फॅशन, भाषा आणि आधुनिक मूल्य थेट आदिवासी भागात पोहोचतात. काही माध्यमे आदिवासींच्या परंपरा, नृत्य, सण उत्सव, कला, त्यांची भाषा,गाणी यांचे जतन करण्याचे कार्य करतात. यामुळे त्यांची संस्कृती मुख्य प्रवाहात ओळखली जात आहे. त्यांना आपले कला-कौशल्य सादर करण्यासाठी टीव्ही, मोबाईल वरील युट्युब, इंस्टाग्राम, यासारखे व्यासपीठ मिळत आहे. त्याचप्रमाणे आदिवासी मुलींना देखील आपली संस्कृती, नृत्याच्या मार्फत दर्शविण्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालय या अंतर्गत होणाऱ्या युवामहोत्सवात आपली कला-कौशल्य सादर करण्यास एक प्रकारची संधी मिळत आहे व त्यांच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान व जागतिक पातळीवर प्रचार होताना दिसून येत आहे.

**सरकारी योजनांची माहिती समजणे: -**

प्रसारमाध्यमांमुळे (टीव्ही, रेडिओ, मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया) आदिवासी महिलांना सरकारी योजनांची माहिती सहज मिळू लागली आहे.

- **महिला व बालविकास**, **वनहक्क योजना**, **उद्योजकता योजनां**, **आरोग्यविमा योजना**, **शिष्यवृत्ती**, **महिला बचतगट योजना** याविषयी माहिती घरबसल्या मिळते.
- पूर्वी सरकारी कार्यालयात जाऊन चौकशी करणे कठीण होत असे; आता मोबाईलवर व्हिडिओ, पोस्ट, सरकारी पोर्टल्स, हेल्पलाइन यांमधून माहिती स्पष्टपणे मिळते.
- **अर्ज कसा करायचा**, **कागदपत्रे कोणती**, **योजनेचे फायदे काय** हे समजल्यामुळे आदिवासी महिलांचा **शासकीय योजनांतील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला** आहे.
- सरकारी सहाय्य मिळाल्यामुळे त्यांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा मजबूत होतो.

**उद्यमशीलता (Entrepreneurship) वाढवणे: -**

- प्रसारमाध्यमे आदिवासी महिलांमध्ये उद्योजकता वाढवण्यास महत्त्वाची मदत करतात.
- विविध **उद्योगांचे प्रशिक्षण कार्यक्रम**, **हस्तकला बाजारपेठ**, **कृषी प्रक्रिया उद्योग**, **ऑनलाइन विक्री प्लॅटफॉर्म** यांची माहिती मिळते.
- यशस्वी आदिवासी महिला उद्योजकांच्या कथा, मुलाखती, व्हिडिओ पाहून **स्वत: काहीतरी करण्याची प्रेरणा** मिळते.
- ऑनलाइन माध्यमांद्वारे त्यांच्या उत्पादनांना (बांबू काम, हातमाग, भात प्रक्रिया, औषधी पदार्थ, दागिने इ.) **थेट बाजारपेठ मिळू लागते.**
- सरकार व स्वयंसेवी संस्थांद्वारे मिळणाऱ्या **कर्ज, अनुदान, प्रशिक्षण** याचा वापर करून त्या **स्वावलंबी उद्योजक** बनतात.

**आत्मविश्वास व नेतृत्वगुण वाढ: -**

प्रसारमाध्यमे आदिवासी महिलांचा आवाज समाजापर्यंत पोहचवतात आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवतात.

- स्त्रियांच्या हक्कांविषयी, यशोगाथांबद्दल व प्रेरणादायी कथा पाहून त्यांच्यात आत्मविश्वास वाढतो.
- स्वत:च्या गावात, बचतगटात, शाळांत किंवा ग्रामसभेत निर्भयपणे मत मांडण्याची क्षमता वाढते.
- सामाजिक माध्यमांवर चर्चा, मोहिमा, प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादींमध्ये सहभागी होऊन नेतृत्वगुण विकसित होतात.
- अनेक आदिवासी महिला आता ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, स्वयंसेवी संस्थांचे ने**तृत्व** करीत आहेत-यामागे माध्यमांनी दिलेली माहिती व प्रेरणा महत्त्वाची ठरते.

**प्रसारमाध्यमांचा आदिवासी महिला व त्यांच्या जीवनावर होणारा नकारात्मक प्रभाव**




**1. संस्कृती व परंपरेवर होणारा परिणाम: -**

- टीव्ही, इंटरनेट, सोशल मीडिया यामुळे **पारंपरिक आदिवासी संस्कृती व रीती-रिवाजांमध्ये घट येते.**
- मुली आणि तरुणाई **पाश्चात्य जीवनशैलीची आकर्षण** अनुभवतात, ज्यामुळे **स्थानीय नृत्य, संगीत, हस्तकला, भाषा आणि परंपरा विसरल्या जातात.**
- पारंपरिक मूल्ये आणि कौटुंबिक संस्कारांना धोका निर्माण होतो.

**2. चुकीची माहिती व अफवा: -**

- अनेक प्रसारमाध्यमांवर **अचूक नसलेली माहिती, अफवा किंवा भ्रामक बातम्या** प्रसारित होतात.
- आदिवासी महिला या चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवून **अयोग्य निर्णय** घेऊ शकतात, जसे की आरोग्य, शिक्षण किंवा रोजगार संबंधी चुकीचे पाऊल उचलणे.

**3. सोशल मीडियावर शोषण: -**

- फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, इंस्टाग्राम यांसारख्या माध्यमांवर गोपनीयता न राखणे, फसवणूक, साइबर धमक्या व गैरवर्तन होऊ शकते.
- आदिवासी महिलांना या माध्यमांवर शारीरिक व मानसिक शोषण होण्याचा धोका अधिक असतो.
- त्यामुळे आत्मविश्वास कमी होऊ शकतो आणि समाजापासून दूर राहण्याची प्रवृत्ती वाढते.

**4. शहरी जीवनशैलीचे अंधानुकरण: -**

- टीव्ही व सोशल मीडिया द्वारे शहरी जीवनशैलीचे आकर्षक दृश्य पाहून आदिवासी महिला **त्याचे अंधानुकरण** करतात.
- स्थानिक संसाधन व जीवनशैली विसरून, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या त्यांच्या जीवनात **असंतुलन निर्माण** होऊ शकते.
- उदाहरणार्थ, मोठ्या खर्चाची इच्छा, आधुनिक पोशाख किंवा खानपान, परंपरागत कार्यकौशल्यांपासून दूर राहणे इत्यादी.

अशाप्रकारे प्रसार माध्यमे आदिवासी महिलांच्या जीवनात शिक्षण, आरोग्य, हक्क, आर्थिक संधी, सांस्कृतिक सन्मान आणि आत्मनिर्भरता निर्माण करून अत्यंत सकारात्मक भूमिका निभावत आहे. प्रसार माध्यमे आदिवासी महिलांना सरकारी योजनांची स्पष्ट माहिती, स्वयंरोजगार व उद्यम शिलतेची संधी, आत्मविश्वास, नेतृत्व आणि सामाजिक सहभाग या गोष्टी देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यास मोठी मदत करतात. त्याचप्रमाणे प्रसार माध्यमांचा आदिवासी महिलांवर नकारात्मक प्रभाव संस्कृतीतील हानी, चुकीची माहिती, अफवा, सोशल मीडियावर शोषण व शहरी जीवनशैलीचे अंधानुकरण यामध्ये दिसून येतो त्यामुळे सावधगिरीने माध्यमांचा वापर व मार्गदर्शन आवश्यक आहे. योग्य व संवेदनशील माध्यमांचा वापर त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोठा आधार ठरू शकतो.

**निष्कर्ष:**

- आदिवासी महिलांच्या जीवनात शिक्षण जागरूकता, आर्थिक सक्षमीकरण व संधी, आरोग्य विषयक माहिती, सामाजिक सहभाग वाढविणे आणि सांस्कृतिक जीवनशैलीचे संरक्षण व जतन करणे या सर्व बाबतीत प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते.
- परंतु योग्य मार्गदर्शन नसल्यास चुकीची माहिती, सांस्कृतिक विसंगती यासारखे धोकेही संभवतात.

- नकारात्मक परिणाम टाळण्यासाठी योग्य मार्गदर्शन, मीडिया साक्षरता आणि स्थानिक सांस्कृतिक मूल्यांचा सन्मान आवश्यक आहे.
- प्रसार माध्यमे आदिवासी महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याची मोठी क्षमता ठेवतात व त्यामुळेआदिवासी महिलांच्या प्रगतीसाठी माध्यमांचा योग्य व मार्गदर्शन वापर करणे आवश्यक आहे.

**सूचना / शिफारसी: -**

- आदिवासींसाठी स्थानिक भाषेत (व्हिडिओ,रेडिओ) विशेष कार्यक्रम राबवावेत.
- महिला स्वयंसहायता गटांसाठी डिजिटल प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.
- मीडिया साक्षरता (Media Literacy) कार्यशाळा शिबिर घ्यावेत.
- महिला गटामध्ये डिजिटल सुविधा, इंटरनेट व मोबाईल प्रशिक्षण, सायबर सुरक्षा प्रशिक्षण द्यावे, सांस्कृतिक परंपरा जपणारे कार्यक्रम वाढवावेत. सोशल मीडियावरील चुकीच्या माहिती विरोधात जागरूकता मोहीम राबवावी.

**संदर्भसूची:**

1. Dhanula Anjli Dharmendrakumar & Amarjeet Kumar (2025). The Role of Social Media in Empowering Tribal Women to Combat Human Trafficking: A Sociological Study of North Gujarat Tribal Region. Social Science Journal for Advanced Research. Singh Publication
2. Lungsanliu Panmei & Samuel Wilson Meshack (2024), "An Assessment of Social Media Usage Patterns and Influences among Tribal Naga Women of Northeast India". Journal of Media, Culture and Communication
3. "आदिवासी समाजातील स्त्रियांच्या शैक्षणिक समस्यांचे अध्ययन" (2025). International Journal of Advance and Applied Research
4. महाराष्ट्रातील आदिवासी महिला सक्षमीकरण" - अभ्यास अहवाल (महाराष्ट्र सरकार).
5. रेडिओ व दूरदर्शनवरील कार्यक्रमांची समीक्षा, स्थानिक वृत्तपत्रे आणि मासिके.
6. प्रसारमाध्यमांचे प्रकार आदिवासी समाजाची ओळख सांस्कृतिक सक्षमीकरण, परंपरा, सण उत्सव संस्कृती भाषा लोकनृत्य,
7. सकारात्मक प्रभाव- शिक्षण व जागरूकता वाढीस मदत, आरोग्य पोषण स्वच्छता याबद्दल माहिती (जसे जाहिरात द्वारे आयोडीन नमक पोषक आहार सॅनिटरी नॅपकिन याविषयीची माहिती) सरकारी योजना/ महिला हक्क,
8. आर्थिक सक्षमीकरण, स्वयंसहायता गटाचे प्रशिक्षण व सक्षमीकरण, हस्तकला, नृत्य, कृषी वस्तूंना बाजारपेठ, ऑनलाइन विक्रीचे मार्ग
9. नकारात्मक प्रभाव: - सांस्कृतिक अस्पष्टता, चुकीची माहिती(अफवा, भ्रामक बातम्यांचा प्रसार), माध्यमांच्या अपुऱ्या नॉलेजमुळे सोशल मीडियावरील शोषण , डिजिटल दरी(नेटवर्क, स्मार्टफोन, इंटरनेटची कमतरता)

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# इंडो पॅसिफिक क्षेत्रातील बदलती समीकरणे आणि भारताचे 'ॲक्ट ईस्ट' बाबतचे धोरण

**डमाळे अनिकेत प्रल्हाद[1], डॉ. लक्ष्मण पोपटराव वाघ[2]**

[1]संशोधक, न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर

[2]संशोधन मार्गदर्शक, संरक्षण आणि सामरिक शास्त्र, विभागप्रमुख के. सी. ई. सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय जळगाव

**Manuscript ID:**
JRD -2026-180116

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(IV)

Pp. 77-81

January 2026

***सारांश (Abstract):***

*प्रस्तुत शोधनिबंध एकविसाव्या शतकातील जागतिक राजकारणाचे केंद्रबिंदू ठरलेल्या इंडो पॅसिफिक क्षेत्रातील भारताच्या धोरणात्मक भूमिकेचे विश्लेषण करतो. शीतयुद्धोत्तर काळातील लूक ईस्ट धोरणाचे व २०१४ मध्ये ॲक्ट ईस्ट धोरणात झालेले रूपांतर हे भारताच्या परराष्ट्र धोरणातील एक महत्त्वाचे वळण मानले जाते. या शोधनिबंधात प्रामुख्याने आशियाई देशांशी असलेले आर्थिक संबंध, सागरी सुरक्षा, दक्षिण चीन समुद्रातील तणाव आणि क्वाड सारख्या बहुपक्षीय व्यासपीठांवरील भारताच्या वाढत्या सक्रियतेचा आढावा घेण्यात आला आहे. चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे निर्माण झालेल्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, भारत कशा प्रकारे शक्ती संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहे, याचे चिकित्सक परीक्षण येथे केले आहे. हा अभ्यास प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही स्रोतांवर आधारित असून, इंडो पॅसिफिक क्षेत्रातील शांतता आणि स्थिरतेसाठी भारताची भूमिका निर्णायक असल्याचे अधोरेखित करतो.*

***मुख्यशब्द:*** *संशोधन, अभ्यास, विश्लेषण, विकास, सामाजिक बदल, आर्थिक प्रगती, शैक्षणिक सुधारणा, तांत्रिक प्रगती, धोरणनिर्मिती, शाश्वत विकास*

**Submitted:** 12 Dec. 2025

**Revised:** 22 Dec. 2025

**Accepted:** 12 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026

## प्रस्तावना

जागतिक राजकारणाचा केंद्रबिंदू आता अटलांटिक महासागराकडून इंडो पॅसिफिक क्षेत्राकडे सरकला आहे. हे क्षेत्र केवळ भौगोलिक प्रदेश नसून ते जागतिक व्यापाराची मुख्य धमनी आहे. जगातील एकूण सागरी व्यापाराचा मोठा हिस्सा याच क्षेत्रातून होतो. भारतासाठी इंडो पॅसिफिक क्षेत्र हे केवळ परराष्ट्र धोरणाचा भाग नसून ते राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीचे प्रवेशद्वार आहे. २०१४ मध्ये ॲक्ट ईस्ट धोरणाची घोषणा करून भारताने पूर्व आशियाई देशांशी केवळ आर्थिकच नव्हे, तर लष्करी, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध दृढ करण्यावर भर दिला. या धोरणाचे मूळ उद्दिष्ट भारताच्या ईशान्येकडील राज्यांना आग्नेय आशियाशी जोडून विकास साधणे आणि या प्रदेशात नियमांवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था प्रस्थापित करणे हे आहे.

## संशोधनाची मुख्य उद्दिष्टय

- इंडो पॅसिफिक क्षेत्राचे समकालीन जागतिक राजकारणातील महत्त्व तपासणे.
- 'लूक ईस्ट' ते 'ॲक्ट ईस्ट' या प्रवासातील धोरणात्मक बदलांचे विश्लेषण करणे.
- या क्षेत्रात चीनच्या वाढत्या प्रभावामुळे भारतापुढे निर्माण झालेल्या सुरक्षा आव्हानांचा अभ्यास करणे.
- आसियान आणि क्वाड देशांसोबतच्या भारताच्या सहकार्याचे मूल्यमापन करणे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी :

- भारताच्या परराष्ट्र धोरणातील पूर्वेकडे पाहणे ही संकल्पना अर्वाचीन नसून ती अत्यंत प्राचीन आणि समृद्ध ऐतिहासिक वारशावर अधिष्ठित आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*डमाळे अनिकेत प्रल्हाद, संशोधक, न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर*

**How to cite this article:**

*डमाळे, . अनिकेत . प्रल्हाद ., & वाघ, . लक्ष्मण . पोपटराव . (2026). इंडो पॅसिफिक क्षेत्रातील बदलती समीकरणे आणि भारताचे 'ॲक्ट ईस्ट' बाबतचे धोरण. Journal of Research & Development, 18(1(IV)), 77–81. https://doi.org/10.5281/zenodo.18169459*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18169459

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

भारतीय संस्कृतीचा दक्षिण-पूर्व आशियातील प्रभाव हा केवळ व्यापारापुरता मर्यादित नव्हता तर तो सांस्कृतिक आणि धार्मिक एकात्मतेचा एक महत्त्वपूर्ण कालखंड होता. प्राचीन काळामध्ये दक्षिण भारतातील चोल साम्राज्य आणि पूर्व किनारपट्टीवरील कलिंगाच्या नाविक सामर्थ्याने आग्नेय आशियातील देशांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले होते. जावा, सुमात्रा, बोर्नियो आणि बाली यांसारख्या बेटांवर भारतीय संस्कृती, स्थापत्यशास्त्र आणि विशेषतः हिंदू व बौद्ध धर्माचा प्रसार याच नाविक मोहिमांमुळे झाला. अंगकोर वाट (कंबोडिया) किंवा बोरोबुदुर (इंडोनेशिया) यांसारखी वास्तूशिल्पे आजही भारताच्या त्या काळातील सॉफ्ट पॉवर आणि सागरी वर्चस्वाच्या साक्षीदार आहेत. आधुनिक ॲक्ट ईस्ट धोरणाला हाच प्राचीन ऐतिहासिक संदर्भ एक नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देतो.

**लूक ईस्ट धोरण:**

आधुनिक कालखंडात, १९९० च्या दशकात जागतिक राजकारणाने एक नवे वळण घेतले. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर शीतयुद्धाचा अंत झाला आणि भारताचा एक अत्यंत विश्वासार्ह मित्र रसातळाला गेला. याच काळात भारताने आपले आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले होते. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी देशाची ढासळती अर्थव्यवस्था सावरण्यासाठी आणि पाश्चिमात्य देशांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी दक्षिण-पूर्व आशियातील प्रगत अर्थव्यवस्थांशी संबंध सुधारण्यावर भर दिला. या धोरणाचा मुख्य उद्देश हा आर्थिक एकात्मता हाच होता. आग्नेय आशियाई राष्ट्रांच्या संघटनेशी भारताने संवाद प्रस्थापित केला ज्यामुळे व्यापार आणि गुंतवणुकीचे नवे मार्ग खुले झाले. हे धोरण प्रामुख्याने बचावात्मक आणि आर्थिक स्वरूपाचे होते, ज्यामध्ये भारताने पूर्वेकडील देशांकडे एक संधी म्हणून पाहण्यास सुरुवात केली.

**ॲक्ट ईस्ट धोरण:**

धोरणात्मक सक्रियता आणि बहुआयामी विस्तार: २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली परराष्ट्र धोरणात आमूलाग्र बदल घडवण्यात आले. म्यानमारमधील शिखर परिषदेत लूक ईस्ट चे रूपांतर ॲक्ट ईस्ट मध्ये करण्यात आले. हा बदल केवळ शाब्दिक नव्हता, तर तो भारताच्या मानसिकतेतील आणि रणनीतीमधील महत्त्वाचे परिवर्तन होते.

**आर्थिक आयाम आणि कनेक्टिव्हिटी: विकासाचे महामार्ग**

ॲक्ट ईस्ट धोरणाचे यश हे केवळ राजनैतिक करारांवर अवलंबून नसून, ते भौतिक आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीच्या सक्षमीकरणावर अधिष्ठित आहे. जोपर्यंत भौगोलिक अडथळे आणि सीमावर्ती पायाभूत सुविधांच्या मर्यादा दूर केल्या जात नाहीत, तोपर्यंत दक्षिण-पूर्व आशियाई बाजारपेठांशी भारताचे आर्थिक संबंध दृढ होणे अशक्य आहे. या संदर्भात, कनेक्टिव्हिटी हा केवळ दळणवळणाचा मार्ग नसून तो भारताच्या भू-आर्थिक रणनीतीचा कणा आहे.

**भारत-म्यानमार-थायलंड त्रिपक्षीय महामार्ग :**

आशियाई व्यापाराची नवीन जीवनवाहिनी हा १३६० किलोमीटर लांबीचा महामार्ग भारताच्या ईशान्येकडील मणिपूर राजयातील या सीमावर्ती शहराला म्यानमारमधील तमु, कालेवा आणि बागो या भागांतून थायलंडमधील मे सॉट हराशी जोडतो. महामार्ग केवळ रस्ते बांधणीचा प्रकल्प नसून तो भारतासाठी जमीन-आधारित व्यापार सेतू आहे. ऐतिहासिकदृष्ट्या भारताचा आग्नेय आशियाशी असलेला व्यापार प्रामुख्याने सागरी मार्गांवर अवलंबून होता. या महामार्गामुळे दक्षिण-पूर्व आशियातील व्हॅल्यू चेन मध्ये भारताचा सहभाग वाढणार आहे. यामुळे मालवाहतुकीचा वेळ आणि खर्च कमी होऊन आशियाई मुक्त व्यापार क्षेत्रा चा लाभ भारताला थेट जमिनीवरून घेता येईल. या प्रकल्पाचे भविष्य म्यानमारमधील राजकीय स्थैर्यावर अवलंबून असले तरी, भारताने याला आपल्या नेबरहुड फर्स्ट आणि ॲक्ट ईस्ट धोरणाचा अविभाज्य भाग मानले आहे.

**कलादान मल्टी-मोडल ट्रान्झिट ट्रान्सपोर्ट प्रकल्प:**

धोरणात्मक पर्याय आणि सुरक्षा कवच हा प्रकल्प भारताच्या सागरी आणि नदीमार्गीय वाहतुकीचा एक महत्त्वाचा संयोग आहे. कोलकाता बंदराला म्यानमारमधील सितवे बंदराशी जोडून तिथून कलादान नदीमार्गे म्यानमारमधील पालेत्वा आणि पुढे मिझोरममधील झोरिनपुईपर्यंत मालवाहतूक करणे हे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. भू-राजकीय दृष्टिकोनातून या प्रकल्पाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारताचा उर्वरित देश आणि ईशान्य भारत यांना जोडणारा सिलिगुडी कॉरिडॉर ज्याला चिकन नेक म्हटले जाते, तो अत्यंत अरुंद (सुमारे २२ किमी) आहे. युद्धजन्य परिस्थितीत किंवा चीनशी असलेल्या तणावाच्या काळात हा मार्ग खंडीत होण्याची भीती असते. अशा वेळी कलादान प्रकल्प भारताला एक सुरक्षित आणि शाश्वत पर्यायी मार्ग उपलब्ध करून देतो. हा प्रकल्प म्यानमारमध्ये भारताचा प्रभाव वाढवतो आणि चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह अंतर्गत तयार होणाऱ्या प्रकल्पांना एक सक्षम लोकशाही पर्याय म्हणून उभा राहतो.

**सागरी सुरक्षा आणि 'सागर' संकल्पना: एक सुरक्षा कवच**

एकविसाव्या शतकात जागतिक राजकारणाचे केंद्रबिंदू हे भूभागावरून सागरी क्षेत्राकडे सरकले आहे. इंडो पॅसिफिक क्षेत्रातील वाढत्या सामरिक महत्त्वामुळे भारत या प्रदेशात केवळ एक आर्थिक भागीदार राहिला नसून, तो एक प्रभावी निव्वळ सुरक्षा प्रदाता म्हणून उदयास आला आहे. भारताची 'ॲक्ट ईस्ट' रणनीती आता सागरी सुरक्षेला केंद्रस्थानी ठेवून आक्रमक आणि सक्रिय स्वरूपाची झाली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**'सागर' संकल्पना: सर्वसमावेशक आणि शाश्वत सुरक्षेचा आराखडा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये मॉरिशस भेटीदरम्यान सागर या संकल्पनेची मांडणी केली. ही संकल्पना भारताच्या सागरी मुत्सद्देगिरीचा पाया मानली जाते. सागर हा दृष्टिकोन भारताच्या सर्वसमावेशक परराष्ट्र धोरणाचे प्रतीक आहे. भारत हा केवळ आपल्या राष्ट्रीय सीमांच्या संरक्षणापुरता मर्यादित नसून हिंदी महासागरातील इतर लहान राष्ट्रांच्या (उदा. श्रीलंका. मालदीव, मॉरिशस, सेशेल्स) सुरक्षेतही स्वतःला भागीदार मानतो. सागरी चाचेगिरी रोखणे, अमली पदार्थांची तस्करी थांबवणे आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तत्पर मदत पोहोचवणे. यांतून भारताने आपली विश्वासार्हता सिद्ध केली आहे. ही संकल्पना चीनच्या विस्तारवादी वन बेल्ट वन रोडला एक नैतिक आणि लोकशाही उत्तर ठरत आहे, कारण यामध्ये वर्चस्वापेक्षा सहकार्यावर भर दिला जातो.

**धोरणात्मक भागीदारी आणि लष्करी सज्जता**

'ॲक्ट ईस्ट' धोरणांतर्गत भारताने दक्षिण-पूर्व आशियाई आणि पूर्व आशियाई राष्ट्रांशी केवळ संवाद न साधता, त्यांच्याशी ठोस लष्करी आणि धोरणात्मक करार केले आहेत. भारताने व्हिएतनामला 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र प्रणाली आणि अत्याधुनिक गस्ती नौका पुरवण्याचा घेतलेला निर्णय हा भारताच्या बदलत्या लष्करी धोरणाचा पुरावा आहे. दक्षिण चीन समुद्रात चीनच्या वाढत्या लष्करी उपस्थितीमुळे असुरक्षित असलेल्या देशांना स्वदेशी तंत्रज्ञानाने सज्ज करणे, हे चीनच्या 'विस्तारवादाला' दिलेले धोरणात्मक उत्तर आहे. तसेच, जपानसोबत केलेला 'लॉजिस्टिक सपोर्ट' करार भारतीय नौदलाची कार्यक्षमता प्रशांत महासागरापर्यंत वाढवण्यास मदत करतो. या भागीदारीमुळे भारताचे सागरी सामर्थ्य केवळ संरक्षणात्मक न राहता, ते आता सामरिक संतुलन राखण्याचे महत्त्वाचे साधन बनले आहे.

**क्वाड: लोकशाही मूल्यांवर आधारित बहुपक्षीय सहकार्य**

भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार प्रमुख लोकशाही राष्ट्रांनी एकत्र येऊन स्थापन केलेला क्वाड हा गट ॲक्ट ईस्ट रणनीतीला जागतिक स्तरावर जोडणारा दुवा आहे. क्वाड हा गट कोणत्याही देशाविरुद्धची लष्करी युती नसून, तो मुक्त, खुला आणि नियम-आधारित इंडो पॅसिफिक क्षेत्रासाठी वचनबद्ध असलेला मंच आहे. या गटाच्या माध्यमातून भारत सागरी कायद्यांचे विशेष पालन करण्यावर भर देतो. दक्षिण चीन समुद्रातील चीनच्या नाईन डॅश लाईन सारख्या बेकायदेशीर दाव्यांना आणि तिथल्या दादागिरीला प्रतिबंध करण्यासाठी क्वाड हे एक जागतिक व्यासपीठ म्हणून काम करत आहे. या भागीदारीमुळे भारताला आपल्या धोरणात्मक स्वायत्ततेशी तडजोड न करता, या क्षेत्रात समतोल राखण्याची मोठी संधी मिळाली आहे.

**भू-राजकीय आव्हाने: चीनचा प्रभाव आणि भारताची रणनीती**

इंडो पॅसिफिक क्षेत्रातील बदलत्या सुरक्षा वातावरणाचा अभ्यास करताना चीन हा घटक सर्वाधिक प्रभावशाली आणि आव्हानात्मक ठरला आहे. भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणासमोर चीनचे वाढते लष्करी सामर्थ्य आणि विस्तारवादी महत्त्वाकांक्षा यांनी अनेक जटिल प्रश्न निर्माण केले आहेत. या भू-राजकीय आव्हानांचे चिकित्सक विश्लेषण खालील तीन प्रमुख आयामांतर्गत करता येईल.

**चीनची वेढा घालण्याची रणनीती: बीआरआय आणि स्ट्रिंग ऑफ पर्ल्स**

चीनने आपल्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह या महाकाय पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या माध्यमातून आशिया आणि आफ्रिकेतील देशांना स्वतःशी जोडून घेण्याचे धोरण राबवले आहे. मात्र, भारतासाठी यातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे चीनचे स्ट्रिंग ऑफ पर्ल्स धोरण. या धोरणांतर्गत चीनने हिंदी महासागरात भारताच्या सभोवताली असलेल्या देशांमध्ये बंदरे आणि लष्करी तळांचे जाळे विणले आहे (उदा. म्यानमारमधील कोको आयलंड, बांगलादेशातील चितगाव, श्रीलंकेतील हंबनटोटा आणि पाकिस्तानमधील ग्वादर). हे केवळ व्यापारी प्रकल्प नसून, भविष्यात भारताच्या नौदलाला रोखण्यासाठी उभारलेली ही एक प्रकारची लष्करी तटबंदी आहे. याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ॲक्ट ईस्ट रणनीतीद्वारे ओमानमधील दुक्म आणि इंडोनेशियातील सबंग यांसारख्या बंदरांवर आपली उपस्थिती वाढवण्यावर भर दिला आहे.

**दक्षिण चीन समुद्र विवाद आणि नाईन डॅश लाईन**

दक्षिण चीन समुद्र हा जागतिक अर्थव्यवस्थेचा मुख्य रक्तवाहिनी मानला जातो. चीनने ऐतिहासिक संदर्भांचा आधार घेत नाईन डॅश लाईन द्वारे या समुद्रातील ८० टक्क्यांहून अधिक भागावर आपला दावा ठोकला आहे. भारताचा ५५ टक्क्यांहून अधिक व्यापार याच समुद्री मार्गांतून होतो. व्हिएतनामच्या सागरी क्षेत्रात भारत ओएनजीसी विदेश च्या माध्यमातून तेल आणि वायू उत्खनन प्रकल्प राबवत आहे. चीनने याला वारंवार सार्वभौमत्वाचा भंग ठरवून विरोध केला आहे. भारताने मात्र आपली भूमिका स्पष्ट ठेवली आहे. सागरी सीमांचे वाद हे कोणत्याही देशाच्या लष्करी शक्तीने नव्हे, तर युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑन द लॉ ऑफ द सी या आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार सुटावेत. भारताचा हा पवित्रा चीनच्या विस्तारवादाला कायदेशीर आणि नैतिक आव्हान देतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**कर्जबाजारी मुत्सद्देगिरी आणि लोकशाही पर्याय**

चीनच्या परराष्ट्र धोरणातील सर्वात प्रभावी पण तितकाच धोकादायक पैलू म्हणजे कर्जबाजारी मुत्सद्देगिरी. विकसनशील देशांना अव्वाच्या सव्वा दराने कर्ज देऊन, ते फेडण्यात अपयशी ठरल्यावर त्या देशांच्या मोक्याच्या जमिनी किंवा लष्करी तळ ताब्यात घेणे, हे चीनचे मॉडेल आहे. श्रीलंकेचे हंबनटोटा बंदर हे याचे उत्तम उदाहरण आहे, जे ९९ वर्षांच्या भाडेतत्वावर चीनच्या ताब्यात गेले आहे. तसेच पाकिस्तानचे ग्वादर बंदर चीनच्या लष्करी आणि व्यापारी हालचालींचे केंद्र बनले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी भारताने ॲक्ट ईस्ट धोरणाद्वारे लोकशाही मूल्यांवर आधारित शाश्वत विकास हा पर्याय मांडला आहे. भारत या क्षेत्रात जे प्रकल्प राबवत आहे (उदा. आयटी पार्क्स, शिक्षण आणि आरोग्य सुविधा), ते त्या देशांच्या सार्वभौमत्वाचा आदर करणारे आहेत. भारताचा हा सॉफ्ट पॉवर आणि हार्ड पॉवर यांचा मेळ चीनच्या धोरणात्मक विळख्याला शह देण्यासाठी अत्यंत आवश्यक ठरत आहे.

**ईशान्य भारताचे एकात्मिकरण: ॲक्ट ईस्ट रणनीतीचा केंद्रबिंदू**

भारताच्या परराष्ट्र धोरणात ईशान्य भारताची भूमिका ऐतिहासिकदृष्ट्या केवळ सीमावर्ती प्रदेश अशी राहिली आहे. मात्र, ॲक्ट ईस्ट धोरणाच्या उदयाने या भूमिकेत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. आज ईशान्य भारत हा ॲक्ट ईस्ट रणनीतीचे हृदय मानला जातो. जोपर्यंत या प्रदेशात अंतर्गत सुरक्षा, राजकीय स्थैर्य आणि पायाभूत सुविधांचा विकास होत नाही, तोपर्यंत आग्नेय आशियाशी भारताची एकात्मता साध्य होणे अशक्य आहे. या संदर्भात भारताने अवलंबलेल्या त्रिस्तरीय धोरणाचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल:

**सुरक्षा आणि सीमा व्यवस्थापन: शांततेकडून प्रगतीकडे**

ईशान्य भारताच्या भौगोलिक रचनेमुळे येथे बंडखोरी आणि फुटीरतावादी चळवळींचा मोठा इतिहास राहिला आहे. म्यानमारच्या घनदाट जंगलांचा वापर करून अनेक बंडखोर गट भारतावर हल्ले करत असत. भारताने आपल्या धोरणात बदल करून म्यानमार सरकारशी लष्करी सहकार्य वाढवले आहे. म्यानमारच्या सीमेवर बंडखोरांविरुद्ध केलेल्या ऑपरेशन सनराईज सारख्या संयुक्त कारवाया हे भारताच्या सक्रिय संरक्षण धोरणाचे उदाहरण आहेत. अंतर्गत सुरक्षा सुदृढ झाल्यामुळेच 'त्रिपक्षीय महामार्ग' आणि कलादान सारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे काम सुरू ठेवणे शक्य झाले आहे. बंडखोरी कमी होणे, ही ॲक्ट ईस्ट धोरणाची पहिली आणि अनिवार्य पायरी ठरली आहे.

**धोरणात्मक गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा: जपानची भागीदारी**

ईशान्य भारताच्या दुर्गम भागात उद्योगांना आकर्षित करण्यासाठी केवळ सरकारी प्रयत्न पुरेसे नव्हते, तर तिथे जागतिक दर्जाच्या गुंतवणुकीची आवश्यकता होती. भारताने धोरणात्मक निर्णय घेत ईशान्य भारताच्या विकासासाठी जपानला सर्वात मोठा भागीदार म्हणून स्वीकारले आहे. जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी च्या माध्यमातून आसाम, मणिपूर आणि मेघालयातील रस्ते, वीज प्रकल्प आणि पाणीपुरवठा योजनांमध्ये मोठी गुंतवणूक केली जात आहे. चीनच्या सीमेजवळ असल्याने ही गुंतवणूक केवळ आर्थिक नसून तिला स्ट्रॅटेजिक बॅलन्सिंग चा पैलू आहे. यामुळे ईशान्य भारत हा जमिनीने वेढलेला प्रदेश न राहता आशियाचा एक महत्त्वाचा मॅन्युफॅक्चरिंग हब बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

**सांस्कृतिक मुत्सद्देगिरी आणि 'पीपल-टू-पीपल' संबंध**

केवळ रस्ते आणि लष्करी तळांनी दोन प्रदेश जोडले जात नाहीत, तर लोकांमधील संवाद महत्त्वाचा असतो. ईशान्य भारताचे सांस्कृतिक आणि वांशिक साम्य आग्नेय आशियातील देशांशी (उदा. थायलंड, म्यानमार, लाओस) मोठ्या प्रमाणावर आहे. केंद्र सरकारने ईशान्येतील स्थानिक लोककला, हस्तकला आणि विशेषतः बौद्ध वारसा यांचा आशियाई देशांशी मेळ घालण्याचे धोरण आखले आहे. संगाई महोत्सव मणिपूर किंवा हॉर्नबिल फेस्टिवल नागालँड यांसारख्या कार्यक्रमांना आंतरराष्ट्रीय दर्जा देऊन तिथे दक्षिण-पूर्व आशियातील पाहुण्यांना निमंत्रित केले जाते. या सॉफ्ट पॉवर मुळे केवळ पर्यटन वाढत नाही, तर दोन्ही प्रदेशांमधील नागरिकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण होते, जे ॲक्ट ईस्ट धोरणाच्या शाश्वततेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या सर्वंकष विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, एकविसाव्या शतकातील जागतिक राजकारणाचे केंद्र आता इंडो पॅसिफिक क्षेत्राकडे सरकले आहे. या पार्श्वभूमीवर भारताने २०१४ मध्ये स्वीकारलेले ॲक्ट ईस्ट धोरण हे केवळ परराष्ट्र धोरणातील बदल नसून, ते भारताच्या नव्या जागतिक महत्त्वाकांक्षेचे प्रतिबिंब आहे. या संशोधनातून प्रामुख्याने असे निष्पन्न होते की, भारताने लूक ईस्ट च्या संकुचित आर्थिक चौकटीतून बाहेर पडून सुरक्षा, कनेक्टिव्हिटी आणि सागरी मुत्सद्देगिरीचा जो व्यापक मार्ग अवलंबला आहे, त्यामुळे आशिया-प्रशांत क्षेत्रात भारताची प्रतिमा एक जबाबदार आणि प्रबळ शक्ती म्हणून प्रस्थापित झाली आहे. ईशान्य भारताचा विकास आणि तिथल्या पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण हे या धोरणाचे इंजिन ठरले आहे ज्याने आग्नेय आशियाशी असलेल्या आपल्या संबंधांना एक नवी दिशा दिली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे आणि दक्षिण चीन समुद्रातील तणावामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना भारताने क्वाड सारख्या जागतिक भागीदारीतून आणि सागर सारख्या सर्वसमावेशक संकल्पनेतून प्रभावी उत्तर दिले आहे. भारताने आपली धोरणात्मक स्वायत्तता जपून लोकशाही मूल्यांच्या आधारे जे शक्ती संतुलन राखले आहे, ते या क्षेत्रातील शांततेसाठी अनिवार्य आहे. भारताचे ॲक्ट ईस्ट धोरण हे केवळ पूर्वेकडील देशांशी संबंध सुधारण्यापुरते मर्यादित नसून, ते इंडो पॅसिफिक क्षेत्रातील नियम-आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकवून ठेवण्याचे एक सशक्त माध्यम बनले आहे. या धोरणाचे भविष्य हे जाहीर केलेल्या प्रकल्पांच्या जलद अंमलबजावणीवर आणि प्रादेशिक स्थिरतेवर अवलंबून आहे.

संदर्भ सूची

१. जयशंकर, एस. द इंडिया वे: स्ट्रॅटेजीज फॉर अन अनसर्टन वर्ल्ड. हार्पर कॉलिन्स इंडिया, २०२०.

२. पंत, हर्ष व्ही. इंडियाज फॉरिन पॉलिसी इन अ युनिपोलर वर्ल्ड. रॉटलेज, २०१८.

३. बरुआ, संजीब. इन द नेम ऑफ द नेशन: इंडिया अँड इट्स नॉर्थईस्ट. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, २०२०.

४. मोहन, सी. राजा. समुद्र मंथन: सिनो-इंडियन रायव्हलरी इन द इंडो-पॅसिफिक. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, २०१५.

५. सिंग, उदय भानू. ॲक्ट ईस्ट अँड इंडियाज नॉर्थ ईस्ट: एनहान्सिंग कनेक्टिव्हिटी विथ आसियान. आयडीएसए, २०१६.

सरकारी अहवाल आणि कायदे (Reports & Laws):

६. परराष्ट्र मंत्रालय, भारत सरकार. ॲक्ट ईस्ट पॉलिसी वार्षिक अहवाल. २०१४-२०२४.

७. आसियान-भारत सचिवालय. दिल्ली डिक्लेरेशन. २०१८.

८. नीती आयोग. डेव्हलपमेंट ऑफ नॉर्थ ईस्टर्न रिजन: अ स्ट्रॅटेजिक अप्रोच. भारत सरकार, २०१९.

९. युनायटेड नेशन्स. कन्व्हेन्शन ऑन द लॉ ऑफ द सी (UNCLOS). १९८२.

शोधपत्रिका आणि लेख (Journals & Articles):

१०. शर्मा, अभिषेक आणि बसू, प्रज्ञाश्री. "भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचे दशक." ओआरएफ स्ट्रॅटेजिक स्टडीज, २०२४.

११. जैशंकर, ध्रुव. "ॲक्टिंग ईस्ट: इंडिया इन द इंडो-पॅसिफिक." ब्रुकिंग्स इंडिया इम्पॅक्ट सीरिज, २०१९.

१२. राजगोपालन, राजेश्वरी पिल्लई. "द क्वाड इन द इंडो-पॅसिफिक." ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन, २०२१.

१३. दास, गुरुदास. "द इकॉनॉमिक बेनिफिट्स ऑफ ॲक्ट ईस्ट पॉलिसी फॉर द नॉर्थ ईस्ट." साउथ एशियन इकॉनॉमिक जर्नल, २०१८.

१४. बाली, एस. "इंडियाज ॲक्ट ईस्ट पॉलिसी: एंगेजमेंट विथ आसियान." इलेक्ट्रॉनिक जर्नल ऑफ सोशल अँड स्ट्रॅटेजिक स्टडीज, २०२२.

१५. कुमार, राजीव. "कनेक्टिव्हिटी की टू ॲक्ट ईस्ट." इंडियन फॉरेन अफेअर्स जर्नल, २०१७.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# डिजिटल अर्थव्यवस्थेतील कृत्रिम बुद्धिमत्तेची भुमिका : एक विश्लेषणात्मक अध्ययन

**पल्लवी काशिनाथ पावरा**
संशोधक विद्यार्थी सोनामाई कला व विज्ञान महिला महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार

**Manuscript ID**:
JRD -2026-180117
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 82-85
January 2026

***सारांश***

*प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा डिजिटल अर्थव्यवस्थेत कशा पद्धतीने वापर होत आहे याचा थोडक्यात उहापोह केलेला आहे. आजचे युग हे तंत्रज्ञान आणि संगणक स्पर्धेचे युग म्हणून नावारूपाला आलेले आहे. डिजिटल अर्थव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही केवळ एक तांत्रिक सुधारणा नसून ती आर्थिक प्रगतीचा मुख्य आधारस्तंभ ठरत आहे. डेटाचे विश्लेषण करण्यापासून ते ते नवनवीन सेवा निर्माण करण्यापर्यंत AI चा वापर सर्वत्र होत आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकाने कृत्रिम बुद्धिमत्ता संकल्पना, उद्योगांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा विविध उपयोग, कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे आणि धोके या मुद्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

***बीज संज्ञा:*** *कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), आरोग्यसेवा, कृषी, शिक्षण, पायाभूत सुविधा, उद्योग*

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

## प्रस्तावना

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे संगणक विज्ञानाचे एक परिवर्तनकारी क्षेत्र आहे जे आपल्या जगाला वेगाने नवा आकार देत आहे. यात तंत्रज्ञानाची एक विस्तृत श्रेणी समाविष्ट आहे जी मशीनला मानवासारखी बुद्धिमत्ता, शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे आणि भाषा समजून घेणे यासह नक्कल करण्यास आणि कार्य करण्यास सक्षम करते. आपल्या शोध इंजिनला शक्ती देणाऱ्या अल्गोरिदमपासून ते रोगांचे निदान करू शकणाऱ्या जटिल प्रणालीपर्यंत AI आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत आहे आणि जवळजवळ प्रत्येक उद्योगात नाविन्याची प्रेरक शक्ती आहे. हा तपशीलवार शोध कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बहुआयामी जगाचा अभ्यास करतो, ज्यामध्ये तिचा ऐतिहासिक विकास, विविध प्रकार आणि अंतर्निहित तंत्रज्ञान, तिचे विविध अनुप्रयोग आणि ते सादर करत असलेले सखोल फायदे आणि नैतिक विचार यांचा समावेश आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :

- भारतीय डिजिटल अर्थव्यवस्थेतील AI च्या वापराचे अध्ययन करणे.
- AI च्या वापरामुळे डिजिटल अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्रोताचा वापर करण्यात आलेला असून त्यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील मासिके, त्रैमासिके, साप्ताहिके तसेच संशोधन पेपर, संदर्भ ग्रंथ ,विविध नियतकालिके ,दैनिक वृत्तपत्रे व आंतरजालाचा )internet) आधार घेण्यात येणार आहे संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या . अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याख्या / अर्थ :

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवी बुद्धिमत्तेचे मशीनमध्ये केलेले सिम्युलेशन किंवा अनुकरण, ज्यांना मानवासारखे विचार करण्यासाठी आणि त्यांच्या कृतींची नक्कल करण्यासाठी प्रोग्राम केलेले असते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*पल्लवी काशिनाथ पावरा, संशोधक विद्यार्थी सोनामाई कला व विज्ञान महिला महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार*

**How to cite this article:**
*पावरा, . पल्लवी . काशिनाथ . (2026). डिजिटल अर्थव्यवस्थेतील कृत्रिम बुद्धिमत्तेची भुमिका : एक विश्लेषणात्मक अध्ययन. Journal of Research & Development, 18(1(IV)), 82–85.* https://doi.org/10.5281/zenodo.18169497

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169497

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

ही संज्ञा अशा कोणत्याही मशीनला देखील लागू केली जाऊ शकते जी मानवी मनाशी संबंधित वैशिष्ट्ये दर्शविते, जसे की शिकणे आणि समस्या सोडवणे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे आदर्श वैशिष्ट्य म्हणजे तिची तर्कसंगत विचार करण्याची आणि विशिष्ट ध्येय साध्य करण्याची उत्तम संधी असलेल्या कृती करण्याची क्षमता. कृत्रिम बुद्धिमत्तेचा एक उप-संच म्हणजे मशीन लर्निंग जो या संकल्पनेवर आधारित आहे की संगणक प्रोग्राम मानवी मदतीशिवाय स्वयंचलितपणे नवीन डेटावरून शिकू शकतात आणि जुळवून घेऊ शकतात. डीप लर्निंग तंत्रे मजकूर, प्रतिमा किंवा व्हिडिओ यासारख्या मोठ्या प्रमाणातील असंरचित डेटाच्या शोषणाद्वारे हे स्वयंचलित शिक्षण सक्षम करतात.

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल अर्थव्यवस्था :**

डिजिटल अर्थव्यवस्था म्हणजे असे देश जे कंपन्या आणि व्यक्तींद्वारे डिजिटल तंत्रज्ञानाचा पूर्ण अवलंब करण्यास सुलभता आणतात. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे आपल्या समाजासाठी एक परिवर्तनकारी तंत्रज्ञान म्हणून, पूर्वी मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता असलेल्या अनेक कार्यांना स्वयंचलित तंत्रज्ञान म्हणून, पूर्वी मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता असलेल्या अनेक कार्यांना स्वयंचलित करून उत्पादकता वाढवणार आहे. NITI आयोगाने जून २०१८ च्या आपल्या कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी राष्ट्रीय धोरण या अहवालात मत मांडले आहे की, "जगातील दुसरी सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याने, AI क्रांतीमध्ये भारताची महत्वपूर्ण भूमिका आहे, NITI आयोगाने पाच क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यांना समाजाच्या गरजा सोडविण्यासाठी AI कडून सर्वाधिक फायदा होईल अशी अपेक्षा आहे.अ) आरोग्यसेवा: दर्जेदार आरोग्यसेवेची उपलब्धता आणि परवडणारी क्षमता वाढवणे,ब) कृषी: शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीची उत्पादकता वाढवणे आणि अपव्यय कमी करणे, क) शिक्षण: शिक्षणाची उपलब्धता आणि गुणवत्ता सुधारणे, ड) स्मार्ट शहरे आणि पायाभूत सुविधा: वाढत्या शहरी लोकसंख्येसाठी कार्यक्षम कनेक्टीव्हिटी आणि इ) स्मार्ट मोबिलिटी आणि वाहतूक: वाहतुकीचे अधिक स्मार्ट आणि सुरक्षित मार्ग आणि रहदारी व गर्दीच्या समस्यांवर चांगले उपाय इ. घटकांचा समावेश आहेत.

**डिजिटल अर्थव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका :**

डिजिटल अर्थव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही केवळ एक तांत्रिक सुधारणा नसून ती आर्थिक प्रगतीचा मुख्य आधारस्तंभ ठरत आहे. डेटाचे विश्लेषण करण्यापासून ते ते नवनवीन सेवा निर्माण करण्यापर्यंत AI चा वापर सर्वत्र होत आहे.

**१) उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढवणे :**

AI मुळे उद्योगांमधील क्लिष्ट आणि वरवर करावी लागणारी कामे स्वयंचलित झाली आहेत. यामुळे मानवी चुका कमी होतात आणि कामाचा वेग वाढतो. उदा. मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात रोबोट्सचा वापर आणि सॉफ्टवेअर क्षेत्रात कोडिंगसाठी AI ची मदत.

**२) आर्थिक समावेशकता आणि फिनटेक :**

बँकिंग आणि वित्त क्षेत्रात AI ची भूमिका क्रांतिकारी आहे.

**i) फसवणूक शोधणे :**

रियल टाइममध्ये संशयात्मक आर्थिक व्यवहार ओळखून सायबर गुन्ह्यांना आळा घालणे.

**ii) क्रेडिट स्कोअरिंग :**

ज्यांच्याकडे बँकिंगचा इतिहास नाही, अशांनाही त्यांच्या डिजिटल वागणुकीवरून कर्ज उपलब्ध करून देणे.

**३) पुरवठा साखळी व्यवस्थापन :**

वस्तूंच्या मागणीचा अंदाज वर्तवणे, गोदामांचे व्यवस्थापन करणे आणि वाहतुकीचे मार्ग ऑप्टिमाइझ करणे यासाठी AI चा प्रभावी वापर केला जात आहे, ज्यामुळे लॉजिस्टिक खर्च कमी होतो.

**४) ग्राहक अनुभव सुधारणे :**

डिजिटल मार्केटमध्ये ग्राहकांच्या आवडीनिवडी समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. AI अल्गोरिदम ग्राहकांच्या मागील खरेदीचा आणि सर्च हिस्ट्रीचा अभ्यास करून त्यांना योग्य उत्पादने सुचवतात.
उदा. नेटफ्लिक्स किंवा ॲमेझॉनवर मिळणारे रिकमेंडेशन्स.
चॅटबॉट्स – २४/७ ग्राहक सेवा देण्यासाठी AI चॅटबॉट्सचा वापर केला जातो.

**५) नवीन रोजगार आणि स्टार्टअप्स :**

AI मुळे जुन्या पद्धतीचे काही जॉब्स कमी होत असले तरी डेटा सायंटिस्ट, मशीन लर्निंग इंजिनिअर आणि AI prompt इंजिनियर यासारख्या नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. यामुळे नवीन स्टार्टअप इकोसिस्टिमला मोठी चालना मिळत आहे.

JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT
# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**६) डेटावर आधारित निर्णय प्रक्रिया :**

डिजिटल अर्थव्यवस्थेत डेटा हे नवीन इंधन आहे. AI या अफाट डेटाचे वेगाने विश्लेषण करून भविष्यातील कल ओळखण्यास मदत करते, ज्यामुळे व्यावसायिकांना अचूक निर्णय घेता येतात.

**उद्योगांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध अनुप्रयोग :**

**१) आरोग्यसेवा :**

AI चा वापर कर्करोग्यासारख्या रोगांचा लवकर टप्प्यात शोध घेण्यासाठी वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण करण्यासाठी, उपचार योजना वैयक्तिकृत करण्यासाठी आणि औषध शोधला गती देण्यासाठी केला जात आहे.

**२) वित्त :**

आर्थिक क्षेत्रात AI अल्गोरिदमचा वापर फसवणूक शोधण्यासठी, अल्गोरिथमिक ट्रेडिंगसाठी आणि वैयक्तिकृत आर्थिक सल्ला देण्यासाठी केला जातो.

**३) शिक्षण :**

AI चा वापर विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिकृत शिक्षण मार्ग तयार करण्यासाठी, ग्रेडिंग स्वयंचलित करण्यासाठी आणि बुद्धिमान शिकवणी प्रणाली प्रदान करण्यासाठी केला जात आहे.

**४) वाहतूक :**

स्व-ड्रायव्हिंग कारचा विकास हा AI चा एक प्रमुख अनुप्रयोग आहे. याचा रहदारीचा प्रवाह ऑप्टिमाइझ करण्यासाठी आणि लॉजिस्टिक्स व्यवस्थापित करण्यासाठी देखील केला जातो.

**५) मनोरंजन :**

AI चा वापर व्हिडिओ गेम्समध्ये बुद्धिमान नोन- प्लेअर कॅरेक्टर तयार करण्यासाठी, संगीत आणि व्हिडिओ गेम्समध्ये बुद्धिमान नॉन- प्लेअर कॅरेक्टर तयार करण्यासाठी, संगीत आणि व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवांमध्ये सामग्री शिफारशींसाठी आणि अगदी कला आणि संगीत निर्मितीमध्ये केला जातो.

**६) रिटेल आणि ई- कॉमर्स :**

AI शिफारस इंजिनला शक्ती देते जे उपभोक्त्यांना उत्पादने सुचवितात, खरेदी अनुभव वैक्तिकृत करतात आणि इन्व्हेंटरी व्यवस्थापन ऑप्टीमाइझ करतात.

**७) उत्पादन :**

कारखान्यांमध्ये ऑटोमेशनसाठी AI-संचालित रोबोट्सचा वापर केला जातो आणि उपकरणांचे अपयश टाळण्यासाठी भविष्यसूचक देखाभालीसाठी AI प्रणालींचा वापर केला जातो.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे :**

**१) पुनरावृत्ती होणाऱ्या कामाचे ऑटोमेशन :**

AI संसारिक आणि पुनरावृत्ती होणारी कार्ये स्वयंचलित करू शकते, मानवी कामगारांना अधिक सृजनशील आणि धोरणात्मक प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मोकळे करते.

**२) वर्धित सुरक्षा :**

धोकादायक वातावारणात किंवा धोकादायक कार्यांसाठी, मानवी जीवनाचे धोके कमी करण्यासाठी AI- संचालित रोबोट्स तैनात केले जाऊ शकतात.

**३) वाढीव कार्यक्षमता आणि उत्पादकता :**

AI प्रणाली मानावांपेक्षा खूप वेगाने आणि अधिक अचूकपणे मोठ्या प्रमाणात डेटावर प्रक्रिया आणि विश्लेषण करू शकतात, ज्यामुळे कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होते.

**४) वैयक्तिकरण :**

AI मोठ्या प्रमाणात उत्पादने, सेवा आणि अनुभवांचे वैयक्तिकरण सक्षम करते.

**५) सुधारित निर्णयक्षमता :**

AI डेटाआधारित अंतर्दृष्टी प्रदान करू शकते जी व्यक्तींना आणि संस्थांना अधिक माहितीपूर्ण आणि प्रभावी निर्णय घेण्यास मदत करू शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**कृत्रिम बुद्धिमत्तेचे धोके :**

**१) गोपनीयतेची चिंता :**

AI एप्लिकेशन्सना बऱ्याचदा मोठ्या प्रमाणात डेटाची आवश्यकता असते, ज्यामुळे हा डेटा कसा गोळा केला जातो, वापरला जातो आणि संरक्षित केला जातो याबद्दल चिंता निर्माण होते.

**२) नोकरी विस्थापन :**

AI द्वारे कार्याचे ऑटोमेशन विशिष्ट उद्योगांमध्ये मानवी कामगारांच्या विस्थापनाबद्दल चिंता निर्माण करते.

**३) तंत्रज्ञानाचा गैरवापर :**

AI चा वापर स्वायत्त शस्त्रे किंवा अत्याधुनिक सायबर हल्ल्यांसारख्या दुर्भावानापूर्ण हेतूंसाठी केला जाण्याच्या क्षमतेबद्दल चिंता आहे.

**४) पक्षपात आणि निष्पक्षता :**

AI प्रणाली त्यांना प्रशिक्षित केलेल्या डेटावरून शिकतात. जर या डेटामध्ये पूर्वग्रह असतील, तर AI प्रणाली या पूर्वग्रहांना कायम ठेवू शकते आणि वाढवू शकते, ज्यामुळे अन्यायकारक किंवा भेदभावपूर्ण परिणाम होतात.

**५) उत्तरदायित्व आणि पारदर्शकता :**

जेव्हा AI प्रणाली चूक करते, तेंव्हा कोण जबाबदार आहे हे ठरवणे एक जटील कायदेशीर आणि नैतिक आव्हान असू शकते. काही डीप लर्निंग मॉडल्सचे “ब्लॅक बॉक्स” स्वरूप त्यांच्या निर्णय घेण्याच्या प्रक्रिया समजून घेणे कठीण बनवू शकते.

**निष्कर्ष :**

डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये AI हे विकासाचे इंजिन आहे. भारत सरकारने देखील “AI for All” या धोरणांतर्गत आरोग्य, शिक्षण आणि शेती या क्षेत्रात AI चा वापर वाढवण्यावर भर दिला आहे. भविष्यात जो देश किंवा जो व्यवसाय AI तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करेल, तोच जागतिक स्पर्धेत टिकून राहील.

**संदर्भ सूची:**

1. Mani N., ‘Digital Economics’, New Century Publications, New Delhi, 2024
2. Sudhakar A., ‘India’s Digital Economy Growth, Challenges, And Future Prospects’, Redshine Publication, Mumbai, 2024
3. Gangshetty ,R.V., Madari D.M.,Suresha K.P., ‘Digital Economy in India Issues and Challenges’,2023
4. Jordan Tim, ‘The Digital Economy’, publisher polity U.K.,2020
5. गोडबोले अच्युत, ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’, बुकगंगा पब्लिकेशन्स, पुणे, २०२१

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# १९४७ पासून शैक्षणिक सुधारणा ते राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020)

**महेंद्र सुभाष वाणी[1], तथागत मनोहर सुरवाडे[2]**
[1,2]संशोधक विद्यार्थी मू. जे. महाविद्यालय (स्वायत्त) जळगाव
**Email:** mahendrawn@gmail.com
**Email:** surwadeshubham1304@ gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180118
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 86-91
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*सदर शोधनिबंधात भारताच्या स्वातंत्र्यानंतर (१९४७) शिक्षण क्षेत्रात घडून आलेल्या महत्त्वपूर्ण शैक्षणिक सुधारणा, विविध आयोगांची भूमिका आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणांचा क्रमिक विकास यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग व कोठारी आयोग यांच्या शिफारशींमुळे शिक्षणाची रचना, अभ्यासक्रम, भाषा धोरण, शिक्षक प्रशिक्षण व सामाजिक समतेचा दृष्टिकोन कसा विकसित झाला याचे विश्लेषण करण्यात आले आहे. १९६८, १९८६ (आणि १९९२ मधील सुधारणा) या राष्ट्रीय शिक्षण धोरणांनी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर, महिला व वंचित घटकांच्या शिक्षणावर आणि शैक्षणिक पायाभूत सुविधांवर केलेल्या परिणामांचा आढावा घेण्यात आला आहे. विशेषतः राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) मधील ५+३+३+४ रचना, बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्याधारित व अनुभवाधिष्ठित शिक्षण, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि संशोधनाभिमुख दृष्टिकोन यांचे वैशिष्ट्यपूर्ण विश्लेषण करण्यात आले आहे. एकंदरीत, या अभ्यासातून भारतातील शिक्षणव्यवस्थेचा पायाभूत सुधारणांपासून ते २१व्या शतकातील गरजांशी सुसंगत अशा आधुनिक, समावेशक व लवचिक शिक्षणव्यवस्थेकडे झालेला प्रवास स्पष्ट होतो.*

***मुख्यशब्द:*** *शैक्षणिक सुधारणा, स्वातंत्र्योत्तर शिक्षण व्यवस्था, शैक्षणिक आयोग, राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८, राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020), ५+३+३+४ शिक्षण रचना, बहुविद्याशाखीय शिक्षण, महिला शिक्षण, उच्च शिक्षण.*

## प्रस्तावना

ब्रिटिश काळात शिक्षण व्यवस्था मुख्यतः प्रशासकीय गरजांपुरती मर्यादित ठेवली गेली. लॉर्ड मॅकॉलेच्या शिक्षण धोरणामुळे इंग्रजी भाषा, पाश्चिमात्य ज्ञानप्रणाली आणि नोकरशाहीला प्राधान्य देण्यात आले. परिणामी, भारतीय ज्ञानपरंपरा व स्थानिक भाषा शिक्षणातून दुय्यम ठरल्या. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणव्यवस्थेची पुनर्रचना करण्याची गरज प्रकर्षाने जाणवली. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाकडे राष्ट्रीय विकास, सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांची पायाभरणी करणारे साधन म्हणून पाहिले जाऊ लागले. विविध शैक्षणिक आयोग व समित्यांच्या माध्यमातून शिक्षणव्यवस्थेत मूलभूत सुधारणा राबविण्यात आल्या. या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश १९४७ पासूनचे राष्ट्रीय शिक्षण धोरण ते NEP २०२० पर्यंतच्या शैक्षणिक सुधारणांचा अभ्यास करणे हा आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

- स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेल्या प्रमुख शैक्षणिक आयोगांचा अभ्यास करणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*महेंद्र सुभाष वाणी, संशोधक विद्यार्थी मू. जे. महाविद्यालय (स्वायत्त) जळगाव*

**How to cite this article:**
*वाणी, . महेंद्र . सुभाष ., & सुरवाडे, . तथागत . मनोहर . (2026). १९४७ पासून शैक्षणिक सुधारणा ते राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020). Journal of Research & Development, 18(1(IV)), 86–91. https://doi.org/10.5281/zenodo.18169520*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18169520

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- विद्यार्थी, महिला शिक्षण, शिक्षक व उच्च शिक्षणावर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चे वैशिष्ट्ये, संधी व अंमलबजावणीतील आव्हाने स्पष्ट करणे.

**स्वातंत्र्योत्तर शैक्षणिक सुधारणा :**

**१ राधाकृष्णन आयोग (१९४८–४९):**

स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेला पहिला शिक्षण आयोग म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील विश्वविद्यालय शिक्षण आयोग होय. या आयोगाने उच्च शिक्षणाची पुनर्रचना करण्याची गरज अधोरेखित केली. शिक्षकांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागात उच्च शिक्षण पोहोचवणे, महिला शिक्षणाचा विस्तार करणे आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देणे या महत्त्वाच्या शिफारशी करण्यात आल्या. या आयोगाच्या शिफारशींनुसार १९५६ मध्ये विश्वविद्यालय अनुदान आयोग (UGC) स्थापन करण्यात आला, ज्यामुळे उच्च शिक्षण संस्थांच्या नियमनास एक सुसंगत दिशा मिळाली.

**२) मुदलीयार आयोग/ माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२–५३) :**

हा आयोग भारत सरकारने डॉ. ए. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली २३ सप्टेंबर १९५२ मध्ये नेमला. माध्यमिक शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी आणि सुधारणा सुचवण्यासाठी हा आयोग स्थापन केला होता. आयोगाने माध्यमिक शिक्षण हे केवळ उच्च शिक्षणाची तयारी न राहता जीवनोपयोगी आणि व्यावसायिकदृष्ट्या उपयुक्त असावे, अशी भूमिका मांडली. विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी व क्षमतांचा विचार करून अभ्यासक्रम रचना, व्यावसायिक शिक्षण, मार्गदर्शन सेवा आणि सहशालेय उपक्रमांवर भर देण्यात आला. आयोगाने ऑगस्ट १९५३ मध्ये २४४ पानी अहवाल सादर केला.

**शिक्षणाची रचना:**

- माध्यमिक शिक्षण ७ वर्षांचे (कनिष्ठ माध्यमिक: ३ वर्षे + उच्च माध्यमिक: ४ वर्षे).
- एकूण शालेय शिक्षण: प्राथमिक नंतर ११ वर्षे.
- उच्च माध्यमिक स्तरावर बहुउद्देशीय शाळा सुरू करणे.

**अभ्यासक्रम:**

- सैद्धांतिक आणि व्यावहारिक ज्ञानाचा समावेश.
- मुख्य विषय: मातृभाषा/प्रादेशिक भाषा, हिंदी, इंग्रजी, सामाजिक अभ्यास, विज्ञान, कला, हस्तकला इ.
- बाह्य परीक्षा कमी करणे, सतत मूल्यमापन.
- शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे.
- क्रिया-आधारित शिक्षण.
- व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाला प्रोत्साहन.
- मुलींसाठी गृहविज्ञान अनिवार्य.

**इतर शिफारशी:**

- शिक्षकांची स्थिती सुधारणे, प्रशिक्षण संस्था वाढवणे.
- नैतिक आणि धार्मिक शिक्षण.
- मार्गदर्शन आणि समुपदेशन सेवा.
- मुली, अनुसूचित जाती-जमातींसाठी विशेष योजना

**३) कोठारी आयोग (१९६४–६६)**

कोठारी आयोग हा स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात व्यापक आणि सर्वांगीण शिक्षण आयोग मानला जातो. ज्याने शिक्षणाला राष्ट्रीय विकासाशी जोडले. डॉ. डी. एच. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली १४ जुलै १९६४ रोजी भारत सरकारने हा आयोग नेमला. या आयोगाने संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा राष्ट्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**प्रमुख शिफारशी :**

१) १०+२+३ शिक्षण संरचना

२) तीन भाषा सूत्र म्हणजे मातृभाषा/प्रादेशिक भाषा, हिंदी व इंग्रजी यांचा स्वीकार करण्यात आला.

३) माध्यमिक स्तरापासून विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यावसायिक शिक्षणावर विशेष भर

या शिफारशींच्या आधारे १९६८ चे राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर करण्यात आले. कोठारी आयोगाने 'सामान्य शाळा प्रणाली' ही संकल्पना मांडून शैक्षणिक समतेवर भर दिला. कोठारी आयोग हा भारतातील राष्ट्रीय शिक्षा आयोग (National Education Commission, 1964-1966) म्हणून ओळखला जातो. आयोगाने २९ जून १९६६ रोजी "शिक्षा आणि राष्ट्रीय विकास" (Education and National Development) नावाचा ६९२ पानांचा अहवाल सादर केला.

**मुख्य शिफारशी**

- १० वर्षे शालेय शिक्षण (प्राथमिक + माध्यमिक), २ वर्षे उच्च माध्यमिक, आणि ३ वर्षे पदवी शिक्षण अशी १०+२+३ रचना.
- ६ ते १४ वयाच्या मुलांसाठी मोफत आणि अनिवार्य शिक्षण (कलम ४५ नुसार).
- मातृभाषा/प्रादेशिक भाषा, हिंदी आणि इंग्रजी (किंवा आधुनिक यूरोपीय भाषा).
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP) किमान ६% शिक्षणावर खर्च करावा. हा लक्ष्यांक आजही पूर्ण झालेला नाही.

**इतर शिफारशी:**

- मुलींचे शिक्षण, मागासवर्गीयांसाठी विशेष योजना राबविणे.
- शिक्षणात नैतिक आणि आध्यात्मिक मुल्यांचा समावेश करणे

**४) राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८**

हे भारताचे पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण असून समान संधी, राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक न्याय या तत्त्वांवर आधारित होते. प्राथमिक शिक्षणाचा विस्तार, विज्ञान शिक्षणावर भर आणि शिक्षक प्रशिक्षण सुधारणा हे या धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट होते. हे कोठारी आयोगाच्या (१९६४-१९६६) शिफारशींवर आधारित आहे आणि शिक्षणाला राष्ट्रीय विकास, एकात्मता आणि सामाजिक न्यायाशी जोडणारे ठरले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सरकारने संसदेत १९६८ मध्ये हे धोरण मांडले. शिक्षणाची "मूलगामी पुनर्रचना" करून राष्ट्रीय एकता, सांस्कृतिक आणि आर्थिक विकास साधणे. सदरहू धोरण शिक्षणाला राष्ट्र उभारणीचे साधन बनवण्यावर भर देते.

**मुख्य वैशिष्ट्ये / शिफारशी:** १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांसाठी मोफत आणि अनिवार्य शिक्षण (भारतीय संविधानाच्या कलम ४५ नुसार), शाळा सोडण्याचे / गळतीचे प्रमाण कमी करणे.

**शिक्षणाची रचना:**

१०+२+३ पद्धत: १० वर्षे शालेय शिक्षण (सामान्य), २ वर्षे उच्च माध्यमिक, ३ वर्षे पदवी.

त्रिभाषा सूत्र : माध्यमिक स्तरावर तीन भाषा शिकवणे १) मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा २) हिंदी. ३) इंग्रजी.

हिंदीला राष्ट्रीय भाषा म्हणून प्रोत्साहन, पण प्रादेशिक भाषांचा विकास आणि संस्कृतला महत्त्व.

शिक्षकांना समाजात मानाचे स्थान, चांगले वेतन, सेवा सुधारणा आणि प्रशिक्षण यासाठी शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणे. जाती, लिंग, प्रदेशीय असमानता दूर करून मुली तसेच मागासवर्गीयांसाठी विशेष योजना राबवून सर्वांना समान संधी प्राप्त करून देणे. विज्ञान आणि तांत्रिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे, व्यावसायिक शिक्षणाचा सामान्य शिक्षणात समावेश करणे. कार्यानुभव आणि सामाजिक सेवा अनिवार्य. नैतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्यशिक्षण यांचा अंतर्भाव करणे.

**समस्या:** १०+२+३ रचना आणि त्रिभाषा सूत्र यामुळे शिक्षण व्यवस्था एकसमान झाली. मात्र पुरेसा निधी आणि योजनेच्या अंमलबजावणीचा अभाव. काही राज्यांत त्रिभाषा सूत्राला विरोध करण्यात आला. तरीही, हे धोरण भारतीय शिक्षणाच्या आधुनिकीकरणाचा मैलाचा दगड ठरले. हे धोरण शिक्षणाला केवळ ज्ञान नव्हे तर राष्ट्रीय एकता आणि विकासाचे साधन बनवण्यासाठी महत्त्वाचे ठरले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

### ५) राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ व १९९२ मधील सुधारणा

राजीव गांधी सरकारच्या काळात जाहीर झालेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ चा उद्देश 'सर्वांसाठी शिक्षण' हा होता. ऑपरेशन ब्लॅकबोर्डद्वारे प्राथमिक शाळांमधील भौतिक सुविधा अद्ययावत करण्यावर भर देण्यात आला. नवोदय विद्यालयांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्यात आली. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU) स्थापन करून दूरस्थ शिक्षणाला चालना देण्यात आली. १९९२ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव सरकारच्या काळात या धोरणांतर्गत खाजगी सहभाग, गुणवत्ता सुधारणा, व्यावसायिक शिक्षण आणि माहिती-तंत्रज्ञानाचा वापर यांवर भर देण्यात आला.

### राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ ची मुख्य वैशिष्ट्ये

शिक्षण रचना १०+२+३ पद्धत देशभर लागू, १४ वर्षांपर्यंत मोफत आणि अनिवार्य शिक्षण, प्राथमिक शाळांमधील सुविधामध्ये सुधारणा करणेसाठी ऑपरेशन ब्लॅकबोर्ड योजना, ग्रामीण भागातील प्रतिभावान मुलांसाठी नवोदय विद्यालयांची निर्मिती करण्यात आली. अभ्यासक्रमात व्यावसायिक कौशल्यांचा समावेश केला गेला. महिलांना समान संधी, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्यकांसाठी विशेष भर. IGNOU सारख्या मुक्त विद्यापीठांची स्थापना करून दूरस्थ शिक्षणाला प्रोत्साहन. शिक्षणावर GDP च्या ६% खर्चाचे लक्ष्य इ. या धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. १९८६ च्या धोरणाने शिक्षणाला समावेशक आणि व्यावहारिक बनवले, १९९२ च्या सुधारणांनी अंमलबजावणीला गती दिली आणि खाजगी क्षेत्राच्या प्रवेशाने शिक्षणाचा विस्तार झाला. हे दोन्ही धोरण २०२० च्या नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा पाया आहेत. हे धोरण शिक्षणाला राष्ट्र उभारणी आणि सामाजिक न्यायाशी जोडणारे दुवा ठरले.

### महिला शिक्षणातील धोरणात्मक बदल

स्वातंत्र्यानंतर महिला शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले. राधाकृष्णन आयोगाने महिला उच्च शिक्षणावर भर दिला, तर १९८६ च्या धोरणात महिला साक्षरता, शिष्यवृत्ती, वसतिगृहे आणि विशेष प्रोत्साहन योजना राबविण्यात आल्या. या प्रयत्नांमुळे महिला साक्षरतेत लक्षणीय वाढ झाली आणि सामाजिक समतेच्या दिशेने सकारात्मक बदल घडून आले. भारतात स्वातंत्र्यानंतर महिला शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक धोरणात्मक बदल घडले. हे बदल शिक्षण आयोगांपासून ते राष्ट्रीय शिक्षण धोरणांपर्यंत आणि विशेष योजनांपर्यंत पसरलेले आहेत. महिला शिक्षणाला असमानता दूर करणे आणि सशक्तीकरणाशी जोडले गेले. १४ वर्षांपर्यंत मुलींसाठी मोफत व अनिवार्य शिक्षणाची तरतूद करण्यात आली. मागासवर्गीय मुलींसाठी विशेष योजना राबविण्यात आल्या.

### विशेष योजना आणि कार्यक्रम

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान अंतर्गत माध्यमिक स्तरावर मुलींची नावनोंदणी वाढवणे. बेटी बचाओ बेटी पढाओ (२०१५) अंतर्गत लिंग गुणोत्तर सुधारणे. तसेच उडान, सुकन्या समृद्धी योजना अंतर्गत आर्थिक प्रोत्साहन दिले गेले.

### शिक्षक, भौतिक सुविधा व भाषा धोरण

शिक्षक हे शिक्षणव्यवस्थेचे केंद्रबिंदू मानून विविध आयोगांनी शिक्षक प्रशिक्षण तसेच व्यावसायिक विकासावर भर दिला. भौतिक सुविधांच्या दृष्टीने शाळा इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि डिजिटल साधनसामग्री यांचा विस्तार करण्यात आला. भाषा धोरणाच्या बाबतीत मातृभाषा व बहुभाषिक शिक्षणाला महत्त्व देण्याची परंपरा कोठारी आयोगापासून सुरू झाली. शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करणे हे शिक्षणाची गुणवत्ता आणि समावेशकता वाढवण्यासाठी आवश्यक आहे.

### मुख्य धोरणात्मक बदल:

- ऑपरेशन ब्लॅकबोर्ड (१९८७): राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ च्या कार्य योजनेतून सुरू. सर्व प्राथमिक शाळांना किमान २ खोल्या, २ शिक्षक, ब्लॅकबोर्ड, नकाशे, खेळाचे साहित्य, शिक्षण साहित्य इ. सुविधा देण्याचे उद्दिष्ट होते.
- RTE कायदा २००९ अंतर्गत शाळांमध्ये अनिवार्य सुविधा देण्यात आल्या त्यामध्ये – स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ शौचालये (मुलींसाठी वेगळे), वर्गखोल्या, खेळाचे मैदान, लायब्ररी यांचा समावेश करण्यात आला.
- PM श्री शाळा योजनेंतर्गत १४,५०० शाळांना आधुनिक सुविधा पुरविण्यात येत आहेत.

### राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020)

२९ जुलै २०२० रोजी जाहीर झालेले राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे ३४ वर्षांनंतरचे नवे धोरण आहे. डॉ. कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला. या धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

येतील : १०+२ ऐवजी ५+३+३+४ शिक्षण संरचना, इयत्ता ५ वी पर्यंत मातृभाषेतून शिक्षणावर भर, बहुविद्याशाखीय व लवचिक अभ्यासक्रम, रटाळ पाठांतराऐवजी कौशल्याधारित व अनुभवाधिष्ठित मूल्यमापन, उच्च शिक्षणात बहु-प्रवेश व बहु-बाहेर पडण्याची सुविधा, Academic Bank of Credits व National Research Foundation इ. NEP 2020 चा उद्देश सर्वसमावेशक, दर्जेदार, संशोधनाभिमुख व रोजगारक्षम शिक्षणव्यवस्था निर्माण करणे हा आहे. विद्यार्थांवरील अभ्यासक्रमाचे ओझे कमी करून खेळ, कृती, शोध यांवर भर देण्यात आला आहे. १९८६ व १९९२ या धोरणातील पूर्ण न झालेले काम या धोरणात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे.

**१९४७ पासून शैक्षणिक सुधारणा ते राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) मधील फरक :**

NEP २०२० हे मागील सुधारणांपेक्षा अधिक आधुनिक आणि लवचिक आहे, ज्यात डिजिटल आणि बहुविद्याशाखीय बदल आहेत- मागील शैक्षणिक धोरणात/आयोगात (१९६८/१९८६) १०+२ रचना होती (वय ६ पासून सुरू), तर NEP २०२० मध्ये ५+३+३+४ (वय ३ पासून, बालवाडीसह) अशी संरचना आहे. उच्च शिक्षणात ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम, बहु-प्रवेश/निर्गमन आणि क्रेडिट बँक इ. चा अंतर्भाव दिसून येतो. मागील धोरणांमध्ये वार्षिक, वर्णनात्मक परीक्षा होत्या, तर NEP २०२० नुसार ३ री, ५ वी, ८ वी, १० वी, १२ वी या वर्गाच्या योग्य प्राधीकरणामार्फत परीक्षा घेतली जाईल. मागील धोरणांमध्ये कला/विज्ञान/वाणिज्य अशा शाखा होत्या, तर NEP मध्ये कुठलीही शाखा नाही, बहुविद्याशाखीय अभ्यासावर भर देण्यात आला आहे, M.Phil. बंद करण्यात आले आहे. मागील धोरणांमध्ये UGC, AICTE सारख्या अनेक संस्था होत्या, तर NEP मध्ये एकच HECI- Higher Education Commission of India, काही निवडक विदेशी विद्यापीठांना भारतात परवानगी आणि सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणासाठी MERUs (Multidisciplinary Education and Research Universities) या नावाने संस्था स्थापित केली जाईल. मागील धोरणांमध्ये तंत्रज्ञान कमी होते, तर NEP मध्ये तंत्रज्ञान वृद्धीसाठी NETF - National Education Technology forum या स्वायत्त संस्थेची स्थापना, e-content आणि डिजिटल ग्रंथालये यांचा समावेश करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक धोरणात B.Ed. ची किमान पात्रता नव्हती, तर NEP मध्ये ४ वर्षांचा B.Ed. अनिवार्य करण्यात आले आहे (२०३० पर्यंत). तसेच शिक्षणातील ४.४३ % GDP ६% करणेबाबत लक्ष्य निर्धारित करण्यात आलेले आहे.

**उद्देश आणि आव्हाने:** मागील शैक्षणिक धोरणातील सुधारणा प्रामुख्याने प्रवेश आणि साक्षरतेवर केंद्रित होत्या, तर NEP संशोधन, विचारशक्ती आणि २१व्या शतकातील कौशल्यांवर (उदा. Fieldwork, logical mastery) जोर देते. सदर NEP २०२० हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण म्हणजे शारीरिक, मानसिक, बौद्धिक अंगांचा परिपूर्ण विकास कसा होईल याकडे जास्तीत जास्त भर देण्यात आला आहे. याशिवाय विद्यार्थ्यांमधील अंगभूत कौशल्य ओळखून त्यांना रोजगाराभिमुख क्षेत्राकडे जाण्यासाठी अंगभूत कौशल्यांचा विकास कसा होईल याकडे लक्ष पुरविण्यात आले आहे. नवे शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे, संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे. एकंदरीत, १९४७ पासूनच्या सुधारणा पायाभूत होत्या, तर NEP २०२० हे जागतिक स्तरावरील कौशल्यांमध्ये स्पर्धात्मक बनवण्यासाठी आहे.

**सारांश :**

सदर शोधनिबंधामध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतर (१९४७) शैक्षणिक क्षेत्रात घडून आलेल्या संरचनात्मक व धोरणात्मक सुधारणा यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. विविध शैक्षणिक आयोग, राष्ट्रीय शिक्षण धोरणे आणि त्यांच्या अंमलबजावणीमुळे विद्यार्थी, महिला शिक्षण, शिक्षक, माध्यमिक व उच्च शिक्षण तसेच शैक्षणिक पायाभूत सुविधांवर झालेला परिणाम स्पष्ट करण्यात आला आहे. विशेषतः राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) हे पूर्वीच्या धोरणांपेक्षा कसे वेगळे आहे आणि २१ व्या शतकाच्या गरजांशी सुसंगत शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यास ते कसे उपयुक्त ठरू शकते, याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**संदर्भ :**

१) National Desk, राधाकृष्णन आयोग अहवाल (१९४९), Retrieved from https://maharashtratimes.com/government-policy/central-government-policy/what-is-university-education-commission/articleshow/91680592.cms on 01/01/2026

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

२) National Desk (Edi.), मुदलियार आयोग अहवाल (१९५३), (२५/०५/२०२२), Retrieve from https://maharashtratimes.com/government-policy/central-government-policy/mudliyar-commission/articleshow/91680588.cms on 01/01/2026

३) मोंडकर सुधीर, (२५/०१/२०१९), कोठारी आयोग अहवाल (१९६६), (२५/०१/२०१९), Retrieved from https://marathivishwakosh.org/3241/ on 02/01/2026

४) राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८, Retrieved from https://teachers.institute/higher-education/kothari-commission-first-national-education-policy-1968 on 01/01/2026

५) मोंडकर सुधीर, (२५/०१/२०१९) राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६, Retrieved from https://marathivishwakosh.org/3183/ on 01/01/2026

६) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अहवाल

७) साहू निरंजन, (७/१२/२०२१), Retrieved from https://www.orfonline.org/marathi/research/five-challenges-that-would-shape-the-outcome-of-nep-2020-96761 on 01/01/2026

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# स्त्री सक्षमीकरणात राज्यघटनेची भूमिका एक सैद्धांतिक व घटनात्मक अभ्यास

**सौ.गीता राजू कांबळे[1], डॉ. मोहन कांबळे[2]**
[1]प्राध्यापिका महाविद्यालय प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालय चिंचवड, पुणे
[2]मार्गदर्शक आदर्श शिक्षण व संशोधन केंद्र, कोथरूड पुणे

**Manuscript ID**:
JRD -2026-180119
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 92-99
January 2026

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*सदर शोधनिबंधात स्त्री सक्षमीकरणात भारतीय राज्यघटनेची भूमिका या विषयाचा सैद्धांतिक व घटनात्मक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेने महिलांना समानता, स्वातंत्र्य, न्याय व प्रतिष्ठेची हमी देत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून दिली आहे. संविधानातील मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये तसेच ७३ व ७४ व्या घटनादुरुस्त्यांद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणामुळे महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. या अभ्यासात अनुच्छेद १४, १५, १६, २१, ३९, ४२ आणि ५१A(e) यांसारख्या घटनात्मक तरतुदींचे विश्लेषण करून स्त्री सक्षमीकरणासाठी त्यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंधक कायदा (१९९४), घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा (२००५), कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (२०१३) आणि 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' यांसारख्या योजना यांचा स्त्री संरक्षण व सक्षमीकरणावर झालेला प्रभाव अधोरेखित करण्यात आला आहे. तथापि, कायदेशीर तरतुदी असूनही सामाजिक मानसिकता, लिंगभेद, रूढी व हिंसा ही स्त्री सक्षमीकरणातील प्रमुख आव्हाने असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते. त्यामुळे घटनात्मक अधिकारांची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती व शिक्षण यांची नितांत गरज अधोरेखित करण्यात आली आहे. एकंदरीत, भारतीय राज्यघटना ही महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी मजबूत आणि मार्गदर्शक आधारस्तंभ ठरते, असा निष्कर्ष या शोधनिबंधातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *स्त्री सक्षमीकरण, भारतीय राज्यघटना, समानता व सामाजिक न्याय, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, महिलांचे कायदेशीर हक्क, घटनात्मक तरतुदी, आरक्षण व राजकीय सहभाग, महिला संरक्षण कायदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर.*

## प्रस्तावना

भारत हा लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष व सार्वभौम राष्ट्र असून त्याच्या राज्यघटनेत सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या तत्वांची हमी दिली आहे. महिलांचे सक्षमीकरण हे कोणत्याही राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचे लक्षण मानले जाते. भारतीय राज्यघटनेने महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय अधिकार देऊन त्यांच्या विकासासाठी एक भक्कम पाया घातला आहे.

## स्त्री सक्षमीकरणाची संकल्पना:

स्त्री सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनाचे निर्णय घेण्यास स्वायत्तता व सामर्थ्य प्राप्त होणे. यामध्ये शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सहभाग, राजकीय प्रतिनिधित्व, कायदेशीर हक्क इत्यादींचा समावेश होतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सौ.गीता राजू कांबळे, प्राध्यापिका महाविद्यालय प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालय चिंचवड, पुणे*

**How to cite this article:**
*कांबळे, . गीता . राजू ., & कांबळे, . मोहन . (2026). स्त्री सक्षमीकरणात राज्यघटनेची भूमिका एक सैद्धांतिक व घटनात्मक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(IV)), 92–99. https://doi.org/10.5281/zenodo.18169539*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169539
OPEN ACCESS

**डॉ. आंबेडकरांचे योगदान:**

भारतीय संविधानात महिलांसाठी समान अधिकार आणि न्यायाची तरतूद होण्यासाठी डॉ. भीमराव आंबेडकर यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी स्त्रियांना सामाजिक न्याय, बंधुता व समान संधी या मूलभूत तत्त्वांची ग्वाही दिली.

**प्रत्यक्ष परिणाम:**

संविधान व त्यावर आधारलेल्या कायद्यांमुळे महिलांना शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात आरक्षण, लैंगिक शोषणाविरुद्ध संरक्षण, मातृत्वाच्या अधिकारांची guaranty, आणि श्रमकायद्यात संरक्षण मिळाले आहे.

**प्रमुख आव्हाने:**

कायद्यात सवलती असूनही, अनेकदा सामाजिक मानसिकता, असमानता, रूढी, हिंसा यामुळे महिलांच्या सक्षमीकरणात अडथळे येतात. त्यामुळे फक्त कायदा पुरेसा नाही तर जनजागृती, शिक्षण व न्यायालयीन सक्तीही महत्त्वाची आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय संविधान हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी मजबूत पाया आहे. समानता, विशेष सवलती आणि अधिकाराच्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या सर्व क्षेत्रात सहभाग वाढवू शकतील असे व्यापक संरक्षण दिले आहे.

**महिला सबलीकरणासाठी संविधानामुळे मिळालेले अधिकार:-**

- **हक्कांची हमी:** शिक्षण, समान रोजगार, संपत्ती व मालमत्तेतील हक्क, विवाह व घटस्फोट, न्याय मिळवण्याचा अधिकार, सार्वजनिक जीवनात सहभाग.
- **राजकीय सहभाग:** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे महिलांची संख्या आयोगाच्या निष्कर्षानुसार मोठ्या प्रमाणात वाढली आहे.
- **आर्थिक व सामाजिक क्षेत्रात समान संधी:** महिलांना विशेष सवलती, सरकारी योजना, कायदेशीर संरक्षण

**स्त्री सक्षमीकरणातील राज्यघटनेची भूमिका – विश्लेषणात्मक दृष्टिकोन:**

भारतीय राज्यघटनेने महिलांना फक्त अधिकारच दिले नाहीत, तर त्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध यंत्रणा व कायदे उपलब्ध करून दिले आहेत. लोकशाही मूल्यांमुळे महिलांना निवडणूक लढवण्याचा, मत देण्याचा व निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याचा अधिकार मिळाला. घटनात्मक प्रावधानांमुळेच समाजात महिलांच्या शिक्षणाचा व रोजगाराचा दर वाढलेला आहे. मात्र, अद्यापही ग्रामीण भागात लिंगभेद, बालविवाह, शिक्षणातील विषमता, स्त्रीद्वेष असे प्रश्न उभे आहेत. त्यामुळे घटनात्मक तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे. भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्याची चौकट नाही तर एक सामाजिक दस्तऐवज आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी तिची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सक्षमीकरणासाठी सामाजिक जागृतीबरोबरच संविधानाने दिलेल्या अधिकारांची माहिती व त्याचा उपयोग होणे गरजेचे आहे. भारतीय संविधान हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी मजबूत पाया आहे. समानता, विशेष सवलती आणि अधिकाराच्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या सर्व क्षेत्रात सहभाग वाढवू शकतील , असे व्यापक संरक्षण दिले आहे.

**भारतीय संविधानातील महिला सक्षमीकरणाचा महत्त्वपूर्ण भूमिका:**

भारतीय संविधानाने महिलांना समान अधिकार बहाल केले आहेत आणि त्यांच्यावर होणाऱ्या भेदभावाच्या विरोधात स्पष्ट भूमिका घेतली आहे. संविधानाच्या प्रस्तावनेत, मूलभूत अधिकारांमध्ये, मूलभूत कर्तव्यांमध्ये आणि दिग्दर्शक तत्त्वांत स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व रूजवले आहे.

**महत्वाच्या घटनादर्शिका कलमांची माहिती:**

- कलम १४: कायदा समोर सर्वांना समानता, कायद्याचे समान संरक्षण.
- कलम १५: केवळ धर्म, जात, लिंग, वंश, जन्मस्थान यांच्या आधारावर भेदभावास मनाई.
- कलम १५(३): राज्याला महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार (सकारात्मक भेदभाव).
- कलम १६: रोजगाराच्या बाबतीत समान संधी.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

- कलम ३९(अ), ३९(ड): पुरुष व महिला यांना समान उपजीविका संधी व समान कामासाठी समान वेतन.
- कलम ४२: कामाच्या मानवी अटी व मातृत्व सवलत.
- कलम ५१A(e): महिलांच्या प्रतिष्ठेला घातक असलेल्या प्रथांचा त्याग करण्याचे कर्तव्य.
- स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षणाची तरतूदही विधिमंडळात आणि ग्रामपंचायत, नगरपालिका इ. मध्ये करण्यात आली आहे.

महिलांना न्याय, समानता, प्रतिष्ठा आणि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांत संधी मिळवून देण्यासाठी hI klamao अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

**१. राज्यघटनेतील सक्षमीकरणासंबंधी तरतुदी:**

**(अ) मूलभूत अधिकारांतून स्त्रीसक्षमतेची हमी:**

**1. अनुच्छेद १४ – समानतेचा अधिकार:**

सर्व नागरिकांना कायद्याच्या दृष्टीने समानता आणि कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा अधिकार दिला आहे. यामध्ये लिंगभेद न करता स्त्रियांना पुरुषांप्रमाणे सर्व संधी मिळण्याचे आश्वासन आहे.

**भेदभाव प्रतिबंध व विशेष तरतुदी:**

राज्य कोणत्याही नागरिकाविरुद्ध लिंगावरून भेदभाव करू शकत नाही. उपklama(३) नुसार महिलांसाठी विशेष तरतुदी करता येतात – जसे स्त्रियांसाठी आरक्षण, सुरक्षा योजना इ.

**3. अनुच्छेद १६ – समान संधी अधिकार**: सरकारी सेवांमध्ये स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान संधी मिळतात.

**4. (अनुच्छेद २१) – जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार**: महिलांना सन्मानाने जीवन जगण्याचा व सुरक्षितता मिळवण्याचा अधिकार आहे.

**२. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे:**

**(अनुच्छेद ३९):** राज्य महिलांना पुरुषांच्या बरोबरीने उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देईल, असा मार्गदर्शक तत्वांमध्ये उल्लेख आहे.

**(अनुच्छेद ४२):** कामगार स्त्रियांसाठी प्रसूती विश्रांती व सुसंवादाचे व्यवस्थापन करणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

**३. स्त्रियांसाठी केलेल्या घटनात्मक सुधारणांचे योगदान:**

**1. ७३ वा व ७४ वा घटनादुरुस्ती कायदा (१९९२):**

ग्रामपंचायत व नगरपालिकांमध्ये महिलांना **३३%** आरक्षण देण्यात आले. यामुळे महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभाग वाढला.

**2. १०८ वा घटनादुरुस्ती विधेयक:**

महिला आरक्षण विधेयक: लोकसभा व विधानसभांमध्ये **३३%** आरक्षण देण्याचा उद्देश. (हा अजून पूर्णतः कायद्यात आला नाही.)

**४. राज्यघटनेने प्रेरित कायदे व योजना:**

भारतीय राज्यघटनेत स्त्रियांच्या आरोग्य, शिक्षण व सन्मानाच्या संरक्षणासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. संविधानातील समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार आणि कायद्यापुढे सर्वांना समान वागणूक या मूलभूत तत्वांनुसार महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कायदे लागू करण्यात आले आहेत. त्यामध्ये भ्रूणलिंग तपास व स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधक कायदा (PCPNDT Act), घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा, 2005, कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, 2013 आदींचा समावेश आहे. हे कायदे महिलांना भेदभाव, हिंसा, शोषण व आरोग्यावरील अन्यायकारक प्रथा यांपासून संरक्षण देत त्यांच्या आरोग्याची, शिक्षणाची व प्रतिष्ठेची हमी देतात.

**कायदे/योजना विवरण:**

1. स्त्री भ्रूण हत्या प्रतिबंधक कायदा, १९९४, - गर्भलिंग तपास व स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध.
2. घरेलू हिंसा प्रतिबंध कायदा २००५ - घरगुती हिंसेपासून महिलांचे संरक्षण.
3. लैंगिक छळ प्रतिबंध कायदा, २०१३ कामाच्या ठिकाणी स्त्रियांसाठी सुरक्षित वातावरण.

**1. स्त्री भ्रूण हत्या प्रतिबंधक कायदा, 1994**

(PCPNDT Act – Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques Act 1994)

**yaa kayadyaacaI उद्दिष्ट०:**

हा कायदा गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणेनंतर गर्भलिंग तपासून स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी बनवण्यात आला आहे.

**yaa kayadyaatIla महत्वाचे मुद्दे:**

- कोणत्याही गर्भवती महिलेचे गर्भलिंग तपासणे, जाहीर करणे किंवा सूचित करणे हे पूर्णपणे कायद्याने गुन्हा ठरवले गेले आहे.
- गर्भलिंग तपास करणाऱ्या डॉक्टर, रुग्णालय, केंद्र यांच्यावर कारवाई करता येते.
- स्त्री भ्रूणहत्येच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण मिळवणे हा यामागचा मुख्य हेतू आहे.
- दोषी आढळल्यास कारावास व दंड याची तरतूद आहे.

**yaa kayadyaacao परिणाम:**

या कायद्यामुळे लिंग निवडीचे प्रमाण कमी झाले असून, स्त्री-पुरुष जन्मदराचे प्रमाण सुधारणे सुरू आहे.

**2. घरगुती हिंसा प्रतिबंध कायदा, 2005**

**(Protection of Women from Domestic Violence Act, 2005)**

**yaa kayadyaacal उद्दिष्ट०:**

स्त्रियांना त्यांच्या घरात किंवा कौटुंबिक वातावरणात होणाऱ्या मानसिक, शारीरिक, लैंगिक, आर्थिक हिंसेपासून संरक्षण देणे.

**yaa kayadyaatIla महत्वाचे मुद्दे:**

- केवळ पतीच नव्हे, तर सासू, सासरे, नातेवाईक, किंवा सहवास करणाऱ्या व्यक्तीही यामध्ये दोषी ठरू शकतात.
- मानसिक त्रास, मारहाण, जबरदस्तीने आर्थिक नियंत्रण, लैंगिक छळ याचा समावेश घरगुती हिंसेमध्ये केला आहे.
- पीडित महिलेला न्यायालयाच्या आदेशाने संरक्षण, निवासाचा हक्क, प्रतिबंधक आदेश, आणि भत्त्याचा हक्क मिळू शकतो.
- 'संरक्षण अधिकारी' या नावाने नियुक्त अधिकाऱ्यांमार्फत महिला मदतीसाठी यंत्रणा काय-रत आहे.

**yaa kayadyaacao परिणाम:**

या कायद्यामुळे महिलांनी हिंसेविरुद्ध आवाज उठवायला सुरुवात केली आहे, आणि कायदेशीर संरक्षणाची जाणीव वाढली आहे.

**3. कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंध कायदा, 2013**

**(Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013)**

**yaa kayadyaacaI उद्दिष्ट०:**

कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित, सन्मानजनक, भयमुक्त वातावरण उपलब्ध करून देणे.

**yaa kayadyaatIla महत्वाचे मुद्दे:**

- अश्लील भाषा, शरीरसंपर्काची जबरदस्ती, अनुचित विनोद, अवांछित स्पर्श किंवा दृष्य – हे सर्व लैंगिक छळात येते.
- प्रत्येक संस्थेत आंतर समिती (Internal Complaints Committee) तयार करणे बंधनकारक आहे.
- 90 दिवसांच्या आत तक्रारीचा तपास पूर्ण करणे आवश्यक आहे.
- दोषी व्यक्तीवर शिस्तभंग, निलंबन, नोकरीवरून काढून टाकणे, दंड इ. कारवाईची तरतूद.
- फ्रीलान्स, कॉन्ट्रॅक्ट, इंटरनशिप करणाऱ्या महिलांनाही यामध्ये संरक्षण मिळते.

**yaa kayadyaacao परिणाम:**

या कायद्यामुळे कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षिततेची जाणीव निर्माण झाली आहे आणि कंपन्या याबाबत अधिक सजग झाल्या आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**निष्कर्ष:**

वरील सर्व कायदे व योजना महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. राज्यघटनेने महिलांना दिलेले हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठी हे कायदे आणि योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे अत्यावश्यक Aaho.

3. अनुच्छेद १६ – समान संधी अधिकार रकारी सेवांमध्ये स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान संधी मिळतात.

4. (अनुच्छेद २१) – जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार महिलांना सन्मानाने जीवन जगण्याचा व सुरक्षितता मिळवण्याचा अधिकार आहे.

**२. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे**

(अनुच्छेद ३९): राज्य महिलांना पुरुषांच्या बरोबरीने उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देईल, असा मार्गदर्शक तत्वांमध्ये उल्लेख आहे.

(अनुच्छेद ४२): कामगार स्त्रियांसाठी प्रसूती विश्रांती व सुसंवादाचे व्यवस्थापन करणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

**३. स्त्रियांसाठी केलेल्या घटनात्मक सुधारणांचे योगदान**

1. ७३ वा व ७४ वा घटनादुरुस्ती कायदा (१९९२):

ग्रामपंचायत व नगरपालिकांमध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्यात आले. यामुळे महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभाग वाढला.

2. १०८ वा घटनादुरुस्ती विधेयक – महिला आरक्षण विधेयक:

लोकसभा व विधानसभांमध्ये ३३% आरक्षण देण्याचा उद्देश. (हा अजून पूर्णतः कायद्यात आला नाही.)

**४. राज्यघटनेने प्रेरित कायदे व योजना:**

**कायदे/योजना विवरण:**

- स्त्री भ्रूण हत्या प्रतिबंधक कायदा, १९९४, - गर्भलिंग तपास व स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध.
- घरेलू हिंसा प्रतिबंध कायदा २००५ - घरगुती हिंसेपासून महिलांचे संरक्षण.
- लैंगिक छळ प्रतिबंध कायदा, २०१३ कामाच्या ठिकाणी स्त्रियांसाठी सुरक्षित वातावरण.
- बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना - मुलींचे जन्मदर वाढवणे व शिक्षणाला प्रोत्साहन. \

**स्त्री भ्रूण हत्या प्रतिबंधक कायदा, 1994**

(PCPNDT Act – Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques Act 1994)

**° उद्दिष्ट:**

हा कायदा गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणेनंतर गर्भलिंग तपासून स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी बनवण्यात आला आहे.

**महत्वाचे मुद्दे:**

- कोणत्याही गर्भवती महिलेचे गर्भलिंग तपासणे, जाहीर करणे किंवा सूचित करणे हे पूर्णपणे कायद्याने गुन्हा ठरवले गेले आहे.
- गर्भलिंग तपास करणाऱ्या डॉक्टर, रुग्णालय, केंद्र यांच्यावर कारवाई करता येते.
- स्त्री भ्रूणहत्येच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण मिळवणे हा यामागचा मुख्य हेतू आहे.
- दोषी आढळल्यास कारावास व दंड याची तरतूद आहे.

**परिणाम:**

या कायद्यामुळे लिंग निवडीचे प्रमाण कमी झाले असून, स्त्री-पुरुष जन्मदराचे प्रमाण सुधारणे सुरू आहे.

**घरगुती हिंसा प्रतिबंध कायदा, 2005**

**(Protection of Women from Domestic Violence Act, 2005)**

**उद्दिष्ट:**

स्त्रियांना त्यांच्या घरात किंवा कौटुंबिक वातावरणात होणाऱ्या मानसिक, शारीरिक, लैंगिक, आर्थिक हिंसेपासून संरक्षण देणे.

**महत्वाचे मुद्दे:**

- 1.केवळ पतीच नव्हे, तर सासू, सासरे, नातेवाईक, किंवा सहवास करणाऱ्या व्यक्तीही यामध्ये दोषी ठरू शकतात.
- 2. मानसिक त्रास, मारहाण, जबरदस्तीने आर्थिक नियंत्रण, लैंगिक छळ याचा समावेश घरगुती हिंसेमध्ये केला आहे.
- 3. पीडित महिलेला न्यायालयाच्या आदेशाने संरक्षण, निवासाचा हक्क, प्रतिबंधक आदेश, आणि भत्त्याचा हक्क मिळू शकतो.
- 4. 'संरक्षण अधिकारी' या नावाने नियुक्त अधिकाऱ्यांमार्फत महिला मदतीसाठी यंत्रणा काय-रत आहे.

**परिणाम:**

या कायद्यामुळे महिलांनी हिंसेविरुद्ध आवाज उठवायला सुरुवात केली आहे, आणि कायदेशीर संरक्षणाची जाणीव वाढली आहे.

**कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंध कायदा, 2013**
(Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013)

**yaa kayadyaacaI उद्दिष्टuo:**

कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित, सन्मानजनक, भयमुक्त वातावरण उपलब्ध करून देणे.

**yaa kayadyaatIla महत्वाचे मुद्दे:**

- अश्लील भाषा, शरीरसंपर्काची जबरदस्ती, अनुचित विनोद, अवांछित स्पर्श किंवा दृष्य – हे सर्व लैंगिक छळात येते.
- प्रत्येक संस्थेत आंतर समिती (Internal Complaints Committee) तयार करणे बंधनकारक आहे.
- 90 दिवसांच्या आत तक्रारीचा तपास पूर्ण करणे आवश्यक आहे.
- दोषी व्यक्तीवर शिस्तभंग, निलंबन, नोकरीवरून काढून टाकणे, दंड इ. कारवाईची तरतूद.
- फ्रीलान्स, कॉन्ट्रॅक्ट, इंटरनशिप करणाऱ्या महिलांनाही यामध्ये संरक्षण मिळते.

**yaa kayadyaacao परिणाम:**

या कायद्यामुळे कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षिततेची जाणीव निर्माण झाली आहे आणि कंपन्या याबाबत अधिक सजग झाल्या आहेत.

**बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना (2015)** (Beti Bachao Beti Padhao Scheme)

**उद्दिष्ट:**

कन्या भ्रूणहत्या थांबवणे, स्त्री-पुरुष जन्मदर वाढवणे, मुलींच्या शिक्षणाला व सबलीकरणाला चालना देणे.

**महत्वाचे मुद्दे:**

- ही योजना महिला व बालकल्याण मंत्रालय, मानव संसाधन विकास मंत्रालय, आणि आरोग्य मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबवली जाते.
- ज्या जिल्ह्यांमध्ये स्त्री-पुरुष जन्मदर कमी आहे, तिथे प्राधान्याने लागू.
- जनजागृती मोहीम, मुलींसाठी शिष्यवृत्ती, शाळांमध्ये प्रवेश, सुरक्षितता या गोष्टींवर भर.
- 'सेल्फी विथ डॉटर', 'बेटी है अनमोल' यांसारख्या सामाजिक उपक्रमांचा समावेश.

**परिणाम:**

काही राज्यांमध्ये स्त्री-पुरुष जन्मदरामध्ये सुधारणा झाली आहे. पालक व समाजामध्ये मुलींबाबत सकारात्मक दृष्टिकोन तयार होऊ लागला आहे. मुलींच्या शिक्षणाची टक्केवारी वाढू लागली आहे.

**निष्कर्ष:**

वरील सर्व कायदे व योजना महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. राज्यघटनेने महिलांना दिलेले हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठी हे कायदे आणि योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे अत्यावश्यक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**महिला सबलीकरणासाठी संविधानामुळे मिळालेले अधिकार:-**

- **हक्कांची हमी:** शिक्षण, समान रोजगार, संपत्ती व मालमत्तेतील हक्क, विवाह व घटस्फोट, न्याय मिळवण्याचा अधिकार, सार्वजनिक जीवनात सहभाग.
- **राजकीय सहभाग:** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे महिलांची संख्या आयोगाच्या निष्कर्षानुसार मोठ्या प्रमाणात वाढली आहे.
- **आर्थिक व सामाजिक क्षेत्रात समान संधी:** महिलांना विशेष सवलती, सरकारी योजना, कायदेशीर संरक्षण

**स्त्री सक्षमीकरणातील राज्यघटनेची भूमिका – विश्लेषणात्मक दृष्टिकोन:**

भारतीय राज्यघटनेने महिलांना फक्त अधिकारच दिले नाहीत, तर त्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध यंत्रणा व कायदे उपलब्ध करून दिले आहेत. लोकशाही मूल्यांमुळे महिलांना निवडणूक लढवण्याचा, मत देण्याचा व निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याचा अधिकार मिळाला. घटनात्मक प्रावधानांमुळेच समाजात महिलांच्या शिक्षणाचा व रोजगाराचा दर वाढलेला आहे. मात्र, अद्यापही ग्रामीण भागात लिंगभेद, बालविवाह, शिक्षणातील विषमता, स्त्रीद्वेष असे प्रश्न उभे आहेत. त्यामुळे घटनात्मक तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्याची चौकट नाही तर एक सामाजिक दस्तऐवज आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी तिची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सक्षमीकरणासाठी सामाजिक जागृतीबरोबरच संविधानाने दिलेल्या अधिकारांची माहिती व त्याचा उपयोग होणे गरजेचे आहे. भारतीय संविधान हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी मजबूत पाया आहे. समानता, विशेष सवलती आणि अधिकाराच्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या सर्व क्षेत्रात सहभाग वाढवू शकतील , असे व्यापक संरक्षण दिले आहे.

**भारतीय संविधानातील महिला सक्षमीकरणाचा महत्त्वपूर्ण भूमिका:**

भारतीय संविधानाने महिलांना समान अधिकार बहाल केले आहेत आणि त्यांच्यावर होणाऱ्या भेदभावाच्या विरोधात स्पष्ट भूमिका घेतली आहे. संविधानाच्या प्रस्तावनेत, मूलभूत अधिकारांमध्ये, मूलभूत कर्तव्यांमध्ये आणि दिग्दर्शक तत्त्वांत स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व रूजवले आहे.

**महत्वाच्या घटनादर्शिका कलमांची माहिती:**

- कलम १४: कायदा समोर सर्वांना समानता, कायद्याचे समान संरक्षण.
- कलम १५: केवळ धर्म, जात, लिंग, वंश, जन्मस्थान यांच्या आधारावर भेदभावास मनाई.
- कलम १५(३): राज्याला महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार (सकारात्मक भेदभाव).
- कलम १६: रोजगाराच्या बाबतीत समान संधी.
- कलम ३९(अ), ३९(ड): पुरुष व महिला यांना समान उपजीविका संधी व समान कामासाठी समान वेतन.
- कलम ४२: कामाच्या मानवी अटी व मातृत्व सवलत.
- कलम ५१A(e): महिलांच्या प्रतिष्ठेला घातक असलेल्या प्रथांचा त्याग करण्याचे कर्तव्य.
- स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षणाची तरतूदही विधिमंडळात आणि ग्रामपंचायत, नगरपालिका इ. मध्ये करण्यात आली आहे.

महिलांना न्याय, समानता, प्रतिष्ठा आणि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांत संधी मिळवून देण्यासाठी हे कलम अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

**डॉ. आंबेडकरांचे योगदान:**

भारतीय संविधानात महिलांसाठी समान अधिकार आणि न्यायाची तरतूद होण्यासाठी डॉ. भीमराव आंबेडकर यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी स्त्रियांना सामाजिक न्याय, बंधुता व समान संधी या मूलभूत तत्त्वांची ग्वाही दिली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**प्रत्यक्ष परिणाम:**

संविधान व त्यावर आधारलेल्या कायद्यांमुळे महिलांना शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात आरक्षण, लैंगिक शोषणाविरुद्ध संरक्षण, मातृत्वाच्या अधिकारांची guaranty, आणि श्रमकायद्यात संरक्षण मिळाले आहे.

**प्रमुख आव्हाने:**

कायद्यात सवलती असूनही, अनेकदा सामाजिक मानसिकता, असमानता, रूढी, हिंसा यामुळे महिलांच्या सक्षमीकरणात अडथळे येतात. त्यामुळे फक्त कायदा पुरेसा नाही तर जनजागृती, शिक्षण व न्यायालयीन सक्तीही महत्त्वाची आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय संविधान हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी मजबूत पाया आहे. समानता, विशेष सवलती आणि अधिकाराच्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या सर्व क्षेत्रात सहभाग वाढवू शकतील असे व्यापक संरक्षण दिले आहे.

**उपयुक्त संदर्भ:**


- महिला सक्षमीकरणासाठी संविधानातील कलमांची यादी: कलम १४, १५, १६, ३९, ४२, ५१A(e).
- जाती-लिंग आधारित भेदभावावर बंदी व समधर्मी न्याय्यासाठी राज्याला अधिकार.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतावादी दृष्टिकोन आणि महिलांसाठी केलेले प्रयत्न- त्रैमासिक
- maihlaa va baalah@k kayada,.

1. भारतीय राज्यघटना – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूल्यमापन
2. महिला व कायदे – भारत सरकार प्रकाशन
3. भारतातील महिला सक्षमीकरणावर केंद्र व राज्य सरकारांचे अहवाल
4. संबंधित घटनात्मक दुरुस्त्या व योजनांचे दस्तऐवजीकरण.
5. Important Constitutional and Legal Provisions for Women in India
6. Dr. B.R.Ambedkar’s Vision for Women Empowerment
7. Constitutional and Legal Framework of Women Empowerment in India

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# आर्थिक विकास -एक दृष्टिक्षेप

**डॉ.एम.टी.पावरा[1], छात्रसिंग थाव-या वसावे[2]**
[1]संशोधक मार्गदर्शक एस.एस.वि.पी.एस.बी.एन.एस.पाटील आर्ट्स & एमएफएम कॉमर्स कॉलेज,धुळे
[2]संशोधन विद्यार्थी एस.एस.वि.पी.एस.बी.एन.एस.पाटील आर्ट्स & एमएफएम कॉमर्स कॉलेज, धुळे

**Manuscript ID**:
JRD -2026-180120
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 100-102
January 2026

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*प्रस्तुत संशोधन विषयात आर्थिक विकासाची संकल्पना,आर्थिक विकासाचे मोजमाप आणि आर्थिक विकासाची वाढ व त्यावरील उपाय सुचविण्यात आले आहेत.आर्थिक विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय उत्पनातील वाढ नव्हे ,सामाजिक आर्थिक व मानवी विकासाची प्रक्रिया असल्याचे स्पष्ट होते.उत्पादन क्षमतेतील वाढ,उत्पन्न विषमतेतील घट,पायाभूत सुविधा,मानव विकास,तांत्रिक प्रगती व संस्थात्मक कार्यक्षमतेतील वाढ महत्वाचे मानले आहेत.तसेच मानवी विकास निर्देशांक,दारिद्र्यानिर्मुलन व पर्यावरणीय संतुलन यांचा उपयोग केला आहे.प्रस्तुत संशोधनातून असे दिसून येते की,समावेशक विकास हे संतुलित व शाश्वत धोरणाच्या अंमलबजावणी द्वारे दीर्घकालीन आर्थिक विकास शक्य होवू शकतो.*

## प्रस्तावना

अविकसित देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रश्नांचा जेव्हा विचार होतो. तेव्हा आपणास आर्थिक विकास काय हे समजून घेणे महत्त्वाचे आहेत. ॲडम स्मिथ यांच्या वेल्थ ऑफ नेशन्स या ग्रंथापासूनच एका अर्थाने आर्थिक विकासाच्या अभ्यास व कारणमीमांसेला प्रारंभ झाला.आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये विविध घटक सहाय्यक ठरत असतात.ढोबळमानाने या घटकांची नैसर्गिक साधने आणि मानवनिर्मित साधने असे वर्गीकरण करता येईल.या घटकामुळे देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. जर देशातील साधन संपत्ती विपुल प्रमाणात असेल, आणि त्या साधनसंपत्तीचा योग्य वापर केला. तर देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होते. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास त्या देशातील लोकसंख्या आणि नैसर्गिक साधनसंपत्ती या दोन घटकांवर प्रामुख्याने अवलंबून असते. सार्वजनिक क्षेत्राच्या अर्थशास्त्राचा अभ्यासात आर्थिक आणि सामाजिक विकास ही अशी प्रक्रिया आहे. ज्याद्वारे लक्षित उद्दिष्टे आणि उद्दिष्टानुसार राष्ट्रप्रदेश, स्थानिक समुदाय किंवा व्यक्तीची आर्थिक कल्याण आणि जीवनमान सुधारले जाते. आर्थिक विकास हा एक धोरणात्मक हस्तक्षेप आहे. जसा उद्देश लोकांचे कल्याण सुधारणे आहे. आर्थिक वाढ ही बाजारातील उत्पादकता आणि जी.डी.पी. मधील वाढीची घटना आहे. अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी आर्थिक वाढीचे वर्णन आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा एक पैलू असे केले आहे.

## उद्दिष्टे:

- आर्थिक विकासाची संकल्पना अभ्यासणे.
- आर्थिक विकासाचे मोजमाप कोणते ते अभ्यासणे.
- आर्थिक विकासात वाढ व्हावी यासाठी उपाययोजना सूचिवणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18169574

OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ.एम.टी.पावरा, संशोधक मार्गदर्शक एस.एस.वि.पी.एस.बी.एन.एस.पाटील आर्ट्स & एमफएमए कॉमर्स कॉलेज,धुळे*

**How to cite this article:**
*पावरा, . एम . टी ., & वसावे, . छात्रसिंग . थाव .-. या . (2026). आर्थिक विकास -एक दृष्टिक्षेप. Journal of Research & Development, 18(1(IV)), 100–102.* https://doi.org/10.5281/zenodo.18169574

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**संशोधन पद्धती:**

सदर शोध निबंध हा दुय्यम तथ्यावर आधारित आहे.संदर्भ-ग्रंथ, संशोधन पेपर, पुस्तके,संकेतस्थळ इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**आर्थिक विकास**

संपूर्ण राष्ट्राचा उत्पन्नातील वाढ ही गोष्ट आर्थिक विकासाच्या संदर्भात अभिप्रेत आहे. काही व्यक्तिगत उत्पन्न वाढले तर आर्थिक विकास झालाच असे म्हणता येत नाही.संपूर्ण राष्ट्राचे उत्पन्न किती वाढते यावर आर्थिक विकास किती झाला. हे अवलंबून असते जागतिक पदोपदीनंतर आर्थिक विकास हे अर्थशास्त्राचे एक उद्दिष्ट म्हणून मान्यता पावले आहे. आर्थिक विकासाने आर्थिक प्रगती तर सुचित होतेच पण विकास ही संकल्पना त्याच्या पलीकडे जाते.लोकांच्या एक कल्याणापुरती ही संकल्पना मर्यादित न राहता आर्थिक सामाजिक पुनर्रचनेची विविधअंगी प्रक्रिया असे स्पष्ट होते.आर्थिक विकास ज्या कारणामुळे होतो.त्या सर्वांची संपूर्ण आकलन झाल्याचा दावा आजही करता येणार नाही.आर्थिक विकासाचा अर्थ एकूण राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ म्हणजेच आर्थिक विकास होय. म्हणजेच आर्थिक विकास ही देशाचा एकूण उत्पन्नात आणि दरडोई उत्पादनात वाढणारी दीर्घकाळपर्यंत सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

**1. आर्थिक विकासाची संकल्पना अभ्यासणे:**

आर्थिक विकास ह्या संकल्पना अशी कोणतीही एक समावेशक व बिनचूक व्याख्या देता येणे अवघड आहे.बऱ्याच वेळा आर्थिक विकास,आर्थिक वृद्धी व दीर्घकालीन बदल हे शब्द एकाच अर्थाने वापरले जातात असे दिसून येते. मेयर व बाल्डवीन यांनी केलेली आर्थिक विकासाची व्याख्या साधारणपणे सार्वमान्य झालेली आहे.ती पुढील प्रमाणे आर्थिक विकास अशी प्रक्रिया होय की ज्याद्वारे अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न दीर्घकाळपर्यंत वाढत असणे. मेयर यांच्या मते,आर्थिक विकास ही अशी प्रक्रिया होय की ज्याद्वारे देशाचे प्रतिव्यक्ती शुद्ध उत्पन्न दीर्घकाळात वाढत असते.

**2. आर्थिक विकासाचे मापन:**

कोणत्या देशाचा आर्थिक विकास किती झाला. हे ठरविण्यासाठी वेगवेगळया अर्थशास्त्रज्ञांनी वेगवेगळया कल्पना लोकांसमोर ठेवल्या. आर्थिक विकास किती प्रमाणात झाला. याचे निर्देशक म्हणून पुढील बाबींचा विचार करणे महत्त्वाचे ठरेल.

- **शुद्ध राष्ट्रीय उत्पन्न:**

वेगवेगळया देशांचे राष्ट्रीय उत्पन्नातून तुलना करून कोणत्या देशाचा विकास जास्त झाला. व कोणत्या देशाचा कमी हे पाहता येते. विभिन्न देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत ज्या देशाची राष्ट्रीय उत्पन्न जास्त त्या देशाचा आर्थिक विकास जास्त व ज्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न कमी त्या देशाचा विकास कमी मानले जाते. ज्या राष्ट्राचे शुद्ध राष्ट्रीय उत्पन्न जास्त त्या राष्ट्राचा आर्थिक विकास जास्त झालेला आहे असे समजावे.

- **प्रति व्यक्ती उत्पन्न :**

देशातील लोकसंख्या वाढीचा विचार करून प्रतिव्यक्ती उत्पन्नावरून आर्थिक विकासाची मापन केले जाते. ज्या देशाचा प्रतिव्यक्ती शुद्ध उत्पन्न जास्त त्या देशाचा आर्थिक विकास जास्त तर ज्या देशाचा प्रति व्यक्ती उत्पन्न कमी त्या देशाचा आर्थिक विकास कमी असतो.

- **आर्थिक समानता** :

आर्थिक समानतेवरून ही त्या देशाचा आर्थिक विकास दर मोजला जातो. जर आर्थिक विषमता जास्त प्रमाणात असेल तर देशातील आर्थिक विकास हा असमतोल निर्माण होते. त्यामुळे सर्व घटकांना समान संधी व आर्थिक क्षमता निर्माण व्हावी तर देशाचा आर्थिक विकास झालेला आहे असे समजावे.

- **आर्थिक कल्याण :**

आर्थिक विकासाचे उद्दिष्टे आर्थिक कल्याण साधणे हे होईल. ज्या देशातील लोकांची आर्थिक कल्याण जास्त प्रमाणात तो देश जास्त विकसित तर आर्थिक कल्याण कमी प्रमाणावर असणारा देश कमी विकसित आहे. आर्थिक कल्याणात सतत वाढ होत असेल, तर त्या देशाचा आर्थिक विकास अधिक होत आहे.

**उपाययोजना:**

- दारिद्र्यात घट व्हावी त्यासाठी देशातील सरकारने विविध कल्याणकारी योजना राबविण्यात याव्यात.
- भांडवल निर्मितीत वाढ व्हावी त्यासाठी प्रयत्न करावे.
- लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी सरकारमार्फत नियोजन करावे.
- विदेशी गुंतवणुकीत वाढ करावी.
- लघुउद्योगांना प्रोत्साहन द्यावे.
- स्वदेशी उद्योग व बाल उद्योग यांना प्रोत्साहन द्यावे.

**सारांश:**

आर्थिक विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.जगातील प्रत्येक देशात कमी अधिक प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्धता असते.या नैसर्गिक साधनामुळे देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. प्रत्येक देशातील सरकारने नैसर्गिक साधन संपत्तीचा व

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

लोकसंख्येचा पर्याप्त वापर केल्यास आर्थिक विकास घडून येईल. देशातील आर्थिक विकास करण्यासाठी प्रत्येक श्रमिकाला काम मिळणे अभिप्रेत आहे. त्यामुळे देशातील लोकांची उपभोग व बचत प्रवृत्तीत वाढ होऊन गुंतवणुकीत वाढ होईल व देशाचा आर्थिक विकास साधला जाईल. यादृष्टीने प्रत्येक देश प्रयत्न केल्यास नक्कीच आर्थिक विकास साधला जाईल.

**संदर्भ सूची:**

1. गौरव दत्त बिश्वाजित नाग.दत्त एवं सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था .एस.चंद & कंपनी लि.प्रकाशक, २०२४
2. डॉ.जी.एन.झामरे – मनोहर पिंपळापुरे. भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र. पिंपळापुरे अँड कंपनी प्रकाशन,२००४
3. पत्की/साबळे. विकासाचे अर्थशास्त्र . पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर
4. प्रा. डॉ. एस. के.पगार. आर्थिक विकास आणि नियोजन. प्रशांत पब्लिकेशन
5. सय्यद नवाब हैदर नक्वी. विकासाचे अर्थशास्त्र सर्वसमावेशक वृद्धीच्या दिशेने. SAGE HBASHA प्रकाशन

www.wikipedia.com

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महिलांच्या जीवनातील बदलात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे मराठी साहित्य व कार्य योगदान

**डॉ.दीपक लोटन सूर्यवंशी**
सहयोगी प्राध्यापक , मराठी विभाग, धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर
**Email:** dipakls71@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180121
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 103-105
January 2026

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*सदर शोधनिबंधात स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महिलांच्या जीवनातील बदलांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या मराठी साहित्य व सामाजिक कार्याचे योगदान अभ्यासले आहे. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचून महिलांना आत्मभान, स्वावलंबन व सामाजिक जाणीव प्राप्त करून दिली. पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनवले. बालविवाह, सतीप्रथा, केशवपन, जातिभेद व स्त्री शोषण यांसारख्या अनिष्ट प्रथांविरुद्ध त्यांनी प्रत्यक्ष कृती व लेखनाच्या माध्यमातून संघर्ष केला. 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' या साहित्यकृतींमधून त्यांनी स्त्री-पुरुष समता, शिक्षणाचे महत्त्व, मानवी मूल्ये, सामाजिक न्याय व विद्रोही चेतना प्रभावीपणे मांडली. त्यांच्या साहित्याला सामाजिक प्रबोधनाची धार असून ते स्त्रीवादी आणि बहुजनवादी विचारधारेचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरते. तसेच १८९७ च्या प्लेगच्या साथीत केलेले त्यांचे सेवाकार्य हे त्यांच्या मानवतावादी दृष्टिकोनाचे श्रेष्ठ उदाहरण आहे. एकूणच, सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक व वैचारिक परिवर्तनाला दिशा मिळाली, असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *सावित्रीबाई फुले, स्त्री शिक्षण, स्त्री सक्षमीकरण, मराठी साहित्य, समाजसुधारणा, बहुजन चळवळ, स्त्रीवादी विचार, सामाजिक न्याय, स्वातंत्र्योत्तर कालखंड.*

## प्रस्तावना

सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रातील आणि संपूर्ण भारतातील स्त्रियांच्या आयुष्यात क्रांती घडवून आणली. मराठी स्त्रियांच्या प्रगतीत त्यांचे योगदान खालील मुद्द्यांनुसार अत्यंत महत्त्वाचे आहे:

**१. स्त्री शिक्षणाची गंगोत्री**:

सावित्रीबाईंनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्या काळात स्त्रियांना शिक्षण निषिद्ध असताना त्यांनी स्वतः शिक्षण घेतले आणि इतर स्त्रियांसाठी ज्ञानाची दारे उघडली. सावित्रीबाई फुले माहिती

**२. सामाजिक अनिष्ट प्रथांविरुद्ध लढा:**

मराठी समाजातील सती प्रथा, बालविवाह आणि केशवपनासारख्या क्रूर रूढींविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. विधवांचे शोषण थांबावे म्हणून त्यांनी १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:

**Address for correspondence:**
*डॉ.दीपक लोटन सूर्यवंशी, सहयोगी प्राध्यापक , मराठी विभाग, धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169617
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*सूर्यवंशी, . दीपक . लोटन . (2026). स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महिलांच्या जीवनातील बदलात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे मराठी साहित्य व कार्य योगदान. Journal of Research & Development, 18(1(IV)), 103–105. https://doi.org/10.5281/zenodo.18169617*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**३. स्त्री हक्क आणि स्वाभिमान**:

स्त्रियांनी केवळ सुशिक्षित न होता स्वावलंबी व्हावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी 'महिला सेवा मंडळ' स्थापन करून स्त्रियांना त्यांचे हक्क आणि मानवी अधिकारांची जाणीव करून दिली.

**४. साहित्य आणि विचार:**

'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' यांसारख्या साहित्यातून त्यांनी स्त्रियांच्या व्यथा मांडल्या आणि त्यांना विद्रोहाची प्रेरणा दिली.

**५. कठीण काळात सेवा:**

१८९७ च्या प्लेगच्या साथीत त्यांनी स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता रुग्णांची सेवा केली, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या या बलिदानामुळे मराठी स्त्रियांमध्ये सेवाभावाची प्रेरणा कायम राहिली.

आजची आधुनिक मराठी स्त्री जी शिक्षण, राजकारण आणि विज्ञानात प्रगती करत आहे, तिचे मूळ सावित्रीबाईंच्या संघर्षात आहे. म्हणूनच त्यांना 'भारतीय स्त्री शिक्षणाच्या जननी' मानले जाते. सावित्रीबाई फुले या भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या.त्यांना 'भारतीय स्त्री शिक्षणाच्या जनक' मानले जाते.

**सावित्रीबाई फुले यांच्याबद्दलची महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:**

- जन्म आणि बालपण: त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला
- शिक्षण प्रसार: त्यांनी त्यांचे पती महात्मा जोतिराव फुले यांच्या सोबतीने १ जानेवारी १८४८ रोजी पुण्याच्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली
- पहिली महिला शिक्षिका: सावित्रीबाई फुले या आधुनिक भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत्या
- समाजसुधारणा: त्यांनी सती प्रथा, बालविवाह आणि केशवपन यांसारख्या अनिष्ट प्रथांविरुद्ध लढा दिला. त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले आणि विधवांच्या पुनर्ववाहाला प्रोत्साहन दिले
- साहित्य: त्यांनी 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' यांसारखे काव्यसंग्रह लिहिले
- मृत्यू: १८९७ मध्ये पुण्यात प्लेगची साथ पसरली असताना, रुग्णांची सेवा करत असताना त्यांना स्वतःला प्लेग झाला आणि १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

**सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:**

- स्त्री शिक्षणाचे अग्रदूत: त्यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात भिडे वाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली.शिक्षणापासून वंचित असलेल्या महिलांसाठी त्यांनी शिक्षणाची दारे उघडली
- सामाजिक समतेचा लढा: त्यांनी केवळ स्त्रियांसाठीच नाही, तर दलित आणि मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणासाठीही पुढाकार घेतला जातीभेदाविरुद्ध त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला
- बालविवाह आणि सतीप्रथेला विरोध: त्या काळातील अनिष्ट प्रथा जसे की बालविवाह, सती प्रथा आणि केशवपन यांविरुद्ध त्यांनी तीव्र लढा दिला.
- विधवांचे पुनर्वसन: विधवा महिलांचे शोषण थांबवण्यासाठी त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले आणि विधवांच्या पुनर्विवाहाचे समर्थन केले
- सत्यशोधक समाजाचे नेतृत्व: महात्मा जोतिराव फुले यांच्या निधनानंतर त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा समर्थपणे सांभाळली
- साहित्यिक योगदान: 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' यांसारख्या साहित्यातून त्यांनी सामाजिक प्रबोधन केले
- मानवतावादी दृष्टिकोन: १८९७ च्या प्लेगच्या महामरीत स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता त्यांनी रुग्णांची सेवा केली, ज्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला

त्यांच्या सन्मानार्थ पुणे विद्यापीठाचे नाव बदलून 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असे ठेवण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले या भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. त्यांना 'भारतीय स्त्री शिक्षणाच्या जनक' मानले जाते. सावित्रीबाई या एक प्रतिभासंपन्न कवयित्री होत्या. जोतीरावांसारख्या सुधारक पतीची सोबत, प्रबोधनातील नवविचारांचे संस्कार आणि आंदोलनातील अनुभव यांमुळे त्यांच्यामधील काव्यगुण बहरून आले; मात्र दीर्घकाळ त्यांचे साहित्य महाराष्ट्राला ज्ञात नव्हते. १९८८ मध्ये अभ्यासक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

डॉ. मा. गो. माळी यांनी 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' या ग्रंथाद्वारे ते प्रकाशात आणले. सावित्रीबाईंच्या 'काव्यफुले' (१८५४) या काव्यसंग्रहात एकूण ४१ कविता आहेत. त्या स्थूलमानाने निसर्गविषयक, सामाजिक, आत्मपर, बोधपर आणि इतिहासविषयक अशा आहेत. सावित्रीबाईंच्या साहित्यावर जोतीरावांच्या विचारांचा निश्चितपणे प्रभाव होता; मात्र त्यांचे लिखाण ही एक स्वतंत्र अभिव्यक्ती आहे. त्यांच्या काव्यातून जोतीरावांविषयीचा आदरभाव; स्त्री-पुरुष नात्यातला समताभाव; निसर्गसौंदर्य पाहून पुलकित होणारे, उचंबळणारे स्त्रीमन अतिशय तरलपणे व्यक्त झाले आहे. तसेच भारतीय खेड्यांमधील कृषक संस्कृतीचे मनोहारी चित्रण, निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि त्यांबद्दलचा कृतज्ञताभाव या कवितांमधून त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच या कवितांमधून स्त्री-पुरुष नात्यातील उतरंड, शोषक लिंगभावसंबंध, पुरुषाची भ्रमरवृत्ती यांविषयी स्त्रीमनाचे हुंकार व्यक्त झाले आहेत. त्यांचा मूळ पिंड समाजसुधारणावादी होता. ज्ञानाची महती, शिक्षणाचे महत्त्व, मनुष्यत्वाचे सार अशा विषयांना वाहिलेल्या कविता त्यांनी प्राधान्याने लिहिल्या. 'स्वागतपर पद्य' हे स्वागतगीत किंवा बाहुलीसारख्या विषयावरील कविता त्यांनी शाळेतील विद्यार्थिनींसाठी रचल्या असाव्यात. लहान मुलींना घरकामाला न जुंपता त्यांना शाळेत पाठवले पाहिजे, हा विचार त्यांनी अधोरेखित केला. ग्रामीण भागातील स्त्रीशिक्षणाविषयीची उदासीनता पाहता हा विचार आजही किती लागू पडतो, हे लक्षात घेण्याजोगे आहे.

सावित्रीबाईंचा दुसरा कवितासंग्रह 'बावनकशी सुबोध रत्नाकर' (१८९२) म्हणजे जोतीरावांचे काव्यमय असे आद्यचरित्रच होय. तसेच भारतातील शूद्रातिशूद्रांना केंद्रस्थानी ठेवून लिहिलेला त्यांच्या मुक्तीचा हा पहिला काव्यमय इतिहास आहे. या कवितासंग्रहामध्ये वैदिक काळ ते इंग्रजी राजवट आणि फुलेंची चळवळ असा भारतीय इतिहासाचा मोठा पट सावित्रीबाईंनी मांडला आहे. सावित्रीबाईंनी आपल्या काव्यातून अभिजन, ब्राह्मणी, वैदिक परंपरेविरुद्ध विद्रोह उभारला आणि गौतम बुद्ध, बळी राजा, छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी ताराबाई यांचे आदर्श उभे करत त्यांनी अवैदिक परंपरेशी नाते जोडले. यातील ताराबाईंवरील पोवाडा हा एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीवर रचलेला पोवाडा म्हणून महत्त्वाचा आहे. तसेच एखाद्या स्त्रीने शिवाजी महाराजविषयक रचलेली कविता म्हणूनही ती लक्षणीय आहे. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात धर्मकल्पना, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा यांनी येथील बहुजनांना मानसिक गुलामगिरीत जखडले होते. त्यांविरुद्धचा विद्रोह सावित्रीबाईंच्या लेखणीतून व्यक्त होतो. अभंगासारखे लोकाभिमुख काव्यप्रकार त्यांनी हाताळले. १८५६ साली जोतीरावांची भाषणे प्रकाशित केली. यांखेरीज सावित्रीबाईंनी जोतीरावांना लिहिलेली पत्रे आणि त्यांची भाषणेही प्रकाशित झाली आहेत. त्यातून उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसने व कर्ज यांसारखे विषय त्यांनी हाताळले असून खटकणाऱ्या गोष्टींचा खरमरीत शब्दांत समाचारही घेतला आहे. दारू, जुगार व वेश्यागमन या तीन गोष्टी पुरुषाला दुराचारी बनवतात आणि म्हणून त्यांपासून पुरुषांनी लांब राहिले पाहिजे, अशी पुरुषवर्गाची कानउघडणी त्यांनी केली आहे. लोकशिक्षणासाठी गोष्टी-वेल्हाळ शैलीचा उपयोग अधिक परिणामकारक आहे, हे ओळखून उदाहरणे देत उद्योग, सदाचरण व विद्यादान यांचे महत्त्व त्यांनी पटवून दिले आहे. सावित्रीबाईंच्या खंबीर नेतृत्वानंतर सत्यशोधक चळवळीची परंपरा सत्यशोधक विचारांचा संस्कार झालेल्या अनेक स्त्रियांनी पुढे नेली. तान्हुबाई बिर्जे (१८७६–१९१३) यांनी 'दीनबंधू' या नियतकालिकाच्या संपादक म्हणून काही वर्षे काम पाहिले. सावित्रीबाई रोडे (कार. १८९०–१९३०) या रामोशी समाजातील महिलेने 'रामोशी समाचार' या नियतकालिकातून दलितांच्या व्यथा मांडल्या. १९२५ साली विदर्भातील वर्धा येथे लक्ष्मीबाई नायडू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्यशोधक महिला परिषदेला पाच हजार महिला हजर होत्या. शांताबाई बनकर यांनी १९३९ मध्ये सावित्रीबाईंचे छोटे चरित्र लिहिले. सावित्रीबाईंवर आजवर जवळपास ४० छोटीमोठी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या काही कवितांचा इंग्रजीत अनुवादही झाला आहे. सुषमा देशपांडे यांनी 'व्हय मी सावित्रीबाई' या मराठी एकपात्री नाटकाचे प्रयोग भारतभर केले आहेत. सावित्रीबाईंच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन 'बालिकादिन' म्हणून साजरा केला जातो. सावित्रीबाईंच्या कार्याचे क्रांतिकारी स्वरूप लक्षात घेऊन त्यांना 'क्रांतिज्योती' ही उपाधी दिली गेली. तसेच ९ ऑगस्ट २०१४ या दिवशी पुणे विद्यापीठाचे नामकरण 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असे करण्यात आले. १४ फेब्रुवारी २०२२ या दिवशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला.

**संदर्भ:**

1. नरके, हरी (संपा.), 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय', महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने समिती, मुंबई, २०१८.
2. माळी, मा. गो. आणि इतर (संपा.), 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले: काळ आणि कर्तृत्व', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८.
3. माळी, मा. गो., 'क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले', मॅजेस्टिक, ठाणे, २०१२ (पहिली आवृत्ती : १९८०)
4. ताबाई बनकर (१९३९) सावित्रीबाईंचे चरित्र

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप एक अभ्यास: (विषेश संदर्भ कालखंड १९९० ते २०२०)

**श्री.पांडुरंग साहेबराव पाटील[1], प्रा. डॉ.संदीप भाऊराव नेरकर[2]**
[1]संशोधक
[2]संशोधन मार्गदर्शक पी.जी. राज्यशास्त्र विभाग प्रताप कॉलेज, अमळनेर
**Email:** bkpspatil@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180122
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 106-109
January 2026

***सारांश***

*भारतीय संघराज्य ही केवळ घटनात्मक रचना नसून ती एक सतत बदलणारी आणि परिस्थितीनुसार स्वतःला जुळवून घेणारी राजकीय प्रक्रिया आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या चार दशकांत केंद्र सरकारचे वर्चस्व, एकपक्षीय राजवट, केंद्रीकृत नियोजन आणि आपत्कालीन तरतुदींचा वापर यामुळे भारतीय संघराज्याचे स्वरूप तुलनेने एककेंद्री राहिले. मात्र १९९० नंतरचा कालखंड हा भारतीय संघराज्यवादाच्या इतिहासातील निर्णायक टप्पा ठरतो. आर्थिक उदारीकरण, आघाडी सरकारांचा उदय, प्रादेशिक पक्षांचे बळकटीकरण, न्यायालयीन हस्तक्षेप, वस्तू व सेवा कर (GST) प्रणाली, तसेच कोविड–१९ महामारी यांसारख्या घडामोडींमुळे केंद्र–राज्य संबंधांत लक्षणीय बदल झाले. हा संशोधन प्रबंध १९९० ते २०२० या कालावधीत भारतीय संघराज्याच्या बदलत्या स्वरूपाचा सविस्तर अभ्यास करतो. या अभ्यासात संघराज्यवादाचे राजकीय, आर्थिक, प्रशासकीय आणि घटनात्मक पैलू विश्लेषित करण्यात आले आहेत. विशेषतः सहकारी, स्पर्धात्मक आणि अलीकडील काळातील केंद्रीकरणात्मक प्रवृत्ती यांचा परस्पर संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न या संशोधनात करण्यात आला आहे.*

***महत्वाचे शब्द:*** *संघराज्यवाद, केंद्र–राज्य संबंध, सहकारी संघराज्यवाद, स्पर्धात्मक संघराज्यवाद, असममित संघराज्यवाद, आर्थिक उदारीकरण, GST, प्रादेशिक पक्ष, न्यायालयीन हस्तक्षेप*

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

**प्रस्तावना**

संघराज्यवाद ही अशी शासनपद्धती आहे ज्यामध्ये सत्तेचे घटनात्मक विभाजन केंद्र आणि राज्य यांच्यात केलेले असते. भारतीय संविधानाने भारताला 'राज्यांचा संघ' (Union of States) असे संबोधले असून, एक मजबूत केंद्र आणि स्वायत्त राज्ये यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय संघराज्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची लवचिकता सामान्य परिस्थितीत संघराज्यात्मक आणि संकटाच्या काळात एककेंद्री स्वरूप स्वीकारण्याची क्षमता. १९९० पूर्वीचा कालखंड केंद्रप्रधान संघराज्यवादाचा होता. काँग्रेस पक्षाचे दीर्घकाळ वर्चस्व, नियोजन आयोगाद्वारे नियंत्रित आर्थिक विकास आणि कलम ३५६ चा वारंवार वापर यामुळे राज्यांची स्वायत्तता मर्यादित राहिली. मात्र १९९० नंतर जागतिकीकरण, आर्थिक सुधारणांची सुरुवात, आणि राजकीय बहुपक्षीयता यामुळे संघराज्याच्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल घडून आले. त्यामुळे भारतीय संघराज्यवादाचा अभ्यास या कालखंडाच्या संदर्भात करणे अत्यंत आवश्यक ठरते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्री.पांडुरंग साहेबराव पाटील, संशोधक*

**How to cite this article:**
*पाटील, . पांडुरंग . साहेबराव ., & नेरकर, . संदीप . भाऊराव . (2026). भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप एक अभ्यास: (विषेश संदर्भ कालखंड १९९० ते २०२०). Journal of Research & Development, 18(1(IV)), 106–109. https://doi.org/10.5281/zenodo.18169639*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169639
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**संशोधन पद्धती:**

या संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) आणि विश्लेषणात्मक (Analytical) या दोन्ही पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला असून त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे:

- भारतीय संविधान आणि घटनादुरुस्त्या
- सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्णय
- संशोधन लेख, पीएच.डी. प्रबंध आणि पुस्तके
- आर्थिक व राजकीय विश्लेषणात्मक अहवाल
- राष्ट्रीय वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतील लेख

या सर्व साधनांच्या आधारे भारतीय संघराज्याच्या बदलत्या स्वरूपाचे सुसंगत विश्लेषण करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- १९९० ते २०२० या कालखंडातील भारतीय संघराज्याच्या स्वरूपातील बदलांचा अभ्यास करणे.
- आर्थिक उदारीकरणाचा केंद्र–राज्य संबंधांवर झालेला परिणाम विश्लेषित करणे.
- आघाडी सरकारे व प्रादेशिक पक्षांच्या भूमिकेचा संघराज्यवादावर झालेला प्रभाव स्पष्ट करणे.
- GST व इतर संस्थात्मक सुधारणांचा संघराज्यीय संतुलनावर झालेला परिणाम अभ्यासणे.
- अलीकडील केंद्रीकरणात्मक प्रवृत्तींचे परिणाम समजून घेणे.

**संशोधनाची गृहीतके:**

- १९९० नंतर भारतीय संघराज्यवाद अधिक गतिशील व बहुआयामी झाला आहे.
- आघाडी सरकारांच्या काळात राज्यांचे राजकीय महत्त्व वाढले आहे.
- आर्थिक सुधारणांमुळे राज्यांमध्ये स्पर्धात्मक संघराज्यवाद उदयास आला आहे.
- GST आणि आपत्ती व्यवस्थापनासारख्या धोरणांमुळे केंद्राचे प्रशासकीय व आर्थिक वर्चस्व वाढले आहे.

**संशोधनाचे विश्लेषण:**

१९९० ते २०२० हा कालखंड भारतीय संघराज्याच्या विकासप्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक टप्पा मानला जातो. या तीस वर्षांच्या कालावधीत भारतीय संघराज्य केवळ घटनात्मक चौकटीपुरते मर्यादित न राहता, राजकीय व्यवहार, आर्थिक धोरणे, प्रशासकीय रचना आणि न्यायालयीन हस्तक्षेप यांच्या माध्यमातून सतत बदलत गेले. या काळात संघराज्यवादाचे स्वरूप अधिक गतिमान, बहुआयामी आणि कधीकधी विरोधाभासी झालेले दिसून येते. सहकारी संघराज्यवाद, स्पर्धात्मक संघराज्यवाद आणि काही प्रसंगी केंद्रीकरणात्मक संघराज्यवाद अशी विविध रूपे या कालखंडात अनुभवास आली. या बदलांचे सखोल विश्लेषण पुढील उपघटकांच्या माध्यमातून करता येते.

**१. १९९० पूर्व व १९९० नंतरच्या संघराज्यवादाची तुलना**

१९९० पूर्वीचा भारतीय संघराज्याचा काळ मुख्यत्वे केंद्रप्रधान संघराज्यवादाचा होता. स्वातंत्र्यानंतर दीर्घकाळ एकपक्षीय राजवट अस्तित्वात असल्यामुळे केंद्र सरकारचे वर्चस्व प्रबळ राहिले. नियोजन आयोगाच्या माध्यमातून आर्थिक विकासाचे केंद्रीकृत नियोजन करण्यात येत होते. राज्य सरकारे केंद्रावर आर्थिक, प्रशासकीय आणि राजकीयदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर अवलंबून होती. याच काळात संविधानातील कलम ३५६ चा वापर अनेक वेळा करण्यात आला, ज्यामुळे राज्य सरकारे बरखास्त करण्यात आली आणि केंद्राचा हस्तक्षेप वाढला. परिणामी राज्यांची स्वायत्तता मर्यादित राहिली आणि संघराज्यवादाचा समतोल ढासळलेला दिसून येतो. याउलट १९९० नंतरचा कालखंड हा भारतीय संघराज्याच्या विकेंद्रीकरणाकडे वाटचाल करणारा ठरतो. राजकीय पातळीवर बहुपक्षीयता वाढली, आघाडी सरकारे अस्तित्वात आली आणि प्रादेशिक पक्षांचे महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले. आर्थिक सुधारणांमुळे केंद्राचे काहीसे नियंत्रण कमी झाले आणि राज्यांना नव्या भूमिका स्वीकारण्याची संधी मिळाली. न्यायालयीन हस्तक्षेपामुळेही संघराज्यवादाला घटनात्मक संरक्षण मिळाले. त्यामुळे १९९० नंतरचा संघराज्यवाद अधिक बहुआयामी, संवादाधिष्ठित आणि वाटाघाटीप्रधान बनला, असे म्हणता येते.

**२. आर्थिक उदारीकरण आणि संघराज्यीय संरचनेतील बदल**

१९९१ मध्ये स्वीकारलेले आर्थिक उदारीकरणाचे धोरण हे भारतीय संघराज्याच्या स्वरूपात बदल घडवून आणणारे एक महत्त्वाचे वळण ठरले. या धोरणांमुळे राज्याच्या भूमिकेत मूलभूत बदल झाले. केंद्र सरकारचे थेट आर्थिक नियंत्रण कमी झाले आणि बाजारपेठेला महत्त्व प्राप्त झाले. राज्य सरकारांना औद्योगिक धोरणे ठरविणे, परकीय गुंतवणूक आकर्षित करणे, पायाभूत सुविधा विकसित करणे यामध्ये अधिक स्वायत्तता मिळाली. गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश यांसारख्या काही राज्यांनी या नव्या आर्थिक

वातावरणाचा प्रभावी उपयोग करून औद्योगिक व आर्थिक प्रगती साधली. यामुळे राज्यांमध्ये परस्पर स्पर्धा वाढली. या प्रक्रियेतून ‘स्पर्धात्मक संघराज्यवाद’ ही संकल्पना पुढे आली. राज्ये केंद्राकडे मदतीसाठी पाहण्याऐवजी स्वतःच्या क्षमतेवर आर्थिक विकास साधू लागली. मात्र या प्रक्रियेचा एक नकारात्मक पैलूही दिसून येतो. आर्थिकदृष्ट्या मागास राज्यांना या स्पर्धेत टिकून राहणे कठीण गेले. परिणामी प्रादेशिक असमतोल अधिक तीव्र झाला. विकसित व अविकसित राज्यांमधील दरी वाढली आणि संघराज्यीय समतोलास आव्हान निर्माण झाले. त्यामुळे आर्थिक उदारीकरणाने संघराज्याला नवे स्वरूप दिले असले, तरी त्यातून काही नवीन समस्या देखील उद्भवलेल्या दिसून येतात.

### 3. आघाडी सरकारे आणि प्रादेशिक पक्षांचा संघराज्यावर झालेला प्रभाव

१९८९ नंतर केंद्रात आघाडी सरकारांची सुरुवात झाली आणि त्याचा भारतीय संघराज्यावर खोल परिणाम झाला. या सरकारांमध्ये प्रादेशिक पक्षांची भूमिका निर्णायक राहिली. केंद्र सरकारला धोरणात्मक निर्णय घेताना राज्यांच्या आणि प्रादेशिक पक्षांच्या मागण्यांचा विचार करणे अपरिहार्य बनले. यामुळे केंद्र–राज्य संबंध अधिक संवादप्रधान आणि सहकार्याधिष्ठित झाले. या काळात प्रादेशिक पक्षांनी केंद्रातील सत्तासंतुलनात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे राज्यांचे राजकीय महत्त्व वाढले आणि संघराज्यवाद अधिक विकेंद्रीत झाला, असे वाटते. मात्र या प्रक्रियेमुळे संघराज्यीय संस्थांचे बळकटीकरण झाले, असे ठामपणे म्हणता येत नाही. अनेक वेळा निर्णय हे संस्थात्मक चौकटीत न होता व्यक्तिनिष्ठ, पक्षाधारित किंवा राजकीय सौदेबाजीच्या आधारे घेतले गेले. म्हणूनच हा काळ संघराज्यीय संस्थात्मक मजबुतीचा नसून, राजकीय वाटाघाटींचा आणि समन्वयाचा राहिला, असे विश्लेषण करता येते. तरीही या काळाने भारतीय संघराज्याला अधिक बहुविध आणि समावेशक स्वरूप प्राप्त करून दिले, हे नाकारता येत नाही.

### 4. न्यायालयीन हस्तक्षेप आणि संघराज्याचे घटनात्मक संरक्षण

भारतीय संघराज्याला घटनात्मक संरक्षण देण्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. विशेषतः एस. आर. बोम्मई खटल्यातील (१९९४) निर्णय हा संघराज्यवादाच्या इतिहासातील मैलाचा दगड मानला जातो. या निर्णयामुळे कलम ३५६ च्या गैरवापरावर मर्यादा आल्या आणि राज्य सरकारांना घटनात्मक सुरक्षितता प्राप्त झाली. सर्वोच्च न्यायालयाने संघराज्यवाद हा भारतीय संविधानाचा मूलभूत भाग असल्याचे स्पष्ट केले. यामुळे केंद्र सरकारच्या एकतर्फी हस्तक्षेपावर नियंत्रण आले आणि संघराज्यीय संतुलन टिकविण्यास मदत झाली. न्यायालयीन सक्रियतेमुळे संघराज्यवाद केवळ राजकीय तत्त्व न राहता एक घटनात्मक मूल्य म्हणून अधोरेखित झाला. तथापि, काही अभ्यासकांच्या मते न्यायालयीन हस्तक्षेपामुळे कधी कधी न्यायालय स्वतः धोरणात्मक क्षेत्रात हस्तक्षेप करत असल्याचेही दिसून येते. त्यामुळे न्यायालयीन सक्रियता आणि न्यायालयीन अतिक्रमण यामधील सीमारेषा स्पष्ट ठेवण्याची गरज अधोरेखित होते.

### ५. GST आणि सहकारी संघराज्यवाद

वस्तू व सेवा कर (GST) प्रणाली ही भारतीय संघराज्याच्या आर्थिक इतिहासातील सर्वात व्यापक आणि महत्त्वाची सुधारणा मानली जाते. GST मुळे देशातील अप्रत्यक्ष कररचना एकसंध करण्यात आली आणि अंतर्गत बाजारपेठ सुलभ झाली. GST परिषद ही केंद्र आणि राज्य यांच्यातील सामायिक निर्णयप्रक्रियेचे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरली. ही व्यवस्था सहकारी संघराज्यवादाचे प्रतीक मानली जाते, कारण केंद्र व राज्यांना एकत्र बसून निर्णय घ्यावे लागतात. मात्र प्रत्यक्षात GST प्रणालीमुळे राज्यांच्या करस्वायत्ततेवर मर्यादा आल्या. GST भरपाईचा प्रश्न, निर्णयप्रक्रियेत केंद्राचे तुलनेने अधिक प्राबल्य यामुळे केंद्र–राज्य तणावही वाढले. म्हणूनच GST हा सहकारी संघराज्यवादाचा प्रयोग असला, तरी त्यातील मर्यादा आणि आव्हानेही तितकीच स्पष्टपणे समोर येतात.

### ६. असममित संघराज्यवाद आणि विशेष घटनात्मक तरतुदी

भारतीय संघराज्य हे मूलतः असममित स्वरूपाचे आहे. देशातील विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे काही राज्यांसाठी विशेष घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या. जम्मू–काश्मीर, ईशान्य भारतातील राज्ये, आदिवासी बहुल क्षेत्रे यासाठी वेगळया तरतुदी अस्तित्वात होत्या. २०१९ मध्ये जम्मू–काश्मीरचा विशेष दर्जा रद्द केल्यामुळे संघराज्यीय संतुलनावर मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली. या घटनेमुळे केंद्राच्या केंद्रीकरणात्मक प्रवृत्ती अधिक ठळकपणे समोर आल्या. असममित संघराज्यवादाच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आणि संघराज्यीय लवचिकतेची कसोटी लागली.

### ७. कोविड–१९ महामारी आणि संघराज्यीय केंद्रीकरण

कोविड–१९ महामारी हा भारतीय संघराज्याच्या कार्यपद्धतीची परीक्षा घेणारा काळ ठरला. या काळात केंद्र सरकारने आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या आधारे व्यापक अधिकारांचा वापर केला. देशव्यापी लॉकडाऊन, आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचना आणि आर्थिक मदत योजनांमुळे केंद्राचे नियंत्रण वाढले. राज्यांची आर्थिक स्थिती कमकुवत झाली आणि केंद्रावर अवलंबित्व वाढले. यामुळे संघराज्यीय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

स्वायत्ततेवर मर्यादा आल्या. तथापि, काही राज्यांनी स्थानिक परिस्थितीनुसार धोरणे राबवून संघराज्यीय लवचिकतेचेही उदाहरण दिले. त्यामुळे या काळात संघराज्यवादाच्या ताकदी तसेच मर्यादा दोन्ही स्पष्ट झाल्या.

**८. एकूण मूल्यांकन**

१९९० ते २०२० या कालखंडात भारतीय संघराज्यवाद एकसंध, स्थिर स्वरूपात न राहता सतत बदलणारा आणि परिस्थितीनुसार स्वतःला जुळवून घेणारा राहिला. सहकारी संघराज्यवाद, स्पर्धात्मक संघराज्यवाद आणि केंद्रीकरणात्मक प्रवृत्ती यांचा संगम या काळात दिसून येतो. त्यामुळे भारतीय संघराज्यवाद ही एक जिवंत, गतिमान आणि प्रयोगशील व्यवस्था असल्याचे स्पष्टपणे अधोरेखित होते.

**निष्कर्ष**

१९९० ते २०२० या कालावधीत भारतीय संघराज्याचा प्रवास स्थिर किंवा एकसारखा न राहता सतत परिवर्तनशील स्वरूपात घडत गेला. या काळात राजकीय, आर्थिक आणि प्रशासकीय घडामोडींनुसार संघराज्याच्या कार्यपद्धतीत विविध प्रकारचे बदल दिसून आले. काही टप्प्यांवर केंद्र व राज्यांमधील सहकार्य वाढून सहकारी संघराज्यवादाला चालना मिळाली, तर आर्थिक सुधारणांमुळे राज्यांमध्ये परस्पर स्पर्धा निर्माण होऊन स्पर्धात्मक संघराज्यवादही बळकट झाला. त्याचवेळी काही विशिष्ट परिस्थितींमध्ये केंद्र सरकारचे अधिकार वाढताना दिसले, ज्यामुळे संघराज्याच्या केंद्रीकरणात्मक प्रवृत्ती अधोरेखित झाल्या. या सर्व प्रक्रियांतून भारतीय संघराज्यवादाची लवचिकता आणि बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला जुळवून घेण्याची क्षमता स्पष्टपणे दिसून येते. भविष्यात भारतीय संघराज्य अधिक सुदृढ व संतुलित करण्यासाठी केंद्र आणि राज्यांमध्ये परस्पर विश्वास निर्माण करणे, राज्यांची आर्थिक स्वायत्तता वाढवणे आणि घटनात्मक नैतिकतेचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक ठरेल.

**संदर्भ**

1. Kumar, Chanchal (2014), Federalism in India: A Critical Appraisal.
2. Sharma, Chanchal Kumar & Swenden, Wilfried (2017), Continuity and Change in Indian Federalism.
3. Wheare, K. C. (1963), Federal Government.
4. Elazar, Daniel J. (1987), Exploring Federalism.
5. भारतीय संविधान. https://lddashboard.legislative.gov.in/constitution-of-india
6. K. Venkataramanan, The Hindu, August 12, 2019, India’s asymmetric federalism.
7. Varghese K. George & Vikas Dhoot, The Hindu, July 21, 2021, Spirit of cooperative federalism is essential for GST to succeed.
8. P. B. Mehata, The Indian Express, December 10, 2020, Our misshapen federalism is not about Centre vs states, but co-produced by political culture in both.
9. Carnegie India (2020), How COVID-19 is Changing Indian Federalism.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# स्वातंत्र्योत्तर भारतातील धर्मनिरपेक्षतेसंदर्भातील परिवर्तन : यश, आव्हाने आणि पुढील वाटचाल

**श्री. संजय देविदास कोळी[1], डॉ. शरद मधुकर कुलकर्णी[2]**
[1]संशोधक विद्यार्थी जी.ई.टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव ता. जि. धुळे
[2]मार्गदर्शक जी.ई.टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागाव, ता. जि. धुळे

**Manuscript ID**:
JRD -2026-180123
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 110-112
January 2026

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*सदर शोधनिबंधात स्वातंत्र्योत्तर भारतातील धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेतील परिवर्तन, त्याचे यश, उद्भवलेली आव्हाने आणि भावी वाटचाल यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. भारतीय समाज हा बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक व विविधतेने नटलेला असल्याने राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता हे मूलभूत मूल्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारतीय संविधानाने राज्यसंस्थेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप स्वीकारून सर्व धर्मांप्रती समभाव, सहिष्णुता व विवेकनिष्ठ राज्यकारभाराची अपेक्षा व्यक्त केली आहे. या अभ्यासात धर्म आणि राज्यसंस्था यांच्यातील परस्परसंबंध, धर्मनिरपेक्षतेची पाश्चात्य व भारतीय संकल्पना, संविधानातील तरतुदी आणि न्यायालयीन भूमिकांचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकारणात धर्माचा वाढता हस्तक्षेप, धार्मिक असहिष्णुता, ध्रुवीकरण, तुष्टीकरणाचे राजकारण आणि त्यातून निर्माण होणारी सामाजिक दरी यांचे चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे. शोधनिबंधातून असे स्पष्ट होते की, धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाची अंमलबजावणी प्रत्यक्ष व्यवहारात अनेकदा अपुरी ठरलेली दिसते. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि लोकशाही मूल्ये धोक्यात येत आहेत. निष्कर्षतः, भारतासारख्या विविधतापूर्ण राष्ट्रात धर्मनिरपेक्षतेचे जतन व संवर्धन करण्यासाठी विवेकाधारित राजकारण, शिक्षणाद्वारे जनजागृती आणि सर्वसमावेशक राज्यकारभाराची नितांत आवश्यकता असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.*

***मुख्यशब्द:*** *धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्योत्तर भारत, भारतीय राज्यघटना, धर्म व राजकारण, धार्मिक सहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, लोकशाही मूल्ये, राजकीय परिवर्तन.*

**प्रस्तावना**

बदल अथवा परिवर्तन मानवी समाजाचा स्थायीभाव असून, समाज नेहमी अस्तित्वात असलेल्या अवस्थेतून त्यापेक्षा प्रगत अशा अवस्थेकडे वाटचाल करीत असतो. या बदलाच्या प्रक्रियेत समाजाने इतिहासात कधी – काळी अंगीकारलेली राजकीय मुल्ये, रूढी, प्रथा – परंपरा व संकेतं कालबाह्य ठरतात अथवा बदलत्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पर्यावरणात ती नव्याने मांडली व अंगिकारली जातात. भारतीय समाजजीवनातील असेच एक सामाजिक वा राजकीय मूल्य म्हणजे 'धर्मनिरपेक्षता'. सामाजिक बदलाच्या प्रक्रियेत हे मूल्य कधी तत्कालीन परिस्थितीची अपरिहार्यता म्हणून अंगिकारले गेले तर, कधी पाश्चात्य अथवा परकीय अंधानुकरण म्हणून अव्हेरले गेले. 'धर्म' ही तशी मानवी समाजाला एकसंध ठेवणारी शक्ती आहे. तसेच ती कधी - कधी समाजाच्या विघटनास देखील कारणीभूत ठरत असते. इतिहासात डोकावून पाहिल्यास धर्मशक्तीच्या या विघटनात्मक प्रभावाचा परिचय करून देणारी असंख्य उदाहरणे दृष्टीक्षेपास पडतात. युरोपातील 'प्रोटेस्टंट चळवळी'नंतर नागरिक स्वातंत्र्याच्या व नागरी समाजरचनेच्या आधारावर उभ्या राहिलेल्या पाश्चिमात्य समाजाने 'इहवादी' भूमिका घेऊन 'राजसत्ता' आणि 'धर्मसत्ता' यांची फारकत घडवून आणली. इहवादी कायद्यासमोर 'धर्म' या संस्थेचे अधिकार गौण ठरविले गेले.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18169676
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*श्री. संजय देविदास कोळी, संशोधक विद्यार्थी जी.ई.टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव ता. जि. धुळे*

**How to cite this article:**
*कोळी, . संजय . देविदास ., & कुलकर्णी, . शरद . मधुकर . (2026). स्वातंत्र्योत्तर भारतातील धर्मनिरपेक्षतेसंदर्भातील परिवर्तन : यश, आव्हाने आणि पुढील वाटचाल. Journal of Research & Development, 18(1(IV)), 110–112. https://doi.org/10.5281/zenodo.18169676*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

युरोपीय समाजात धर्मनिरपेक्षतेचे तत्व बऱ्याच अंशी चांगल्या रीतीने अंमलात आणले गेले असले तरी आशियायी – आफ्रिकी समाजावरचा विशेषतः इस्लाम धर्मियांच्या मनावरचा धर्माचा पगडा आणि त्याला इतर धर्मीयांची समतुल्य प्रतिक्रियावादी भूमिका बघता 'राजसत्ता' आणि 'धर्म' यांना विभक्त करणे अवघड झालेले दिसून येते. प्रस्तुत शोध निबंधात स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक व राजकीय पर्यावरणात धर्मनिरपेक्षते संदर्भातील परिवर्तनाच्या चढत्या – उतरत्या आलेखाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्दिष्ट्ये:**

- व्यक्ती व समाजजीवनातील धर्म आणि राज्यसंस्थेच्या भूमिकेचा अभ्यास करणे
- राज्यसंस्थेच्या/धर्मसंस्थेच्या धर्मनिरपेक्ष व्यवहाराचे मूल्यमापन करणे
- देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेपुढील आव्हानांचा अभ्यास करणे
- राजकीय हेतू साध्य करण्यासाठी धर्माच्या आधारावर केल्या जाणाऱ्या अनुनय अथवा तुष्टीकरणाच्या कारणांचा शोध घेणे
- एकूण समाज व्यवस्थेतील ऐहिक विकासात बाधा उत्पन्न करणाऱ्या घटकांचा चिकित्सक अभ्यास करणे

**गृहीतके : (Hypothesis)**

- व्यक्ती व समाज जीवनातील धर्माचे स्थान राज्यसंस्थेपेक्षा श्रेष्ठ आहे.
- सामाजिक जीवनातील धार्मिक सहिष्णुता अथवा धार्मिक सलोखा हा राज्यकारभारातील धर्मनिरपेक्ष व्यवहारावर अवलंबून आहे.

**विषय प्रवेश:**

इंग्रजीतील 'Secularism' या शब्दाला मराठीत पर्यायी शब्द म्हणून 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द वापरला जातो. याचा अर्थ राज्यसंस्थेने राज्यकारभार करताना धर्मापासून तटस्थ राहणे किंवा राजकीय जीवनात धर्माची उपेक्षा करणे असा होतो. तसेच अर्थव्यवस्था, सामाजिक व राजकीय संस्था इत्यादी जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील समस्या असोत त्यांच्याकडे ऐहिक कल्याणाच्या दृष्टीने पाहणे या भूमिकेला धर्मनिरपेक्षता असे म्हणतात. धर्मनिरपेक्ष म्हणजे अधर्म अथवा निधर्म नव्हे किंवा धर्माविषयी असहीष्णूताही नव्हे. त्याचा अर्थ एवढाच की, ऐहिक जीवनाची व्यवस्था लावतांना धर्मकल्पना अप्रस्तुत मानल्या जाव्यात. त्यांच्याऐवजी शास्त्रीय ज्ञान, मानवी मुल्ये आणि विवेकनिष्ठा यांचे सहाय्य घेतले जावे. प्रस्तुत अर्थ विचारात घेता धर्मनिरपेक्षतेची ही पाश्चात्य संकल्पना राज्यसंस्थेने कोणत्या गोष्टी करू नयेत याचे स्पष्टीकरण करीत असल्याने तिचे स्वरूप नकारात्मक आहे. तर भारतीय संविधानातील नागरिकांच्या मुलभूत हक्कांच्या तरतुदींतून व्यक्त होणारा धर्मनिरपेक्षतेचा आशय मात्र राज्यसंस्थेकडून "सर्व धर्म समभाव" अशा व्यवहाराची अपेक्षा करतो. स्वाभाविकच धार्मिक जीवनात येथील राज्यसंस्थेची विवेकनिष्ठ आणि सकारात्मक भूमिका अधिक महत्वपूर्ण ठरते.

**पूर्वेतिहास:**

कोणत्याही मानवी समाजात 'सामुहिक शहाणपण' नेहमी बाल्ल्यावस्थेत असते. ते सतत जागृत ठेवण्याची जबाबदारी ही तेथील राज्यसंस्थेची व समाजधुरिणांची असते. त्याठिकाणी जोपावेतो सामाजिक व सांस्कृतिक जीवनात एकजिणसीपणा असतो तोपावेतो तेथील समाजजीवन सुरळीत चालल्याचे प्रत्ययास येते. असा समाज हा खऱ्या अर्थाने लोकशाही शासनास पूरक असतो. परंतु बदलत्या काळानुसार जेवढ्या प्रमाणात हा एकजिणसीपणा कमी होत जाऊन समाज जीवनात सांस्कृतिक विविधता निर्माण होते, तेवढ्या प्रमाणत तेथील पालकत्वाची जबाबदारी स्वीकारलेल्या राज्यसंस्थेची जबाबदारी वाढत जाते. अगदी वैदिक काळापासून भारतीय समाजजीवन "जगा आणि जगू द्या" या तत्वाशी बांधील आहे. यावरून आजच्या समाज जीवनातील पराकोटीची विविधता बघता 'सर्वसमावेशकता' हे भारतीय संस्कृतीचे (हिंदी संस्कृतीचे) एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य असल्याचे प्रकर्षाने जाणवते. म्हणूनच कदाचित भारतीय संस्कृतीस सर्व 'संस्कृतींची जननी' असल्याचे बिरूद शोभून दिसते. इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यावर धर्मनिरपेक्षतेचा उल्लेख भारतीय संदर्भात कुठेही आढळून येत नसला किंवा त्याची वाच्यता केली नसली तरी, सामाजिक व्यवहार मात्र 'धर्मनिरपेक्ष' असल्याचे प्रत्ययास येते. आणि कोणत्याही समाजातील हा सामाजिक व्यवहार राज्यसंस्थेच्या विवेकी व 'धर्मनिरपेक्ष व्यवहारावर' अवलंबून असतो, यात शंका नाही.

**भारतातील सामाजिक व राजकीय वस्तुस्थिती किंवा वास्तव:**

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्र उभारणीच्या कार्यात सर्व समाज घटकांचा सक्रीय सहभाग प्राप्त व्हावा म्हणून संविधानातच राज्यव्यवस्थेच्या 'धर्मनिरपेक्ष' स्वरूपाचा स्वीकार केला. भारतीय संविधानातील नागरिकांच्या मुलभूत हक्कांच्या तरतुदी, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे, मुलभूत कर्तव्ये इत्यादींतून राज्यसंस्थेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप व्यक्त होते. तसेच भारतीय न्यायसंस्थेने आजवर दिलेल्या अनेक निवाड्यांतून हे मूल्य अनेक वेळा अधोरेखित केलेले दिसुन येते. उदा. १९७३ मध्ये 'केशवानंद भारती खटल्या'चा न्यायनिवाडा करताना सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या 'मुलभूत संरचना सिद्धांता'ची (Basic Structure Doctrine) मांडणी केली आणि राज्यव्यवस्थेचे 'धर्मनिरपेक्ष' स्वरूप हे संविधानाचे 'गाभा तत्व' असल्याचे स्पष्ट केले. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे तर संविधानाच्या उद्देशपात्रीकेतच 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द अधिकृतरीत्या समाविष्ट करण्यात आला. धर्माच्या नावे राजकारण करणाऱ्या व्यक्ती व संस्थांकडून तर प्रस्तुत घटनादुस्तीच अनधिकृत ठरविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जातो. विशेषकरून निवडणुकांच्या काळात या प्रयत्नाला अधिकच धार येते. धार्मिक असहीष्णूतेतून होणाऱ्या दंगली, धर्मयुद्धाने होणारी मनुष्यहानी, वित्तहानी, धार्मिक उत्सवांचे व

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

कार्यक्रमांचे एकांगी प्रकटीकरण इत्यादींतून धर्माची नकारात्मक प्रतिमा निर्माण होते जी, कोणत्याही सभ्य समाजातील राष्ट्रबांधणीच्या कार्यात योगदान देणाऱ्या घटकांना प्रभावित करते.

स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक व राजकीय जीवन धर्मनिरपेक्षतेच्या कसोटीवर तपासून पाहता निराशाच पदरी पडते. धर्माच्या आधारावर केला जाणारा भेदभाव, दिवसागणिक वाढत जाणाऱ्या धार्मिक असहिष्णुतेच्या घटना व त्यातून दुभंगत चाललेले समाज जीवन आणि त्यातील सलोख्याचा अभाव चिंतेचा व चिंतनाचा विषय बनला आहे. धर्म ही तशी मानवी जीवनातील अति संवेदनशील बाब आहे. तिचे प्रतिबिंब सामाजिक व राजकीय व्यवहारांत प्रत्ययास येते. म्हणूनच याची जाण समाजधुरीणांना, राजकारण्यांना आणि बुद्धिवाद्यांना असणे आवश्यक आहे. परंतु अलीकडे ज्या गोष्टींशी अथवा समस्यांशी धर्म या शब्दाचा संबंध येतो अशा गोष्टींपासून दोन हात लांब राहणे किंवा अशा विषयावर सोयीस्कररित्या मौन बाळगण्याकडे समाजातील बहुतेक बुद्धिवाद्यांचा कल दिसून येतो. याच्या कारणांचा शोध घेता असे ठळकपणे जाणवते की, भारतातील तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी, पुरोगामी, बुद्धिवादी, प्रसार माध्यमे व तत्ववेत्ते भिती संशय आणि पुर्वाग्रहांनी ग्रासलेले आहेत. 'भिती' बहुमताच्या दडपणाची, आर्थिक व सामाजिक कोंडीची, आणि सुरक्षिततेची. अशा सामाजिक पर्यावरणात कोणत्याही देशाचा विकास खुंटेल हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही.

**उपाययोजना अथवा पुढील वाटचाल:**

प्रस्तुत विषय हा सामाजिक जाणीवेचा संवेदनशील घटक असल्याने कोणत्याही धर्मातील मुलभूत तत्वाला धक्का न लावता राज्यसंस्थेकडून सर्वसमावेशक व विवेकाधारित राजकीय व्यवहाराची अपेक्षा आहे. राजकारणाचे व राजकीय प्रक्रियेचे निधर्मिकरण होणे गरजेचे आहे. त्यात निर्वाचन आयोगाची भूमिका महत्वपूर्ण ठरू शकते. आपल्या वर्तनाद्वारे परधर्म सहिष्णुता रूजवून "आपण आणि ते" या जागी "आपण सर्व एक" ही जाणीव वृद्धिंगत करावी. यातून धार्मिक अल्पसंख्यांक समुदायांतील विलागात्वाची भावना कमी होऊन "भारतीय राष्ट्रवाद" वृद्धिंगत होण्यास हातभार लागेल. तसेच भारतासारख्या बहुधार्मिक व बहुसांस्कृतिक देशात निकोप राजकीय सामाजिकारणाची नितांत आवश्यकता आहे. यात शिक्षण व शिक्षण प्रक्रियेची भूमिका प्रभावी ठरू शकते. ज्यातून अशी विवेकनिष्ठ भावी पिढी खरोखर निर्माण होऊ शकेन ज्याद्वारे येत्या काळात आपले "विश्वगुरु" होण्याचे स्वप्न हे स्वप्न न राहता सत्यात उतरेल.

**निष्कर्ष:**

भारतातील सामाजिक आर्थिक व राजकीय जीवनातील आढळून येणारी कमालीची विषमता, सातत्याने होणाऱ्या निवडणुका व त्यावर आधारित सत्ता स्पर्धेतील राजकीय पक्षांचे पर्यायाने शासनाचे ठरणारे भवितव्य यांमुळे राज्यसंस्थेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप लयास जात आहे. तसेच धर्मनिरपेक्षतेच्या नेमक्या आकलनाच्या संदर्भात अज्ञान, मतभिन्नता व पूर्वग्रह मोठ्या प्रमाणात दिसून येतात किंवा आपल्या राजकीय लाभासाठी राजकीय पक्षांकडून असे पूर्वग्रह जाणीवपूर्वक पसरविले जातात. काही अभ्यासक, राजकारणी वा टीकाकार तर आजही राज्यसंस्थेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप स्वीकारण्यास तयार नाहीत. भारतीय समाजाला भेडसावणाऱ्या बेरोजगारी, सुशिक्षित बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण, स्त्रियांचे प्रश्न आणि सर्वात महत्वाचे म्हणजे दिवसेंदिवस कमी होत जाणारा सामाजिक व धार्मिक सलोखा अशा अनेक ज्वलंत समस्यांकडे दुर्लक्ष करून आपल्या राजकीय लाभासाठी अस्मितेच्या मुद्द्यांवर कात्थ्याकुट करण्याकडे बहुसंख्य राजकारण्यांचा कल दिसून येतो. जगाच्या पाठीवर कुठेच व कधीच हा प्रश्न एवढा गुंतागुंतीचा झाल्याचे आढळत नाही. अनेक देशांत भिन्न – भिन्न धर्माचे लोक एकत्र राहतात, त्यांचे सामाजिक वा राजयीय संबंध व धार्मिक निष्ठा यांत तणावही निर्माण होतात परंतु कुठेच या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर गंभीरपणे शोधण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. आज जागतिक पटलावर भारतासारख्या उभरत्या अर्थव्यवस्थेला मात्र हा प्रश्न तसा निरुत्तर सोडून चालणार नाही. कारण तो त्याचा राष्ट्रीय अस्तित्वाचा प्रश्न आहे. भावी पिढ्यांचे आणि पर्यायाने भारताचे भवितव्य या प्रश्नाच्या यशस्वी सोडवणूकीवर अवलंबून आहे.

**संदर्भ:**

१) भारतीय संविधान

२) धर्म, धर्मनिरपेक्षता आणि भारत – डॉ. सदा कऱ्हाडे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

३) अस्मिता आणि धर्म: भारतातील इस्लाम विरोधाचे मूलाधार – अमलेंदू मिश्रा, सेज भाषा प्रकाशन, दिल्ली

४) राष्ट्र आणि राष्ट्रवाद: संकल्पना आणि विकास – डॉ. सुधाकर देशमुख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

५) भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध खंड एक: भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया – तुकाराम जाधव , महेश शिरापूरकर, युनिक अकादमी, पुणे

६) धर्म, समाज आणि राजकारण – डॉ. अशोक चौसाळकर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# रोजच्या आहारातील पालेभाज्यांचे आयुर्वेद व आधुनिक दृष्टिकोनातून अध्ययन

**डॉ. मिनल अरविंद नेहते**
सहाय्यक प्राध्यापक, संस्कृत-संहिता-सिद्धान्त विभाग, राजर्षि शाहु महाराज आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँण्ड रिसर्च सेंटर बुलढाणा, बी.ए.एम.एस. बी.ए. (संस्कृत), एम.ए. (संस्कृत)NET (संस्कृत). पीएच.डी
**Email:** minalsachin152@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180124
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(IV)
Pp. 113-119
January 2026

**Submitted:** 1 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*सदर शोधनिबंधात रोजच्या आहारातील पालेभाज्यांचे आयुर्वेदिक तसेच आधुनिक विज्ञानाच्या दृष्टिकोनातून सविस्तर अध्ययन करण्यात आले आहे. निरोगी व संतुलित जीवनासाठी आहाराचे महत्त्व अधोरेखित करत पालेभाज्यांमधील पोषणमूल्ये, औषधी गुणधर्म व त्यांचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम यांचे विश्लेषण केले आहे. आयुर्वेदातील रस, विपाक, वीर्य व गुण या संकल्पनांच्या आधारे धान्यक (कोथिंबीर), मेथिका (मेथी), पालक, चुक्रिका (आंबटचुका), नागवेल (विड्याचे पान), पूतिहा (पुदिना) व कैडर्य (कढीपत्ता) या पालेभाज्यांचे दोषांवरील परिणाम, औषधी उपयोग व रोगनिवारणातील भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. तसेच आधुनिक संशोधनाच्या आधारे या पालेभाज्यांमधील जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर, अँटीऑक्सिडंट्स व जैवसक्रिय घटक यांचे आरोग्यदायी फायदे मांडण्यात आले आहेत. पालेभाज्यांचे नियमित सेवन केल्याने पचनसंस्था सुधारते, रोगप्रतिकारशक्ती वाढते, रक्तवाढ होते, हाडे मजबूत राहतात तसेच मधुमेह, हृदयविकार, स्थूलता व काही प्रकारच्या कर्करोगाचा धोका कमी होतो, हे या अभ्यासातून स्पष्ट होते. निष्कर्षतः, आयुर्वेद व आधुनिक विज्ञान या दोन्हींच्या समन्वयातून पालेभाज्यांचा समावेश दैनंदिन आहारात करणे हे सुदृढ, निरोगी व दीर्घायुषी जीवनासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे या शोधनिबंधातून अधोरेखित करण्यात आले आहे.*

**प्रस्तावना**

२१ वे शतक विज्ञानाचे, यांत्रिक प्रगतीचे आहे. मनुष्याचे शरीर हे देखील एक यंत्रच आहे. मनुष्याचे शरीर निसर्गाची अद्भुत रचना आहे. म्हणूनच निसर्गाबरोबर मैत्री करूनच आपले जीवन पुढे जात असते. निरोगी शरीरातच निरोगी मन वास करते. यासाठीच आरोग्याकडे लक्ष देत कर्तव्य पार पाडत मनुष्य जगत आहे. शरीराला निरोगी, सुदृढ ठेवण्यासाठी जेवणाकडे विशेष लक्ष द्यायला पाहिजे. रोजच्या भोजनामध्ये आपण भरपूर भाजीपाला, वनस्पती, फळे, मसाल्याचे पदार्थ यांचे सेवन करतो. यांचे प्रमाण जरी कमीअधिक असले तरी त्या प्रत्येक पदार्थाची शरीराला आवश्यकता असते. सकस, पौष्टिक आहारच निरामय, स्वस्थ जीवन जगण्यास सहाय्य करतो. जुन्या पिढीतील लोकांनी 'अन्न हे पूर्णब्रह्म' म्हणत भोजनाला त्यातील प्रत्येक व्यंजनाला जसे लोणचे, पापड, कोशिंबीर, गोडाचा पदार्थ यांनाही अनन्य साधारण महत्त्व दिलेले आहे. समर्थ रामदास स्वामींनी अन्नाला पूर्णब्रह्म उल्लेखलेले असून भोजन करण्याला एक यज्ञकर्मच म्हटले आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्री डॉ. मिनल अरविंद नेहते, सहाय्यक प्राध्यापक, संस्कृत-संहिता-सिद्धान्त विभाग, राजर्षि शाहु महाराज आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँण्ड रिसर्च सेंटर बुलढाणा, बी.ए.एम.एस. बी.ए. (संस्कृत), एम.ए. (संस्कृत)NET (संस्कृत). पीएच.डी*

**How to cite this article:**
*नेहते, . मिनल . अरविंद . (2026). रोजच्या आहारातील पालेभाज्यांचे आयुर्वेद व आधुनिक दृष्टिकोनातून अध्ययन. Journal of Research & Development, 18(1(IV)), 113–119.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18169710*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18169710

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

ज्याप्रमाणे यज्ञातील अग्नीत एकेक द्रव्याचा हवी अर्पण केला जातो त्याप्रमाणे उदरातील जठराग्नीतही एकेक पदार्थ अर्पण केला जातो. पालेभाज्या खाणं आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. असं म्हटलं जाते की, दररोज कोणत्या ना कोणत्याही प्रकारच्या हिरव्या भाजीचा समावेश आहारात करावा. हे निरोगी जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. हिरव्या भाज्यांमध्ये चरबी कमी असते तसंच यात प्रथिने, जीनवसत्त्वे आणि खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात. असं माहिती असून देखील अनेक लोकांना पालेभाज्या खायला आवडत नाही. परंतु आवडत नसेल तरी आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करणे गरजेचं आहे.

**महत्त्वाचे शब्द-रस, विपाक, वीर्य, गुण, उपयोग.**

**1) धान्यक (कोथिंबीर /धणे)**

धान्यकं तुवरं स्निग्धमवृष्यं मूत्रलं लघु ।

तिक्तं कटूष्णवीर्यश्च दीपनं पाचनं स्मृतम् ॥

ज्वरघ्नं रोचकं ग्राहि स्वादुपाकि त्रिदोषनुत् । तृष्णादाहवमिश्वासकासकार्श्यक्रिमिप्रणुत् ॥

आर्द्रन्तु तद्गुणं स्वादु विशेषात्पित्तनाशनम् ॥ [1]

English name-Coriander fruit / leaves
Latin name-Coriandrum sativum Linn. .
Family- Umbelliferae

**गुण:** रस - कषाय, तिक्त, मधुर,

विपाक- मधुर

वीर्य- उष्ण.

**मुख्य गुण-** लघु, स्निग्ध.

**कर्म व उपयोग**

दोषघ्नता - स्निग्ध व उष्ण असल्याने वातघ्न, कषाय (तुरट), तिक्त (कडु), मधुर (गोड) असल्याने पित्तघ्न व तिक्त, कटु (तिखट) उष्ण असल्याने कफघ्न. पित्तप्रकोपाने दाह, पाक ही लक्षणे असतात. धान्यक पित्तशमन करते; कफप्रकोपजन्य स्राव, क्लेद, अभिष्यन्द, कण्णुर यांचा नाश होतो; वातप्रकोपजन्य शूलाचेही शमन होते, याप्रमाणे धान्यक तीनही दोषाचे शमन करून धातुपाकापासून (पूय निर्मिती) संरक्षण करते. धान्यकाचा वापर जठराग्नि प्रदीप्त करण्यासाठी व आमपाचन करण्यासाठी होतो. ज्वर म्हणजेच ताप त्याचबरोबर तृष्णा (तहान), दाह (जळजळ),वमन (उलटी), श्वास (दमा), कास (खोकला), कृशता व कृमी रोग यांचा नाश करण्यामध्ये सुद्धा होतो. पचनाचे आजार आध्मान (पोटफुगी), शुल (पोटात दुखणे) त्याचबरोबर वातानुलोमन (गॅसेस) यामध्ये धान्यकाचा उपयोग होतो

Coriandrum sativum an ancient spice that is used globally in various cultures due to its culinary and therapeutic properties. It is used in almost all the traditional systems of medicines. In Ayurveda, it is mainly used for balancing all three doshas and for the enhancement of appetite and digestion. Whereas in the folk system it is used mainly in cooking and bakery. It is utilized in different forms in a different culture. Each part of the coriander has an aroma and important phytochemicals comprising of significant biological properties like antimicrobial, antioxidant, anti-mutagenic, anxiolytic, sedatives, anti-depressant, neuro-protective, anti-diabetic, diuretic, anti-hypertensive. [2]

**2) मेथिका (मेथी)**

मेथिकावातशमनी श्लेष्मघ्नीज्वरनाशिनी ।

ततः स्वल्पगुणावन्या वाजिनां सा तु पूजिता॥[3]

रस -कटु, तिक्त (कडवट)

विपाक -कटु

वीर्य -उष्ण,

मुख्य गुण- लघु ( पचण्यास हलके) , स्निग्ध.

**कर्म व उपयोग**

दोषघ्नता -वातकफघ्न, रक्तपित्तप्रकोपक.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

वेदनास्थापन (वेदनानाशक) आणि शोधहर (सूज कमी करणारे ) असल्याने शोथ( सूज), विद्रधी (पूययुक्त गाठ), वेदना यामध्ये वरुन गरम करून लेप उपयोगी होतो

**आभ्यंतर (पोटातून घेणे) -**

दीपन (भूक निर्माण करणारे), पाचन (पचन सुधारणारे) अनुलोमन (गॅसेस पास करणारे) शूलप्रशमन (वेदनानाशक) असल्याने अग्निमांद्य, उदरशुल (पोटदुखी), यांमध्ये चूर्णाचा; प्रसूतीनंतर स्तन्यजनन (दूध निर्माण होण्यासाठी) म्हणून बीजचूर्णाचा लाडू, वातवाहिन्यांना बल्य असल्याने वातवाहिनी दौर्बल्यात आणि बल्य व अंगमर्द प्रशमन असल्याने सामान्य दौर्बल्य, सर्वांगमर्द (सर्वांगदुखी) आणि प्रसूतीनंतर आर्तवशुद्धीसाठी तसेच वातप्रकोप होऊ नये म्हणून वापर करतात. मेदोहर (चरबीचा नाश करणारे) म्हणून बीजचूर्ण वापरतात. पानांचा भाजीसाठी व बियांचा फोडणीत घालण्या-साठी वापर होतो. रोज १ ते ३ चमचे बिया पोटात घेतल्यास प्रमेहात हितकर आहे.

English name-Fenugreek
Latin name-Trigonella foenum-graecum Linn.
Family- Papilionaceae

Vitamins and minerals: Although fenugreek is relatively low in mineral content, some are present in good concentrations such as phosphorus and sulphur and also it has been reported that curry made from fenugreek has a high amount of calcium, iron. and zinc. Germinating seeds of fenugreek have pyridoxine, cyanocobalamine, calcium pantothenate, biotin and vitamin C.[4] Over the last few years, several studies have been carried out on the medicinal and functional properties of fenugreek seeds. Fenugreek is rich in fiber, protein, and due to its valuable bioactive components has promising therapeutic and application. Antidiabetic, antioxidant, anticarcinogenic, hypoglycemic activity. hypocholesterolemic activity are the major medicinal properties of the fenugreek demonstrated in various studies. Based on these several healthful benefits, fenugreek can be recommended and be a part of our daily diet and incorporated into foods in order to produce functional foods.[5]

**3) पालंक्या (पालक)**

पलँक्या वातला शीता श्मेष्मला भेदिनी गुरुः ।
विष्टम्भिनी मदश्वासपित्तरक्तकफापहा ॥ [6]

रस - मधुर, तिक्त
विपाक- मधुर
वीर्य- शीत
गुण- गुरु ,स्निग्ध

**कर्म व उपयोग**

पालक वात निर्माण करणारे त्याचप्रमाणे कफकारक व पित्तशामक आहे. पालक मलभेदक असल्याने कठीण मलप्रवृत्ती मलावष्टंभ यामध्ये उपयोगी ठरते. पालक रक्तवर्धक, चक्षुष्य (डोळयांना हितकर), वृष्य,दाहप्रशमन करणारे आहे. यामुळे पालकाचा वापर पांडू (ॲनिमिया), नेत्रविकार, मलावष्टंभ,दुर्बलता यामध्ये होतो.

English name-Spinach
Latin name-Spinacia oleracea Linn.
Family-Chenopodiaceae

The mineral and vitamin composition in spinach varies from the season in which spinach was grown, like folate and tocopherol and minerals such as nitrogen, potassium, calcium, magnesium, copper, zinc, and manganese. Cooking effects the micronutrient composition in spinach too. For instance, the amount of folates decrease as spinach is boiled or steaming.[7] Spinach (Spinacia oleraceaL.), a plant with the richness in several vitamins and minerals is a very beneficial plant to the health of humans. Human and animal research have also shown that spinach-derived chemicals can help with obesity, hyperglycemia, and hypertriglyceridemia, all of which are symptoms of the metabolic syndrome. The leaves of spinach are used in various pharmacological activities such as, anti-cancer properties, anti-inflammatory properties, anti-obesity properties etc. various phytochemicals such as flavonoids, carotenoids and phenolic groups have been noticed in high amounts.[8]

**4) चुक्रिका (आंबटचुका)**

चुक्रा त्वम्लतरा स्वाद्वी वातघ्नी कफपित्तकृत् ।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

रुच्या लघुतरा पाके वृन्ताकेनातिरोचनी ॥ ९

रस - अम्ल.

विपाक - अम्ल.

वीर्य -उष्ण.

मुख्य गुण -लघु, रूक्ष.

**कर्म व उपयोग -**

चुक्रिका उष्ण वीर्यअसल्यामुळे वातशामक, कफपित्तप्रकोपीआहे. अत्यंत आंबट असल्यामुळे स्वादिष्ट (रुचकर) असते. आंबट चुका सेवनामुळे जाठराग्नी प्रदीप्त होतो त्यामुळे अरुची (तोंडाला चव नसणे), अग्निमांद्य (भूक न लागणे), यकृत विकार यामध्ये याचा वापर होतो .याची बीज शीत व दाहशामक असल्यामुळे पित्तज अतिसार (जुलाब) व मूत्रमार्ग दाह यामध्येही याचा वापर होतो .याच्या पानांचा लेप सूज व किट दंशावर सुद्धा करतात. दातदुखी मध्ये गुळण्या करण्यासाठी याच्या पानांचा स्वरस वापरतात. English name-Bladder Dock Latin name -Rumex vesicarius Linn. Family-Polygonaceae.

This plant mainly contains ascorbic acid, protein and low quantity of lipids, tocoferol and minerals. The plant also contains rich source of ß carotenes and anthraquinones particularly in roots such as emodin and chrysophanol and other parts rumicine, lapathine, Lutein and even some glycosides: vitexin, isovitexin, orientin and iso-orientin vitamins (especially vitamin C), proteins, lipids and organic acids. This plant is a good source of minerals such as; K, Na, Ca, Mg, Fe, Mn and Cu. Also it has many important medicinal uses, the plant is stimulant, tonic, and aphrodisiac agent .

This leafy vegetable is a rich source of vitamins, minerals, proteins, fibers, carotenes and flavonoids with many health benefits. It grows as a common vegetable and also run wild.[10]

**5) नागवेल (तांबूल/ विड्याचे पान)**

ताम्बूलं विशदं रूच्यं तीक्ष्णोष्णं तुवरं सरम् ।।

वश्यं तिक्तं कटु क्षारं रक्तपित्तकरं लघु ।

बल्यं श्लेष्मास्यदौर्गन्ध्यमलवात श्रमापहम् ।। ११

**पानांचे गुण :** विशद गुणयुक्त (मुख स्वच्छ करणारे), रूचिकारक( चविष्ट) तीक्ष्ण, उष्णवीर्य, कषाय रसयुक्त (तुरट), वश्य (वशकारक), तिक्त (कडवट), कटु रसयुक्त (तिखट), क्षार गुणयुक्त रक्तपित्त उत्पादक, लघु, बलकारक आहे. कफ, मुखाची दुर्गंधी, मल, वात, तसेच श्रम यांचा नाश करणारे आहे.

रस- कषाय, कटू

विपाक-कटू

वीर्य-उष्ण

**मुख्य गुण-** उत्तम दीपन (भूक वाढविणारे) , पाचन (पचन करवणारे) , श्लेष्मघ्न (कफनाशक), वातहर (वातनाशक), पित्त प्रकोपक, उष्ण, स्वर्य (स्वरासाठी चांगले), सुगंधीत, शोथघ्न (सूजेचा नाश करणारे), प्रतिदूषक (antibiotics प्रमाणे कार्य करणारे), कृमिघ्न (जंतनाशक), वृष्य(कामोत्तेजक), मुखातील कंडू-मल-क्लेद-दुर्गंधीनाशक आहे.

**उपयोग:**

१) विड्याच्या पानाचा प्रयोग पीनस (जुनाट सर्दी), कास (खोकला), कफविकार, आध्मान (पोटफुगी) तसेच शोथादि विकार (सूज) यामध्ये अनुपान म्हणून याचा उपयोग होतो. सुपारी, चूना, काथ, वेलची आदि द्रव्य पानात ठेऊन त्याचा विडा बनवून मुखशुद्धीसाठी बरेच लोक खातात. पहिल्यांदा पान सेवन करणाऱ्यांमध्ये पान सेवनानंतर तोहात नजनक होते. तसेच स्वाद ग्रहण करण्याची शक्ती कमी होते. तसेच तोंडात व गळयात जकडल्या प्रमाणे वाटते.

2) नागवेलीच्या तेल सेवनाने मुख आणि आमाशयामध्ये (पोटामध्ये) उष्णतेचा अनुभव होतो सुरुवातीला केंद्रीय वातनाडी संस्थानाला उत्तेजनेनंतर यामध्ये डायस्टेस (Diastase) ची मात्रा अधिक असल्याने स्टार्च व पिष्टमय पदार्थाच्या पाचनाला सहाय्यक होतो. तसेच पान खाल्ल्याने लालास्वावाची वृद्धी होऊन पाचन सुधारते. भात खाणाऱ्यांमध्ये याचा विशेष लाभ होतो. जर त्यांनी पान खाणे मध्येच बंद केल्यास पचन व्यवस्थित होत नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

3) ज्यांना पान खाण्याचे व्यसन असते त्यांना पान खाल्ल्याने बरे वाटते, मन प्रसन्न होते, थकवा दूर होतो, काही अंशी कामोत्तेजना होते, पानाच्या व्यसनाने कोणतेच विषारी परिणाम होत नाही. भोजनानंतर, स्नानानंतर उलटी झाल्यानंतर पान खाण्याचे फायदे आहे.

४) कफप्रधान रोग, तमकश्वास (दमा), श्वसनिका शोथ (श्वासनलिकेला सूज), स्वरयंत्र शोथ यामध्ये या पानाचा रस प्यायला देतात व ही पाने वरून बांधतात, लहान मूलांच्या खोकल्यामध्ये, सर्दीमध्ये ही पाने एरंडतैल लावून गरम करून छातीवर बांधल्याने खूप लाभ होतो.

५) रोहिणी (Diptheria) नामक लहान मुलांच्या गळयाच्या आकारामध्ये या पानांचा रस गरम पाण्यासोबत देऊन गुळणे करायला सांगतात.

English name-Betel
Leaf Latin name-Piper betel Linn.
Family- Piperaceae

Important chemical constituents of betel leaf are Chavibetol, Chavibetol acetate, Caryophyllene, allyl pyrocatechol diacetate, campene, Chavibetol methyl ether, eugenol a-pinene, f-pinene, u-limonene, safrole, 1-8 cineol and allyl pyrocatechol monoacetate. These components are valued as a stimulant for its medicinal properties like antifungal, anti-nociceptive (inhibits nociception, the sensation of pain), anti cancer, immunomodulatory, antihalitosis (inhibits bad smelling breath), anti-diabetic, gastroprotective, anti-allergic, anti-fertility, anti-filarial, anti-larvicidal, wound healing and anti-dermatophytic. [12]

**6) पूतिहा (पुदिना)**

पूतिहा कटुरुष्णश्च रोचनो दीपनो लघुः ।

हन्ति वातकफाध्मानशूलच्छर्दिकृमींस्तथा ।। प्रि. नि. [13]

रस - कटु.

विपाक -कटु.

वीर्य -उष्ण.

मुख्य गुण -लघु, रूक्ष,तीक्ष्ण .

English Name - Peppermint
Latin name - Mentha piperata Linn.
Family - Labiatae; (Syn. Lamiaceae)

**उपयोग:**

पुदिना कटू, उष्ण, तीक्ष्ण असल्याने रुचीकर (तोंडाला चव आणणे) व दीपन (भूक वाढवणे) हे कार्य करतो. म्हणूनच पुदिना अग्निमांद्य (भूक न लागणे), अपचन ,आध्मान (पोटफुगी) उलटी ,अतिसार (द्रवमलप्रवृत्ती) व कृमी (जंत) यामध्ये पुदिन्याची चटणी नित्य आहारात ठेवणे लाभदायी असते. पुदिना हा हृदय उत्तेजक असल्याने हृदय दौबल्य तसेच कफाचा नाश करणारा असल्यामुळे कास (खोकला), श्वास (दमा), हिक्का (उलटी), ज्वर (ताप) यामध्ये लाभदायी आहे. त्याचप्रमाणे प्रतिदूषक आणि स्थानिक संज्ञाहर असल्याने दंतशुल( दातदुखी), शिर:शूल (डोकेदुखी) व प्रतिश्याय (सर्दी) यामध्ये सुंगण्यासाठी वापरतात

Mentha arvensis linn. is called "Pudina or Putiha" in Ayurveda and used as a medicinal herb since ancient times. This is an aromatic herb which is a natural coolant with a sweet and pungent taste. The herb has the quality to pacify all the three doshas and chiefly manages the Pitta dosha. The mint leaves are owning to their carminative properties which help in digestion and assimilation of food and treats colic pain. The leaf extract is utilized to treat intestinal worms. The leaves are low in calories and contain a minimal amount of protein and fat. It is also rich in Vitamins A, C, iron, potassium and B-complex which enhances healthy skin, bolsters immunity, promotes the brain function and improves the hemoglobin profile. The aromatic essential oils are piled with antioxidants which scavenges the cells from free radical damage and support complete health. Leaves are wonderful appetizer which helps to activate the salivary glands in the mouth. It stimulates the secretion of digestive enzymes and promotes the digestion process. Mint oil possesses strong antiseptic and antibacterial and calming nature that helps in the soothing stomach and ease indigestion, inflammation and irritable bowel syndrome. Menthol oil treats diarrhea and relieves nausea caused due to motion sickness. The powerful and refreshing aromatic properties of mint leaves are used in making soothing balms and essential oils which assist in alleviating headache and nausea. The mind leaves help to ward off bacteria causing bad breath. Pudina leaves extract is beneficial in clearing plaque deposited in the teeth. Menthol is the key element

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

which is utilized in most toothpaste, mouthwashes and mouth freshener and chewing gums to combat dental problems.[14]

**7) कैडर्य ( कढीपत्ता /गोड निंब)**

कैडर्योऽन्यो महानिम्बो रामणो रमणस्तथा ।

गिरिनिम्बोमहारिष्टः शुक्लशालः कफाह्वयः ||

कैडर्यः कटुकस्तिक्तः कषायः शीतलो लघुः |

सन्तापशोषकुष्ठास्रक्रिमिभूतविषापहः ||

राजनिघण्टु – प्रभद्रादिवर्ग [15]

राजनिघंटू या संस्कृत ग्रंथामध्ये प्रभद्रादिवर्ग यामध्ये निंबाचे पाच प्रकार सांगितलेले आहेत. यामध्ये कैडर्य या संस्कृत नावाने कढीपत्त्याचे वर्णन आहे.

रस -कटु, तिक्त, कषाय

विपाक-कटू

वीर्य -शीत

मुख्य गुण - लघु, स्निग्ध.

**उपयोग:**

कढीपत्ता हा कडवट, तुरट शीत असून संताप (चिडचिड), शोष (सर्वांग शरीराची झीज/कृशता, कुष्ठ, रक्त विकार, कृमी, भूतबाधा आणि विषविकार यांचा नाश करतो. कढीपत्त्याच्या पानांतील प्रथिने आणि बीटा-कॅरोटीनमुळे केस गळणे थांबते, वाढ होते आणि अकाली पांढरे होण्यास प्रतिबंध होतो.

यातील व्हिटॅमिन्स आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेला चमकदार बनवतात आणि आरोग्य सुधारतात.

कढीपत्त्याची पाने ही कटू विपाकी असल्याने पचन सुधारण्यास मदत करते आणि आतड्यांच्या आरोग्यासाठी चांगले आहे.

यामध्ये लोह आणि फॉलिक ऍसिड मुळे रक्ताची कमतरता ॲनिमिया दूर होते आणि रक्ताचे प्रमाण वाढते. तसेच यांची पाने वजन कमी करण्यासाठी आणि चरबी जाळण्यास मदत करते. कढीपत्त्याची पाने कडू आणि तुरट असल्यामुळे रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते. यात असलेले अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारशक्ती वाढवतात.

English name- Curry leaves
Latin name - Murraya koenigii (L.)Spreng.
Family- Rutaceae

**Traditional uses-**

The barks and roots are used externally to cure the bites of the poisonous animals; the green leaves were eaten raw as a cure for dysentery, diarrhea. Infusion of roasted leaves were given in order to stop emesis Furthermore, Murraya koenigii were also used as blood purifier, tonic and cure for stomachache and used as flavoring agents in curries and chutneys. Curry leaves were also used as calcium source to those having calcium deficiency besides that it also consist Vitamin A, Vitamin B and B2, Vitamin C and iron. For the treatment of morning sickness; fresh juice of curry leaves together with lime juice and sugar is given and it is also applicable for vomiting due to indigestion. In the case of stomach upsets, the curry leaves is grounded to a fine paste and mixed with buttermilk and consumed orally. A paste of curry leaves is applied on the boils for swift relief, besides that, renal pain can be cured by consuming the root as a juice The fresh juice of curry leaves can prevent the progression of cataract. Murraya koenigii will retain the black color of the hair or in other words, it will prevent the premature greying of the hair. [16]

Murraya koenigii is a leafy medicinal as well as green leafy plant that belongs to family Rutaceae. The various pharmacological activities of the plant has been seen such as such as activity on Anti diabetic, cholesterol reducing property, antimicrobial activity, antiulcer activity, Antioxidative property, cytotoxic activity, anti-diarrhoea activity, anti-cancer activity with many other phagocytic activity. The chemical composition of the Murraya koenigii consists of essential oil alkaloids and terpenoid[17].

**निष्कर्ष-**

पालेभाज्यांच्या सेवनाने मनुष्याची रोगप्रतिकारक शक्ती सुधारते ,त्याचबरोबर विविध व्याधींचा नाश होण्यासाठी तसेच सुदृढ व निरोगी आयुष्य जगण्यासाठी या भाज्यांचा रोजच्या आहारात समावेश असणे अत्यावश्यक आहे.हिरव्या भाज्या आरोग्यासाठी खूप

महत्त्वाच्या आहेत कारण त्या फायबर, लोह, फॉलेट, व्हिटॅमिन (A, C, K) आणि खनिजे (जस्त, कॅल्शियम) यांनी समृद्ध असतात, पालेभाज्यांमध्ये फायबर जास्त असल्यामुळे बद्धकोष्ठता दूर होते, रक्त वाढते, कॅल्शियम व विटामिन डी मुळे हाडे मजबूत होतात, रोगप्रतिकारशक्ती सुधारते, वजन नियंत्रणात राहते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते, तसेच शरीराला ऊर्जा मिळते आणि डिटॉक्स होण्यास मदत होते व व्हिटॅमिन ए व बीटा कॅरोटीनमुळे डोळे व त्वचा चांगली राहण्यास मदत होते. व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्समुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. याच अँटीऑक्सिडंट्समुळे काही प्रकारचे कर्करोग (जसे की पोट, स्तन, त्वचा) होण्याचा धोका कमी होतो.

मेंदूच्या कार्यासाठी आवश्यक पोषक तत्वे पुरवून स्मरणशक्ती सुधारतात आणि वयानुसार होणाऱ्या संज्ञानात्मक घसरणीपासून बचाव करतात. पानांतील क्लोरोफिलमुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते. या भाज्यांचा आहारात समावेश केल्याने टाइप 2 मधुमेहाचा धोका कमी होतो.

**आधार ग्रंथ-**

चुनेकर कृष्णचंद (२०१०), सम्पादक, पाण्डेय गंगासहाय - श्रीमद् भावमिश्रप्रणीतः, भावप्रकाशनिघंटू, सविमर्श-हिन्दी व्याख्योपेतः चौखम्भा भारती अकादमी, वाराणसी.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. भावप्रकाशनिघंटु- पृ. क्र. 33
2. Shifali Thakur (Feb 2021), Coriander (Coriandrum Sativum): A Common Indian Traditional Spice And Ayurvedic Remedy, International Journal Of Research In Ayurveda & Pharmacy (IJRAP), Review Article, page no. 74 - 81
3. भावप्रकाशनिघंटु- पृ.क्र.36
4. Nasim Khorshidian , Mojtaba Yousefi Asli, Masoumeh Arab , Abolfazl Adeli Mirzail, Amir Mohammad Mortazavian (Nov 2015), Fenugreek: potential applications as a functional food and nutraceutical Nutrition and Food Sciences Research , Review Article, Vol -3, No- 1, Jan-Mar 2016, pages: 5-16
5. तत्रैव
6. भावप्रकाशनिघंटु- पृ.क्र.655
7. Chokkara Sri Lasya (July 2022), Spinach and its health benefits: A review, The Pharma Innovation Journal 2022; SP-11(8): 1232-1239
8. तत्रैव
9. भावप्रकाशनिघंटु- पृ. क्र- 659.
10. Kaushal Mahendra Patil, Yash Vikhankar, Pooja Dhangar, Vishal Bodke (September 2024), Review On Rumex Vesicarius Plant, International Journal Of Pharmaceutical Sciences, Volume 2 - Issue 09, Article Id IJPS/240209041.
11. भावप्रकाशनिघंटु- पृ.क्र.260.
12. Kaur Karandeep Rai, Trivedi Rashmi V. et.al. (2019), Review on Betel leaf used in various Ailments, International Journal of Pharmacognosy, IJP, Vol. 6, Issue 8, pg. 259-267.
13. देशपांडे अ. पां., जवळगेकर र. रा., रानडे सुभाष (2005), 'द्रव्यगुण विज्ञान (भाग 1 व 2)', अनमोल प्रकाशन, पुणे, पृ. क्र. 913.
14. Shifali Thakur, Bhawna Walia, Gitika Chaudhary (2021), Mentha arvensis (Pudina): A Review Based upon its Medicinal Properties, Research Journal of Pharmacognosy and Photochemistry, Volume 13, Issue-3, page no. 143-148.
15. भावप्रकाशनिघंटु- पृ. क्र. 317
16. Muthulinggam Nishan et al/International Journal PharmTech Research, 2014-2015,7(4), page no. 566-572.
17. Jain M, Gilhotra R, Singh RP, et al. Curry leaf (Murraya Koenigii): a spice with medicinal property. MOJ Biology and Medicine. 2017;2(3):236-256.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# संशोधनाचा विषय- निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग

**जीवन हटेसिंग सिसोदे**
मु.देवळसगाव पो.मोयखेडा दिगर ता. जामनेर जि. जळगाव

**Manuscript ID**:
JRD -2026-180125
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 120-121
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ओळख आहे. अशा आमच्या देशामध्ये निवडणूका निपक्षपणे होणे अपेक्षित आहे. त्यासाठी निवडणुका घेताना राबवली जाणारी यंत्रणा ही अत्याधुनिक असायला हवी. बदलत्या काळानुसार निवडणूक सुधारणा करणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या सुधारणा करताना लोकांचे जनमतत घेणेदेखील तितकेच महत्त्वपूर्ण आहे.*

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटनेच्या भाग-15 मंध्ये कलम 324 ते 329 मध्ये निवडणुकीविषयी तरतुदी देण्यात आलेल्या आहे. भारत देश जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असून जगातील इतर देशांच्या तुलनेत सर्वात मोठे लिखित संविधान आहे. भारतामध्ये गणराज्य पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला असून येथील लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रतिनिधित्व करतात. बदलत्या काळानुसार लोकसभा,राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणूक घेण्याच्या पद्धतीमध्ये बदल होणे गरजेचे आहे. जेणेकरून निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शक होऊन जनतेला आपण केलेल्या मतदानचे मूल्य कळेल. त्यासाठी निवडणूक सुधारणा आणि सामान्य जनतेचा राजकीय सहभाग करून घेणे फार महत्वपूर्ण आहे.

**उद्दिष्टे :**

- जनतेचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या राजकारनामंध्ये राजकीय सहभाग वाढविणे.
- जुन्या राजकीय कायद्यामध्ये बदल करून त्यात सुधारणा करणे.
- भारतीय निवडणूक व्यवस्थेवर लोकांचा विश्वास निर्माण करणे.

**संशोधन पद्धती:**

दुय्यम संशोधन साधनसामग्री पद्धत :- ऐतिहासिक संशोधन पद्धती.

**मुख्य घटकाचे विश्लेषण :**

लोकसंख्येनुसार जगातील सर्वात मोठा देश म्हणून भारताची ओळख आहे. अनेक लोक वेगवेगळया व्यवसायामध्ये क्षेत्रामध्ये प्रगती करताना दिसून येतात त्यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक, स्त्री -पुरुष असा मतभेद न करता भारतामध्ये त्यांना अनेक प्रकारचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18169743
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*जीवन हटेसिंग सिसोदे, मु.देवळसगाव पो.मोयखेडा दिगर ता. जामनेर जि. जळगाव*

**How to cite this article:**
*सिसोदे, . जीवन . हटेसिंग . (2026). संशोधनाचा विषय- निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग. Journal of Research & Development, 18(1(IV)), 120–121.* https://doi.org/10.5281/zenodo.18169743

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

म्हणूनच भारताला जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश म्हणून ओळखले जाते. राजकीय क्षेत्रामंध्ये आज 31% स्त्री तर 69% पुरुष आहेत. यामध्ये स्त्रियांचा राजकीय क्षेत्रातील वाटा अत्यंत कमी असून तो वाढवण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर राजकीय क्षेत्राचे महत्त्व पटवून देणे महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा जास्तीत जास्त सहभाग करून घेणेदेखील महत्वाचे आहे. ग्रामीण भागातील 15% महिला तर 85% पुरुष तसेच शहरी भागातील 30% महिला तर 60% पुरुष आहेत. यामध्ये महिलांची टक्केवारी आपल्याला कमी दिसून येते. या क्षेत्राविषयीची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवणे आणि प्रत्येक राजकीय पक्षांनी महिलांना संधी देणे तसेच उच्च निच्च, गरीब श्रीमंत असा मतभेद न करता सर्वसामान्यांना जास्तीत जास्त सहभाग या क्षेत्रात करून घ्यावा. लोकप्रतिनिधी कायदा 1950, लोकप्रतिनिधी कायदा 1951, मतदान नोंदणी अधिनियम 1960, राष्ट्रपती उपराष्ट्रपती कायदा 1952, संसद तसेच विधानमंडळातील कायदे यांच्यामध्ये देखील परिस्थितीनुसार तसेच वेळेनुसार बदल करणे महत्त्वपूर्ण आहे. जेणेकरून या कायद्यासंदर्भात ची माहिती सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचेल आणि त्यांचा राजकीय क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होईल.

आमच्या भारतामध्ये अनेक जातीचे अनेक धर्माचे लोक एकत्र राहतात. भारतीय राज्यघटनेने प्रत्येकाला स्वातंत्र्य,समता, बंधुता, न्यायांची वागणूक सर्वांना सामान प्रमाणात दिली आहे. लोकांनी लोकांसाठी लोकांमार्फत चालवलेले शासन म्हणजे लोकशाही होय. या ववाक्याला अनुसरून भारतीय लोकांचा लोकशाहीवर विश्वास प्रचंड आहे. परंतु आजच्या काळामध्ये निवडणूक आयोगावर देखील लोकांचा विश्वास कमी होत चाललेला आहे. लोकांचा लोकशाही, राजकारण, निवडणूक आयोग, कायदेमंडळ तसेच राजकीय पक्ष यांची घटना यामध्ये सुधारणा करून पारदर्शक पणे कारभार चालवावा. जेणेकरून लोकांचा राजकीय क्षेत्रावर पुन्हा विश्वास निर्माण होईल यासाठी निवडणूक सुधारणा आणि राजकीय सहभाग करणे महत्वाचे आहे.

**निष्कर्ष:**

- सामान्य लोकांचा राजकीय क्षेत्रामध्ये सहभाग वाढला.
- अत्याधुनिक आणि बदललेल्या राजकीय कायद्यामुळे लोकांचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला .

**संदर्भसूची:**

1. Bhartiy Rajyghatana,
2. ( Kolambe Ranjan), Bhagirath Publication Pune, March 2022, ISBN -1810/2019.
3. Indian Polity( M. Laximikanth), MC GRAW HILL Publication, Feb. 2025, ISBN-978-93-6444-766-6.
4. Loksabha, Rajysabha adhiniyam( Indian Parliament), S. Chanda Publication Pvt. Ltd., 2 June 2021, ISBN-978-9390378982.
5. Loksatta Newspaper

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# भारतीय राजनीति में मुस्लिम भागीदारी : उपलब्धियाँ, बाधाएँ और भविष्य की दिशा

**प्रा. शेख मोईन शेख नईम[1], डॉ. रईस अहमद[2]**
[1]राजनीति विज्ञान विभाग, सामाजिक विज्ञान संकाय, क.ब.चौ.उ.म.वि., जलगांव
[2]असिस्टेंट प्रोफेसर, गांधी फैज़-ए-आम कॉलेज, शाहजहांपुर (उ. प्र.)

**Manuscript ID**:
JRD -2026-180126
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 122-126
January 2026

***सारांश***

*भारत ने स्वतंत्रता के बाद एक लोकतांत्रिक राष्ट्र के तौर पर राजनीतिक संस्थाओं, चुनावी प्रक्रियाओं तथा शासन व्यवस्था में अहम बदलाव किए हैं। दशकों की इस परिवर्तनशील यात्रा में विभिन्न समुदायों की राजनीतिक भागीदारी भारत के अर्जित लोकतंत्र की सफलता तथा सीमाओं दोनों को उजागर करती है। भारत की एक महत्वपूर्ण अल्पसंख्यक आबादी का प्रतिनिधित्व करने वाले मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी स्वतंत्रता के बाद देश के लोकतांत्रिक विकास का एक महत्वपूर्ण संकेतक रही है। प्रस्तुत शोधपत्र स्वतंत्रता के पश्चात मुसलमानों की भारतीय संसद में भागीदारी का समग्र विश्लेषण प्रस्तुत करता है। प्रस्तुत अध्ययन में यह स्पष्ट किया गया है कि संवैधानिक अधिकारों तथा लोकतांत्रिक ढांचे के विद्यमान होने के बावजूद मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी कई सामाजिक, आर्थिक तथा संस्थागत कारकों से प्रभावित रही है। साथ ही, कुछ ऐतिहासिक उपलब्धियों तथा उभरती संभावनाओं को भी रेखांकित किया गया है, जो निकट भविष्य में और ज़्यादा समावेशी लोकतंत्र की दिशा में संकेत करती हैं।*

***मुख्य शब्द:*** *लोकतंत्र, मुस्लिम प्रतिनिधित्व, स्वतंत्र भारत का राजनीतिक रूपांतरण, समावेशी प्रतिनिधित्व*

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

## प्रस्तावना

भारत ने स्वतंत्रता के बाद एक संवैधानिक लोकतंत्र के रूप में राजनीतिक संस्थाओं, चुनावी प्रक्रिया और शासन प्रणाली में निरंतर विकास एवं परिवर्तन का अनुभव किया है। लोकतांत्रिक सिद्धांतों के अनुसार , किसी भी लोकतंत्र की गुणवत्ता का मूल्यांकन मात्र चुनावों के आयोजन भर से नहींबल्कि समाज , के सभी वर्गों की समान राजनीतिक भागीदारी तथा प्रभावी प्रतिनिधित्व से किया जाता है। प्रतिनिधित्वसहभागिता तथा , समावेशन जैसे अवधारणात्मक ढांचे आधुनिक लोकतांत्रिक सिद्धांतों के केंद्रीय तत्व माने जाते हैंजो यह , कि लोकतंत्र किस हद तक अपने न निर्धारित करते हैंागरिकों की विविध आकांक्षाओं को प्रतिबिंबित करता है। भारतीय समाज की बहुलतावादी संरचना में मुस्लिम समुदाय एक महत्वपूर्ण अल्पसंख्यक समूह हैजिसकी , राजनीतिक सहभागिता स्वतंत्र भारत के लोकतांत्रिक रूपांतरण को समझने का एक सैद्धांतिक तथा व्यावहारिक आधार प्रदान करती है। संविधान द्वारा प्रदत्त समानताधार्मिक स्वतंत्रता एवं , सार्वभौमिक वयस्क मताधिकार जैसे प्रावधानों के बावजूदस्वतंत्रता के बाद से मुस्लिम समुदाय की संसद , में भागीदारी कई सामाजिकआर्थिक तथा , संस्थागत बाधाओं से प्रभावित रही है। यह स्थिति लोकतांत्रिक समावेशन तथा अल्पसंख्यक राजनीति से जुड़े सिद्धांतों के आलोक में एक महत्वपूर्ण अध्ययन का विषय बनती है। स्वतंत्र भारत के इतिहास में कुछ चरण ऐसे भी रहे हैं जहाँ मुस्लिम समुदाय ने राजनीतिक नेतृत्व तथा संसदीय भागीदारी के माध्यम से लोकतांत्रिक प्रक्रिया में उल्लेखनीय योगदान दिया है। लेकिनसमग्र परिदृश्य में उनकी सहभागिता , जो सिर्फ ,अपेक्षाकृत सीमित रही है संख्यात्मक असंतुलन का प्रश्न भर नहीं हैबल्कि यह राजनीतिक , सामाजिक विश्वास और ,सशक्तिकरण संस्थागत प्रतिनिधित्व की व्यापक संरचनात्मक समस्याओं को भी उजागर करता है।

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. शेख मोईन शेख नईम, राजनीति विज्ञान विभाग, सामाजिक विज्ञान संकाय, क.ब.चौ.उ.म.वि., जलगांव*

**How to cite this article:**
*शेख मोईन शेख नईम, & अहमद, . रईस . (2026). भारतीय राजनीति में मुस्लिम भागीदारी : उपलब्धियाँ, बाधाएँ और भविष्य की दिशा. Journal of Research & Development, 18(1(IV)), 122–126.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18169778*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18169778

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

इस संदर्भ मेंप्रस्तुत , अध्ययन प्रतिनिधित्व के सैद्धांतिक विमर्शसहभागी लोकतंत्र एवं , सामाजिक न्याय के सिद्धांतों को आधार बनाकर मुस्लिम राजनीतिक सहभागिता का विश्लेषण प्रस्तुत करता है।

**शोध के उद्देश् :**

- स्वतंत्रता के पश्चात भारत के अर्जित लोकतंत्र के राजनीतिक रूपांतरण की प्रक्रिया में मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता के स्वरूप तथा प्रवृत्तियों का विश्लेषण करना।
- भारतीय राजनीति में मुसलमानों की भागीदारी को प्रभावित करने वाले सामाजिक, आर्थिक तथा संस्थागत कारकों की पहचान एवं समालोचनात्मक अध्ययन करना।
- संसद में मुस्लिम प्रतिनिधित्व की स्थिति का आकलन करते हुए उसकी लोकतांत्रिक समावेशिता के संदर्भ में समीक्षा करना।
- भविष्य में मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी तथा सशक्तिकरण को बढ़ावा देने हेतु संभावित नीतिगत एवं संस्थागत सुधारों हेतु सुझाव प्रस्तुत करना।

**शोध का महत्त्व :**

- प्रस्तुत अध्ययन स्वतंत्र भारत के लोकतांत्रिक रूपांतरण की प्रक्रिया में मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता का समग्र विश्लेषण प्रस्तुत करता है, जिससे भारतीय लोकतंत्र की समावेशिता तथा गुणवत्ता को समझने में सहायता मिलती हैं।
- प्रस्तुत शोधपत्र अल्पसंख्यक राजनीति तथा प्रतिनिधित्व से जुड़े सैद्धांतिक विमर्श को सुदृढ़ करता है और भारतीय संदर्भ में लोकतांत्रिक सहभागिता के व्यावहारिक आयामों को स्पष्ट करता है।
- प्रस्तुत अध्ययन मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी को प्रभावित करने वाले सामाजिक, आर्थिक तथा संस्थागत कारकों की पहचान करता है, जो भविष्य के अकादमिक शोध एवं तुलनात्मक अध्ययनों हेतु उपयोगी आधार प्रदान करता है।
- प्रस्तुत शोध नीतिनिर्माताओं, राजनीतिक दलों एवं नागरिक समाज हेतु नीतिगत सुझाव प्रदान करता है, जिनके माध्यम से एक अधिक न्यायपूर्ण, सहभागी तथा समावेशी लोकतांत्रिक व्यवस्था के निर्माण में योगदान दिया जा सकता है।

**विश्लेषण:**

भारतीय लोकतंत्र समानताप्रतिनिधित्व तथा , समावेशिता के संवैधानिक आदर्शों पर आधारित हैलेकिन , व्यवहार में इन आदर्शों की प्राप्ति विभिन्न सामाजिक समूहों हेतु समान रूप से नहीं हो पाई है। देश के एक महत्वपूर्ण अल्पसंख्यक समुदाय के रूप में मुसलमानों की राजनीतिक सहभागिता तथा प्रतिनिधित्व भारतीय लोकतंत्र की गुणवत्तासामाजिक न्याय एवं , बहुलतावादी चरित्र को परखने की एक महत्वपूर्ण कसौटी प्रस्तुत करता है। स्वतंत्रता के बाद से अब तक मुस्लिम समुदाय की राजनीतिक भूमिका समय , परिस्थितियों तथा राजनीतिक संरचनाओं के अनुरूप बदलती रही हैसाथ संरचनात्मक बाधाएँ भी स्पष्ट रूप -जिसमें उपलब्धियों के साथ , से दिखाई देती हैं। प्रस्तुत विश्लेषण का उद्देश्य मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता के स्वरूपउस पर प्रभाव डालने वाले , वास्तविक स्थिति और संसद में उनके प्रतिनिधित्व की ,आर्थिक एवं संस्थागत कारकों-सामाजिक भविष्य की संभावनाओं का समग्र एवं समालोचनात्मक अध्ययन करना हैताकि भारतीय लोकतंत्र में समावेशिता तथा , प्रतिनिधित्व के प्रश्न को गहराई से समझा जा सके।

**मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता का स्वरूप तथा प्रवृत्तियां:**

स्वतंत्रता के बाद भारत के अर्जित लोकतंत्र के राजनीतिक रूपांतरण की प्रक्रिया में मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता के स्वरूप तथा प्रवृत्तियों का विश्लेषण यह स्पष्ट करता है कि यह सहभागिता समय, परिस्थितियों और राजनीतिक संदर्भों के अनुसार निरंतर परिवर्तनशील रही है। प्रारंभिक दशकों में मुस्लिम समुदाय की राजनीतिक भूमिका मुख्यतः राष्ट्रीय दलों के भीतर समायोजन तथा धर्मनिरपेक्ष राजनीति में विश्वास के माध्यम से अभिव्यक्त हुई। सार्वभौमिक वयस्क मताधिकार तथा लोकतांत्रिक संस्थाओं की स्थापना ने औपचारिक रूप से समान अवसर प्रदान किए, लेकिन व्यावहारिक स्तर पर मुस्लिम राजनीतिक सहभागिता कई संरचनात्मक सीमाओं से प्रभावित रही। समय के साथ, चुनावी राजनीति में क्षेत्रीय दलों के उदय, पहचान-आधारित राजनीति और सामाजिक-आर्थिक कारकों ने मुस्लिम समुदाय की राजनीतिक प्रवृत्तियों को नए आयाम प्रदान किए। मतदान व्यवहार, प्रत्याशी का चयन, नेतृत्व की भूमिका तथा नीतिनिर्माण में प्रभाव जैसे पहलुओं में यह देखा जा सकता है कि मुस्लिम सहभागिता मात्र संख्या तक सीमित न रहकर रणनीतिक एवं परिस्थितिजन्य स्वरूप ग्रहण करती गई। हालांकि कुछ ऐतिहासिक चरणों में राजनीतिक प्रतिनिधित्व में वृद्धि दिखाई देती है, मगर फिर भी समग्र रूप से यह प्रवृत्ति असमान एवं असंतुलित बनी रही है।

इस तरह, मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता का अध्ययन भारतीय लोकतंत्र के राजनीतिक रूपांतरण की गुणवत्ता, समावेशिता तथा सामाजिक न्याय के स्तर को समझने का एक महत्वपूर्ण आधार प्रस्तुत करता है। प्रस्तुत विश्लेषण न सिर्फ अतीत की प्रवृत्तियों को रेखांकित करता है, बल्कि वर्तमान चुनौतियों तथा भविष्य की संभावनाओं को समझने में भी सहायक सिद्ध होता है।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**मुसलमानों की राजनीतिक भागीदारी को प्रभावित करने वाले कारक:**

मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता मात्र संवैधानिक अधिकारों तथा मतदान के अवसरों तक सीमित नहीं है। इसे कई सामाजिक, आर्थिक तथा संस्थागत कारक प्रभावित करते हैं, जो उनके प्रतिनिधित्व एवं नीतिनिर्माण में प्रभाव को सीमित या सशक्त कर सकते हैं।

**1. सामाजिक कारक:** मुस्लिम राजनीतिक भागीदारी को सामाजिक संरचना, जातिगत एवं धार्मिक पहचान और सामुदायिक संगठन प्रभावित करते हैं। बहुलतावादी समाज में सांस्कृतिक तथा धार्मिक दृष्टिकोण अक्सर मतदान व्यवहार एवं राजनीतिक प्राथमिकताओं को निर्धारित करते हैं। साथ ही, शिक्षा, सामाजिक चेतना तथा राजनीतिक जागरूकता का स्तर भी यह निर्धारित करता है कि समुदाय के सदस्य कितने सक्रिय रूप से चुनावी तथा नीतिगत प्रक्रियाओं में सम्मिलित होते हैं।

**2. आर्थिक कारक:** मुसलमानों की राजनीतिक सक्रियता पर आर्थिक पिछड़ापन, बेरोज़गारी तथा सीमित संसाधन प्रतिकूल प्रभाव डालते हैं। आर्थिक रूप से कमज़ोर वर्ग न सिर्फ चुनावी भागीदारी में कम सक्रिय होते हैं, बल्कि उनके लिए राजनीतिक नेतृत्व तक पहुंच तथा प्रभाव का अवसर भी सीमित हो जाता है। आर्थिक असमानता न सिर्फ व्यक्तिगत स्तर पर, बल्कि क्षेत्रीय एवं राज्य स्तर पर प्रतिनिधित्व की असमानता को भी बढ़ाती है।

**3. संस्थागत कारक:** राजनीतिक दलों की नीतियाँ, प्रत्याशी चयन प्रक्रिया, चुनावी संरचना तथा संसद में अल्पसंख्यकों हेतु आरक्षित अवसर जैसी संस्थागत परिस्थितियाँ मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी को प्रभावित करती हैं। राजनीतिक दलों में अल्पसंख्यक नेतृत्व का अभाव तथा दलगत प्राथमिकताओं के चलते मुसलमानों की राजनीतिक आवाज़ सीमित रह जाती है। इसके इलावा, निर्वाचन आयोग, चुनावी वित्त पोषण तथा राजनीतिक गठबंधन जैसी संस्थागत प्रक्रियाएँ भी प्रतिनिधित्व की वास्तविकता को आकार देती हैं।

**समालोचनात्मक दृष्टि:** इन कारकों का समग्र विश्लेषण यह दर्शाता है कि मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता सिर्फ संख्या तथा वोट बैंक तक सीमित नहीं है, बल्कि यह समाज, अर्थव्यवस्था एवं संस्थागत ढांचे के जटिल अंतःक्रियात्मक प्रभावों का परिणाम है। मुस्लिम समुदाय के राजनीतिक सशक्तिकरण हेतु केवल संवैधानिक अधिकार काफी नहीं हैं; बल्कि सामाजिक एवं आर्थिक असमानताओं को कम किया जाना तथा संस्थागत सुधारों के माध्यम से अल्पसंख्यक समुदाय हेतु नेतृत्व, प्रतिनिधित्व एवं निर्णय निर्माण की वास्तविक संभावना सुनिश्चित करना भी ज़रूरी हैं।

**संसद में मुस्लिम प्रतिनिधित्व की स्थिति:**

भारत के अर्जित लोकतंत्र की आत्मा उसकी समावेशिता में निहित है। देश की सर्वोच्च विधायी संस्था संसद से यह अपेक्षा की जाती है कि वह भारत के विविध सामाजिक-धार्मिक समूहों का यथोचित प्रतिनिधित्व करे। निम्नलिखित चार्ट के आँकड़े 1952 से 2024 तक लोकसभा में मुस्लिम प्रतिनिधित्व की स्थिति को स्पष्ट करते हैं तथा यह प्रश्न उठाते हैं कि क्या भारत का अर्जित लोकतंत्र वास्तव में सभी समुदायों को समान अवसर दे पा रहा है।

| लोकसभा | मुस्लिम सांसद | प्रतिनिधित्व |
|---|---|---|
| 1952 | 25 | 5.11 % |
| 1957 | 23 | 4.66 % |
| 1962 | 26 | 5.26 % |
| 1967 | 28 | 5.38 % |
| 1971 | 28 | 5.41 % |
| 1977 | 32 | 5.90 % |
| 1980 | 49 | 9.04 % |
| 1984 | 45 | 8.30 % |
| 1989 | 33 | 6.24 % |
| 1991 | 29 | 5.37 % |
| 1996 | 27 | 4.97 % |
| 1998 | 28 | 5.16 % |
| 1999 | 32 | 5.89 % |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

| | | |
|---|---|---|
| 2004 | 35 | 6.45 % |
| 2009 | 28 | 5.16 % |
| 2014 | 23 | 4.24 % |
| 2019 | 26 | 4.79 % |
| 2024 | 24 | 4.42 % |

**स्रोत:** भारतीय निर्वाचन आयोग

1952 से 2024 तक कुल 9,534 सांसद चुने गए, जिनमें से मात्र 541 मुस्लिम सांसद रहे। जबकि जनसंख्या के अनुपात के आधार पर अपेक्षित मुस्लिम सांसदों की संख्या 1,147 होनी चाहिए थी। यह अंतर स्वयं में लोकतांत्रिक प्रतिनिधित्व के गंभीर अभाव को दर्शाता है। औसतन देखें तो कुल वंचन दर (Deprivation Rate) 52.8% रही, अर्थात् मुस्लिम समुदाय को उसके जनसंख्या-अनुपात के अनुसार संसद में आधे से भी कम प्रतिनिधित्व प्राप्त हुआ। 1952 से 1977 तक मुस्लिम प्रतिनिधित्व अपेक्षित संख्या से निरंतर कम रहा, जहाँ वंचन दर 44% से 57% के बीच बनी रही। 1980 का चुनाव एक अपवाद के रूप में सामने आता है, जहाँ वंचन दर घटकर 16.95% रह गई। यह दौर राजनीतिक प्रतिस्पर्धा, सामाजिक गठबंधनों तथा अल्पसंख्यक समर्थन की राजनीति से जुड़ा माना जा सकता है। 1991 के बाद मुस्लिम प्रतिनिधित्व में स्पष्ट गिरावट दिखाई देती है। 1991 में वंचन दर 56.92%, 2014 में 65.15%, 2019 में 66.23% तथा 2024 में यह बढ़कर 72.7% हो गई। 2024 में स्थिति सबसे अधिक चिंताजनक है, जहाँ 543 सांसदों में मात्र 24 मुस्लिम सांसद चुने गए, जबकि अपेक्षित संख्या 77 थी। यह लोकतांत्रिक समावेशिता के गंभीर संकट की ओर संकेत करता है।

लोकतंत्र सिर्फ मतदान का अधिकार नहीं, बल्कि निर्णय-प्रक्रिया में भागीदारी का भी नाम है। संसद में मुस्लिम प्रतिनिधित्व के अभाव के कारण अल्पसंख्यक समुदाय की सामाजिक-आर्थिक समस्याएँ नीति-निर्माण में पर्याप्त रूप से प्रतिबिंबित नहीं हो पातीं, लोकतंत्र की बहुलतावादी प्रकृति कमज़ोर होती है और समुदाय में राजनीतिक हाशियाकरण की भावना गहराती है। संलग्न चार्ट के आँकड़े स्पष्ट करते हैं कि भारतीय संसद में मुस्लिम प्रतिनिधित्व संवैधानिक आदर्शों तथा लोकतांत्रिक समावेशिता की कसौटी पर खरा नहीं उतरता। बढ़ती वंचन दर यह दर्शाती है कि समस्या सिर्फ ऐतिहासिक नहीं, बल्कि वर्तमान लोकतांत्रिक संरचना से भी जुड़ी हुई है। अगर भारतीय लोकतंत्र को वास्तव में समावेशी बनाना है, तो राजनीतिक दलों, चुनावी संरचनाओं तथा सामाजिक चेतना — तीनों स्तरों पर गंभीर आत्ममंथन एवं सुधार की ज़रूरत है। तभी संसद भारत की वास्तविक विविधता का प्रतिनिधि स्वरूप बन सकेगी।

**भविष्य की दिशा:**

भारतीय लोकतंत्र में मुस्लिम समुदाय की वास्तविक राजनीतिक भागीदारी तथा प्रतिनिधित्व बढ़ाने हेतु सिर्फ संवैधानिक अधिकार काफी नहीं हैं। इसके लिए नीतिगत, सामाजिक तथा संस्थागत सुधारों की ज़रूरत है। प्रस्तुत शोध के आधार पर निम्नलिखित सुझाव दिए जा सकते हैं:

**1. राजनीतिक दलों में समावेशिता को बढ़ावा देना:** राष्ट्रीय तथा क्षेत्रीय राजनीतिक दलों को मुस्लिम समुदाय हेतु प्रत्याशी चयन, नेतृत्व भूमिकाओं तथा नीतिगत निर्णयों में सक्रिय भागीदारी सुनिश्चित करनी चाहिए। अल्पसंख्यकों हेतु निर्धारित किए गए प्रतिनिधित्व को सिर्फ सांकेतिक रूप से न देखें, बल्कि इसे वास्तविक निर्णय प्रक्रिया में प्रभावशाली बनाना ज़रूरी है।

**2. सामाजिक तथा आर्थिक सशक्तिकरण:** शिक्षा, कौशल विकास तथा रोज़गार के अवसरों में सुधार मुस्लिम समुदाय के राजनीतिक आत्मविश्वास एवं भागीदारी को बढ़ाने में सहायक होंगे। आर्थिक तथा सामाजिक पिछड़ापन राजनीतिक निष्क्रियता का एक प्रमुख कारण है; इसलिए इन असमानताओं को कम करना लोकतांत्रिक समावेशिता हेतु ज़रूरी है।

**3. संस्थागत सुधार और अल्पसंख्यक प्रतिनिधित्व:** संसद में अल्पसंख्यकों के प्रतिनिधित्व की वास्तविक स्थिति को सुधारने हेतु निर्वाचन प्रक्रिया, चुनावी वित्तपोषण तथा आरक्षित सीटों के प्रभावी उपयोग जैसे संस्थागत उपाय किए जा सकते हैं। इसके अतिरिक्त, निर्वाचन आयोग एवं संबंधित संस्थाओं द्वारा अल्पसंख्यक समुदाय के राजनीतिक जागरूकता कार्यक्रम आयोजित किए जाने चाहिए।

**4. लोकतांत्रिक जागरूकता और नागरिक सहभागिता:** मुस्लिम समुदाय में लोकतांत्रिक अधिकारों, मतदान की प्रक्रिया तथा राजनीतिक सहभागिता के महत्व के प्रति जागरूकता बढ़ाने हेतु प्रशिक्षण, कार्यशालाएँ तथा सामुदायिक कार्यक्रम आयोजित किए जा सकते हैं। यह पहल न सिर्फ मतदान दर बढ़ाने में सहायक सिद्ध होगी, बल्कि राजनीतिक नेतृत्व में भी सक्रिय भागीदारी सुनिश्चित करेगी।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

**5. बहुलतावादी और समावेशी नीतिगत दृष्टिकोण:** सरकारी तथा राजनीतिक नीतियाँ अल्पसंख्यक समुदायों की विशिष्ट आवश्यकताओं तथा आकांक्षाओं को ध्यान में रखकर तैयार की जानी चाहिए। राजनीतिक प्रतिनिधित्व तथा नीतिगत निर्णयों में विविध दृष्टिकोण सम्मिलित करने से लोकतंत्र की समावेशिता तथा सामाजिक न्याय सुनिश्चित किया जा सकता है।

प्रस्तुत सुधारों के माध्यम से मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी न सिर्फ संख्या में बढ़ेगी, बल्कि उनकी नीति निर्माण तथा नेतृत्व में प्रभावशीलता भी सुनिश्चित होगी। यह पहल भारतीय लोकतंत्र को अधिक न्यायपूर्ण, सहभागी तथा समावेशी बनाने की दिशा में एक महत्वपूर्ण योगदान होगी।

**निष्कर्ष:**

- स्वतंत्र भारत में मुस्लिम समुदाय की राजनीतिक सहभागिता ने लोकतंत्र की समावेशिता तथा बहुलतावादी चरित्र को उजागर किया है, मगर संसद में इस समुदाय का प्रतिनिधित्व अभी भी जनसंख्या के अनुपात में काफी कम है।
- मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी मात्र मतदान तक सीमित नहीं है; यह राजनीतिक दलों में भूमिका, नेतृत्व तथा नीतिनिर्माण में प्रभाव जैसे विभिन्न आयामों में परिलक्षित होती है।
- सामाजिक कारक (जातीय-सांस्कृतिक पहचान, शिक्षा एवं राजनीतिक जागरूकता) तथा आर्थिक कारक (आर्थिक पिछड़ापन, रोज़गार एवं संसाधनों का अभाव) मुस्लिम समुदाय की राजनीतिक सक्रियता को प्रभावित करते हैं।
- राजनीतिकदलोंकीनीतियाँआरक्षितसीट,प्रत्याशीकीचयनप्रक्रिया,ोंकाप्रभावएवंनिर्वाचनढांचा जैसे संस्थागत कारक मुस्लिम समुदाय के प्रतिनिधित्व तथा सशक्तिकरण में अहम भूमिका निभाते हैं।
- ऐतिहासिक उपलब्धियों के बावजूद मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी में असमानता यह दर्शाती है कि संवैधानिक अधिकारों एवं लोकतांत्रिक संस्थाओं के अस्तित्व के बावजूद वास्तविक समावेशिता अब भी पुर्ण रूप से साकार नहीं हो पाई।
- भविष्य में मुस्लिम समुदाय की राजनीतिक भागीदारी को बढ़ाने हेतु नीतिगत तथा संस्थागत सुधारों की ज़रूरत है, जिसमें शिक्षा, सामाजिक तथा आर्थिक सशक्तिकरण, राजनीतिक दलों में समावेशिता एवं नागरिक जागरूकता सम्मिलित हैं।
- इन सुधारों तथा सहभागिता के माध्यम से भारत का अर्जित लोकतंत्र और ज़्यादा न्यायपूर्ण, सहभागी तथा समावेशी बन सकता है, जिससे अल्पसंख्यक समुदाय हेतु वास्तविक नेतृत्व एवं नीति निर्माण के अवसर सुनिश्चित होंगे।

**संदर्भ सूची:**

1. शर्मा, रामनाथ, 'भारतीय राजनीति और अल्पसंख्यक प्रश्न', राजकमल प्रकाशन, प्रथम संस्करण, 2012, पृ. 93.
2. खान, आतिफ, 'Muslim Politics in India', Orient Blackswan, Second Edition, 2015, p. 78.
3. नय्यर, हामिद, 'Representation and Minorities in Indian Democracy', Sage Publications, 2018, p. 102.
4. हसन, मुशीरुल, 'Indian Muslims since Independence', Penguin Books, 1997, p. 45.
5. अहमद, इमरान, 'Indian Democracy and Minority Rights', Oxford University Press, 2016, p. 59.
6. सईद, अब्दुल, 'Muslims in Indian Political System', Manak Publications, Third Edition, 2014, p. 88.
7. खानएजा,ज़, 'Minority Representation in Indian Democracy', Routledge India, 2019, p. 121.
8. सैयद, आरिफ, 'Indian Polity and Muslim Leadership', Atlantic Publishers, 2017, p. 65.
9. फैज़, सलमान, 'भारतीय लोकतंत्र और मुसलमानों की भूमिका', ज्ञान प्रकाशन, 2020, पृ. 134.
10. नसीम, तारिक, 'Political Inclusion and Indian Muslims', Cambridge University Press, 2021, p. 77.
11. Khan, Atif, 'Muslim Representation and Indian Politics', Routledge India, 2018, p. 114.

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article


# स्वतंत्र भारतातील साहित्याचे प्रतिबिंब


**प्रा.डॉ.नयन भट्रप्रसाद पाटील**

व्ही.पी.होले.शिक्षणशास्त्र आणि शारीरिक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय,जळगाव



**Manuscript ID**:
JRD -2026-180127

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(IV)

Pp. 127-129

January 2026

**Submitted:** 14 Dec. 2025

**Revised:** 24 Dec. 2025

**Accepted:** 15 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*सदर शोधनिबंधात स्वतंत्र भारतातील साहित्याचे प्रतिबिंब या संकल्पनेच्या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व वैचारिक परिवर्तनांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. १९४७ नंतर भारतीय समाजाने अनुभवलेले फाळणीचे दुःख, निर्वासितांचे प्रश्न, जातिव्यवस्था, गरिबी, औद्योगिकीकरण, शहरीकरण, स्त्रीस्थिती आणि सामाजिक विषमता यांचे प्रभावी प्रतिबिंब साहित्यामध्ये कसे उमटले, याचे विश्लेषण या अभ्यासात केले आहे. स्वातंत्र्योत्तर साहित्य हे केवळ कलात्मक अभिव्यक्ती न राहता सामाजिक वास्तवाचे संवेदनशील व चिकित्सक माध्यम ठरले आहे. प्रगतिशील साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य तसेच ग्रामीण व शहरी वास्तववाद या विविध साहित्यप्रवाहांनी उपेक्षित घटकांचे दुःख, संघर्ष, आत्मसन्मान व अस्मितेचे प्रश्न ठामपणे मांडले. मराठी साहित्यातील कादंबरी, कथा, कविता आणि नाटक या साहित्यप्रकारांतून सामान्य माणसाचे जीवन, त्याचे संघर्ष, मूल्यसंघर्ष, बंडखोरी आणि मानवी संवेदना प्रभावीपणे व्यक्त झाल्या आहेत.*


## प्रस्तावना

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला आणि त्या ऐतिहासिक घटनेनंतर केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रातही आमूलाग्र परिवर्तन घडून आले. स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्याने नव्या मूल्यांची, नव्या प्रश्नांची आणि नव्या संघर्षांची मांडणी केली. स्वतंत्र भारताचे साहित्यिक प्रतिबिंब या संकल्पनेतून स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील सामाजिक वास्तव, मानवी संवेदना, राजकीय जाणीव आणि सांस्कृतिक अस्मिता यांचे साहित्यिक प्रतिबिंब अभ्यासले जाते.स्वतंत्र भारताचे साहित्यिक प्रतिबिंब या संकल्पनेतून स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील सामाजिक वास्तव, मानवी संवेदना, राजकीय जाणीव आणि सांस्कृतिक अस्मिता यांचा सखोल अभ्यास केला जातो. विविध भाषा, प्रांत आणि संस्कृती असलेल्या भारतात साहित्याने एकीकडे राष्ट्रीय एकात्मतेचा विचार मांडला, तर दुसरीकडे स्थानिक प्रश्न, उपेक्षित घटकांचे दुःख आणि व्यक्तिस्वातंत्र्याची जाणीव यांनाही वाचा फोडली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर साहित्य हे केवळ कलात्मक अभिव्यक्ती न राहता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरले आहे. या बदलत्या वास्तवाचा प्रभाव साहित्यावर पडणे अपरिहार्य होते. स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्याने केवळ स्वातंत्र्याचे गौरवगान न करता त्या स्वातंत्र्याशी निगडित जबाबदाऱ्या, अपूर्ण स्वप्ने आणि सामान्य माणसाच्या जीवनातील संघर्ष यांचेही प्रांजळ चित्रण केले.साहित्य हे समाजाचे आरसामानले जातो.

## स्वातंत्र्योत्तर काळाची सामाजिक पार्श्वभूमी

स्वातंत्र्यानंतर भारताला फाळणीचे दुःख, निर्वासितांचे प्रश्न, गरिबी, जातिव्यवस्था, स्त्रियांची स्थिती, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागले.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:



**Address for correspondence:**

*प्रा.डॉ.नयन भट्रप्रसाद पाटील, व्ही.पी.होले.शिक्षणशास्त्र आणि शारीरिक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय,जळगाव*



**How to cite this article:**

*पाटील, . नयन . भट्रप्रसाद . (2026). स्वतंत्र भारतातील साहित्याचे प्रतिबिंब. Journal of Research & Development, 18(1(IV)), 127–129. https://doi.org/10.5281/zenodo.18169820*

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18169820

OPEN ACCESS

या सर्व घडामोडींचा थेट परिणाम साहित्यावर झाला. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता सामाजिक वास्तवाचे सशक्त माध्यम बनले. जातिव्यवस्था ही भारतीय समाजाची खोलवर रुजलेली समस्या स्वातंत्र्यानंतरही कायम राहिली. संविधानाने समता आणि सामाजिक न्यायाची हमी दिली असली तरी प्रत्यक्ष जीवनात दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांना भेदभावाचा सामना करावा लागला. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे दलित साहित्य आणि प्रगतिशील साहित्य उदयास आले. स्त्रियांची स्थिती हाही स्वातंत्र्योत्तर समाजातील एक महत्त्वाचा प्रश्न ठरला. शिक्षण, रोजगार, विवाहसंस्था आणि कौटुंबिक जीवनातील स्त्रीचे स्थान यावर नव्याने विचार होऊ लागला. स्त्रीवादी साहित्याने स्त्रीच्या निर्वासितांचे प्रश्न, पुनर्वसनाची समस्या आणि त्यातून निर्माण झालेले सामाजिक तणाव हे साहित्याचे महत्त्वाचे विषय बनले. त्याचबरोबर गरिबी, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता या समस्या अधिक तीव्र स्वरूपात समोर आल्या. ग्रामीण भागात शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, तर शहरी भागात वाढता मध्यमवर्ग आणि कामगारांचे शोषण यामुळे सामाजिक असमतोल वाढत गेला.अस्मितेचा, स्वातंत्र्याचा आणि आत्मसन्मानाचा प्रश्न ठामपणे मांडला. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे भारतीय समाजरचना झपाट्याने बदलू लागली. खेड्यांतून शहरांकडे होणारे स्थलांतर, तुटलेली कुटुंबव्यवस्था, एकाकीपणा आणि मूल्यसंघर्ष यामुळे मानवी नातेसंबंधांवर परिणाम झाला. या सर्व सामाजिक घडामोडींचा थेट परिणाम साहित्यावर झाला. त्यामुळे साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाच्या वास्तवाचे सशक्त, संवेदनशील आणि चिकित्सक माध्यम बनले.

**स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्यात पुढील विविध प्रवाह दिसून येतात**

- प्रगतिशील साहित्य – सामाजिक विषमता, वर्गसंघर्ष आणि शोषण यांविरुद्ध आवाज उठवणारे साहित्य.
- दलित साहित्य – दलितांच्या वेदना, संघर्ष आणि आत्मसन्मानाची मांडणी करणारा महत्त्वाचा प्रवाह.
- स्त्रीवादी साहित्य – स्त्रीच्या अस्मितेचा, स्वातंत्र्याचा आणि अधिकारांचा शोध.
- ग्रामीण व शहरी वास्तववाद – ग्रामीण जीवनातील बदल तसेच शहरी जीवनातील एकाकीपणा आणि ताणतणाव.

**मराठी साहित्यातील स्वातंत्र्योत्तर प्रतिबिंब**

मराठी साहित्याने स्वातंत्र्यानंतरच्या भारताचे वास्तव प्रभावीपणे व्यक्त केले. कादंबरी, कथा, कविता आणि नाटक या सर्व साहित्यप्रकारांतून समाजजीवनाचे विविध पैलू उलगडले गेले.

**१.कादंबरी-** स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीने सामाजिक परिवर्तनाचा वेध घेतला. ग्रामीण जीवनातील दारिद्र्य, शेतकऱ्यांचे प्रश्न, जमीनधारणेचे ताण तसेच शहरी मध्यमवर्गीय जीवनातील नैतिक मूल्यसंघर्ष यांचे सखोल चित्रण कादंबरीत आढळते. औद्योगिकीकरण, राजकारण आणि बदलती कौटुंबिक रचना यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम कादंबरीकारांनी प्रभावीपणे मांडला. व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक बंधने यांतील संघर्ष हा या काळातील कादंबऱ्यांचा महत्त्वाचा विषय ठरला.

**२.कथा-** स्वातंत्र्योत्तर मराठी कथांनी सामान्य माणसाच्या जीवनातील सूक्ष्म वास्तव उलगडले. बेरोजगारी, गरिबी, शोषण, एकाकीपणा आणि मानसिक ताणतणाव यांचे वास्तववादी चित्रण कथांमधून झाले. लघुकथेने समाजातील दुर्लक्षित घटकांचे दुःख, वेदना आणि बंडखोरी प्रभावीपणे व्यक्त केली. त्यामुळे मराठी कथा ही सामाजिक जाणिवेची सशक्त अभिव्यक्ती ठरली.

**३.कविता -** स्वातंत्र्यानंतरची मराठी कविता अधिक वैचारिक, सामाजिक आणि आत्मपर झाली. कवीने केवळ राष्ट्रप्रेम व्यक्त न करता सामाजिक अन्याय, मानवी वेदना, अस्तित्वाचे प्रश्न आणि बदलती मूल्यव्यवस्था यांचा शोध घेतला. दलित कविता, ग्रामीण कविता आणि स्त्रीवादी कविता यांमुळे मराठी कवितेला नवे आयाम प्राप्त झाले. कविता ही परिवर्तनाची आणि आत्मशोधाची माध्यम बनली.

**४.नाटक -** स्वातंत्र्योत्तर मराठी नाटकांनी समाजातील विसंगती, राजकीय विडंबन आणि मानवी नातेसंबंधांतील तणाव यांचे प्रभावी सादरीकरण केले. प्रायोगिक नाटक, सामाजिक नाटक आणि राजकीय नाटक या माध्यमांतून रंगभूमी ही समाजप्रबोधनाची जागा ठरली. प्रेक्षकांना विचार करण्यास प्रवृत्त करणे हे मराठी नाटकांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले.एकूणच स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याने भारतीय समाजाच्या बदलत्या वास्तवाचे प्रामाणिक प्रतिबिंब साकारले. त्यामुळे मराठी साहित्य हे केवळ कलात्मक अभिव्यक्ती न राहता समाजाचा जिवंत इतिहास ठरले आहे.

**साहित्य आणि राष्ट्रीय वेगळेपण -** स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्याने राष्ट्रीय अस्मितेच्या निर्मितीत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतासमोर 'राष्ट्र' म्हणून स्वतःची ओळख घडविण्याचे मोठे आव्हान होते. विविध भाषा, धर्म, जाती, प्रदेश आणि संस्कृती यांनी बनलेल्या भारतीय समाजात एकात्मतेची भावना निर्माण करणे आवश्यक होते. साहित्याने हे कार्य प्रभावीपणे पार पाडले.स्वातंत्र्योत्तर साहित्यातून 'विविधतेत एकता' ही संकल्पना ठळकपणे मांडली गेली.प्रादेशिक प्रश्न, स्थानिक जीवनानुभव आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

लोकसंस्कृती यांचे चित्रण करतानाच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार साहित्यिकांनी जोपासला.लोकशाही मूल्ये, व्यक्तिस्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या संविधानिक तत्त्वांचा प्रचार साहित्याच्या माध्यमातून झाला.

धर्मनिरपेक्षता ही स्वतंत्र भारताची मूलभूत ओळख साहित्याने सशक्तपणे अधोरेखित केली. धार्मिक सहअस्तित्व, मानवी मूल्ये आणि सहिष्णुता यांचा पुरस्कार करणारे लेखन मोठ्या प्रमाणावर झाले. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय, दलित-आदिवासी हक्क, स्त्रीस्वातंत्र्य आणि वंचित घटकांचे प्रश्न साहित्याच्या केंद्रस्थानी आले. त्यामुळे साहित्य हे केवळ भावनिक अभिव्यक्ती न राहता राष्ट्रनिर्मितीचे वैचारिक साधन ठरले.मराठी साहित्यानेही राष्ट्रीय अस्मितेच्या घडणीत महत्त्वाचे योगदान दिले. स्थानिक वास्तव मांडताना राष्ट्रीय प्रश्नांशी नाते जोडण्याची भूमिका मराठी साहित्याने सातत्याने घेतली. त्यामुळे साहित्य आणि राष्ट्रीय अस्मिता यांचे नाते अतूट झाले.

**निष्कर्ष:**

स्वतंत्र भारताचे साहित्यिक प्रतिबिंब या संकल्पनेतून स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाचे बहुआयामी आणि गतिमान चित्र समोर येते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर सतत बदलत राहिला. या परिवर्तनशील वास्तवाचे सूक्ष्म, संवेदनशील आणि चिकित्सक प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटले.मराठी साहित्याने स्वातंत्र्योत्तर भारतातील सामान्य माणसाचे जीवन, त्याचे संघर्ष, स्वप्ने, निराशा आणि बंडखोरी यांचे प्रामाणिक चित्रण केले. कादंबरी, कथा, कविता आणि नाटक या सर्व साहित्यप्रकारांतून समाजातील विषमता, अन्याय, मूल्यसंघर्ष आणि मानवी संवेदना प्रभावीपणे व्यक्त झाल्या. विशेषतः दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य आणि प्रगतिशील प्रवाहांमुळे मराठी साहित्य अधिक सामाजिक जाणीवसंपन्न झाले.

म्हणूनच स्वातंत्र्योत्तर साहित्य हे केवळ साहित्यिक अभिव्यक्ती न राहता स्वतंत्र भारताच्या सामाजिक इतिहासाचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरते. समाजाच्या आत्मशोधाची, राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेची आणि मानवी मूल्यांच्या संघर्षाची साक्ष देणारे हे साहित्य भविष्यातील अभ्यासासाठीही अत्यंत मोलाचे आहे.

**संदर्भ सूची:**

1. स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्य – विविध समीक्षात्मक लेखन
2. मराठी साहित्याचा इतिहास
3. सामाजिक परिवर्तन आणि साहित्य
4. खांडेकर, वि. स. – *साहित्य आणि समाज.*
5. फडके, य. दि. – *सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य.*
6. साळुंखे, भालचंद्र – *दलित साहित्य : स्वरूप आणि भूमिका.*
7. *मराठी साहित्य परिषद पत्रिका* – स्वातंत्र्योत्तर विशेषांक.
8. *समकालीन साहित्य* – विविध समीक्षात्मक लेख.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

Original Article

# नलविरचितम्-पाकदर्पणम्' मधील पाककलेचे वर्तमानातील प्रतिबिंब

**वै. स्वप्नील अनिल सहस्रबुद्धे[1], प्रा.डॉ. भाग्यश्री भवलतकर[2]**
[1]खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मूळजी जेठा कॉलेज, जळगांव
[2]मार्गदर्शक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**Manuscript ID:**
JRD -2026-180128
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(IV)
Pp. 130-135
January 2026

***बीजसार***

*'नलविरचितम्-पाकदर्पणम्' हा पाककला व शास्त्र विषयक असा प्रथम संस्कृत ग्रंथ होय. कृत व त्रेता युगातील निसर्ग व पर्यावरण यांशी अनुबंधित पाकसिद्धिचे कलात्मक व शास्त्रीय विवेचन यात केले आहे. पदार्थ निर्मितीची साधने व पदार्थ वितरणाची साधने यांचा सांस्कृतिक विचार ग्रंथलेखकाने केला आहे. तत्कालिन आहारसंस्कृतिचे दर्शन वर्तमानकालात निसर्गाश्रियी साधनांच्या उपयोजनाने आधुनिककालात कसे प्रतिबिम्बीत होते याचा शोध प्रस्तुत शोधनिबंधात सोदाहरण घेतला आहे.*

***लक्षवेधक शब्द:*** *अन्न (भात), मांस, शाक, पात्र, संभार, दर्वीपूट पुगपट्टनेत्र, चुल्याम्, कर्पूर, विधि, सूदकार, परिवेशक, भोक्ता.*

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

'नलविरचितम्-पाकदर्पणम्' मध्ये कृत व त्रेतायुगातील रामायणपूर्व कालापर्यंतच्या पाककला परंपरेचा कलात्मकतेने व शास्त्रीय दृष्टिने, वर्णनात्मक उल्लेख नलराजांनी केलेला आहे. या ग्रंथातून आहार परंपरेच्या मार्गाने सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. वर्तमानकालात भारताच्या चहूदिशांना 'पाकदर्पणम्' मधील अन्नविधिची परंपरा व वितरण कौशल्य हे लौकिक जीवनात आकर्षण ठरले आहे. पाकविधितून स्वाद आणि वितरणासाठीच्या मांडणीतून, क्षुधावर्धक संसूचन करण्याकडे सूदकारांचा व परिवेशकांचा तथा भोक्त्यांचा कल अनुभवता येतो. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये नलराजांनी वर्णित केलेल्या भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य व पेय या पंचविध पाकसिद्धिंचे वर्णन केले आहे. त्याचा तुलनात्मक विचार करूया. 'अन्न' (भात) या अन्नपदार्थाचे शाकाहारी व मांसाहारी उदाहरणे विचारात घेऊन पाहाणी करता येते.

**1) भक्ष्य/भोज्य -**

**(I) शाकाहारी अन्नविधि -** प्राचीन कालापासून 'ओदन' तथा 'अन्न' तथा तांदूळ हा मानवी आहारामध्ये मुख्य पदार्थ म्हणून गणला जातो. भारतात तांदूळ हे मुख्य पीक असलेले पर्वतीय, वन्य आणि सागरी किनारे असे भूप्रदेश आढळतात. आजही या प्रदेशांत तांदूळ हे प्रमुख अन्न आहे. 'नलविरचितम्-पाकदर्पणम्' मध्ये सर्वसामान्यतः शाकाहारी स्वरूपातील भाताचे - साधा पाण्यात शिजवलेला भात व चित्रान्न भात, दूध घालून शिजवलेला भात आणि मठ्ठा घालून शिजवलेला भात एवढे भात करण्याचे सामान्य विधि दिले आहेत. गोवंश परंपरा, पर्जन्याधिक्यातील अन्नोत्पादन परंपरा यांचा लोकसांस्कृतिक जीवनात विचार केलेला दिसतो. त्यामुळे दूध, ताक आणि तांदूळ यांचा सरसः वापर दिसतो. असे असले तरी भाताचे मांसाहारी पदार्थ मात्र 'पाकदर्पणम्' मध्ये मोठ्या प्रमाणावर दिले आहेत.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*वै. स्वप्नील अनिल सहस्रबुद्धे, खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मूळजी जेठा कॉलेज, जळगांव*

**How to cite this article:**
*सहस्रबुद्धे, . स्वप्नील . अनिल ., & भवलतकर, . भाग्यश्री . (2026). नलविरचितम्-पाकदर्पणम्' मधील पाककलेचे वर्तमानातील प्रतिबिंब. Journal of Research & Development, 18(1(IV)), 130–135*
*https://doi.org/10.5281/zenodo.18169856*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18169856
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

वर्तमानकालात भाताचे शाकमिश्रित तथा फलमिश्रित पदार्थ मोठ्या प्रमाणावर दैनंदिन जीवन, विवादाहि समारंभ व शाकाहारी हॉटेल संस्कृतिमध्ये पहावयास मिळतात. त्यात- चित्रान्न, पुलाव, बिर्याणी, मसाले भात, केशर भात, जिरायुक्त भात आदि प्रकार मोठ्या प्रमाणावर दिसतात.

तसेच भाताबरोबर रस्सम तथा डाळ तथा आमटी घेऊन कालवून खाण्याच्या पद्धती दिसतात. तसेच भाताचा आंबोळी, पानगे, पोंगल असे पदार्थही केलेले पहावयास मिळतात. यांत मांसाहाराचे अनुकरण शाकाहारात असल्याचे स्पष्ट जाणवते.

'नलविरचितम्-पाकदर्पणम्' मधील 'चित्रपाकीय भक्तभेदनिरुपणम्' असे -

"कथ्यन्ते भक्तभेदाश्च चित्रपाकसमन्विताः |
पुष्पैरनेकैर्बुहुभिः सुगन्धैर्वासितेषु च ॥86॥
विशालेषु च रम्येषु पूगपादेषु मानवित् |
सुजातं राजशाल्यन्नं सुपक्कं सुमनोहरम् ॥87॥
निक्षिपेत्तद्यथा योग्यं सुशीलं भक्तमुत्तमम् |
सर्वत्र सैन्धवं न्यस्येत् मृगनाभिसकर्पुरम् ॥88॥
कुंकुमं हिमतोयञ्च केतकीकुसुमं न्यसेत् |
मातुलुङ्गदलं न्यस्य कुम्भीकुस्तुम्बरी तथा ॥89॥
आर्द्रकस्य पलाण्डोश्च शकलान् समुन्निक्षिपेत् |
जीरकस्य च मेथ्याश्च चूर्णं सर्वत्र निक्षिपेत् ॥90॥
एभिश्चाकलयेद्भक्तं पूगपदेषु संस्थितम् ॥"1

नलराजांनी भाताची पाकसिद्धि सांगताना 'चित्रपाक' हा एक भाताचा प्रकार, प्रथम प्रकरणात वर्णन केलेला आहे. ह्या प्रकारात, पुराण राजशाली (बासमती) हा तांदूळ घेऊन तो थोड्या पाण्याने आधी स्वच्छ धुवून घ्यावा व नंतर तांदळाच्या तीन पट पाणी घालून चुलीवर शिजवण्यास ठेवावा. भात चांगला शिजत आला आहे हे पाहून त्यात सुगंधित पुष्पे टाकावित. सर्वत्र सैंधव मीठ टाकून दर्वीपूटयंत्राने हलवून घ्यावे. कस्तुरी कापूर, केवडा पुष्प, लिंबू, धने, जिरे यांची पावडर, कांद्याचे तुकडे, कोथिंबीर, आल्याचे तुकडे, मेथी इ. टाकून सुसज्जित करावे व पूगपट्टात (सुपारीच्या पानापासून बनवलेल्या पात्रात) काढावे. असा सुगंधित 'चित्रपाक' भोजन समयी भोजनकर्त्यांच्या समोर पूगपात्रात प्रस्तुत करावा. पूगपट्ट (सुपारीच्या पानाचे पात्र), पुराण राजशाली, पाणी, विविध सुगंधि पुष्पे, कांदी, लिंबू, धने, जिरे, आलं, मेथी, कोथींबीर यांसारख्या वस्तू पर्यावरणातील नैसर्गित वस्तुंचा वापर करून अन्नविधि संपन्न केलेला दिसतो. त्यात, हा पदार्थ मातीच्या चुलीवर वनातील सरपण वापरून सिद्ध केलेला असल्याने पर्यावरण अनुबंधित (Ecofriendly) आहे. हाच पदार्थ अलिकडील काळात हॉटेलमध्ये, मुद्दाम केळीच्या पानावर आकर्षक पद्धतीने प्रस्तुत केला जातो. तसेच आभासी सांस्कृतिक पर्यावरण तयार करून वितरीत केला जातो, हे परंपरेचे वर्तमानातील प्रतिबिंब होय. मात्र ह्यासाठी इंधन-विज किंवा गॅस स्वरूपात वापरले जाते तर चुलीऐवजी गॅसशेगडी तथा इलेक्ट्रिक शेगडी किंवा ओव्हन यांसारख्या आधुनिक साधनांचा वापर केला जातो. पाकदर्पणम् काळात भात हलविण्यासाठी 'दर्वीपूटयंत्र' (लाकडाची रवी), फळे कापण्यासाठी 'कल्कनीकोट्या' (एक धारदार शस्त्र) चा वापर केलेला दिसतो तर वर्तमानात कटर, मिक्सर, ज्युसर, फुडप्रोसेसर आदिंचा वापर करताना आढळतो.

**(II) मांसाहारी अन्नविधि -** मांसमिश्रित भाताचे विविध प्रकार, नलराज आपल्या 'नलविरचितम्-पाकदर्पणम्' मध्ये वर्णन करतात. यांत, छाग (बकरा), मेष (मेंढा), कुक्कुट (कोंबडी), लावूक (लावा पक्षी), शकुन्त नावाचा पक्षी आदिंच्या मांसाचा ओदनसिद्धिसाठी वापर केलेला दिसतो. उदाहरणार्थ- 'सामान्यमांसोदन', 'तहर्यन्न', 'मांसमिश्रितचित्रपाक', 'लावुकमांसोदन', 'कुक्कुटमांसतैलोदन', 'सूक्ष्ममांसोदन' प्रकार वर्णित आहेत त्यातील 'लावुकमांसोदननिर्माणविधि' येणेप्रमाणे-

"लावुकस्यामिषं दग्धं दग्धं मेदस्य मेदसम् |
तण्डुलाकारवत्कृत्वा सम्यगाभर्ज्य सर्पिषा ॥92॥
निक्षिपेच्छकलैः सार्द्धं पर्पटादिसमुद्भवैः |
किञ्चिदाज्यं पुनस्तत्र नवनीतसमुद्भवम् ॥93॥
मेलयित्वा तु तैस्साकं कुर्यात्पोटलिका पुनः |
अन्तरालाट्टलके सम्यक् पचेतां पाकवित्तथा ॥94॥

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

इदं चित्रतरं भक्तमेवं कृत्वा प्रदापयेत् |
अमिषस्योदनश्चायं लावुकस्याति दुर्लभः ॥95॥''
वृष्यं रोगहरं पथ्यमिन्द्रियाणां बलप्रदम् |
श्लेष्मजित् श्रमजित् बल्यमायुर्वृद्धिकरम्परम् ॥ 96॥''2

लावा पक्ष्याचे (तित्तर पक्षी) मांस प्रथमतः चांगले शिजवून घ्यावे. त्या मांसाचे तांदळाच्या दाण्याएवढे बारीक चिरून तुकडे करावे व तुपावर परतून घ्यावे. नंतर त्यात पर्पट (पापड) तसेच वर उल्लेखिलेली चित्रपाकीय ओदनसाठीची सर्व सुगंधि सामग्री आणि जिरे, धने, सैंधव, आलं, लिंबू आदि सामग्री त्यात संमिश्र करावी. पुनः त्यात लोणकढे तूप टाकून त्याची पोटली (पुरचुंडी) भात शिजविताना मध्ये सोडावी. भात पूर्ण शिजत आल्यावर त्या पुरचुंडीतील मांसासह इतर पदार्थ भातात एकत्र करून हलवून घ्यावे. असा हा चित्रविचित्र भात बनवून खाण्यासाठी प्रस्तुत करावा.

लावुक पक्ष्याच्या मांसाने युक्त असा हा भात वीर्यवर्धक, रोगनाशक, पथ्य, इन्द्रियांना बळ देणारा, कफनाशक तथा थकावट दूर करणारा आणि उत्तमप्रकारे बलकारक एवं आयुवर्धक असतो.

**(III) कदलीस्तम्भशाक (केळीच्या खांबाची भाजी) -**

''राजरम्भान्तरागर्भमादाय त्वचमुत्सृजेत् |
तन्मूलाग्रे ततश्छित्वा दात्रेण विसृजेद् बुधः ॥211॥
करवीरदलाकारं कृतं तत्तत्प्रदापयेत् |
मध्यदण्डं समादाय छिन्द्यात्तण्डुलवत्पुनः ॥212॥
दण्डमन्यं पुनश्छिन्द्यात् कणावत्तण्डुलस्य च |
चणकाकारवच्छिन्द्यात् दण्डमन्यं सुबुद्धिमान् ॥213॥
चक्राकारं च कुर्वीत स्तम्भरम्भातरुद्भवम् |
निक्षिपेत्प्रवणीभाण्डेष्वेतान् विद्वान पृथक् पृथक् ॥214॥
सैन्धवं तेषु निक्षिप्य शोभार्थं रजनीं क्षिपेत् |
जम्बीराम्लं च निक्षिप्य पचेत्तान् वन्हिना ततः ॥215॥
सम्भारादीन् विनिक्षिप्य भर्जयित्वावतारयेत् |
पूगपट्टेषु निक्षिप्य वासयेत्पूर्ववच्च तान् ॥216॥
कृत्वा तु पोटलीं विद्वान अन्तराट्टालके न्यसेत् |
प्रदद्याद्भोजने काले रम्भास्तम्भाननुत्तमान् ॥217॥
लघून् स्वादुतरान् रुच्यान् पवित्रान् पित्तनाशनान् ॥218॥''[3]

चांगला जाड भरीव असा केळीचा खांब आणून त्यातील अन्तर्गर्भ (गाभा) काढावा. वरील त्वचा काढून टाकावी तसेच त्याचा वरचा व खालचा भाग कापून टाकावा. आतील गाभ्याचे चार भाग करावेत. एक भाग घेऊन त्याचे कण्हेरीच्या पानाच्या आकाराएवढे तुकडे करावेत. दुसऱ्या भागाचे तांदळाच्या दाण्याएवढे बारीक तुकडे करावे तर तिसऱ्या भागाचे चण्याच्या (हरभऱ्याच्या) आकाराएवढे तुकडे करावेत. उरलेला चौथा भाग घेऊन त्याच्या गोल चकत्या, दात्रे असलेल्या सुरीने कराव्यात. हे सर्व वेगवेगळया आकाराचे तुकडे वेगवेगळया भांड्यात ठेवावे. नंतर त्यात सैंधव मीठ टाकावे. उत्तम रंगाने त्याची शोभा वाढावी म्हणून हळद व लिंबाचा रस घालून शिजवावे. त्यानंतर तूप व हिंगाचा तडका देऊन त्यात संभार (मसाला) घालून चांगले परतवून घ्यावे. सुगंधीत बनण्यासाठी कर्पूर, पुष्प आदि टाकून अधिवासित करावे. त्यानंतर पूगपट्टात काढून घेऊन त्याची पोटली (पुरचुंडी) अन्तराट्टालकात ठेवावी. भोजनकाली प्रस्तुत करावी. केळीच्या खांबामध्ये असलेल्या पाण्यामुळे केळीचा खांब कापल्यावर काळसर पडतो. तसेच आपले हात देखील काळपट होतात, हे होऊ नये म्हणून प्रथम त्यावर सैंधव मीठ टाकायला सांगितले. तसेच त्यात हळद व लिंबाचा रस घालायला सांगितला. ह्यामुळे भाजीचा रंग काळपट न होता सोनेरी पिवळसर होतो. काप वेगवेगळे कापत असताना त्यात जाळीसारखा भाग निघतो तो मिठामुळे आपोआप वेगळा होतो. ह्या कृतितून त्याचे सौंदर्य खुलविण्याचा प्रयत्न साधला आहेच पण त्याचबरोबर काळपटपणा व तुरट अशी चव कमी करण्याचा प्रयत्न साधला जातो. साजूक तूप, हिंग तसेच मसाल्याच्या पदार्थांनी त्याची लज्जत अधिक वाढते. तसेच सुगंधि द्रव्यांच्या अधिवासाने तयार झालेल्या पिवळसर सोनेरी व सुगंधि असा कदलीस्तंभशाक हा नेत्रसुखाय व रुचिकर होतो. असा हा शाक (भाजी) पचावयास हलका, रुचिकर, तोंडाला चव आणणारा, मधूर व पित्तशामक असतो हे नलराज आरोग्यदृष्ट्या स्पष्ट करतात.

**(IV) चणकपत्रशाक (हरभऱ्याच्या पानांची भाजी) -**

''तरुणं दलमानीय शोधयेच्चणकस्य च |
चुल्यां निधाय प्रवणीं तत्र सिञ्चेद् घृतं नवम् ॥349॥

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

सम्यक्तप्ते घृते तत्र लसुनस्य कणान् क्षिपेतं |
रामठं तत्र निक्षिप्य तद्दलं शोधितं क्षिपेतं ॥350॥
पर्पटस्य कणान् क्षिप्त्वा कुष्माण्डवटकांस्ततः |
एभिः साकं समालोड्य दर्व्या पाकं च योजयेत् ॥351॥
अवलोक्य पुनः पाकमवतार्याधिवासयेत् |
नेत्रेण वेष्टयित्वाथ भुक्तिकाले प्रदापयेत् ॥352॥
इदं स्वादुत्तरं वृष्यं पित्तघ्नं कफनाशनम् ॥353॥''[4]

ताजी, टवटवीत व कोवळी हरभऱ्याची पाने आणून स्वच्छ धुवून घ्यावीत. नंतर चुलीवर कढई ठेवून त्यात नविन ताजे तूप घालावे. तूप चांगले गरम झाल्यावर त्यात लसणाचे तुकडे व हिंग टाकून स्वच्छ केलेली हरभऱ्याची कोवळी पाने टाकावित. तसेच पापडाचे तुकडे, कोहळ्याचे तुकडे टाकून लाकडाच्या पळीने चांगले हलवावे. चांगले शिजले आहे हे पाहून चुलीवरून कढई खाली उतरवावी. कर्पूर आदि सुगंधित द्रव्यांनी सुगंधित करावे. त्यानंतर पूगपट्टात (सुपारीच्या पानाच्या वाटीत) भाजी काढून घ्यावी. जेवताना वाढावी. ही हरभऱ्याच्या पानांची भाजी अत्यंत स्वादिष्ट, वीर्यवर्धक, पित्त व कफनाशक असे कार्य करते.

**2) लेह्य -**

चाटून खाल्ल्या जाणाऱ्या पदार्थांना लेह्य पदार्थ म्हणतात. ह्यात विविध प्रकारचे लोणच्याचे पदार्थ, चटण्या, गुळांबा, साखरांबा इ. सारख्या पदार्थांचा अंतर्भाग येतो.

'नलविरचितम्-पाकदर्पणम्' या ग्रंथात 'लेह्य प्रकरणम्' मध्ये नलराज विविध लेह्य पदार्थांचे वर्णन करतात. उदाहरणादाखल 'सहकारीदिलेह्य' येथे देत आहे. तो असा-

**सहकारादिलेह्य (आंबा आदिंचा लेह्य) -**

"सुपक्वफलसंदोहं सहकारादिसम्भवम् |
आनीय सूदः शास्त्रज्ञः क्रिमिभ्यः शोधयेत् पृथक् ॥1॥
भर्जयेच्च पुनस्तानि पृथक् शर्करया सह |
तदुत्थमाहरेद्द्रव्यं त्वग्बीजानि समुत्सृजेत् ॥2॥
द्रव्ये तस्मिन् घनीभूते सिञ्चेत्किञ्चिज्जलं ततः |
द्रव्यञ्च सूक्ष्मवस्त्रेण यावल्लेह्यं तु शोधयेत् ॥3॥
आनयेत् पूगपट्टस्य नेत्राण्यथ शुभानि च |
अनेकेषु च पात्रेषु मध्ये तेषु पुनर्न्यसेत् ॥4॥
लेह्यं चाङ्गुलिकं तेषु निक्षिपेच्च पृथक् पृथक् |
ततश्च घनसारादि कल्कं तेषु च मेलयेत् ॥5॥
विचित्रवासनापुष्पैः लेह्यं सम्यक् च वासयेत् |
ततः पुष्पाणि संत्यज्य सहकुर्याच्च पोटलीः ॥6॥
पूर्ववत्स्थापनं कुर्यात् ततः शैत्योपचारकम् |
एवं विधानि लेह्यानि कर्तव्यानि बहून्यपि ॥7॥
रसनास्वगतं जाड्यं त्यजेल्लेह्यस्य सेवनात् |
एतात्पित्तहरं पथ्यं कफवातहरं परम् ॥8॥''[5]

बुद्धिमान व पाकशास्त्रात निष्णात असलेल्या पाककर्त्याने आंबा आदि पिकलेली फळे घ्यावीत. त्या फळांना कीड वगैरे नाही ना याची खात्री करून अशा फळांचा गर काढून घ्यावा. वेगवेगळया फळांचे गर वेगवेगळया भांड्यात घ्यावे. त्यात साखर घालावी व शिजवावे. शिजल्यावर त्या फळांची साल, बीया इत्यादि असल्यास काढून टाकून शिजलेला गर, फार घट्ट झाला असेल तर त्यामध्ये थोडेसे पाणी घालावे. पुन्हा जोपर्यंत लेह तयार होत नाही तोपर्यंत शिजवावा व सूक्ष्म छिद्रे असलेल्या पातळ वस्त्राने तो गाळून घ्यावा. नंतर सुंदर पूगपट्टनेत्रे घेऊन वेगवेगळा काढून घ्यावा. हा लेह बोटावर घेऊन चाटण्यायोग्य असावा. त्यानंतर कापूरादिंनी सुगंधित करावा तसेच वेगवेगळया सुगंधित पुष्पांनीही अवलेह चांगल्या प्रकारे सुगंधित करावा. नंतर ती पुष्पे काढून टाकावी. शीतल अट्टालिकेत (पदार्थ थंड करण्यासाठीची एक पेटी) ठेऊन ताडाच्या पानांनी हवा घालावी. अशा प्रकारे अनेक प्रकारचे लेह्य निर्माण करावेत. ह्यांच्या सेवनाने जीभेचा जडपणा जातो. जीभेची गेलेली चव परत येते. हा पित्तशामक असून शरीराचे पोषण करणारा तसेच चांगल्या प्रकारे कफ तथा वाताला नष्ट करणारा आहे. दैनंदिन सेवनाच्या दृष्टिने अशा पद्धतीने केलेले विविध सॉस, जाम, लोणची, गुळांबा, साखरांबा, मोरावळा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

आदि विविध पदार्थांचा मुख्य स्त्रोत अतिप्राचीन पाककल्पनांमधून प्रवाहित झालेला आहे हे सिद्ध होते. 'नलविरचितम्-पाकदर्पणम्' मध्ये लेह्य कल्पनांमध्ये मांसाहारी लेह्य वर्णित नाहीत.

**3) चोष्य -**

'महाराजनलविरचितम्-पाकदर्पणम्' ह्या ग्रंथाच्या 'ग्रंथोपक्रमः' मध्ये 'पञ्चविधभोजनस्य भेदाः' मध्ये 'चोष्य' ह्या खाद्यप्रकाराचा उल्लेख नलराज करतात. परंतु तशा प्रकारातील पाककृति ग्रंथात विशेष पहावयास मिळत नाही. असे जरी असले तरी 'क्षीरादिपाकनिरुपणम्' या अध्यायात -

"षड्भागशेषमिति तत् घटिकां प्रवदन्ति हि |
ब्रुकत्यष्टावशिष्टं तत् शर्करामिति साधकाः ॥12॥"6

असा उल्लेख आहे. लेह्य प्रकारावरच अधिक पाकसंस्करण करून, मग ते अग्निसंस्करण असेल अथवा आतप संस्करण असेल, यांच्या आधारे चोष्य कल्पना, सिद्ध केलेल्या पहावयास मिळतात. प्रचलित चोष्य प्रकारांमध्ये (चघळून खाण्याचे पदार्थ) ह्यांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. विविध प्रकारची चॉकलेट्स, आवळा कँडी, विविध फळांचे साठे उदाहरणार्थ आंब्याचे साठे, फणसाचे साठे इ.

**4) पेय –**

**पायस (खीर) –**

**विचित्रलशुनपायसनिर्माण**

"त्वचं लशुनभागानां समुत्सृज्य प्रयत्नतः ॥1॥
अग्रतो मूलतः किञ्चित् छित्वा छेदान् सुमुत्सृजेत् |
विरुढार्थं स्त्रजन्तेषां कुर्यात्सूच्यार्धतन्तुभिः ॥2॥
पायसं यावता सिद्धं तावदेव परिग्रहेत् |
यावता स्यात्क्रियाशुद्धिः तावदेव प्रयोजयेत् ॥3॥
भागान् लशुनकन्दस्य छिन्यात्सूदश्चर्तुविधम् |
तेषां विरुढगर्भस्थं समादाय समुत्सृजेत् ॥4॥
तानेव पोटलीं विद्वान् कुर्याद्वै सूक्ष्मवाससा |
काञ्चिकामिश्रिते पाके यावत्तण्डुलसम्भवे ॥5॥
कृत्वा स्थानं पचेत्सम्यगागन्धकटुमोचनात् |
पक्कं लशुनमादाय सघृतं मांसमुत्सृजेत् ॥6॥
क्षालयेद्वारिणा सम्यक् क्षीरेण पाकवित् |
चतुःकृत्वः पञ्चकृत्वः क्षालयेद्वारिणा पुनः ॥7॥
भाण्डद्वये च लशुनं निक्षिपेत्तादृशं ततः |
एकस्मिन्निक्षिपेद्भाण्डे सह्यो लशुन साभिधा ॥8॥
अन्यस्मिन् विन्यसेद्भाण्डे सहः सरलिकास्ततः |
शृतमर्धविशिष्टं च क्षीरं विश्रावयेद् बुधः ॥9॥
यथार्हं शर्करायुक्तं क्षीरं भाण्डद्वये क्षिपेत् |
निक्षिप्य पायसेऽन्यस्मिन् रम्भाफलमनुत्तमम् ॥10॥
पनसस्य फलं रम्यमपरे पायसे न्यसेत् |
कल्कं च घनसारादि निक्षिपेदुभयत्र हि ॥11॥
निक्षिपेत्तत्र जात्यादि कुसुमान्युमयत्र हि |
पायसं लघुवातघ्नं रम्यं व्याधिहरं शुभम् ॥12॥"[7]

सर्वप्रथम लसणाच्या पाकळ्या घेऊन त्यांची साल काढावी तसेच ह्या पाकळ्यांचा वरचा व खालचा काही भाग काढून टाकावा. त्या सर्व लसणाच्या पाकळ्या सुईदोऱ्यात ओवून एकत्र कराव्या व एक माळ तयार करावी. नंतर जेवढ्या प्रमाणात खीर बनवायची आहे त्यानुसार लसूण घ्यावा. ह्या लसणीचा कांदा फोडून चार भाग करून मधील दांड्यासारखा भाग काढून टाकावा. नंतर एका मलमलीच्या वस्त्रात बांधून पोटली (पुरचुंडी) करावी. मठ्ठामिश्रित तांदळाच्या कांजीमध्ये ही पोटली व लसणाची बनविलेली माळ टाकावी. जोपर्यंत त्या लसणाचा उग्र गंध उडून जाणार नाही तोपर्यंत शिजवावे. त्यानंतर हा पक्व लसूण घृतमिश्रित मांसाबरोबर घेऊन पाण्याने स्वच्छ

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(IV)| January- 2026

धुवून घ्यावा व पाककर्त्याने तो दूधासोबत शिजवावा. मग चार-पाच वेळा पाण्याने धुवून घ्यावा. अशा प्रकारे शिजवून घेतलेला हा लसूण दोन वेगवेगळया पात्रांमध्ये काढावा. त्यातील एका पात्रात दूध मसाला टाकावा आणि दुसऱ्या पात्रात सरलिका (व्हॅनिलासारखा सुगंध येणारी वनस्पती) टाकावी. नंतर दोन्ही पात्रात तापवलेले दूध व साखर घालावी. अशा तयार झालेल्या खीरीच्या एका पात्रात उत्तम प्रतीचे केळे घालावे. तर दुसऱ्या खीरीच्या पात्रात फणसाचे गरे घालावेत. दोन्ही खीर पात्रांमध्ये हिंग, कर्पूर, यांचे चूर्ण टाकावे. नंतर दोन्ही पात्रांमध्ये चमेलीची वगैरे फुले टाकावीत. भोजन समयी प्रक्षिप्त चमेलीची फुले काढून टाकावीत आणि खाण्यासाठी द्यावी. अशा प्रकारे लसूणनिर्मित खीर पचनास हलकी, वातहारक, मनोरम तसेच व्याधिविनाशक, कल्याणकारी आहे. महाराज नल यांनी पेय प्रकार सांगत असताना विविध प्रकारच्या खिरींचे, त्यांच्या निर्माणविधी व गुणांचे वर्णन केले आहे. अशाच एका लसणाच्या खिरीचे वर्णन त्यांनी केले आहे. लसूण हा उग्र गंधी, तिखट असा पदार्थ असून देखील अशा पदार्थापासूनची वैचित्र्यपूर्ण खीर कशी बनवावी हे वरील श्लोकात वर्णिलेले आहे. खाण्यासाठी मनोरम होण्यासाठी त्यात विविध सुगंधि पुष्पे, कर्पूर, दूधमसाला, तसेच सरलिकासारख्या सुगंधि वनस्पतीचा वापर केलेला आहे. दुग्ध शर्करेसह केळे तसेच फणस ह्या फलांचा वापर करून त्याचा स्वाद अधिकच वाढविला आहे. हा पायस विधि सांगताना त्याची आयुर्वेदीक उपयोगिता नलराज आवर्जून सांगतात. **"पायसं लघुवातघ्नं रम्यं व्याधिहरं शुभम् |"** अतिशय सोप्या व सूचक शब्दांतून त्या शब्दांची आयुर्वेदीक व्याप्ती दिसून येते.

**5) पर्यावरणीय अनुबंधित परंपरांचा आधुनिक काळातील बिंब-प्रतिबिंब विचार-**

'अन्न' ही सकळ प्राणीमात्राला उपजत असलेली गरज आहे. मानवाने कालौघात निसर्गदत्त अन्नावर निसर्गाच्याच सहाय्याने अन्ननिर्माण विधि आपल्या बुद्धिचातुर्याने रचले. म्हणजे निसर्ग आणि पर्यावरणाचा थेट उपयोग माणूस करीत नसला तरी अन्न संदर्भातील निसर्ग आणि पर्यावरणाशी असलेली त्याची नाळ दिक् कालातीत अबाधीतच असते. त्यामुळे थेट सत्य तथा कृत युगापासून कलियुगातील वर्तमानापर्यंत पर्यावरण आणि निसर्गाशी पाकसिद्धिच्या संदर्भात त्यास अनुबंधितच रहावे लागते. त्यामुळे प्राचीनतम परंपरा आणि वर्तमानातील जीवनशैली यांत निसर्गदत्त पदार्थांशी आणि पर्यावरणानुसार स्थल काल परिस्थितीशी अन्ननिर्माण विधिच्या संदर्भात माणसाला जुळवून घ्यावे लागते व शरीरपोषण आणि मनस्वास्थ्य यादृष्टिने कलात्मकतेने अन्नविधि निर्माण करावे लागतात. हेच वरील उदाहरणांवरून स्पष्ट होते. औद्योगिक प्रगति आणि वैज्ञानिक प्रयोगसिद्धिंसह वैश्विक जीवनशैलीत मानवाने निर्माण केलेल्या साधनांच्या गर्दीत देखील अन्नब्रह्माच्या बाबतीत त्याला आभासीविश्व अवलंबिता येत नाही.

वेदात जसे पर्यावरणातील शक्तिंचे वर्णन आहे तसेच नलराज घोषित 'पाकवेदात' अन्नाचे वर्णन आहे.

**संदर्भ**

1. त्रिपाठी (व्याख्याकार, डॉ .सं .चतुर्थ संस्करण वि / चौखम्भा संस्कृत भवन -प्रकाशक / इन्द्रदेव (आयुर्वेदाचार्य .2076 .पृष्ठ क्र / 14-15 .श्लोक क्र / 86-90.
2. तत्रैव .पृष्ठ क्र -15 .श्लोक क्र / 92-96.
3. तत्रैव .पृष्ठ क्र -31-32 .श्लोक क्र / 211-218.
4. तत्रैव .पृष्ठ क्र -51 .श्लोक क्र / 349-353.
5. तत्रैव .पृष्ठ क्र -100 .श्लोक क्र / 1-8.
6. तत्रैव .पृष्ठ क्र -110 .श्लोक क्र / 12.
7. तत्रैव .पृष्ठ क्र -83-84 .श्लोक क्र / 1-12.